# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ५२** **दि. २३/०८/२०२३**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२३/०८/२०२३ बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्रीसुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | काळे दिपमाला मनोज | मराठे जितेंद्र भगवान |
| जोहरे प्रिया मधुकर | सोनवणे अश्विन शांताराम | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर |
| नेरकर सरिता अनंत | पाटील सचिन भिमराव | पाटील रेखा चुडामण |
| पोकळे दिलीप बबनराव | चौधरी मनोज सुरेश | सोनवणे सुरेखा सुदाम |
| सोनवणे कांचन विकास | पाटील प्रतिभा सुधीर | पाटील राजेंद्र झिपरु |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील चंद्रशेखर शिवाजी | महाजन सुनिल सुपडू |
| शिंदे गायत्री उत्तम | कापसे मयुर चंद्रकांत | शेख शबानाबी सादीक |
| बाविस्कर किशोर रमेश | कापसे प्रतिभा चंद्रकांत | नाईक प्रशांत सुरेश |
| सपकाळे मिना धुडकु | देशमुख प्रतिभा गजानन | काळे रेश्मा कुंदन |
| सपकाळे रंजना भरत | पाटील विजय पुंडलिक | आहुजा मनोज नारायणदास |
| कोल्हे प्रविण रामदास | सोनवणे सुरेश माणिक | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| सनकत चेतन गणेश | बारी शोभा दिनकर | सोनार रंजना विजय |
| सोनवणे भारती कैलास | शेख हसीनाबी शरीफ | खडके सुनिल वामनराव |
| चौधरी चेतना किशोर | भिल पार्वताबाई दामु | खडके विश्वनाथ सुरेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | पाटील उषा संतोष | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| तायडे ज्योती शरद | कोल्हे सिंधु विजय | पटेल इब्राहिम मुसा |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | बरडे नितीन मनोहर | सोनवणे विक्रम किसन |
| काळे अमित पांडुरंग | बेंडाळे उज्वला मोहन | **स्विकृत सदस्य** |
| चौधरी मंगला संजय | राणे गायत्री इंद्रजित | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | जोशी अनंत हरिश्चंद्र | राजेंद्र नारायण मराठे |
| सोनवणे धीरज मुरलीधर | तायडे सुरेखा नितीन | महेश रतन चौधरी |
| भोळे सिमा सुरेश | चव्हाण ज्योती बाळासाहेब | |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, उपायुक्त. श्रीमती. निर्मला गायकवाड- फेगडे, सहा.आयुक्त. श्री.अभिजीत बाविस्कर, सहा.आयुक्त श्री.गणेश चाटे, सहा.आयुक्त. अश्विनी गायकवाड- भोसले, नगररचनाकार श्री. वि. डि. तायडे, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे, मुख्यलेखाधिकारी श्री.चंद्रकांत वानखेडे, सहा.आयुक्त(आरोग्य विभाग) श्री.उदय पाटील, शहर अभियंता, श्री.चंद्रकांत सोनगिरे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**नगरसचिव :-** नमस्कार, सर्व सन्मा.सभागृहाचे स्वागत आहे. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी वंदे मातरमसाठी उभे राहावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता १) सन्मा.सदस्या सोनवणे राखी शामकांत २) शेख सैईदा युसुफ ३) सोनवणे निता मंगलसिंग ४) सन्मा.सदस्य कोल्हे ललित विजय यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२१९ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सौ.जयश्री सुनिल महाजन, मा.महापौर | जळगांव शहर महानगरपालिका मा.महापौर यांचे स्विय सहाय्यक श्री.अशोक सिताराम भारुळे यांच्या सासुबाई स्व.सुमनबाई लक्ष्मण ठोसर यांचे दुख:द निधनाबद्दल. |
| २. | १.सौ.जयश्री सुनिल महाजन, मा.महापौर<br>२.श्री.ललित विजयराव कोल्हे, मा.सभागृहनेता<br>३.श्री.अश्विन शांताराम सोनवणे<br>४.श्री.किशोर रमेश बाविस्कर<br>५.श्री.धिरज मुरलीधर सोनवणे<br>६.सौ.सिंधू विजय कोल्हे<br>७.श्री.मनोज नारायणदास आहूजा<br>८.श्री.सुनिल वामनराव खडके | जळगांव शहर महानगरपालिकेचे जेष्ठ सन्मा. सदस्य, स्व.दत्तात्रय देवराम कोळी यांचे दुख:द निधनाबद्दल. |
| ३. | सौ.सिमा सुरेश भोळे | जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.३ चे सन्मा.सदस्य, कै.दत्तात्रय देवराम कोळी, २) प्रोफेसर कॉलनी येथील रहिवासी कै.तुकाराम रामदास चिरमाडे यांचे दुख:द निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्मांना श्रध्दांजली अर्पण केली.

**नगरसचिव :-** सर्व सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी दोन मिनीट श्रध्दांजलीसाठी उभे राहायचे आहे.

(नगरसचिव यांनी अभिनंदनाच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२२० पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सौ.जयश्री सुनिल महाजन, मा.महापौर | मा.श्री.अशोकभाऊ जैन यांनी उदयोग क्षेत्रात केलेल्या अतुलनिय कामगिरीबद्दल ए.बी.पी.माझा च्या “माझा सन्मान-२०२३” पुरस्काराने गौरव झाल्यामुळे जळगांव शहरासह देशविदेशात जैन उदयोग समुहाचे नांव लौकित झालेबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| २. | १.सौ.सिमा सुरेश भोळे<br>२.श्री.विश्वनाथ सुरेश खडके | महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांसाठी व विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जपानमधील कोयासन विदयापीठाने महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय आदरणीय उपमुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना डॉक्टरेट पदवी प्रदान केल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ३. | श्री.विशाल राधेश्याम त्रिपाठी | १)जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकिय इमारतीच्या आवारात “लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल” यांचा पुर्णाकृती |

| | | |
|---|---|---|
| | | पुतळा बसविण्याकामी स्व:खर्चाने पुतळा बनवुन आणल्याबद्दल जळगांव शहराचे आमदार मा.श्री.सुरेश दामु भोळे यांचे हार्दीक अभिनंदन.<br>२) "लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल" यांचा पुतळा बसविणेकामी त्वरीत परवानगी आणून दिल्याबद्दल मा.महापौर,सौ.जयश्री सुनिल महाजन यांचे हार्दीक अभिनंदन.<br>३) "लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल" यांचा पुतळा बसविण्याकामी ठराव पारित करुन दिल्याबद्दल तत्कालीन मा.महापौर,सौ.सिमा सुरेश भोळे यांचे हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने हे सभागृह अभिनंदन करीत असुन त्यांचे उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

**श्री.अनंत जोशी :-** आपला ठराव देखील झालेला आहे, आकाशवाणी चौकात सिग्नलची व्यवस्था लवकरात लवकर करा ऐवढीच विनंती आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** डॉ.विश्वेश अग्रवालचा जो दवाखाना आहे तेथील जो अंडरपास आहे त्या ठिकाणी पण गतीरोधक टाकण्यात यावा. आता बंटीने विषय काढला, बंटीला तुम्ही बोलु देता, आम्हाला बोलु देत नाही असे आहे का ? आम्ही पण चांगलाच विषय मांडतो ना, चुकीचा विषय मांडत नाही. या दोन्ही ठिकाणी महापौर महोदया.

**नगरसचिव :-** नमस्कार, सर्व सन्मा.सभागृहाचे स्वागत आहे. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी वंदे मातरमसाठी उभे राहावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरूकरण्याचे निर्देश दिले.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता १) सन्मा.सदस्या. सोनवणे राखी शामकांत २) सईदा बी शेख युसुफ ३) सोनवणे निता मंगलसिंग ४) कोल्हे ललित विजय यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**श्री.ईब्राहिम पटेल :-** विशालभाऊ बोलत आहे. आजचा दिवस हा ऐतिहासीक दिवस आहे. कारण की आज आपण, आपला जो चंद्रयाण-३ आहे.संध्याकाळी ५.०० वा ५.३० वा. चंद्रावर उतरणार आहे. त्यामुळे भारतीयांसाठी आपल्यासाठी हा गर्वाचा दिवस आहे. अभिमानाचा दिवस आहे. तर हा प्रस्ताव आपण सर्व शासनाचे म्हणा, सर्व भारतीयांचा अभिनंदनाचा प्रस्ताव पारित करण्यात यावा सर्वांकडुन. आज एतिहासीक दिवस आहे आपण चंद्रावरती पाय ठेवणार आहे.

(बाजार रोडचे नागरीक सभागृहात मा.महापौर यांचेकडे तक्रार मांडण्याकरीता आले.)

**नागरीक :-** आम्ही बाजार रोडचे राहणारे नागरीक, मॅडम आम्ही प्रभाग क्र.२ मध्ये बाजार रोडला राहतो, तेथे एक ९ मिटर आणि एक १२ मिटरचा रस्ता आहे. आणि जवळपास १५ ते २० वर्षापासुन आम्ही तेथे राहतो आहे. १५ ते २० वर्षात फक्त दोनच वेळी तो रस्ता बनविण्यात आला आहे. आणि त्या रस्त्यावर बाजार भरतो दर बुधवारी, दर बुधवारी त्या रस्त्यावर बाजार भरतो, आणि महानगरपालिकेला २ ते २.५ लाख रुपये दर आठवडयाला मिळतात. पण इतके असुन सुध्दा आता पर्यंत १५ ते २० वर्षामध्ये त्या रस्त्यावर फक्त दोनच वेळी डांबरीकरण झालेले आहे. आणि १० वर्षापासुन डांबरीकरण झालेले नाही. रस्ता पुर्ण धुरमय झालेला आहे, जागोजागी खड्डे झालेले आहे. आणि चिखलाचे सामराज्य तेथे आहे. म्हातारे लोकांना चालणे सुध्दा मुश्किल आहे, ते पडतात पायांचे फ्रॅक्चर होतात त्यांचे.त्यांना खुप त्रास आहे. आणि दुसरे आता इतके झालेनंतर महानगरपालिकेने काम हातात घेतलेले आहे आणि ९ मिटर रस्त्याची वर्कऑर्डर काढण्यात आलेली आहे. ९ मिटर रस्त्याची वर्कऑडर काढल्यानंतर आमच्या येथील काही नगरसेवक यांची ईच्छा आहे की, तो रस्ता १२ मिटरचा व्हावा.तो काही मेन रोड नाही, कोणाचा बायपास नाही आणि तेथे काही इंडस्ट्रीयल एरिया पण नाही. तेथे १२ मिटरच्या रस्त्याची गरज नाही आणि नागरीकांनी सुध्दा त्याची मागणी केलेली नाही. असे असुन सुध्दा तो रस्ता १२ मिटरचा व्हावा, आणि नगरपालिकेने आमची जागा अधिग्रहण करण्याकरीता आम्हाला नोटीसा दिलेल्या आहेत. पण आजची कन्डीशनमध्ये आम्हाला तो रस्ता ९ मिटरचा जश्या वर्कऑर्डर निघालेली आहे सहा महिन्या आधी तसा तो रस्ता पुर्ण मिळावा आणि १२ मिटरचा रस्ता तुम्हाला करायचाच असेल

तर नियमाप्रमाणे जी जागा तुम्ही आमची अधिग्रहण कराल. त्याचा आम्हाला मोबदला द्या.किंवा जे बैठक मध्ये होईल तेव्हा आम्ही त्याचा विचार करु. पण आजच्या कन्डीशनला जो रस्ता आहे ९ मिटरचा तो करण्यात यावा.

**मा.महापौर :-** ज्या प्रमाणे वर्कऑर्डर असेल त्या प्रमाणे त्याचे काम होईल कारण वर्कऑर्डरच्या बाहेर काम करता येत नाही.

**नागरीक :-** धन्यवाद मॅडम.

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये विषय असा आहे की,

**श्री.अश्विन सोनवणे :-** मी काय म्हणतो भाऊ आपण सभागृहाचे कामकाज सुरू करा आणि यांना महापौर कार्यालयात बोलावुन चर्चा करून घ्या.

**मा.उपमहापौर :-** ठिक आहे ना.

**मा.महापौर :-** सभा कामकाजाला सुरूवात करावी.

**श्री.अश्विन सोनवणे :-** महापौरताई

**मा.महापौर :-** बोला.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मागच्या वेळी आपण सांगीतले होते की आपण शहरातील जे खड्डे आहेत.आता पावसाळा असल्यामुळे ते रिपेअरिंग करू शकत नाहीत. तर ते कमीत कमी मुरूम ने तरी बुजविले गेले पाहीजे. कारण आता पावसाळ्यात खड्डयांचे प्रमाण वाढत आहे. नंतर ज्या ठिकाणी चिखल आहे ते रिपेअरिंग करायला सांगीतलेले होते. तर पाच सात दिवस काम झाले त्यानंतर काम तसेचे तसे आहे. शहरात खड्डयांचे प्रमाण वाढलेले आहे लोकं ओरडता आहेत. काल रिंगरोडला एक महिला पडली खड्डयात तर याच्यावर काय कारवाई करणार आहेत तुम्ही बोलले होते की आपण त्यांच्यावर कारवाई करू आणि याचा अहवाल सात दिवसांत आम्हाला भेटणार आहे. कारवाई झालेली दिसत नाही आणि खड्डे जसेच्या तसे आहेत. खड्डे बुजविले गेलेले नाहीयेत.

**श्रीमती. सरिता नेरकर :-** अश्विनभाऊ माझ्याही वॉर्डात खुप खड्डे झालेले आहेत तर ते अजुनही बुजविले गेलेले नाहीयेत तर ते बुजविण्यात यावे.

**मा.महापौर :-** ठिक आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** सन्मा.सभागृहाच्या लक्षात आणुन देवु ईच्छितो की जसे आता अश्विनभाऊं म्हणत आहेत की त्यांनी रस्ते दुरूस्तीच्या बाबतीत काय कार्यवाही केलेली आहे. तर आपण रस्ते दुरूस्तीचे प्रभाग वाईज जी निविदा प्रक्रीया राबवली होती. त्याला आपण तिसऱ्यांदा प्रक्रीया केलेली आहे. कुठल्याही ठेकेदाराने आजपर्यंत टेंडर भरून निविदा केलेली नाहीये.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मग आता मला हाच विषय विचारायचा आहे की कोणी करत नसेल तर महापालिकेचा खर्च करून दुरूस्ती करून टाका. ते करत नाहीत तर दुरूस्त करत नाही का आपण.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** नाही नाही भाऊ तस नाहीये . आपण तिसऱ्यांदा कॉल केलेले आहे आणि कॉन्ट्रॅक्टर लोकांची सुध्दा बैठक आपण घेतली की तुमची काय अडचण आहे. तर त्यांनी आपल्याला असे सांगीतले की डाबंरीकरणाचे जे खडीकरण करणे आणि डांबरीकरण करणे , रस्ते वर्षभर दुरूस्ती करणे. तर आतापर्यंत जे प्रस्ताव केलेले होते तर त्यांच्या डांबरीकरणाच्या ॲटमच्या बाबतीत त्यांच ऑब्जेक्शन होते की हे ॲटम आपल्याला करता येणार नाही.

**श्री.मनोज चौधरी :-** साहेब मागचा पावसाळा गेला आणि आता हा दुसरा पावसाळा आला आहे. तुम्ही हे कारण नका सांगु .

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ मागच्या पावसाळयाचे जे काम होते . तर आपण त्यांची बैठक घेवुन त्यांची समस्या सॉल केलेल्या आहे. आता हे टेंडर भरले जातील.

**श्री.अश्विन सोनवणे :-** लवकरात लवकर करा ते

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** हो भाऊ, तुम्ही जे रिंगरोडचे सांगत आहात ना तर तो फक्त रिंगरोडचाच विषय आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** लवकरात लवकर करा ते

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** फक्त एकच सांगु ईच्छितो की तुम्ही जो रिंगरोडचा विषय मांडत आहात ना तर तो रिंगरोडचा विषय हा ४२ कोटींचा रस्ता आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ४२ कोटींचा रस्ता आहे मान्य आहे. पण तो झालाच नाहीये ना, जर झाला असता तर तिथे जे खड्डे पडले आहे तर ते तुम्ही दुरस्त करून घ्या. महापालिका म्हणुन ती आपली जबाबदारी आहे ना

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** हो भाऊ, त्याची वर्कऑर्डर ऑलरेडी दिली गेलेली आहे आणि तिथे आपण महापालिकेने खर्च करणे योग्य होईल का ? कारण कॉन्ट्रक्ट दिला आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** अहो लोक आपल्याकडे कर भरत आहेत ना तो ४२ कोटींच्या याच्यात आहे तर तो सहा महिने खड्डे बुजणार नाही का?

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ मंजुरी दिली पाहीजे ना.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मग तुम्ही सांगा ना खड्डे बुजवायला नाहीतर ॲक्शन घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** यासंदर्भात तुम्ही PWD ला संपर्क करा की याचे कार्यादेश तुम्ही दिलेले आहेत आणि याच्यावर कुठलीही कार्यवाही दिसुन येत नाही आणि तुम्ही पत्रव्यवहार तर करू शकतात ना, डांबरीकरणाचे काम तर नंतर सुरू होईल.

**श्री.अश्विन सोनवणे :-** डांबरीकरणाचे काम सुरू होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** भाऊ तो रस्ता

**श्री.अश्विन सोनवणे :-** तो करत नाही तर तुम्ही ॲक्शन घ्या ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** करा ना त्यांच्यावर प्रेशर क्रीयेट करा ना.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मग , रस्ते दुरूस्त झाले नाही, चिखल ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी मुरूम टाका.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ त्याठिकाणी खडीकरण करणे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नाही मला सांगा कुठे आहे आता तो

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** त्याच्याकडे जी वर्कऑर्डर आहे ना

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौरताई मी काय म्हणतोय.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ईबाभाऊ दोन मिनिंट माझ बोलण होवू द्या मग बोला.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ कस आहे मी आज शिवाजी नगरच्या रस्त्याचे काम दिले आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** कधी करत आहात सुरूवात मला हे सांगा.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** मी B&C ला आजच पत्र देतो भाऊ

**श्री.अश्विन सोनवणे :-** पत्र देवुन काय फायदा आहे .पत्र दिल्याने काय होत आणि ते पत्र आठ दिवसांनी जात स्वत: जा ना तिथे बांधकाम विभागात

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** बोलतो मी सोनवणे साहेबांशी

**श्री.अश्विन सोनवणे :-** फोन लावा पण ते खड्डे बुजवा कारण की लोकं मरत आहेत बर का

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ रिंग रोडचे सांगतो मी

**श्री.अश्विन सोनवणे :-** लोक मेलेले आहेत तिथे आणि लोकं आम्हाला सर्वांना शिव्या देत आहेत

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त महोदया आपण बोलाव. कारण आयुक्त म्हणुन आपला प्रभाव वेगळा पडतो आणि अधिकाऱ्यांचा प्रभाव वेगळा पडतो.

**मा.आयुक्त :-** सर आम्ही बोललो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि पाहीजे तसा प्रतिसाद मिळत नाही तिथुन

**मा.आयुक्त :-** सर आम्ही त्यांच्याशी प्रत्यक्ष बोललो आणि मा.आमदार साहेबांचही घर आहे तरी त्यांनी सुध्दा समक्ष बोलले की याच्या आधी तुम्ही खड्डे तरी बुजवुन द्या. कारण आता काय होत आहे की वर्कऑर्डर त्यांच्याकडे आणि आम्ही बोलायचे त्यांना

**श्री.नितीन लढ्ढा :-** या संदर्भात अधिकारी वर्गाची एक मिटींग लावा आणि त्यांना जाणीव करून द्या की हा गंभीर विषय आहे की कार्यादेश त्यांच्याकडे असतांना आपण रस्ते दुरूस्तीला खर्च करू शकत नाही आणि त्याचा त्रास महापालिकेला सहन करावा लागतो.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.अश्विन सोनवणे :-** कमीत कमी खड्डे दुरूस्त तरी करून द्यायला लावा त्यांना.

**मा.आयुक्त :-** सर आता हे ४२ कोटींच्या रस्त्याचे काम आहे

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ४२ कोटींच्या रस्त्यांच्या कामांच काय आहे.

**मा.उपमहापौर :-** आता आपले ४२ कोटींचे जे कार्यादेश आहेत ते दिले गेलेले आहेत. आता लोकं असे सभागृहात अशा प्रकारे येवुन आपल्याला विचारतात.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.मनोज चौधरी :-** लोक आम्हाला व्हिडीओ टाकत राहतात फक्त , काय गरज आहे त्यांना आंत यायची आणि परवानगी कोण देत त्यांना आत यायची.

**श्री.अश्विन सोनवणे :-** दुसरा विषय असा आहे की, उदय पाटील यांनी एक महिन्याचा पिरियेड दिलेला होता शहरातील कचऱ्या संदर्भात तर काय काय कार्यवाही केली तुम्ही ते सांगा. कारण आता मॅडमांनी स्वत: चेक केले आहे त्याच्यामध्ये माती दगड आढळले तर त्याच्यावर तुम्ही काय ॲक्शन घेत आहेत. तुम्ही शहरात फिरायला पाहीजे ना, फिरतांना दिसत नाही तुम्ही , शहरात फिरायला पाहीजे ना, राऊंड मारायला पाहीजे साफसफाई होते आहे की नाही होत आहे. कुठला कुठला कचरा उचलला जातो. तुम्ही फक्त महासभेला शब्द देतात आणि नंतर जशीच्या तशी परिस्थिती होते. द्या उत्तर द्या.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** सन्मा.व्यासपिठ, सन्मा.सभागृह अश्विन भाऊंनी मागील सभेमध्ये कचऱ्यासंदर्भात काही प्रश्न प्रश्न उपस्थित केलेले होते. तर याच्या संदर्भात मागील महासभेत त्यांना असे आश्वस्त केलेल होत की आपले शहरातील जे वॉर्ड आहेत तर त्यांची सर्वांची माहिती संकलित करू तर त्या अहवाल आला त्याच्या अंती या फेऱ्या शहरातील कमी केलेल्या आहे. यापुर्वी घंटागाडीच्या ज्या फेऱ्या होत्या तर ती घंटागाडी दोनच फेऱ्या मारीत होती. परंतू आपल्या शहरामध्ये कचरा उचलला जात नसेल तर संकलीत करणे त्यांना क्रमप्राप्त आहे. तर आज रोजी शहरातील प्रत्येक घंटागाडीच्या या काही ठिकाणी तक्रारी अशा प्राप्त झाल्या आहेत की घटांगाड्या येत नाहीत आणि मला असे अपेक्षित आहे की.

**श्री.अश्विन सोनवणे :-** अहो शहरातील कचरा जो आहे. तो उचलण्यासाठी त्याने भाड्याने ट्रॅक्टर लावलेले आहेत. टनावर लावलेले आहेत पण टनावर भरलेले काय आहे त्याने त्यात दगड माती काय भरलेले आहे हे तुम्ही पाहीले पाहीजे ना आता ठिक आहे लोक घंटागाडी मध्ये कचरा टाकत आहेत. पण काही काही स्पॉट वर आजही कचरा दिसतोय ना, त्याचे वाहन जे आहे तो ते कचरा उचलत नाहीये आणि त्याला वर्कऑर्डर दिलेली आहे की इतके वजन भरणार नाही तर त्याला पैसे भेटणार नाहीये. त्याच्यामुळे ते दगड माती टाकतात.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** भाऊ आपण

**श्री.अश्विन सोनवणे :-** ठिक आहे आता किती लक्ष दिले आहे तुम्ही

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** भाऊ मागच्या

**श्री.अश्विन सोनवणे :-** कचरा जसाचा तसा दिसतोय. आता तुम्ही पहा पदमालय रेस्ट हाऊस जवळ आपण टर्न मारतो तिथे पाहा किती कचरा आहे तर तो आठ दिवसांपासुन कचरा पडलेला आहे तिथे, त्या रोडाने रोज जातो मी , जर तुमच म्हणण आहे की रोज कचरा उचलला जातो तर मग आठ दिवसांपासुन तिथे कचरा कसा काय आहे. तुम्ही राऊंड मारा ना राऊंड मारायला पाहीजे. सकाळी सकाळी शहरात राऊंड मारायला पाहीजे कचरा उचलता आहे की नाही. कचरा दिसला की जे संबंधित आहे त्यांना बोलावुन तो कचरा उचलला गेला पाहीजे. उचललाच जात नाहीये.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** भाऊ आपण जो कचरा उचलला जातो आहे तर तो सरासरी जर बघितला तर तो तिस टन म्हणजे दररोज तिस टन कचऱ्याचे संकलन होत आहे आणि मागील काही महिन्यात त्याला ४५ हजार रूपयांचा त्याला आपण दंडही केलेला आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** म्हणजे महिन्याभरात ४५ हजार , फक्त ४५ हजार आणि बिल घेतोय तो करोडोंचे

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** भाऊ हा दंड कसला काही की जर कचऱ्यामध्ये माती आढळुन आली तर.

**श्री.अश्विन सोनवणे :-** हे झाले दंडाचे आता मला सांगा आठ दिवसांपासुन कचरा पडलेला आहे तिथे पदमालय रेस्ट हाऊसच्या रस्त्यावर त्याच्यावर तुम्ही दंड केला का?

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** भाऊ कचरा जर दिसला तर १०० टक्के कचरा उचलला जातो पण मला आढळुन आला नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्याचाही दंड तुम्ही केला पाहीजे ना

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** नाही भाऊ काय आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही शहरात राऊंड मारायला पाहीजे तुमच्याकडे ती जबाबदारी आहे. तुम्ही राऊंड मारा ना शहरामध्ये कचरा कुठे आहे असला की बर दिसणार नाही.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** आठ दिवसापासुन कचरा

**श्री.अश्विन सोनवणे :-** म्हणजे विषय असा झालेला आहे की, जो करोडोंचे बिल काढतो त्याला आपण दोन चार लाखांचा दंड लावुन देतो दोन चार लाख रूपये दंड आपण त्याच्याकडून भरून घेतो तस नाही व्हायला पाहीजे ना

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** भाऊ प्रत्येक वॉर्डांमध्ये जे वाहन दिलेले आहे त्या वाहनाद्वारे प्रत्येक वॉर्डात वाहने मी चेक करतो की त्या वाहनामध्ये किती कचरा आहे. गाळ आहे की माती आहे जर असेल तर त्याच सुध्दा रजिष्टर आपल्याकडे मेंटेंन केलेले आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आमच अस म्हणण आहे की तुम्ही शहरात फिरा आणि आठ आठ दिवस कचरा उचलला जात नसेल आणि मग कचऱ्याच वजन बरोबर भरत आहे तुमच काम आहे. आठ आठ दिवस कचरा उचलला जात नाहीये मग तिथे वजन कस काय पोहचत आहे हे तुम्ही राऊंड मारा ना

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** भाऊ कचऱ्याच वजन आपण पुर्वी

**श्री.अश्विन सोनवणे :-** लोक लिफ्टमध्ये आपल्या विषयी शिवीगाळ करत आहेत. लिफ्टमध्ये शिव्या लिहुन ठेवल्या आहेत. पेपरात आली आहे ती बातमी , पुण्यनगरीला बातमी आली आहे. लिफ्टमध्ये शिव्या दिलेल्या आहेत अधिकाऱ्यांना , लक्ष द्यायला पाहीजे ना आपण

**श्री.ईब्राहीम पटेल :-** मागच्या वर्षीपण दंड माफ केलेला आहे त्याला

**श्री.अश्विन सोनवणे :-** हो मग

**श्री.ईब्राहीम पटेल :-** दंड माफ केलेला आहे त्याला

**श्री.अश्विन सोनवणे :-** हो ते तर दंड माफ केलेला आहे.

**श्री. नितीन बरडे :-** दंड टाकता का हे पण ते ही पाहुन घ्या.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मॅडम हे जो पर्यंत हे राऊंड मारत नाहीत अधिकारी यांना तुम्ही सक्त ताकीद द्या. शहरात राऊंड मारायला लावा जिथे साफसफाई होत नाही तिथे व्यवस्थित साफसफाई व्हायला पाहीजे काहीच होत नाही. १५-१५ दिवस एक एक महिना गाड्याच येत नाहीत वॉर्डामध्ये आणि पगार पुर्ण घेतात , बिल पुर्ण काढतात ठेकेदाराचे चालले काय आहे हे

**श्री. नितीन बरडे :-** गटारी काढायचा आणि साफसफाईचा दंड टाकलेला आहे का आजपर्यंत अश्विनभाऊ ते बघा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** कचराच उचलत नाही तर हे काय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय आहे परिस्थिती की काय आहे की लोकांचा भुर्दंड हा नगरसेवकांना सहन करावा लागत आहे. सामान्य नागरीक हा नगरसेवकाकडे तक्रार करतो आणि प्रत्येक समस्येच लिपीक किंवा एस.आय. ला नगरसेवकांना सांगाव लागत हे हि कुठेतरी योग्य नाहीये.

**श्री.अश्विन सोनवणे :-** भाऊ मॅडमांना फोटो टाकला होता की ते स्वत: कचरा टाकत होते. गटारीची परिस्थिती वाईट आहे आणि

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय आहे आज गटारींची परिस्थिती अत्यंत विदारक आहे. म्हणजे तिन तिन फुट खोल असलेल्या गटारी फक्त चार चार , सहा सहा इंच खाली दिसतात.

**मा.आयुक्त :-** सर आपण याच्यामध्ये आपले काही अधिकारी आहेत तर आपण त्यांना याकरीता त्यांना दत्तक अधिकारी म्हणुन दिलेले आहे ते स्वत: सकाळी राऊंड घेतात सकाळी १० ते १२ पर्यंत आणि एस आय सोबत बांधकामचा इंजिनियर यांनी नाले सफाई , कचरा उचलणे आणि रस्ते सफाई याचा अहवाल एकत्रिक करून आपण HOD मिटींग मध्ये हे प्रश्न सॉल करतो हे प्रश्न सॉल झाले पाहीजे म्हणुन.

**श्री.अश्विन सोनवणे :-** जर आपण मिटींगमध्ये हे चालु केल आणि नगरसेवकांनी ही सांगा म्हणजे ते ही सांगतील. एक विषय अजुन आहे. आपल्या शहराचे नेते माजी मंत्री सुरेशदादा जैन यांची ज्यावेळेला नगरपालिकेवर सत्ता होती. त्यावेळी सामान्य लोकांसाठी त्यांनी जवळ जवळ बारा ते पंधरा दवाखाने त्यावेळेला शहरात चालु केलेले होते. त्यावेळी जळगांव शहरातील सर्व दवाखान्यांसाठी प्रमुख वैद्यकीय अधिकारी शांतारामदादा सोनवणे होते. त्यावेळेला लोकांना चांगल्याप्रकारे सुविधा मिळत होत्या. पण आजची परिस्थिती अशी आहे आपल्या दवाखान्यांची की ते बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. शिवाजी नगर दवाखान्यात तिथली डिलेव्हरी बंद करून टाकली आहे. चेतनदास मध्ये डिलेव्हरी बंद करून टाकली आहे. जायच कुठे गोरगरिब , सामान्य लोकांनी जायच कुठे? तिन तिन चार चार हजार रूपये कुठे भरतील. आपले शाहु महाराज हॉस्पीटल आपण रामदास पाटील ट्रस्ट , पिपल्स बँक वाल्यांना देवुन टाकले आहे. तर ते सुध्दा आपल्या आता नियम अटी शर्तीनुसार ठरलेले होते. त्यानुसार तेही करत नाहीये ना ते पण आता नॉर्मल डिलेव्हरीचे पंधरा-पंधरा विस विस हजार रूपये घ्यायला लागले आहे. सिझर झाले तर तिस तिस , चाळीस चाळीस हजार रूपये बिल मागायला लागले आहेत आणि डिलेव्हरी झाल्यानंतर ते म्हणतात की बाळाला पेटीत टाकावे लागेल. त्याचा दोन हजार रूपये रोज द्यावा लागेल. कुठुन देतील गोरगरीब , सामान्य लोक कुठुन देतील. जर ट्रस्टला आपण चालवायला दिलेले आहे तर त्या ट्रस्ट चे काम आहे की त्या गोरगरीब लोकांना त्यांनी मोफत सेवा दिली पाहीजे.

त्याला तर आता शासनाची पण मान्यता मिळालेली आहे. ज्या महात्मा ज्योतिबा फुले योजना असेल तर हे त्या योजने मध्ये आहे हे सगळ , तर माझ अस म्हणण आहे की जे गोरगरीब लोक आहेत ते कुठे जातील. कुठुन देतील ते पैसे, त्यांनी बाकीचे डिपार्टमेंट चालु केले , तिथे हार्ट चे असेल , ऑर्थोपेडीक असेल तर तिथे चालु केले याचे आपले काही म्हणणे नाही पण आपल्या ज्या महापालिकेच्या अटी शर्ती होत्या. आपण जश्या सेवा देत होते त्यानुसारच आपण त्यांच्याशी ॲग्रीमेंट केलेले आहे. तर त्यांनी त्यानुसार ती सेवा दिली पाहीजे. सेवा पुरवली पाहीजे ती सेवा दिली जात नाहीये. मग गोरगरीब लोक कुठे जातील ते लोक कुठुन भरतील तिस तिस / चाळीस चाळीस हजार , दोन हजार रूपये पेटीत टाकतात काही कारण नसतांना हे काय आहे. कुठुन भरतील. मॅडम आता आपल्या या दोन्ही तिन्ही दवाखान्यांमध्ये डिलेव्हरी चालु झाल्या पाहीजे. आपल्याकडे डॉक्टर आहेत. MBBS डॉक्टर आहेत. दुसरे दहा बारा डॉक्टर आहेत. आपण त्यांना पगार देतोच आहे ना , सगळे पगार घेत आहेत तर बंद करायच कारण काय आहे. चालु करा ना ते , चालु करायला पाहीजे आणि शाहु महाराज हॉस्पीटल जे आहे ते अटी शर्तीनुसार करीत असतील तर ठिक आहे नाही तर कारवाई करा मॅडम , गोरगरीब लोकांसाठी आपण करायलाच पाहीजे कुठुन आणतील ते तिस तिस/ चाळीस चाळीस हजार रूपये.

**मा.आयुक्त :-** सर आपण आपले नर्सिंग होम सुरू करण्यासाठी तिन ते चारदा जाहिरातीही दिल्या डॉक्टरांसाठी पण त्यांच अस म्हणणे आहे की पर्मनंट पोस्ट असतील आणि कमी पेमेंटमध्ये कामही करतील. यामुळे अजुन ते झालेले नाहीये.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मॅडम यापुर्वी आपल्या दवाखान्यांमध्ये शहरातील मोठ मोठे डॉक्टर येत होते. काय हो नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो बरोबर आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आहेत ना भरपुर डॉक्टर आहेत जे सेवा द्यायला तयार आहेत.

**मा.आयुक्त :-** संस्थेच्या अनुषंगाने उदय पाटील याची माहिती घ्या आणि करूया.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मग आता आपण ते चालुच करणार नाहीत का ते सेक्शन , त्यावेळी बारा ते पंधरा हॉस्पीटल टाकले त्यांनी आणि तुम्ही ते बंद करत आहात हि काय पध्दत आहे.

**मा.आयुक्त :-** आकृतीबंधाच्या अनुषंगाने आता जे मंजुर झालेले आहेत तर आता आपल्याला कंत्राटी पध्दतीने डॉक्टरांना घेता येणार नाही. यासाठी आपण तिन ते चार जाहिराती झाल्या आपल्या पण डॉक्टर मिळत नाहीत.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मग MBBS  डॉक्टर तर आहेत ना आपल्याकडे

**मा.आयुक्त :-** नाही सर तस नाहीये , डिलेव्हरीसाठी MBBS चालत नाही त्यासाठी MD गायनॅक किंवा मग DGO लागतात आपल्याला पण कोणीही येत नाही. सर आपण पार्ट टाईम पण रिक्वेस्ट सुध्दा केली पण ते नाही सांगतात.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आता शाहु महाराज हॉस्पीटलचे काय आहे.

**मा.आयुक्त :-** सर मी त्यांना तेच सांगीतले ना

**श्री.अश्विन सोनवणे :-** आता शववाहीका जी आहे ती बंद पडलेली आहे. सुरेशदादा होते तेव्हा दोन ते तिन रूग्णवाहीका होत्या , शववाहीका होत्या. दवाखान्यांची स्थिती काय होती आणि आजची परिस्थिती काय आहे. तर कुठे जातील सामान्य लोक चाळीस चाळीस हजार रूपये बिल कुठुन भरतील

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** भाऊ दवाखान्याच्या बाबतीमध्ये सन्मा.नगरसेवक श्री.महेश चौधरी यांनी तक्रार केलेली आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्यांनी हि तक्रार दिलेली आहे. भाऊ तुम्हाला किती दिवस झाले पत्र देवुन

**श्री.महेश चौधरी :-** १२/०४/२०२३ ला दिले होते भाऊ पत्र

**श्री.अश्विन सोनवणे :-** पहा एप्रिल महिन्यात दिलेली आहे त्यांनी काय झाले त्याचे

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** त्या तक्रारीच्या अनुषंगाने आपण प्रमुख वैद्यकीय अधिकारी यांचीही चौकशी तयार केलेली होती आणि पिपल्स बँकेला जे दिलेले आहे त्यांचाही खुलासा मागविलेला होता. त्यांचा खुलासा मागविल्या नंतर त्या तक्रारीमध्ये

**श्री.अश्विन सोनवणे :-** खुलासा काय मागवता तुम्ही खुलाश्यात कोणी कबुल करते का की आम्ही अस करत आहेत.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** नाही नाही भाऊ मी काय.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही स्पष्ट सांगा त्यांना मनपाच्या अटी शर्तीनुसार चालवा दवाखाना तुम्ही घेत आहेत ना लोकांकडून पैसे, ट्रस्टचा अर्थ काय आहे की गोरगरीबांना मोफत सेवा मिळाली पाहीजे, फुकटात सेवा मिळाली पाहीजे ना, त्यामध्ये टाका तुम्ही की हे तुम्हाला करावच लागेल. खुलासा काय आहे खुलाश्यात कोण मान्य करणार आहे.

खुलाश्याची प्रक्रीया चालुच ठेवणार आहे का आपण कमीत कमी लोकांसाठी तुम्ही हे तरी करा, बाकीच आमच काहीच म्हणण नाहीये ना

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर मी महेशभाऊ चौधरी यांना दोनदा भेटलो. त्यांच्या ऑफीसला गेलो त्या बाबतीमध्ये जी काही भिन्नता होती. त्यासाठीचे डॉक्युमेट घेतले. तसे मी त्यांना भेटण्यासाठी पण मागच्या आठवड्यात गेलो होतो त्यांना वेळ नव्हता. मी स्वत: त्यांना चार ते पाचदा संपर्क केला की चौकशी पुर्ण करून आपल्याला अहवाल सादर करायचा आहे. तर काल त्यांनी मला बरेचशे मुद्दे दिले त्या अनुषंगाने अहवाल प्राप्त झालेला आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** लोक त्यांना बिल मागतात त्यांना बिलही दिले जात नाही. तुम्ही हे जे संस्थेवाल्यांना त्यांना स्वत: बोलवा आणि नितीनभाऊ तुम्ही पण त्यांना बोलवा मिटीगं घ्या आणि या विषयावर तोडगा निघाला पाहीजे. कारण गोरगरीबांचे खुप हाल होत आहेत. कुठुन आणतील लोक तिस तिस/ चाळीस चाळीस हजार रूपये , आणि तिथे बोर्ड लावा आधी त्याचा

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे हॉस्पीटल या संस्थेला देण्याचा मागचा हेतू आपला असा होता की चांगल्या दर्जेदार सेवा गरीब रूग्णांना मिळायला पाहीजे. त्या अनुषंगाने नागरीकांचे काही तथ्य असल्याशिवाय विनाकारण काही तक्रारी करत नाहीत. परंतू तक्रारीमध्ये काही तथ्य असेल तर आपण त्या प्रतिष्ठानच्या व्यवस्थापकांना बोलावावे आणि त्यांच्या सोबत चर्चा करावी आणि त्याच्यामध्ये पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीकोनातुन नाकरीकांना ठळक स्वरूपात माहिती उपलब्ध करून देण्यात यावी.

**मा.आयुक्त :-** सर आपण या तक्रारीच्या अनुषंगाने एक पारदर्शक रिपोर्ट तयार करून त्यानुसार काम करण्यासाठी त्यांना सांगु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मॅडम नागरीकांना उपलब्ध करून देण्यात यावे की कुठल्या कुठल्या सुविधा त्यांना मोफत दिल्या जातात.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ज्या सुविधा आहेत त्या सुध्दा त्यांना मोफत दिल्या पाहीजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे प्रत्येक नागरीक बिल मागेल अस काही नाहीये. परंतू प्रत्येक नागरीकाला तेथील दरपत्रक काय आहे ते दाखवायच आहे.

**मा.महापौर :-** आपल्या महानगरपालिकेमध्ये नविन उपायुक्त व सहा.आयुक्त रूजू झालेले आहेत. त्यांचा परिचय गोराणेसाहेब आपल्याला करून देतील.

**नगरसचिव :-** जळगांव महानगरपालिकेमध्ये नुकतेच नविन अधिकारी आलेले आहेत. त्यांची नावे पुढील प्रमाणे सौ.पल्लवी भागवत मॅडम अति.आयुक्त त्या हजर झालेल्या आहे परंतू रजेवर आहेत. त्यानंतर श्री.अविनाश गांगोडे साहेब ते उपायुक्त म्हणुन आलेले आहेत त्यांच्याकडे सामान्य प्रशासन विभाग देण्यात आलेला आहे ते हजर झालेले आहेत. तदनंतर श्रीमती निर्मला गायकवाड-फेगडे, उपायुक्त म्हणुन त्यांच्याकडे पुर्ण महसुल डिपार्टमेंट आहे. त्यानंतर दवाखाने वगैरे सगळे डिपार्टमेंट यांच्याकडे देण्यात आलेले आहेत. तदनंतर श्री.मारोती मुळे, मुख्यलेखापरिक्षक म्हणुन त्यांचे आदेश झालेले आहेत परंतू ते हजर झालेले नाहीत. तदनंतर श्रीमती. अश्विनी गायकवाड-भोसले या सहा.आयुक्त म्हणुन जळगांव महानगरपालिकेत हजर झालेल्या आहेत.त्यांच्याकडे पाणी पुरवठा, बांधकाम आणि प्रकल्प विभाग देण्यात आलेले आहेत. तदनंतर श्री.डिगेश तायडे साहेब सहा.संचालक नगररचना या पदाचा अतिरीक्त कार्यभार त्यांच्याकडे दिलेला आहे ते हजर झालेले आहेत. याप्रमाणे नविन अधिकारी हजर झालेले आहेत.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मॅडम एक प्रश्न अजुन आहे हे अमृतचे काम अजून किती वर्ष चालणार आहे. लोकांच्या तक्रारी आलेल्या आहेत अजुनही काही लोकांना कनेक्शन मिळालेले नाहीयेत. कुणाला पाणी येत नाहीये, कोणाकडे पाईपलाईन टाकलेली नाहीये. म्हणजे बारा वर्षाचा वनवास सहन करावा लागेल अस वाटत आहे मला

**श्री.सचिन पाटील :-** महापौर महोदया,

**श्रीमती. सरिता नेरकर :-** सर दोन मिनिंट

**श्री.सचिन पाटील :-** ताई एक मिनिंट

**श्रीमती. सरिता नेरकर :-** सर दोन मिनिंट

**श्री.सचिन पाटील :-** एक मिनिंट थांबाना

**श्रीमती. सरिता नेरकर :-** सर दोन मिनिंट

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्रीमती. सरिता नेरकर :-** महापौरताई मागच्या मिटींगमध्ये जवळजवळ ५० ते ६० लोक आलेले होते आपण त्यांना सांगीतले होते गेंदालाल मिलचा विषय की टाकुन देतो आता ते लोक ईथे आले आहेत. ते आत मध्ये आले नाही आता नितीनभाऊ लढ्ढा त्यांच्याशी बोलले की थांबा पण ते आता ईथे गेटवर आहेत. ते म्हणताहेत की आज जर विषय नाही झाला तर आम्ही तुमच्या घरी जातो आणि माझ्या घरीही काही लोक गेलेले आहेत. माझी सुन घाबरून गेलेली आहे ती वर जावुन बसली आहे. त्याच काय आता बाकी लोक ईथे आहेत. गेंदालाल मिलचे लोक आता ईथे गेटवर आहेत. बाकीचे माझ्या घराच्या रस्त्याला लागले आहेत का मध्ये बोलावू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** गेंदालाल मिल परिसर आणि सिटी कॉलनी परिसरचे लोक बाहेर निवेदन घेवुन आलेले होते. मी त्यांना दोन वेळा बोललो.

**श्रीमती. सरिता नेरकर :-** आत्ता बोलले भाऊ फोनवर त्यांच्याशी पण ते गेले नाहीत तिथेच आहेत ते गेटवर

**श्री.अश्विन सोनवणे :-** मॅडम तुम्ही कुठे पाईपलाईन टाकायची आहे काय करायचे आहे तुम्ही एक मिटींग घ्या सर्व इंजिनियर लोकांची आणि प्रभाग वाईज क्लियर करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ईक्वीलिटी ने काम करून घ्या.

**मा.आयुक्त :-** सर डिपार्टमेंटली करूया

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्रीमती. सरिता नेरकर :-** साहेब बोलले की टाकुन देतो पण अजुन टाकुन दिले नाही. मी गरीब बाई आहे लोक आले की मी घाबरून जाते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई तुमच्या आवाजामुळे सभागृह घाबरून जात त्याच काय

**श्री. चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** ताई आता तुम्ही जे म्हणतात तसेच थोड्यावेळापुर्वी अश्विनभाऊंनी सुध्दा तेच मांडले होते आणि त्यावरच चर्चा झाली. आपण आता तिसऱ्यांदा टेंडर कॉल केलेले आहे आणि कॉन्ट्रक्टर लोकांची भेटही घेतली आहे. त्यांच्या अडचणी सॉल केल्या आहेत.

**श्रीमती. सरिता नेरकर :-** साहेब अश्विनभाऊंच्या वॉर्डात नाही केले तरी चालेल पण माझ्या वॉर्डात मंजूर करून द्या. ते लोक माझ्या घरी आलेले आहेत माझी सुन घाबरत आहे.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री. चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** ताई आपण त्याची शॉर्ट टर्मची निविदा काढलेली आहे. तिन दिवस झालेले आहे अजून दोन दिवस लागतील. शुक्रवार पर्यंत मी वर्कऑर्डर देण्याचा प्रयत्न करतो. सोमवार पासुन मी काम चालु करतो. फक्त याच्यात एक अडचण आहे मी सर्वांना सांगू ईच्छितो की मागे जिल्हाधिकारी साहेबांनी रेती आणि मुरूमांचे डंपर , ट्रॅक्टर यांच्यावर बंदी घतलेली आहे. आपण जस म्हंटले तसे जरी डिपार्टमेंटली काम करायच म्हंटल तर तुमच्या ट्रॅक्टरमध्ये जरी मुरूम भरलेला असला.

**श्री.अश्विन सोनवणे :-** साहेब रेतीचा चोरीचा विषय आहे तो मुरूमाची तुम्ही रितसर पावती फाडा ना महसुलची

**श्री. चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** सध्या पावत्या बंद आहेत ना , कॉन्ट्रक्टर नाही म्हणत आहे ना भाऊ

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**मा.उपमहापौर :-** नाही नाही साहेब महसुलचा गौणखनिजच्या बाबतीतल्या पावत्या कधीच बंद नसतात.

**श्री.अश्विन सोनवणे :-** बंद नसतात. साहेब

**मा.उपमहापौर :-** आणि तुम्ही महासभेत बोलत आहात

**श्री. चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ मी विचारले ना त्यांना ते म्हणाले की बंद आहेत.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.अश्विन सोनवणे :-** मान्यता सांगा मी करून देतो.

**मा.उपमहापौर :-** जिल्हाधिकारी साहेबांची मंजुरी लागेल तर आपण करून घेवु.

**श्री. चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** ठिक आहे.

**श्रीमती. सरिता नेरकर :-** साहेब मी आता बाहेर त्यांना सांगु का की नक्की सोमवारी होईल.

**श्री. चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** ठिक आहे.

**श्री. सचिन पाटील :-** महापौरताई आता नेरकर ताईंनी जो विषय सांगीतला की अश्विनभाऊ तुमच्या एलआयसी कॉलनीमध्ये एक घर खाली आहे. तिथे त्यांची तात्पुरती व्यवस्था करा बहिण म्हणुन म्हणजे ताई घाबरणार नाही कधीच ते असो. आत्ता थोड्या वेळापुर्वी अश्विनभाऊंनी सांगीतले की आपल्या महापालिकेच्या लिफ्टमध्ये अधिकाऱ्यांच्या प्रशासनाच्या बाबतीत काहीतरी गैर लिहीले जात आहे. म्हणजे कुठेतरी काहीतरी खुप मोठा विद्रोह

आहे. आज काल यामध्ये पेपरमध्ये विविध प्रकारच्या बातम्या येत आहेत. आजच्या हॅलो जळगांवमध्ये ऑनड्युटी जुगार खेळतांना पकडले १५ दिवसांनंतरही कारवाई नाही. अतिक्रमणच्या जुगारी कर्मचाऱ्यांना अभय , पेढे आणि पार्ट्यांचा जल्लोष म्हणजे माझ म्हणण एक आहे की काही दिवसांपुर्वी दुसऱ्या कुठल्या तरी प्रभाग अधिकाऱ्याने परस्पर रद्दी विकली त्यासाठी तुम्ही त्याला तात्काळ संस्पेंड केल. सर्वांना आनंद वाटला की आयुक्त आपल्या अतिशय शिस्तप्रिय, कडक आहेत आणि जर १५ दिवसांपासुन अशा प्रकारे होतय आणि ते बाहेर कुठेतरी पार्टी करत आहेत आणि त्या ठिकाणी पेढे वाटत आहेत आणि आपल्या आयुक्त मॅडम म्हणत आहेत की उपायुक्त यांचा प्राप्त झालेला अहवाल टपालात असेल. तर म्हणजे आपल्या १७ मजलीत टपाल खालुन वरपासुन तर खाल पासुन वरपर्यंत येण्याकरीता जर १५ दिवस लागत असतील. तर मला प्रशासनाने याच तात्काळ उत्तर द्यावे.

**मा.आयुक्त :-** यामध्ये उपायुक्तांना चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले होते. त्यांना त्यांनी नोटीस काढल्या त्याचे उत्तर आणि त्याचा सर्व अहवाल माझ्याकडे सादर केला आहे. तो माझ्यापर्यंत अजुन आलेला नाहीये आणि तो मी पाहीलेला नाहीये म्हणुन मी ते सांगीतले होते आणि तो अहवाल माझ्याकडे आल्यानंतर मी सांगु शकते.

**श्री.सचिन पाटील :-** मॅडम तुम्ही मागवु शकता आहे. तुमच्या प्रशासनाचे बाभाडे निघत आहेत पुर्ण

**मा.आयुक्त :-** प्रकरण तपासुन अहवाल सादर केला जाईल.

**श्री.सचिन पाटील :-** नागरीकांनाही माहिती पडले आहे भाऊ नितीनभाऊ , याच्यामुळे काय होत आहे की कारवाई होत नाही मग आमच्याकडे नागरीकही येत नाही मग या कर्मचाऱ्यांना अभय मिळत आहे. कालांतराने काय होईल की तुम्ही अधिकारी मस्त राहाल आणि आम्हाला रस्त्यांवर नागरीकांचा मार खावा लागेल. अशी परिस्थिती होणार आहे.

**मा.आयुक्त :-** प्रकरण तपासुन अहवाल सादर केला जाईल.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**मा.उपमहापौर :-** एक मिनिंट भाऊ आपण त्याच्यामध्ये

**श्री.धिरज सोनवणे :-** याच विषयामध्ये मागील १३ तारखेला दिव्य मराठीने दिले आहे जे कोरोनामध्ये चौदा लाखाचे साहित्य होते आपण खरेदी केले होते. ते साहित्य आज त्या कार्यालयात नाहीये. त्या साहित्याबाबत अधिकाऱ्याच मत मागीतले आहे की हे साहित्य गेले कुठे? याच्यात कुणी स्पष्ट सांगत नाहीये की याच्यात की १४ लाखांचे साहित्य म्हणजे ते आपल्याला बऱ्याच ठिकाणी बराच स्पेस आहे त्या ठिकाणी भिंती आहेत. आज माझ्या प्रभागातील पाण्याची टाकी आहे गणेश नगरमधील ती तिचे वॉल कंपाऊंड पुर्णपणे पडलेले आहे. म्हणजे तिथे रिकामटेकडे मुलं सगळे हैदोस घालतात. कंपाऊंउ नाहीये त्या ठिकाणी असलेले पत्रे आपल्याला तिथे वापरता आले असते. परंतू एवढे १४ लाखाचे साहित्य हे गहाळ होतय आणि मिडीया कळवत आहे. मग अधिकारी काय करत आहेत आणि ते साहित्य विकले जात आहे साहित्य चोरीला जात आहे. म्हणजे हा कोणाचा पैसा आहे. हा अधिकाऱ्यांचा आहे की नागरीकांचा आहे. मग जर नागरीकांचा आहे तर याचा वापर कसा व्हायला पाहीजे.

**श्री.सचिन पाटील :-** असे प्रकरणं जर १५/१५ दिवस टपालात राहतील. तर कुठेतरी काहीतरी शिजत आहे म्हणजे अशी काहीतरी जाणीव किंवा दिसत आहे येथे

**श्री.जितेंद्र मराठे:-** आयुक्त मॅडम

**श्री.सचिन पाटील :-** दोन मिनिंट जितुभाऊ

**श्री.जितेंद्र मराठे:-** तोच विषय आहे भाऊ , एक आठवण करून देतोय मग बसुन जातो मी खाली

**श्री.सचिन पाटील :-** ठिक आहे.

**श्री.जितेंद्र मराठे:-** धिरजभाऊंनी आता काहीतरी पत्रांचे , बांबुचे काहीतरी सांगीतले, त्याच्यापुर्वी काहीतरी एक रद्दीचे झाले आणि अजुन त्याच ठिकाणी जे आपले कचऱ्याचे कंटेनर असतात ना हे तिस ते पस्तीस कंटेनर पुर्णपणे ते ३५ ते ४० हजार मध्ये विकलेले आहेत. आता तिथल्या कर्मचाऱ्यांनी विकले की अधिकाऱ्यांनी विकले याची संपुर्ण माहिती तुम्ही जर खोलात गेले तर तुम्हाला कळेल तर याच्या संदर्भात जस सचिन पाटील साहेब सांगत आहेत, धिरजभाऊ सांगत आहेत. तर मी याच्यामध्ये मी आपल्याला पत्र पण दिलेले आहे की आपण या संदर्भात काहीतरी कार्यवाही करावी.

**श्री.सचिन पाटील :-** मॅडम या मिडीयानेच तुम्हाला व्हिडीओ शुटींग टाकलेली आहे आणि सर्व केलेले आहे. मागेही तुम्हाला एक टाकलेले होते तुम्ही तात्काळ ॲक्शन घेतली. आम्हाला आनंद वाटला. पण आता तुम्ही ॲक्शन घेत नाहीत मॅडम

**मा.आयुक्त :-** सर या अनुषंगाने सर्व प्रकरणांचे चौकशीचे आदेश काढले आणि या दोन्ही प्रकरणांमध्ये अहवाल मागविलेले आहेत.

**श्री.सचिन पाटील :-** मॅडम या प्रकरणांमध्ये जे दोषी आढळुन आले तर लगेच ॲक्शन घ्या तुम्ही

**मा.आयुक्त :-** सर या दोन्ही प्रकरणामध्ये चौकशी अहवाल मागविलेले आहेत आणि गांगोडेंकडे ते दोन्ही प्रकरणे आहेत आणि ते आज मुंबईला मिटींगला गेलेले आहेत. त्यांना विचारले असते आपण पण

**श्री.सचिन पाटील :-** मॅडम तुम्ही आढावा तर घेतला असेल ना

**मा.आयुक्त :-** सर ते मिटींगला गेले असल्यामुळे एका दिवसांत अहवाल मिळत नाही आणि ते आल्यावर विचारू त्यांना की काय दिले आहे अहवालात आणि या दोन्ही प्रकरणांचे चौकशीचे आदेश दिलेले आहेत. त्याच्यामध्येही त्यांनी पत्र काढले आहे सीसीटीव्ही होते का किंवा असतील तर सीसीटीव्ही फुटेज आहेत का? त्यांनी ते पत्र काढलेले आहे आणि पुर्ण माहिती मागविलेली आहे. या आठवड्यामध्ये आज गुरूवार आहे गुरूवार शुक्रवारमध्ये तो अहवाल माझ्याकडे या दोन दिवसांमध्ये येईल. मग अहवालाच्या अनुषंगाने

**श्री.सचिन पाटील :-** मॅडम आता तुम्हाला माहिती असेल की जिल्हाधिकारी साहेबांनी बांभोरी मध्ये ट्रॅक्टर मध्ये रेती भरत असेल किंवा रिकामे असेल तरी त्याच्यावर जर गुन्हा दाखल करू शकत आहेत. तर काही अधिकार तुम्हालाही आहे मॅडम, तुम्ही चौकशी करून तात्काळ संस्पेंड करू शकता आहे. याच्यात तुमची प्रतिमा खराब होते मॅडम , प्रशासनाची

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**मा.महापौर :-** नितीनभाऊ तुम्ही बोलुन घ्या पहिले बाकीचे थांबा एकच मिनिंट तुम्हालाही चान्स देते बोलायला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई यांचा विषय संलग्नित असेल पहिल्या विषयाशी तर मग यांना बोलुन घेवु द्या मग मी नंतर बोलतो.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**मा.उपमहापौर :-** चेतनभाऊ पहिल्या विषयाशी संलग्न आहे का आपला विषय

**सौ.पार्वताबाई भिल :-** दादा दोनच मिनिंट , उपमहापौर साहेब, आयुक्त मॅडम आणि महापौर मॅडम , मी काही रोडांवर बोलणार नाही किंवा गटारींवर बोलणार नाही आणि मी तुम्हाला कामाच्या बाबतीत पण बोलणार नाही. मी विषय सांगते की मागच्या हफ्त्यात जे हरिविठ्ठल नगरमध्ये जो मेन रोड आहे ना मी त्याबद्दल पाच वर्ष झाले त्या रोडावर बोलायला त्याच्यावर मुरूम टाकला जात नाही काही नाही. आता सहा महिन्यापहिले एक बाई बाहेर निघाली मी तिथेच होती त्या बाईला आठवा नववा महिना होता ती बाई त्या रोडावर पडली. तर ती अक्षरश: रोडावर तरफडत होती तर त्या महिलेला दवाखान्यात टाकले. दवाखान्यात टाकल्यामुळे आणि गुरूंच्या कृपेने ती महिला वाचली पण ते बाळ वारले तर ते बाळ मी भरून देणार आहे की तुम्ही भरून देणार आहे आणि मागे तो एक माणुस कशामुळे वारला तर त्या गटारींमुळे वारला आहे. तर मग तुम्ही आता विचार करायला पाहीजे की त्या रोडाची दुर्दशा कशी आहे. म्हणुन मी विनंती करून सांगते आहे मी काही तुम्हाला खड्डे बुजायला लावत नाहीये आणि मी काही हे रोड करायला लावत नाहीये आणि काही व्हायला नको आणि काल महिला मरतील माणस मरतील आणि या सभागृहामध्ये हे सगळे लोक येवुनच जातील. हा नगरसेवकांचा अपमान होतो आहे. कारण नागरीक ओरडतात आमच्यावर तुम्हाला माहिती आहे का काय म्हणतात नागरीक आम्ही आयुक्तांना भेटु , महापौरांना भेटु तुमच्या मध्ये स्वार्थ नाहीये आहे का तुमच्यामध्ये स्वार्थ , वॉर्डामध्ये चार नगरसेवक आहे पण कोणावरही विश्वास नाहीये. म्हणुन सभागृहामध्ये असे लोक येत आहेत. आज माझ्या बरोबर कमीत कमी चाळीस ते पन्नास महिला येणार होत्या. मी विनंती करते की याच्यावर महापौरताई निर्णय घ्या. आयुक्त मॅडम तर तो रोड मला या हफ्यामध्ये दुरूस्ती करून पाहीजे. हे प्रत्येक सभेमध्ये हेच म्हणतात की हो ताई करू पण ते काही होत नाही.माझा तर विश्वास उठुन गेला आहे.

**मा.महापौर :-** सोनगिरे साहेब वर्कऑर्डर दिली गेली आहे का त्याची

**सौ.पार्वताबाई भिल :-** लोक जेव्हा बोलतात ना ते शिव्या देतात आम्हाला खाली मान टाकावी लागते.

**श्री. चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** ताई मी आता जसे सांगीतले तस आपल्याही प्रभागाचे आहे.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**सौ.पार्वताबाई भिल :-** साहेब ताई बडबड करते पण काम होत नाही. काम पाहीजे मला काम ते लोक ऐवढ्या शिव्या देतात. लाज वाटते नगरसेवकांना शिव्या खातांना आपल्या कानावर

**श्री. चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** ताई या आठ दिवसांत ते काम चालु करतो.

**सौ.पार्वताबाई भिल :-** साहेब किती दिवस झाले आता

**श्री.मनोज चौधरी :-** साहेब मागच्या मिटींगला बोलले होते तुम्ही

**सौ.पार्वताबाई भिल :-** पाच वर्ष झाले आहे

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.मनोज चौधरी :-** महापौरताई

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** ताई माझ एक काम आहे.

**मा.महापौर :-** सर्व सदस्यांनी शांत बसायच आहे नितीनभाऊ बोलतील.

**श्री.मनोज चौधरी :-** महापौरताई , कुलभुषणभाऊ आणि आयुक्त मॅडम मी आता परत त्या चंदुआण्णा नगरच्या रस्त्यावर बोलतोय. जशी परिस्थिती आता ताईंनी सांगीतली की तिथे एक महिला डिलेव्हरी झाली आणि तिचे बाळ वारले. ती परिस्थिती माझ्या वॉर्डाच्या रस्त्यावरही होवू शकते आणि महापौरताई व कुलभुषणभाऊंना विचारायचे आहे मला आज पेपरात आले आहे बरोबर आहे का कुलभुषणभाऊ, कचरा फॅक्टरीची बातमी तुम्ही नारळ फोडायला गेले होते वाटत काल मग प्रभागात नगरसेवक नाहीयेत का? पुर्ण जळगांव शहराचा कचरा येतो त्या रोडावर तुम्हाला सिरीयसनेस पणा नाहीये का या गोष्टींचा , आयुक्तांना पण नाहीये आणि तुम्हालाही नाहीये. तुम्हाला मी ओरडुन ओरडुन सांगतोय की तिथे कचरा टाकतात तिथले काम केले नाही. पण तुम्ही काल जावुन आले बघुन आले. तुम्हाला करायचे नसेल तर मी उद्या गाड्या बंद करून दाखवतो कचऱ्याच्या , बंद करून दाखवतो कुलभुषण भाऊ

**मा.उपमहापौर :-** भाऊ याच्यात काय आहे

**श्री.मनोज चौधरी :-** नाही कुलभुषणभाऊ

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.मनोज चौधरी :-** अहो कुलभुषणभाऊ तुम्हाला महापौर , उपमहापौर पदासाठी मतदान केलेले आहे तुम्हाला, आम्हाला बोलायचा अधिकार आहे ना.

**मा.उपमहापौर :-** भाऊ बोला पण बोलायची पध्दत राहते.

**श्री.मनोज चौधरी :-** बदनाम करत आहेत तुम्ही मागच्या वेळेस पण

**मा.उपमहापौर :-** भाऊ याच्यामध्ये काय गोष्ट आहे ऐकुन घ्या पहिले

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.मनोज चौधरी :-** मागच्या वेळेस पण तुम्ही काय बोलले होते.

**मा.उपमहापौर :-** महापौरताई या बोलल्या होत्या.

**श्री.मनोज चौधरी :-** आम्हाला माहिती नव्हत किंवा सिटी इंजिनियरने सांगीतले नसेल.

**मा.उपमहापौर :-** भाऊ तुमच्या वॉर्डाच्या कामांच्या बाबतीतला विषय मी आयुक्त मॅडमांना १०० वेळा बोलुन त्यांना पर्सनली विचारले आहे. मी १०० वेळा बोललो आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** भाऊ मी कमी बोललो आहे का?

**मा.उपमहापौर :-** भाऊ तुमच्या पेक्षा जास्त वेळा मी त्यांना बोललेलो आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** ऐकुन घ्या कुलभुषणभाऊ रस्त्याबद्दल मी तुमच्यावर राग नाही करत आहे मी राग कशाबद्दल करतो आहे तुम्ही काल तिथे येवुन गेले. तुम्ही नारळ फोडले त्या वॉर्डाचे नगरसेवक नव्हते का कोणी?

**मा.उपमहापौर :-** भाऊ ऐकुन घ्या पहिले

**श्री.मनोज चौधरी :-** त्याच उत्तर पाहीजे मला पहिले

**मा.उपमहापौर :-** भाऊ ऐकुन घ्या पहिले.

**मा.उपमहापौर :-** ज्या ठिकाणी गेलो त्या ठिकाणी तसा कुठलाच उद्देश नव्हता त्या ठिकाणी आपले प्रकल्प अभियंता योगेश बोरोले त्यांचा मला फोन आला मी माझ्या शिव स्मारकाच्या तयारी मध्ये होतो. मी महापालीकेत पण नव्हतो मा.महापौरताई पण नव्हत्या काल मला शहर अभियांत्याचा फोन आला. त्या ठिकाणी आपली वर्कऑर्डर प्रोसेस झालेली आहे.जो कचऱ्यावरची प्रक्रिया करणे संदर्भातली प्रक्रिया आहे त्याठिकाणी मशिन पण आहे.

**श्री मनोज चौधरी :-** भाऊ मान्य आहे पण एक दिवस उदघाटन लेट झाले असते तर काय फरक पडला असता एवढे वर्ष वर्ष काम बंद होते ना.

**मा.उपमहापौर :-** मान्य आहे. याच्या बद्दल वाद नाही आहे. तुमचा विषय कचरा फॅक्टरीचा आहे की काय सांगा मला.

**श्री मनोज चौधरी :-** प्रभागातील नागरीकांनी आम्हाला नगरसेवक म्हणुन कशासाठी पाठविलेले आहे. मी असेल डॉक्टर असेल कोणीही असेल, वारंवार त्या रस्त्याचे काम सांगतो तुम्हाला, तीन तीन फुटाचे खड्डे आहेत. चला तेथुन चालुन पहा.

**मा.उपमहापौर :-** त्या विषयाचा पाठपुरावा मी केलेला आहे तुम्ही प्रशासनाला विचारुन घ्या.

**श्री.मनोज चौधरी :-** भाऊ त्याचे टेंडर निघाले आहे प्रोसेस केव्हा होईल मला सांगा आणि जबाबदार असाल तर सांगा नाहीतर सांगू नका.

**मा.उपमहापौर :-** ऐका त्या रस्त्याची खरंच परिस्थिती इतकी दयनीय आहे आपल्या महापालिकेच्या कचऱ्याचे गाडया आणि दहा ते पंधरा हजार लोक रोज ये जा करतात पण या रस्त्याचा १०० वेळ विषय झाला कधी संगीतले की १०० कोटी दिले कधी सांगीतले की ८५ कोटी दिले. कधी सांगीतले जाते की डागडूजी करायची आहे. पण त्या रस्त्याचे काम काही होत नाही. हे सर्व फेलियुलर जे आहे ते महानगरपालिका प्रशासनाचे आहे. त्याच्यासाठी सर्व सन्मा.सदस्यांचा रोष हा महापौर व उपमहापौर यांच्यावर येतो. तो रस्ता होणार कसा ते सांगा, का तुम्ही चालढकल करत आहात त्या रस्त्यासाठी.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आजच्या आज दुरुस्त करा त्याला, थोडी नैतिकता आपण ठेवा की, तो आजच्या आज दुरुस्त झाला पाहिजे. जर तो रस्ता खराब आहे तर आपले काम आहे त्याची डागडुजी करणे.

**श्री मनोज चौधरी :-** भाऊ आम्ही कोणासाठी भांडत आहे.कुलभुषणभाऊ प्रशासन जर करत नाही तर आम्ही कोणाला मागणी करणार आहे. तुम्ही महापौर उपमहापौर आहात ना. मॅडमांना वारंवार फोन करतो, मॅडम माझे फोन कट करून टाकतात. मागच्या हप्त्यात साहेबांना फोन केला साहेब म्हणाले मॅडम मुंबईला आहेत. विचारा मॅडमांना मी फोन केला की नाही भाऊ मग आम्ही वारंवार लोंकाच्या शिव्या खायच्या का लोकांच्या?

**मा.उपमहापौर :-** डॉक्टर साहेब थांबा ना, मॅडम उत्तर देत आहे ना.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** कधी होतील भाऊ आमचे काम आता त्यांना माहिती आहे तो विषय आपण त्या रस्त्याने गेला आहात आपण ते काम केले तर आपला सन्मान झाला असता.

**श्री मनोज चौधरी :-** मॅडम एक विनंती आहे ते पी.डब्ल्यु.डी.ने केले आहे त्याचे टेन्डर निघाले आहे. या उत्तराला काही अर्थ नाही. काम केव्हा सुरू होईल. कुलभुषणभाऊ त्या प्रभागात तो पहिला एक मुख्य रस्ता आहे. त्या रस्ताचे काम सुरू करा ना तुम्ही. बजेट पण झाले व प्रोसेस कुठ पर्यंत झाली आहे.

**मा.आयुक्तः-** पीडब्लुडी कडे कालच मी वर्क ऑडर केली. कालच दिली.

**श्री मनोज चौधरी :-** मॅडम, मी तुम्हाला ३ ते ४ महिन्यापासुन वांरवार सांगत आहे. टेन्डर निघायला किती दिवस झाले.

**मा.आयुक्तः-** टेन्डर कोणी काढले, तुम्ही पी.डब्ल्यु.डी.ने काढले ना.

**श्री मनोज चौधरी :-** मॅडम आपण वरिष्ठ अधिकारी आहेत तुम्हाला विचाराचा अधिकार आहे. आम्ही विचारू शकतो का नगरसेवक जावून. नगरसेवक गेले तर नगरसेवक टक्केवारी मागतात असे सांगतील ते.

**मा.आयुक्तः-** पी डब्ल्यु.डी. ने टेन्डर काढले त्याचे अधिकार राज्य शासनाकडे राज्य शासना कडे फाईल प्रलंबित आहे. का डीपीटीसीच्या मिटींग मध्ये मंत्री महोदयांच्या.

**श्री मनोज चौधरी :-** मॅडम ४२ कोटीचे काम झाले . मी वारंवार सांगत आहे की, तो रस्ता खराब होत आहे.महापालिकेचे कोण अधिकारी गेले तेथे.

**मा.आयुक्तः-** जे रस्ते पीडब्लुडी कडे आहेत त्यांच्या सर्वाच्या मान्यता पेंडींग मान्यता हया राज्य शासनाकडे आहेत. पालक मंत्री यांच्या व महोदयाच्या अध्यक्षते खालील डीपीटीसी मिटींग झाली तिन्ही मा.मंत्री तेथे उपस्थित होते. तेथे पण हाच विषय झाला की, सेक्रेटरींकडे बैठक लावा. आणि आपल्याला मान्यता द्या. तेथे पी.डब्ल्यु.डी.चे एक्झीकेटी इंजिनिअर उपस्थित होते. त्यांनी ही हेच उत्तर दिले की, राज्य शासनाकडे प्रलंबित आहे आम्ही काय करु शकतो. या दोन्ही विषयांवर चर्चा झाल्या. स्पेसिपीक आपले दोन विषय होते.

**मा.उपमहापौर :-** मॅडम वारंवार आम्ही सभागृहात ओरडून सांगतो राज्य शासनाकडून प्राप्त होणारा निधी आपली एवढी मोठी एजन्सी आहे. आपल्याला नियोजन करता येते. आपण त्या पी.डब्ल्यु.डी.च्या भरोश्यावर राहुन प्रॉब्लम निर्माण होत आहे. समस्या निर्माण होत आहे. या रस्त्याच्या संदर्भात सभागृहात ५ व्यांदा हा विषय आला. इतका मुख्य रस्ता इतका रहदारीच्या रस्त्याची ही परिस्थिती आहे. जळगांव शहराच्या ९०% रस्त्यांची अशीच परिस्थिती आहे. मंजुर झालेले आहे, निधी वर्ग झालेला आहे. वर्क ऑडर झाली आहे. प्रोसेस मध्ये आहे परंतु इमप्लीमेंटच होत नाही. आणि सभागृहामध्ये सन्मानिय सदस्य वारंवार प्रश्न उपस्थित करता आहेत नेहमी हेच उत्तर मिळते. वर्क ऑर्डर झालेली आहे, निधी मंजुर झालेला आहे. प्रोसेस मध्ये आणि याला शासनाकडुन प्रॉब्लेम आहे,आता पावसाळा येवून गेला. आपण का आता तेच चालु ठेवायचे का. याच्यावर इम्लीमेट होणे आवश्यक आहे.

**श्री मनोज चौधरी :-** भाऊ तेच म्हणतो आहे मी मॅडमांना वारंवार तेच सांगतो. विचाराना मॅडमांना, निधी यायला वेळ लागेल तुम्ही मनपा फंडातून दीड दोन कोटी मनपा फंड टाका. काम करायला आहेत ना ठेकेदार.
**मा.आयुक्त:-** ज्या दिवसी तुम्ही भेटले त्याच आठवडयात कसे काय करता येईल आपल्याला.
**श्री.मनोज चौधरी :-** किती दिवस झाले मी तेच विचारत आहे तुम्हाला.तिन महिने झाले मॅडम आज.
**मा.उपमहापौर :-** अश्या पध्दतीने दर महासभेला अश्याच चर्चा होतात या रस्त्यावरुन आपण शासन स्तरावर निधी प्राप्त करुन दिलेला आहे. त्यांची वर्क ऑडर झालेली आहे त्यांची तुम्ही आता पर्यंत एकतरी पत्र व्यवहार केला का पी.डब्ल्यु.डी.शी. एक तरी पत्र व्यवहार केला का ?
**श्री सोनगीरे शहर अभियंता :-** आता हा १०० कोटीची आणि ८५ कोटीची एजन्सी ही बीॲण्ड सी आहे.
**मा.उपमहापौर :-** तुम्ही हा जो विषय आहे, शासन स्तरावर हा निधी प्राप्त झालेला आहे त्यांची वर्क ऑडर
**श्री सोनगीरे शहर अभियंता :-** निधी मंजूर झालेला आहे. प्राप्त झालेला नाही आहे. त्यांचे टेन्डर प्रस्ताव झाल्यानंतर राज्य शासना कडे पाठविण्यात आलेले आहेत जसे मा.आयुक्ता नी सांगितलेच आहे. डिपीटीसी मध्ये याच्या बाबतीत बरिच चर्चा झाली आहे.
**मा.उपमहापौर :-** थांबा हो भाऊ पाच मिनिट
**श्री इब्राहीम पटेल :-** दोन वर्ष झाले ४२ कोटी दिले इकडे तुम्ही बिले थांबवून घेतात ठेकेदार सांगतो की ४ कोटीचे बिल अजून प्रलंबित आहे. लोक आम्हाला विचारतात काम का होत नाही सोशल मिडीया वाले आमची खिल्ली उडवता आहेत.
**मा.उपमहापौर :-** या रस्त्याचा निधी मंजूर झालेला आहे. निविदा प्रक्रिया झालेली आहे. वर्कऑडर झाली आहे का?
**श्री सोनगीरे शहर अभियंता:-** तिन महीने झाले
**मा.उपमहापौर :-** काम कोणी घेतले आहे. ऐका सार्वजनिक बांधकामला मा.आयुक्त यांच्या सहीचे पत्र दया कि सभागृहामध्ये तुम्हाला कसे समजले की निधी प्राप्त झाला आहे.
**श्री सोनगीरे शहर अभियंता :-** निधीचे नाही म्हणत आहे मी.
**मा.उपमहापौर :-** त्यांनी काही पत्र केलेले आहे का तुमच्याकडे की, मंजूर झाले आहे मग तुम्ही कसे काय सांगत आहात की, मंजुर झाले आहे.
**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** प्रत्यक्ष भेट झाली.
**मा.उपमहापौर :-** त्याला काय अर्थ आहे. तुम्हाला काही पत्र आलेले आहे का ? मंजुर झाल्याचे काही आलेले आहे का ? माहिती मिळालेली आहे का ? मॅडम मनपा फंडातून इस्टीमेट तयार करून सुरवात करा.
**श्री सोनगीरे शहर अभियंता :-** आपण सभागृहाने १०० कोटीच्या कामांना एनओसी आपण स्वत: दिलेली आहे. त्यांच्या मार्फत काम करून घेण्याची. त्यांनी १०० कोटी मध्ये जे जे रस्ते घेतले त्यांची एनओसी आपण त्यांना दिलेली आहे. त्याची टेन्डर प्रोसेस झालेली आहे.
**मा.उपमहापौर :-** शासन निर्णय आहे का? सभागृहामध्ये वारंवार या विषयावर चर्चा होत आहे.
**श्री सोनगीरे शहर अभियंता :-** त्यांनी शासन निर्णयाचा संदर्भ देऊनच एन.ओ.सी. मागितली होती आपल्याला.
**मा.उपमहापौर :-** तर तुम्ही त्यांना एक पत्र पाठवा की, या संदर्भामध्ये वारंवार सदस्यांचा रोष होत आहे, प्रशासनाला जाब विचारत आहे. आता त्यांना जबाब देणे मुश्किल झालेले आहे. किंवा ते आता समर्पक उत्तर देऊ शकत नाही. तरी आपण त्या रस्त्याच्या कामाची सुरवात कधी करणार. किंवा त्या रस्त्याच्या संदर्भातला निधी कोणत्या लेखा शिर्षातला आहे. त्याची माहिती मागवा आणि त्यांना सांगुन त्याचा पाठपुरावा करा.
**श्री मनोज चौधरी :-** भाऊ एक मिनीट, ३ कोटींचे पालकमंत्र्यांचे पत्र डि.पी.डी.सी.मधुन यांना दिले होते. साहेब बोलले की, आम्हाला पत्र आणा,तेव्हा आम्ही तुम्हाला प्रस्ताव देऊ. बरोबर आहे का साहेब.
**श्री सोनगीरे शहर अभियंता :-** बरोबर आहे.
**श्री.मनोज चौधरी :-** ऐकुन घ्या. मी फक्त जे सांगत आहे त्याची तुमच्याकडुन माहिती घेतली पाहिजे. कुलभुषणभाऊ असे झाले, आयुक्त मॅडम तुम्ही लक्ष द्या याच्यावर थोडे, तुम्ही म्हणतात निधी मिळत नाही. तो निधी आणला होता आम्ही. पण तो निधी मला वापरता आला नाही. त्याच्यानंतर साहेबांनी असे सांगितले मला, ते जे पत्र आले होते, २९ कोटीचा, जो विषय चालला की, २९ कोटी रुपये आपल्या महापालिकेला मिळवु शकतात असे या पत्रासाठी पाठपूरावा मी व श्री अश्विन पाटील यांनी केला होता. ते पण ही शासनाला मिळाला होता. बरोबर साहेब, साहेबानी मला काय सांगितले मला बेसिक पत्र आणा येथून ईथ पर्यंतचा आहुजा नगरचा रस्ता तेव्हा मी प्रस्ताव दिला. हेच काम करायच का तुम्हीजर न्याय देत नसाल तर आम्ही कोणाकडे न्याय मागायचा. भाऊ तुम्ही काम करणारे लोकं

आहे म्हणुन तुमच्या जवळ बोलत आहे ना आम्ही. आम्ही केव्हा पासुन हा प्रश्न प्रशासनाकडे मांडत आहे पण ते देत नाही म्हणुन तर तुमच्या समोर मांडत आहे हा विषय. तुम्ही किंवा मॅडम एखादी कार्यवाही जोपर्यंत एखाद्या कर्मचाऱ्यावर करणार नाही तो पर्यंत हे सुधरणार नाही. हे असच चालनाणार आहे.

**श्री चेतन सनकत :-** करता येत नाही असे साहेब अगोदर बोलले याच्या अगोदर माझ्या दलित वस्ती मध्ये पाठवलेल्या कामाना एनओसी दिली होती. आणि तिथून पत्र आल्या नंतर मनपा फंडातून काम केले आहेत. येथे माझ्या प्रभागामध्ये तुम्ही मनपा फंडात एन.ओ.सी.दिल्यानंतर कामे करू शकतात.शासनाकडुन निधी आलेला असला तरी कामे करु शकतात. मग एवढया महत्वाच्या विषयामध्ये काम का करू शकत नाही. कायदे दोन प्रकारचे कसे असू शकतात. कायदा हा एकच प्रकारचा असतो. भाऊ विषय समजून घ्या आता.

**श्री सोनगीरे शहर अभियंता :-** कुठलाही निधी मंजूर होतो डी.पी.डी.सी.कडुन असेल, नागरीक सुविधा असेल, दलित वस्ती जो काही निधी असेल.

**श्री मनोज चौधरी :-** शासनाच्या पत्रात कोणत्याही निधीतुन आहे . तेवढाच राहतो. पालकमंत्र्यांनी पत्र दिल्यानंतरही तुम्ही प्रस्ताव पाठवत नाही.

**श्री सोनगीरे शहर अभियंता :-** माझे म्हणणे तर ऐकुन घ्या. कुठलेही प्रस्ताव पाठवण्यापुर्वी महासभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

**श्री मनोज चौधरी :-** या कामांचे ठराव मंजूर झालेले आहेत. त्यासाठी महीना दिड महिना लावला साहेब हे कारण देवू नका निधी आणला हे सर्वाना माहिती आहे. आम्हाला लोकासमोर जाईचे आहे. १७ तारखे पर्यंत आम्ही आमच ऐकाल १७ नंतर कोणी कोणाचे ऐकनार नाही सर साहेब मी दोन महिने तीन महीने पूर्वी पत्र दिलेले होते भाऊ मी नाही भाऊ असे नाही ना घरी पाठवाना दोन तिन जणांना भाऊ कार्यवाही झाल्या शिवाय कोणी किती भी बोले तरी काही फरक नाही पडणार. सगळे नगरसेवक तयार आहे विचारा तुम्ही. कार्यवाही झाली पाहिजे. भाऊ अश्विनभाऊ कार्यवाही होत नाही तोपर्यत तुम्ही किती ही बोलले मी किती ही बोलला तर हेच चालणार आहे. कार्यवाही करा ना. एक दोन अधिकाऱ्यांवर कार्यवाही करा. भाऊ ते होऊ शकत नाही तो पर्यंत हे थांबणारच नाही.

**श्रीमती सरीता नेरकर :-** तुम्ही जेव्हा वार्डात येतात ना. तर तुमचे काम आहे. चारही नगरसेवकांना सांगायचे.

**श्री सचिन पाटील :-** सन्मानिय नगरसेवक केव्हा पासून मनोज भाऊ पोट तिळकीने विषय मांडत आहेत. मागच्या वेळेस पण हा विषय झाला होता. मा.उपमाहापौर यांना सर्व विषय मोठया प्रमाणात सांगितले सर्व . काय आहे गेल्या अडीच तिन वर्षापासुन मिडीया मध्ये नगरसेवक हा एक बदनाम फरिश्ता होऊ गेलेला आहे. सगळयात सोपा कोण तर नगरसेवक. ऐवढया मोठया प्रमाणात जर. मनोजभाऊ पोटतिळकीने विषय मांडत आहे. त्याच्यावर मा.उपमहापौर विष्लेशन करत आहे. आणि त्यातुन जर नगरसेवक बदनाम फरिश्ते होत असतील तर माझी मिडीयाला हात जोडुन एक विनंती आहे सभागृहामध्ये की, मिडीयाने हे जे रस्ते आहे १०० कोटी ८० कोटीचे जे काही रस्ते असतील ते. हे रस्ते पी.डब्ल्यु.डी.ला कोणी द्यायला लावले हा कळीचा नारद कोण होता यांचे नाव तर येवू दया त्याच्या मुळे हार्ट बिट वाढतील नागरीकांकरीता, आणि उपमहापौरांना वरतुन बोलावे लागेल १० मिनीट म्हणजे ही महापालिकेची सर्व यंत्रणा असल्यावर ही देखील या प्रकारे अशी वेळ येत आहे. आणि नगरसेवक हा बदनाम फरिश्ता होतो. उद्या उठुन लोकं रस्त्यावर मारायला लागतील. लोकं १०% घेतात असे ही म्हणतात आम्हाला, तर आम्ही किती दृष्टीने आमच्यावर शिंतोडे उडवुन घ्यायचे नितीनभाऊ याला ही तर काही सिमा आहे. तुम्ही या सभागृहाला जेष्ठ नगरसेवक आहात. मला नाही वाटत की, असे मिडीयाने कधी नगरसेवकांवर शिंतोडे उडविलेले असतील. राजुभाऊ एक मिनीट, तर आता माझी मिडीयाला हात जोडून सर्व नगरसेवकांकडून विनंती आहे. तुम्ही जी सत्यता आहे की, जळगाव चे रस्ते, जळगांवचे ड्रेनेज, जळगावचे बगीचे, जळगावचे काय सो ॲण्ड सो, सुजलाम सुफलाम या बाबतीत सर्व कल्पना आधिच विरून गेलेल्या आहेत. हा नगरसेवक ७५ नगरसेवक बदनाम होत आहे. तर एकदा तरी आता शेवटच्या कार्यकाळ संपेपर्यंत सत्यता ही आपल्या मिडीयातुन येऊ द्यावी. जर आम्ही चुकीचे असु तर नक्की आमच्यावर शिंतोडे उडवा. नक्की आमच्यावर ताशेरे आणा तुम्ही. परंतू या प्रकारे एक नगरसेवक इतक्या वेळेपासुन बोलत आहे. अक्षरशा त्याचे हार्ट बिट वाढत आहेत. तरी ही ते बोलत आहे. म्हणजे कधी काळानंतर असे होईल. एखादा नगरसेवक प्रश्न मांडता मांडता जागेवर पण पडु शकतो तरी ही प्रशासन जागे होणार नाही. एकच म्हणणे आहे मिडीयाने आमच्या नगरसेवकांच्या वतीने हे निवेदन मांडतो मी, जी सत्यता आहे याच्या मधील १०० कोटी, ८० कोटी, ८५ कोटी जे काही असतील ते. त्यातली सत्यता जाणावी. त्या दृष्टीने नगरसेवक खरोखर जबाबदार आहेत का ? हा टॅगमार्क घेऊन तुम्ही ते विषय होऊ द्या. तर लोकांना नागरीकांना समजेल, नगरसेवक याच्याकरीता जबाबदार नाही. मा.महापौर जबाबदार नाही आहेत. मा.उपमहापौर जबाबदार नाहीत.

**श्री राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया आताच आपले सहकारी मित्र सन्मा.सदस्य श्री सचिनसर पाटील यांनी कोण कळीचा नारद यांनी बी ॲण्ड सीला काम दिलेत. ज्या कळीच्या नारदाने निधी आणला, कमीत कामी आज नाही चार सहा महिने, आठ महिन्याने रोडावर चालणार आहेत. नाहीतर २० वर्ष रोडाचे काम होणार नाहीत. २० वर्ष कुठुन आणणार निधी कुठुन कामे करणार.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असल्याने कोण काय बोलले समजत नाही.)

**श्री मनोज चौधरी :-** आमच म्हणणे काय आहे. तुम्ही चुकीचे गैरसमज करुन घेऊ नका. आमचे म्हणणे काय आहे. बी ॲण्ड सी ला न देता महानगरपालिकेकडुनच हा टेन्डर निघाल पाहिजे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असल्याने कोण काय बोलले समजत नाही.)

**श्री राजेंद्र पाटील :-** मनोज भाऊ मी त्यांच्या रस्ता साठी भांडत आहेत मी. ते सहा महिन्यापासुन त्यांच्या रस्त्यासाठी भांडत आहे. मी वर्षभरापासून भांडत आहे मी तुमचे बोलने ऐकले ना. आता माझे बोलने आदित्य चौक ते स्मशानभुमिच्या रस्त्यासाठी भांडत होतो. माझ्या रस्त्याचे निधी आणुन ही ते मिळत नाही. मा.आमदार राजूमामा भोळे यांनी ५ कोटी निधीतुन त्याचे १ कोटी मंजूर केले. त्यांना मी धन्यवाद देतो. महापालिकेचा अर्धा रस्ता मनपाने तयार केला. मी पुर्ण रस्ता मांडलेला होता. प्रस्ताव काय होता. डी-मार्ट पासुन स्मशानभुमी ते आदित्य चौक पर्यंतचा रस्ता, त्यातला अर्धा रस्ता मनपाने तयार केला त्यातला अर्धा रस्ता अजुन बाकी आहे. त्या रस्त्याला खड्डे पडलेले आहे. तुम्ही जाऊन बघा. आपल्या महापालिकेचे काम कसे आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** आम्ही पण तेच म्हणत आहे. जबाबदार कोण.

**श्री.राजेंद्र पाटील :-** म्हणुन चांगल्या कॉलिटीचे रस्ते व्हायला पाहिजे. आणि त्यासाठी बी ॲण्ड सी कडून रस्ते झाले पाहीजे.

**श्री.मनोज चौधरी :-** त्यात आमच काही फायदा आहे का ? तुम्ही बी ॲण्ड सी ला द्या की, महानगरपालिकेला द्या.आमचे एकच म्हणणे आहे की, काम वेळेवर झाले पाहिजे. नितीनभाऊ, अश्विनभाऊ,

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्याच्यासाठी जसे उपमहापौरांनी म्हटले की, लेखी पत्र व्यवहार करा ना. तुम्ही फोन करुन विचारतात तर तुम्हाला फक्त हो हो म्हटले जातील. लेखी पत्र व्यवहार करा, त्याचा पाठपुरावा झाला पाहिजे.

**श्री.मनोज चौधरी :-** या महासभेला काहीच अर्थ नाही का ?

**श्री.राजेंद्र पाटील :-** महासभा याच्याचसाठी आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** मग मी तेच बोलत आहे ना.

**मा.महापौर :-** राजुभाऊ बसुन घ्या.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मी माझे बोललेले नाही अजुन मी त्यांचे प्रश्नांचा खुलासा देत होतो. माझे बोलणे बाकी आहे. आता साहेबांनी सांगितले की, आपण १०० कोटीच्या कांमाना एनओसी दिली आहे. असे साहेबांनी सांगीतले त्यामध्ये माझे पाच सात काम असे आहेत ते त्याच्यातले मेहरून २५१ त्याला आपण एन.ओ.सी.दिलेली आहे साहेब, १०० कोटीमध्ये ते मंजुर आहे. कारण त्याचे आता महापालिकेकडे आपले टेंडर झालेले आहेत. ओपन झाले का दुसरे पाकीट ओपन झाले का ? मी पत्र व्यवहार केलेले आहे मी पत्र दिलेले आहे साहेबांना की, त्याचे दुसरे पाकीट ओपन करू नये. तेथे २५१ मध्ये दुसरे रस्तेच नाही ना. तेथे सर्व दुसरे रस्ते होत आहे. रस्ता शिल्लक नाही. त्याच्यामुळे काम पण बदलविता येणार नाही ना. दुसरा राहिला असता तर मी केले असते ना. रस्तेच शिल्लक नाही २५१ मधील. परत ऐका ना. माझे होऊ द्या. तुम्ही बोला ना नंतर बोला ना तुम्ही. माझे होऊन जाऊ द्या.

**मा.महापौर :-** खाली बसा, यांच पुर्ण होऊ द्या.

**श्री.राजेंद्र पाटील :-** याच्यानंतर आजच आपण हे जे अजेंडयामध्ये ३०-३० लाखाचे कामे दिलेले आहेत. त्यातले मी जे काम सुचविलेले आहे. त्या सुचवलेल्या कामांवरती दोन दिवसापुर्वी जे.सी.बी. फिरविण्यात आला. त्याठिकाणी साफसफाई मुरुम टाकायला सुरवात केली. मी संबंधीत इंजिनिअरला विचारले की, मी हे काम सुचविलेले आहे. तुमच्याकडुन इस्टीमेट घेतले, येथे मोजमाप करायला संबंधीत इंजिनिअरने माणुस पाठविला, त्याच्यासोबत एक ठेकेदार पण आला, गाडीवर लिफ्ट द्यायला. त्यानी त्या कामाची सुरवात करुन टाकली तेथे. आता ते काम कुठेही मंजुर नाही. मी संबंधीत इंजिनिअरला विचारले की, हे काम कसे सुरु होत आहे. त्यांनी सांगितले की, त्यांनी २६७,२६९ ज्याच्यामध्ये तो निधी उरणार आहे. त्या उरणाऱ्या निधी मध्ये हे रस्ते करणार आहे. उरणाऱ्या निधीतुन तुम्ही रस्ते करणार आहे म्हणजे विषय असा झाला. हे अतिक्रमणचे दुकानदार कसे जागा सांभाळतात. तशी हे जागा सांभाळुन ठेवण्याचे काम करत आहे. एखाद्या नवरदेवाच लग्न होत. त्याच्यासाठी कपडे घेतात.आणि त्याचे कपडे

उरले तर सुख्याला आपण देऊ. तर त्या नवरदेवाचे कपडे शिवायचे बाकी आणि सुख्याचे कपडे पहिले शिवले. हा कोणता प्रकार आहे. आणि असे जर कोणी अधिकारी करत असले तर त्यांच्यावर मॅडम कार्यवाही झाली पाहीजे. मी त्याच्यावरतीच येत आहे जी सुरवात केली ना मी. असे जर अधिकारी करत असतील जाणुन बुजुन करत असतील. आता हा जो आदित्य चौकाचा जो रस्ता आहे.याचा सुध्दा मी बी ॲण्ड सीला बसलो होतो. संबंधीत इंजिनिअरचा मला फोन आला, भाऊ तुमचा रस्ता मंजुर झाला का ? मी मागणी करतो तेव्हा तुम्ही काहीच करत नाही. आणि माझे झाले की नाही झाले. म्हणजे तो पण त्याच्यात खुटी मारायचे काम. असे नाही आणि कोणी अधिकारी जर विशिष्ट अधिकारीसाठी काम करत असेल तर त्याची चौकशी झाली पाहिजे. त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

**श्री.नितीन बरडे :-** याच्यानंतर शासनाला सांगा राजुभाऊ की, किमान २ च नगरसेवक ठेवा एका वार्डात.

**श्री.दिलीप पोकळे :-** मघाशी चौधरी साहेब यांनी दोन विषय काढले एक कानळदा रस्त्याचा एक खड्डयाचा, तर घनकचऱ्याच्या विषयात थोडी दुरूस्ती करतो, घनकचरा हा पूर्ण शहराचा प्रोजेक्ट आहे. आता संपुर्ण शहराचा प्रकल्प असल्याने आपण सांगितले जे काही आहे. आता आम्हाला सांगुन द्या येणाऱ्या काळामध्ये नगरसेवकांना काम कसे करणार ते सांगून दया. म्हणेज आम्हाला त्यावर बोलण्याची गरज पडणार नाही.

**मा.उपमहापौर :-** म्हणजे तुमच म्हणण्याचे अर्थ काय ?

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझ्या म्हणण्याचे अर्थ असे आहे की, आपण त्या ठिकाणी गेल्यानंतर संबंधीत अधिकारी यांनी सांगितले की, तुम्ही आले तर नारळ फोडून घ्या.तो संपुर्ण शहराचा विषय होता. येत्या काळामध्ये होणारे काही उदघाटने असतील तर ते ही तुम्ही आम्हाला आताच सांगून दया मि तुम्हाला म.महापौर व म.उपमाहापौर म्हणून विनंती करतोय. माझ्या वार्डात जितके कामे झालेले आहे ते सन्मा.पालकमंत्री गुलाबभाऊंच्या निधीतुन झालेले आहेत. तुम्ही मनपा फंडातुन किती निधी दिला माझ्या वार्डामध्ये.

**मा.उपमहापौर :-** ३०% दिले.

**श्री.दिलीप पोकळे :-** ते कामे सन्मा.पालकमंत्री यांच्या निधीतुन झाले आणि त्या ठिकाणी मी त्यांना बोलविले होते. येथे विषय बोलविण्याचे चालले आहे आणि मी तुम्हाला बोलविण्या विषयी विचारत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझा विषय नाही. प्रशासनाचा आहे. तुमच्या भावना कळल्या आम्हाला. समजुन घ्या.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** त्या ठिकाणी महापौर होते, तुम्ही होते, आयुक्त मॅडम होत्या.सोनगीरे साहेब होते बोरोले साहेब होते.यांना समजायला पाहिजे ना.बरं आम्ही नव्हते, सन्मा.नितीनभाऊ आहेत.सन्मा.अश्विनभाऊ आहे. यांना कोणाला तरी बोलविले पाहिजे.

**मा.उपमहापौर :-** जेव्हा त्याची प्रत्येक्षात सुरवात होईल ना सर्वांना बोलवु तुम्ही चिंता नका करा. सगळयांना बोलवु.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** परंतु मला या विषयाच्या पॉलिसी बद्दल बोलायचे आहे. ही सुध्दा पॉलिसी ठरली पाहिजे. महानगरपालिका हद्दीमध्ये जे शहराचे विषय आहे. मी पुन्हा सांगतो, मघाशी भाऊंनी विषय मांडला आम्ही प्रभागातले नगरसेवक आहेत.तुम्ही मला जो विषय विचारला प्रभागातला विषय विचारला. मी तुम्हाला शहराच्या विषयावर विचारत आहे. तोच विषय संपुर्ण शहरासाठी आहे. तेच विषय सन्मा.सदस्यांनी पाठपुरावा करुन दिलेले आहेत. त्या प्रकल्पासाठी सन्मा.पालकमंत्री असतील,सन्मा.आमदार असतील,खासदार असतील, ज्या ज्या ठिकाणी निधीचा विषय आहे. आपल्या जळगांव शहरामध्ये जे प्रकल्प सुरू होणार आहेत. ज्यांचे उदघाटन होणार आहेत. तर आपण मला यामध्ये आश्वस्त कराव की यांच्या कार्यक्रमाला आपण सर्व सन्मा.सभागृहाला त्या ठिकाणी आंमत्रित करणार आहे का?

**मा.उपमहापौर :-** माझ काम नाहीये ते प्रशासनाचे काम आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** अस कस काय म्हणत आहेत तुम्ही

**श्री.दिलीप पोकळे :-** म्हणजे हे प्रशासन ठरवेल की केव्हा काय होणार आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मला एक सांगा हा आपला पिंप्राळ्याचा जो विषय आहे. याच्यात माझ म्हणण आहे की प्रोटोकॉल असो नसो तो काही संबंध नाही. मनोज भाऊंनी कचरा फॅक्टरीच्या रस्त्याचा विषय दहा वेळा मांडलेला आहे. किमान सगळ्या नगरसेवकांना नाही. पण ज्या प्रभागात आपण जात असाल. प्रभागातील सन्मा.नगरसेवक यांना तो कोणत्याही पक्षाचा असो त्याला त्याठिकाणी बोलवले पाहीजे आणि तुम्ही सांगतात की हा प्रशासनाचा विषय आहे. तुम्हाला या सभागृहाने महापौर, उपमहापौर बनवले आहे हे विसरू नका तुम्ही

**मा.उपमहापौर :-** मान्य आहे.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत असल्यामुळे गोंधळ निर्माण झाल्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही)

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नगरसेवक त्या प्रभागाचा असेल त्याला बोलवलच पाहीजे. तुम्ही सांगायला पाहीजे प्रशासानाला की संबंधित तिथल्या नगरसेवकाला बोलवा. तुम्ही अस करायला नको.

**मा.महापौर :-** भाऊ बोला, बाकी आता सगळे शांत बसा, नितीनभाऊंना बोलू द्या त्यांनी केव्हाच विचारलेले होते. त्यांना मी परमिशन देत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतू काय झाले आहे आता सर्व सभागृह संतप्त आहे परंतू आपण याच्यातील उपस्थितीची स्थिती बघितली. तर संपुर्ण महानगरपालिका प्रशासनाला दोषी धरणे मला वाटते की हे संयुक्तिक नाहीये.कारण हा विकास कामांचा जो गोंधळ जो झालेला आहे त्यामुळे एक वेगळी परिस्थिती निर्माण झाली असल्याकारणाने ती संपुर्ण परिस्थिती संपुर्ण सभागृहाला, संपुर्ण शहराला म्हणजे याच अस झालेल आहे की चोराला सोडून सन्यासाला फाशी होत असेल.

**श्री.मनोज चौधरी :-** भाऊ चोर कोणाला म्हणत आहे तुम्ही, प्रशासनाची काहीच जबाबदारी नाहीये का?

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही भाऊ

**श्री.मनोज चौधरी :-** नाही भाऊ आता बोलतांना पहिलाच शब्द वापरला नितीनभाऊ तुम्ही की याच्यात प्रशासनालाच जबाबदार धरले पाहीजे असे चुकीचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही होत काय आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** नितीनभाऊ याच्यात प्रशासनालाच जबाबदार धरले पाहीजे याचा अर्थ काय होतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सगळ्या गोष्टी क्लिअर करतो मी

**श्री.मनोज चौधरी :-** नितीनभाऊ प्रशासन जो पर्यंत झुकत नाही ना तोपर्यंत कोणतेच काम व्यवस्थित होत नाही. तुम्ही मागच्या वेळेस पण मांडले होते माझ्याबद्दल की या शहरातील पुर्ण कचरा हा मनोज चौधरींच्या प्रभागात जातो म्हणुन आपण भाऊ रोज नाही लोक काय-काय पध्दतीने बोलतात हे आम्हाला ऐकाव लागते भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** आम्ही महासभेमध्ये का मांडतो आहे भाऊ, त्यानुसारच मांडतोय. आता भिलताईंनी आता परिस्थिती मांडली तीच परिस्थिती माझ्या प्रभागामध्ये यायला पाहीजे का ? लोक आम्हाला जिवंत ठेवतील का? विचारा त्या डॉक्टरांना की सकाळ पासुन संध्याकाळ पर्यंत किती फोन येतात लोकांचे, मी तेच म्हणतोय भाऊ जोपर्यंत मुख्य अधिकारी , कर्मचारी यांच्यावर हे जोपर्यंत कारवाई करत नाही तोपर्यंत या गोष्टी बंद होणार नाहीत भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य आहे मनोजभाऊ तुमची भुमिका जी आहे ती रास्त आहे त्याबद्दल दुमत नाहीये. परंतू काय झालेल आहे की गेल्या वर्षभरापासुन आपण सगळ्या निविदांच्या संदर्भात गोंधळ जो पाहातोय ना तो अत्यंत गुंतागुंतीचा झालेला आहे. इतका गुंतागुंतीचा झालेला आहे की, सभागृहाच्या सर्व सदस्यांपासुन ते महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपासुन ते कनिष्ठ अधिकाऱ्यांपर्यत इतका मोठा संभ्रम निर्माण झालेला आहे की कुठला रस्ता कोणत्या निधीमध्ये मंजुर आहे हे कळत नाही. काय होते की कामाची पुनरावृत्ती होऊ नये या अनुषंगाने प्रशासन त्या दृष्टोकोनातुन काळजी घेत असत. जसे मनोजभाऊंच्या प्रभागातील रस्त्यांचा विषय आहे. अत्यंत गंभीर बाब आहे आणि तो रस्ता होण अत्यंत गरजेचे आहे. ही वस्तुस्थिती जरी मान्य केली परंतू त्या रस्त्याच नियोजन त्या १०० कोटी रूपयांमध्ये केलेले आहे. १०० कोटींच्या कामांना स्वत: महानगरपालिकेने NOC दिलेली आहे. त्यांची निविदा प्रक्रीया

**श्री.मनोज चौधरी :-** भाऊ दोन मिनिंट, ते काम टाकण्याच्या आधी मी मॅडमांकडे जावुन आलो होतो की हा रस्ता तुम्ही मनपा फंडातुन टाका. मॅडम खर आहे का हे टेंडर प्रोसेस व्हायच्या पहिले हे व्हायच्या पहिले मी तुमच्याकडे आलो होतो, डॉक्टर साहेब आणि मी मॅडम तो रस्ता मनपा निधित करून द्या भाऊ आता याचे उत्तर द्यायला लावा त्यांना.

**मा.आयुक्त :-** सर भाऊंनी उत्तर दिले आणि भाऊ ज्या दिवशी भेटले. त्याच दिवशी त्याचे टेंउर पडलेले होते.

**श्री.मनोज चौधरी :-** मॅडम आठ दिवस जातात ना.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत असल्यामुळे गोंधळ निर्माण झाल्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही)

**मा.आयुक्त :-** सर १५ मार्चला टेंडर झाले आहे त्या कामाच त्याच्यामध्ये तुम्हाला सांगते की २६-२६ कोटींचे दोन काम आहेत आपले त्याच्यात भिलताईंनी जो रस्ता सांगीतला तो त्याच्यात आहे. कचरा फॅक्टरीकडे जाणारा रस्ता

तो पण त्याच्यात आहे. मी पुनश्च सांगते की आपली DPDC ची मागे पालकमंत्री साहेबांच्या अध्यक्षतेखाली जी बैठक झाली. दोन मंत्री होते तिथे गिरीषभाऊ होते तिथे मी त्यांना विनंती केली की आमची बैठक लावायची म्हणुन

**श्री.मनोज चौधरी :-** मॅडम बैठक होऊ द्या पण ते काम अजुन दोन तिन महिने सुरू होणार नाही.

**मा.आयुक्त :-** सर मी आता याच्या विषयी काय कमिटमेंट करू.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मॅडम मी काय म्हणतो आहे त्यांनी माप घेतलेले आहेत.

**मा.आयुक्त :-** सर

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्यांनी माप घेतलेले आहेत. जर हाच रस्ता तुम्ही मनपा फंडातुन केला तर ती ते तुम्ही दुसरीकडे वापरू शकतात. मी त्यांना विचारलेले आहे. मी त्यांच्या डेप्युटी इंजिनिअरला विचारलेले आहे.

**मा.आयुक्त :-** भाऊ मी तेच सांगते आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्यांनी काही रस्त्यांचे नांव दिलेले नाहीये आणि जर हा रस्ता तुम्ही मनपा फंडातुन केला तर तर ती क्वॉलीटी दुसरीकडे वापरू शकतात. मी विचारले ना त्यांना करू शकतात आहे काय किती वेळ झाला करत आहे चर्चा

**मा.आयुक्त :-** भाऊ हा रस्ता काँक्रीटीकरण करणे अस नांव टाकलेले आहे टेंडरमध्ये , हरिविठ्ठल नगरच सांगुया

**श्री.अश्विन सोनवणे :-** पण तुम्ही हे टाकुन द्या ना मी त्या इंजिनिअरला विचारले होते. म्हणजे हा जर रस्ता तुम्ही मनपा फंडातुन करून टाकला मनोजभाऊच्या वॉर्डातील तर त्याची जी क्वॉलीटी आहे ती दुसऱ्या कडे वापरता येईल ना. करत नाही का महापालिका विचारले होते ना इंजिनिअरला येथे मी

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण जर मनपा फंडातुन करायचे असेल तर तसा प्रस्ताव त्यांना पुन्हा द्यावा लागेल नाहीतर काय होईल की प्रशासन नोट ही पुट अप करणार नाही. हि वस्तुस्थिती आहे. कारण प्रशासन एक कामाला दोन-दोन ठिकाणी कुठल्या अर्थाने प्रस्तावित करेल. उद्या आपण ही ऑब्जेक्शन घेवु किंवा ऑडीट ऑब्जेक्शन घेईल की या कामाची पुनरावृत्ती दोन ठिकाणी प्रस्तावित केलेली दिसत आहे की हे काम या फंडातुन प्रस्तावित होते आणि त्याच कामाचे मनपाच्या निधीतुन कसे काय प्रस्तावित करत आहेत. हे ऑडीट ऑब्जेक्शन निघेल भविष्यात आणि त्याच्यामुळे जर कधी अशा पध्दतीने जस मनोजभाऊंच म्हणणे आहे की १०० कोटींच जर कधी अंधारमय वाटत असेल की लवकर होणार नाही मग तसा आपल्याला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल की ते १०० कोटींत प्रस्तावित केलेले काम रद्द करण्यात यावे आणि त्या कामाची तातडीची गरज पाहाता ते काम मनपा निधीतुन करून देण्यात यावे.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत असल्यामुळे गोंधळ निर्माण झाल्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही)

**मा.आयुक्त :-** भाऊ २६ आणि २६ कोटींचे असे १५ मार्चला टेंडर झालेले आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** मॅडम तिन महिने झाले आहे.

**मा.आयुक्त :-** सर मग मी तेच सांगते आहे की आता याचे उत्तर कसे देवु.

**श्री.मनोज चौधरी :-** मॅडम एक दोन महिने नाही तिन महिने झाले आहे.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत असल्यामुळे गोंधळ निर्माण झाल्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही)

**श्री.मनोज चौधरी :-** आता हे काम मंजुर झालेले असेल तर त्यांनी सांगायला पाहीजे की या कामाला सहा महिने लागतील. तर तुम्ही ते काम मनपा फंडातुन टाकुन द्या एवढीच विनंती होती माझी मॅडमांना

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत असल्यामुळे गोंधळ निर्माण झाल्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही)

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्याबाबत आपल्याला एक धोरण स्विकारावे लागेल की ज्या कामांची NOC आपण दिलेली आहे. ते काम रद्द करावे लागेल आणि

**श्री.मनोज चौधरी :-** आता तुम्हीच विचारा की काम किती दिवसात चालु होईल असे तुम्ही सांगीतले की बर वाटेल की काम सुरू होईल की नाही अस.

**मा.महापौर :-** अश्विनभाऊ आता तुम्ही माहिती घ्या आणि त्यांना अवगत करा याबाबत

**मा.उपमहापौर :-** अश्विनभाऊ आता अस आहे की सदस्यांनी सांगीतले की अश्विनभाऊंनी सांगीतले की लगेच काम होतील असे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नाही ना ऐका परवा आमची गिरीषभाऊंकडे आमची मिटींग झाली आणि या विषयात चर्चाही झाली. त्यावेळी भाऊंनी सांगीतले की DPDC त असे झालेले आहे. भाऊंनी आमच्या समोर तिथे सचिवांना फोन लावला मंत्रालयात की हा जो विषय आहे महापालिकेच्या कामांच्या टेंडरचा हा लवकरात लवकर मंजुर करा

आणि याच्यात भाऊ असतील गुलाबभाऊ असतील पाठपुरावा करत आहेत आणि हे लवकरात लवकर होईल. ५४ कोटींच्या टेंडरला सुरूवात होईल.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत असल्यामुळे गोंधळ निर्माण झाल्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही)

**श्री.नितीन लढ्ढा :-** अश्विनभाऊ आपण राज्यातील सत्ताधारी पक्षाचे असल्याकारणाने आमचे मनोजभाऊंना आश्वासित करा की काम केव्हा मार्गी लागेल.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत असल्यामुळे गोंधळ निर्माण झाल्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही)

**श्री.मनोज चौधरी :-** नितीनभाऊ मी अश्विनभाऊंना विचारलेलेच नाहीये मी मॅडमांना विचारलेले आहे की काम कधी सुरू होणार आहे असे. ते जर म्हणतील की अश्विनभाऊंना विचारा तर मी अश्विनभाऊंकडेच विचारेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मॅडम बघा यांची तळमळ पाहाता आहे ना या विषयावर त्या कामाचे प्रत्यक्षात त्याचे स्टेटस रिपोर्ट काय आहे आणि ते आवाक्यात किंवा मुदतीमध्ये जर कधी मान्य होवुन येत असेल, नसेल तर हि टर्म संपण्याच्या पुर्वी तसा धोरणात्मक निर्णय बदल करून घ्यावा लागेल की यापुर्वी १७ कोटींच्या कामांना जरी NOC दिलेली असेल तरी कामाची गांर्भीयता पाहाता त्या कामाला अजुन जास्त कालावधी लागत असल्यामुळे ते काम तिथे रद्द करून ते काम मनपा निधीतुन करण्याच्या संदर्भातील तसे धोरण ठरवावे लागेल आणि येणारी पुढची जी महासभा असेल, त्याच्यामध्ये ते धोरण ठरवुन या प्रश्नाला मार्गी लावुन आणि चालना द्यायला साईस्कर होईल अस मला वाटते.

**श्री.कुलभुषण पाटील,मा.उपमहापौर :-** साहेब त्या रस्त्यावर खुप खड्डे पडलेले आहेत.

**श्री.अश्विन सोनवणे :-** खड्डे तरी बुजा.

**श्री.कुलभुषण पाटील,मा.उपमहापौर :-** हे तर ते सुध्दा नाही म्हणता. काय कार्यक्रम आहे हे काही समजत नाही. काय कारण आहे ते सांगा.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे,शहर अभियंता :-** तो रस्ता दुरुस्ती करण्या सारखा राहीलेला नाही.

**श्री.मनोज चौधरी :-** तो रस्ता कशासारखा राहीलेला नाही ते सांगा.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे,शहर अभियंता :-** रस्ता डागडुजी सारखा राहीलेला नाही.

**श्री.मनोज चौधरी :-** म्हणजे रस्ताच राहीलेला नाही. पत्रकार बंधुना मी विनंती करतो की, साहेबांनी जे सांगीतले ते उदया छापा की डागडुजी सारखाच रस्ता राहीलेला नाही. आम्ही तेच सांगतो आहे की, मनपा फंडातून तो रस्ता करा. कधीचे सांगतो आहे, वर्षभरापासून मी हेच तर सांगतो आहे हे मी आताच एक-दोन महिन्यापासून सांगत नाही हे वर्षभरापासून सांगत आहे. एकदा रिकॉल केले कोणीच आले नाही असेच सांगीतले नां तुम्ही मला, कां टेंडरच काढले नाही त्याचे ?

**श्री.चंद्रकांत सोनगिरे,शहर अभियंता :-** तो प्रस्तावच असा आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** हे पैसे तर आले हो, हे तर वर्षभरापूर्वीची गोष्ट आहे नां, यालातर सहा महिने झाले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौर, माझा एक महत्वाचा विषय आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेचे सन १९९२-९३ मध्ये ६४५ कर्मचारी कॉन्ट्रक्ट लेव्हल वरती त्यावेळी अशी पध्दत होती सन-९२-९३ ला परिस्थिती होती की शहरातील आरोग्याची सेवा ठेकेदारी पध्दतीने कर्मचाऱ्यांकडुन करुन घेत होतो. ९२-९३ मध्ये येथे ठेकेदाराअंतर्गत ६४५ कर्मचारी काम करीत होते आणि ठेकेदारास आपण एकमुस्त पेमेंट अदा करीत होतो. परंतु तद्नंतर सदर कर्मचारी कामगार न्यायालयात गेले आणि तेथे त्यांनी मागणी केली की, आम्हाला सन त्यांनी २००७ मध्ये इंडस्ट्रीयल कोर्टात सूट दाखल केला महापालिकेच्या विरोधात आणि त्यांनी सांगतले की, आम्ही महानगरपालिकेच्या सेवेत काम करतो आहे आणि त्याअनुषंगाने महानगरपालिका कर्मचारी यांना असणारे वेतन, भत्ते हे सुध्दा आम्हाला लागू करण्यात यावे. अश्या पध्दतीने २००७ ला इंडस्ट्रीयल कोर्टात त्यांनी दावा दाखल केल्यानंतर हे कर्मचारी महापालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी म्हणून काम करीत नव्हते. कारण ते ठेकेदाराचे कर्मचारी होते. ज्यावेळी सन २००७ मध्ये यामध्ये इंडस्ट्रीयल कोर्टामध्ये आपली महानगरपालिकेची बाजू कुठेही योग्य पध्दतीने मांडली गेली नाही त्यावेळी ती महानगरपालिकेची किंवा नगरपालिकेची ती जबाबदारी होती की, हे कर्मचारी मनपाचे कर्मचारी नाहीत हे मक्तेदाराचे कर्मचारी आहेत. मक्तेदार व महापालिका यांचा संबंध आहे ही योग्य बाब न मांडल्यामुळे त्यासंदर्भात इंडस्ट्रीयल कोर्टाने २/०४/२०१५ ला मनपाच्या विरोधात निकाल दिला. मनपाच्या विरोधात निकाल दिल्यानंतर सुध्दा याविरुध्द मनपाने उच्च न्यायालयात अपिल दाखल केले असता मा.उच्च न्यायालयाचे असे लक्षात आले की, खालच्या कोर्टात प्रतिवादी यांनी पुरावे व आपली बाजू न मांडल्यामुळे हा निकाल महानगरपालिकेच्या विरोधात गेला आहे. त्यावेळी उच्च न्यायालयाने मनपावर ताशेरे ओढत एक लक्ष रुपये दंड करुन मॅटरमध्ये पुरावे

देण्यासाठी पुन्हा इंडस्ट्रीयल कोर्टाकडे पाठविले. म्हणजे त्यावेळी उच्च न्यायालयाने मनपाला निगलीजन्सी म्हणून एक लाख रुपये दंड आकारला दंड आकारल्यानंतर मॅटर पुन्हा इंडस्ट्रीयल कोर्टात गेले परंतू ही ॲपरचुनीटी मिळुन सुध्दा, मनपाने मॅटर रिओपन होवून सुध्दा योग्य पध्दतीचे आपले पुरावे दाखल केले नाहीत. इंडस्ट्रीयल कोटोने २६/१०/२०१७ ला आपला निकाल कायम ठेवत ९६ कोटी रुपये जमा करण्याचे आदेश दिले. २०१७ नंतर मनपाने उच्च न्यायालयात अपील दि.२६/०२/२०१८ ला ९० दिवसांचे मुदतीनंतर दाखल केले. एवढेच नव्हेतर खालच्या कोर्टाचे निकालास स्थगीती मागण्यास स्वारस्य दाखवले नाही. एखादया खालच्या कोर्टात निकाल आपल्या विरोधात गेला असेल त्यावेळी उच्च न्यायालयामध्ये प्राथमिक मागणी हेच करतो की, खालच्या कोर्टातील भूमिकेला स्टे ची भूमिका आपली असायला पाहीजे. परंतू फक्त अपिल दाखल करुन दिलं त्यामध्ये स्टेची मागणी देखिल केली गेली नाही आणि ते अपिल उच्च न्यायालयात पडून राहीले. मनपाने २०२२ पर्यंत चालवले सुध्दा नाही फक्त दाखल करुन ठेवल म्हणजे त्यावेळी मनपाला कधी गरज वाटली नाही की मनपाच्या विरुध्द खालच्या कोर्टाने ९६ कोटीचा आदेश झाल्यानंतर त्या मॅटरमध्ये खुप गांभीर्याने उच्च न्यायालयात संपुर्ण बाजु लक्षात आणुन ते मॅटर चांगल्या पध्दतीने चालवु दयायला पाहीजे त्यासंदर्भात कुठलीच तसदी आपल्या वकीलांनी घेतली नाही किंवा मनपा प्रशासनाने घेतली नाही. तद्नंतर ते मॅटर निकाली निघालं आणि ९६ कोटीची डिमांड निघाली तेव्हा २०२३ मध्ये आपण सिनीयर कॉन्सीलर लावून ते मॅटर रिस्टोर करण्याची उच्च न्यायालयात विनंती केली आणि उच्च न्यायालयाने ते मॅटर रिस्टोर करुन घेतल. त्याला स्टेटस्को दिला ही मागच्या वेळी मी आपल्या या सभागृहात आपण असतांना चर्चा केली त्यावेळी आपण स्वत: यात गांभीर्याने लक्ष घालुन ॲड शैलेंश ब्रम्हे यांना अपॉईमेंट करुन त्यासंदर्भातील स्थगिती मिळवली. परंतू आता कालच्या दिवशी ते मॅटर मे.उच्च न्यायालयाने आपले ते मॅटर डिसमीस करुन टाकलं. आता आपल मॅटर डिसमीस केल्याने आज ती ९६ कोटीची लायबीलीटी आजच्या स्थितीला मनपावर येवुन ठेपलेली आहे. म्हणजे कुठल्याही गोष्टीची महानगरपालिकेची एक नया पैसा सुध्दा चूक नसताना हे विनाकारण ९६ कोटीचा भुर्दंड महानगरपालिकेवर येवुन बसला आहे. आता याला जबाबदार कोण ? आपण या सपंर्ण प्रकरणाची जर सुरुवातीपासून प्राथमीक माहिती जर घेतली तर निश्चितपणे यासंदर्भात मनपाचे त्यावेळेचे जे प्रशासन असेल आणि ज्या पध्दतीने लेबर कोर्टाला माहिती पुरवण्यात आलेली असेल म्हणजे ज्यापध्दतीने सक्षम पध्दतीने महानगरपालिकेची बाजू लेबर कोर्टात देणं अपेक्षित होतं की हे कॉण्ट्रक्टवरील कर्मचारी आहेत यांचा मनपाच्या आस्थापनेशी कुठलाही संबंध नाही त्यावेळी महानगरपालिकेच्या बाजूने या मॅटरचा निकाल लागला असता. परंतु निव्वळ आपल्या प्रशासनातील तत्कालीन जे कोणी अधिकारी असतील किंवा त्यावेळी जो कोणी आपले वकील जे या मॅटरमध्ये लक्ष घालत असतील निव्वळ यांच्या चूकीमुळे हे मॅटर महानगरपालिकेच्या विरोधात जावून हा ९६ कोटीचा भुर्दंड महानगरपालिकेवर येवुन पडला आहे. एकीकडे आपण १० -१०, २५-२५ लाखांचे विकास कामांसाठी यासभागृहात भांडत असतो आणि अश्या पध्दतीने गरज नसताना ही ९६ कोटीची लायबिलीटी मनपावर आली याला जबाबदार कोण ? याचे संदर्भात प्रशासन गांभीर्याने चौकशी करेल कां ? म्हणजे याच्या संदर्भात तर मी म्हणतो यावेळी जे मनपाचे अधिकारी असतील ते व जे या मॅटरमध्ये विधीतज्ञ असतील ते यास संयुक्त जबाबदार असतील या निष्कर्षापर्यंत मी आलेलो आहे असे मी ज्यावेळी या विषयाचे गांभीर्याने माहिती घेतल्यानंतर. तर यासंदर्भात मला वाटते प्रशासन एखादी चौकशी समिती नेमेल काय ? आणि चौकशी समिती नेमून यासंदर्भात जे दोषी असतील त्यांना यासंदर्भात जबाबदार धरण्यात येईल कां ? हा एक मुद्दा झाला आणि दुसरा मुद्दा याच्या संदर्भात तातडीने सुप्रीम कोर्टामध्ये जेष्ठ विधी सल्लागारांची मदत घेवून या मॅटरमध्ये पुन्हा रिस्टोर करण्याच्या दृष्टीकोनातून तातडीने पावलं उचलण हे सुध्दा तेवढेच गरजेचे आहे. कदाचीत सुप्रीम कोर्टातही मला वाटत नाही की, काही दिलासा मिळू शकेल कां ? परंतू हा शेवटी जनतेचा पैसा आहे. मुळात यांची जी मागणी आहे ती त्यावेळेला मुळातच बेकायदेशिर होती परंतू बेकायदेशीर मागणीला योग्य पध्दतीने मनपाकडनं माहिती न पुरविल्यामुळं लायबिलीटी आज महानगरपालिकेवर येवुन ठेपली आहे. आज ९६ कोटी रुपये मनपाची परिस्थिती आहे कां ? एवढी मोठी रक्कम महानगरपालिकेची परिस्थिती नसताना या महानगरपालिकेला आपल्या मनपा निधीतून या पैश्यांची जबाबदारी स्विकारावी लागेल ही परिस्थितीतरी आहे कां ? उदया समजा तुम्ही कारवाई केली कोणा कर्मचाऱ्यावर जे दोषी असतील तर त्यांचेकडून काय वसुल होणार आहे ? परंतू हे ९६ कोटी रुपये आज भरणे आज आपल्यावर आलेलेच आहेत. कारण हायकोर्टाने आपले अपिल फेटाळल्यानंतर आज ती लायबिलीटी स्टॅण्ड झाली आहे. सुप्रीम कोर्टात जावून दिलासा नाही दिला तर १०० टक्के हे ९६ कोटी रुपये भरणे आले आहेच कारण मागची लेबर कोर्टाची ऑर्डर जर तुम्ही वाचलेली असेल तर त्याच्यामध्ये निकाल झाल्याचे २ महिन्याच्या आतमध्ये ४८ कोटी मनपाने तातडीने अदा करावे असे स्पष्ट आदेश आहे. त्या गोष्टीला आता सहा आठ महिने होवून गेले आता आपण त्याच्यामध्ये

चार सहा महिने हायकोर्टामध्ये रिलिफ मिळवण्याचे दृष्टीकोनातून प्रयत्न केले परंतू हायकोर्टाने देखिल हे ऑर्ब्जवेशन नोंदवले आहे की, महानगरपालिकेनेच आपलीच बाजू योग्य पध्दतीने मांडलेली नसल्या कारणाने खालच्या कोर्टाने दिलेला निकाल मान्य केलेला आहे. म्हणजे ही गंभीर स्वरुपाची बाब आहे म्हणजे यापूर्वी सुध्दा एका विहीरीच्या मॅटर मध्ये विहीरीच्या मोबदल्यापोटी २५ कोटी रुपये महानगरपालिकेला अदा करावे लागलेले आहेत. महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नामध्ये अश्या पध्दतीने गळत्या लागत असतील तर मला सांगा या शहरातील अश्या रस्त्यांच्या संदर्भात म्हणा किंवा इतर सेवा कुठल्या परिस्थितीत महानगरपालिका पुरवेल ? अंत्यत आपले कोर्ट मॅटरमध्ये दुर्लक्ष आहे हे केवळ उदाहरणार्थ हे दोन मोठ मोठ मॅटर आहेत. असेच एक मॅटर पुर्वी आपण चर्चा केली आहे की, एक मक्तेदाराने जैन सेल्स कंपनी त्याने ७० लाख मागणी बाकी होती महानगरपालिकेकडे त्याने इथे खालच्या कोर्टात दावा दाखल केलेला होता त्या दाव्याच्या निकालाच्या अनुषंगाने मनपाने जवळपास ७० पैकी ६० -६५ लाख रुपये कोर्टाच्या आदेशाचे अगोदर अदा केलेले आहेत फक्त ५ - ७ लाख रुपये त्यावेळी बाकी असतील. त्याने त्या दाव्यामध्ये ही भूमिका घेतली की, मला जे ६० - ६५ लाख रुपये मिळाले ते व्याजापोटी मिळाले आहेत व माझी मुळ रक्कम आहे ती घेणेच बाकी आहे आणि तो दावा सुध्दा मनपाचे विरुध्द जावून त्या ७० लाखाचे १७ कोटी रुपये अदायगीचे आदेश झालेले आहेत. आणि त्यासंदर्भात ती डिक्री एक्झीकुट करण्याचे दृष्टीकोनातून महानगरपालिका आयुक्तांची खुर्ची ॲटेच करण्याच्या दृष्टीने ती ऑर्डर तेथे पेंडींग असताना आपण त्यास पुन्हा उच्च न्यायालयात चॅलेंज केले आणि उच्च न्यायालयात ते स्थगीत आहे. अश्या पध्दतीने ७० लाखाचे १७ कोटी, कामगारांचा काही देणं नसतांना ९६ कोटी, विहीरीचा ३०-४० हजारा मोबदल्याच अनुषंगाने २५ कोटी रुपये अश्या कोटयावधी रुपयांची एका निगलीजन्समुळे जर कां महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीवर बोजा पडत असेल तर मला वाटत हे सभागृह याच कामांसाठी पूढचे पाच वर्ष भांडत राहीले तरी या शहराचा विकास होण शक्य नाही. आणि याला मी म्हणतो निव्वळ प्रशासनातील जे कोणी अधिकारी असतील जे आपल्या वकीलाना वेळेवर योग्य माहिती पुरवत नाही किंवा आपल्या छोटयाश्या वैयक्तीक स्वार्थासाठी निगलीजन्स करीत असतील तर त्याचे दृष्यपरिणाम या संपूर्ण महानगरपालिकेला आणि पर्यायाने या शहराला होणार आहे. म्हणजे इतकी वाईट परिस्थिती आहे हे दोन चार मॅटर फक्त आपल्या डोळयासमोर आणले त्याच्यामध्ये आपण लक्ष घालतो त्याच्यामुळे लक्षात येतात. असे अनेक मॅटर्स आहेत याच्यामध्ये महानगरपालिकेची बाजू सक्षमरित्या कधीच मांडली जात नाही आणि परिणामी कोटयावधी रुपयांचा भूर्दंड या महानगरपालिकेच्या तिजोरीवर येवुन पडतो. ही अत्यंत गंभीर स्वरुपाची बाब आहे म्हणून यासंदर्भात भविष्यात प्रशासनाची भूमिका काय राहील ज्या ज्या पध्दतीने अश्या काही कोर्टात केसेस प्रलंबीत असतील त्यावर गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

**मा.आयुक्त :-** २२ जेंव्हा निदर्शनास आले की जेव्हा आपली महापालिकेची सभा झाली तेंव्हा आपले काही कर्मचारी येऊन भेटायचे की कोर्टामध्ये चर्चा झालेली आहे की, महानगरपालिकेने १०० कोटी भरायचे मग आम्ही कोर्टाची माहिती घेतली . नितीनभाऊशी चर्चा केली मग आम्ही सिनियर कॉन्सिलर लावले, याची मान्यता घेतली. मोठया याने आपण आपली बाजू मांडण्याचा आटोकाट प्रयत्न केला. अजून १७ कोटींच मॅटर याच्यामध्ये कोर्ट मॅटर ऐकत आहे. परंतू यामध्ये २९ कोटींच्या वसुली यामध्ये सुप्रिम कोर्टात अपिल करावेच लागेल प्लस यामध्ये सन २०१५ मध्ये पहिला कोर्टाचा काय निकाल लागला यामध्ये आपण काय ॲफेडीव्हीट सादर केलेले आहेत, कोण वकील होते इथपासून ते २०२२ पर्यंत कारण दोनदा संधी मिळाली कोर्टात बाजू मांडायला परंतू ती बाजू मांडलेली नाही. याकाळामध्ये जे-जे कर्मचारी होते किंवा फाईलवर ज्यांच्या ज्यांच्या सहया आहेत. जे-जे वकील आहेत हे सगळे तपासून सगळयांवर कायदेशिर कारवाई करण्यात येईल. जे जे असे प्रश्न असतील त्यामध्ये असे दुर्लक्ष करण्याची कोणीही हिंमत करणार नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त साहेब मला सांगा उदया जावुन कोणी सांगलीतले सुप्रिम कोर्टाने दिलासा नाही दिला तर हे ९६ कोटी रुपये भरणे आलेच.

**मा.आयुक्त :-** सर पब्लीक बॉडी आहे. सुप्रीम कोर्टाकडे प्लस पुन्हा ९६ कोटींचे आहे कोर्टाकडे पण जे मांडाले तेच मांडावे लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तोपर्यंत करू परंतू यामध्ये या ९६ कोटींचे काय म्हणजे या ९६ कोटी रुपयांतन बहुतेक विकास कार्य केले जावु शकतात. एकीकडे संपुर्ण सभागृह चुटफुट कामासाठी आपल्याकडे अपेक्षेने पाहत असतात ते आपण मंजूर करु शकत नाही आपल्या आर्थिक परिस्थितीच्या अनुषंगाने आणि अश्या पध्दतीने कोर्टाच्या आदेशाने पैसा तो शंभरटक्के उदया जर सुप्रिम कोर्टाने नाही दिलासा दिला अखेर शेवटी सगळ कामे ठप्प करुन ४८ कोटींचे सर्व् कामे कोर्टाने ३ ३ वॉर्डासाठी दिलेला कोणाचा अटेंम्ट होणार नाही म्हणुन ४८ कोटी रूपये तिथे डिपॉझिट द्यावे

लागतील. मग अशा परिस्थितीत शहराचा गाडा चालणार कसा काय ? उच्च न्यायालयाकडुन अपेक्षा होत्या परंतु शेवटी काय असत ज्यावेळी खालच्या कोर्टात साक्षी पुरावे चालतात. त्यावेळी बऱ्याच गोष्टी ॲडमीट केल्या जातात हया आपल्या ॲडमीट ऐकुन घेतल्या जातात त्यावरुन ऐकुन घेतल्यानंतर त्याच्यावरुन जो काही निवाडा होतो. वरच्या कोर्टात गेल्यानंतर वरचे कोर्ट हेच म्हणते की, मी तुम्ही या सगळया गोष्टी खालच्या कोर्टात ॲडमीट केलेल्या आहेत. मग रिॲडमीट केल्यानंतर याच्यामध्ये तुमचे म्हणणे मांडण्याची संधी सुप्रीम कोर्टात मिळत नाही कारण साक्षी पुरावे हे खालच्या कोर्टातच चालतात वरच्या कोर्टात चालत नाही. झालेल्या चुका दुरुस्त्या करण्याच्या संदर्भातही तुम्हाला संधी मिळत नाही मग तश्या परिस्थितीत काय राहणार ? मग माझे म्हणणे आहे की, या ९६ कोटीला जबाबदार कोण ? आणि ती जबाबदारी फिक्स करुन ते आज महानगरपालिकेला परत मिळणार काय आज तशी परिस्थिती नाही. उदयाचे सुप्रिम कोर्टाचा दिलासा न मिळाल्यास ४८ कोटी रूपये डिपॉझिट केल्यानंतर दिलासा मिळाला नाही तर उदया ही सगळी कामे ठप्प करुन प्रशासनाला हे ४८ कोटी तेथे भरावे लागतील मग करणार काय ? आणि या निधीची पुर्तता होणार कशी काय ? नुसते कोणाला जबाबदार धरुन किंवा कोणाला जरी फासावर लटकवुन दिले व त्यांना फासावर लटकवुन दिले तरी येथे त्याचे कुटूंब येवून ४८ कोटी भरुन देणार नाही येथे, मॅडम खुप गंभिर बाब आहे आणि महानगरपालिका कधी आर्थिक सबलीकरणाकडे पुढे वाटचाल करु शकणार नाही. ती सक्षम होवू शकत नाही. कारण जोपर्यंत आपल्याकडुन हे सगळे बंद होत नाही तोपर्यंत या महापालिकेला आर्थिक स्थर्य लाभणारच नाही. मी जीव तोडुन तोडुन सांगतो परंतु योग्यवेळी माहिती पुरवली जात नाही. वकिल येथे असतात एकीकडे काय असत ज्यावेळी सुप्रिम कोर्टाच्या वकिल साहेब यांना ॲपाईमेंट करण्याचा विषय झाला होता साधारणत: चांगला वकील एक एक हेरिंगचे ३-३, ४-४ लाख रुपये आकारतात आणि आपण आपल्या पॅनलवरील वकिलांना ३० हजार २५ हजार ५ हजार अशी फि देतो. जसे तुम्ही रेंमडचा कपडा मागाल तसा त्या पध्दतीचा कपडा तुम्हाला मिळेल तुम्ही ऑडनरी कंपनीचा कपडा घेणार तुम्हाला त्याच पध्दतीचा कपडा मिळेल. त्याच पध्दतीने या वकिलांचे संदर्भात सुध्दा महापालिका प्रशासनातील अधिकारी कुठेतरी असा विचार करतात की इतकी इतकी फी दिली जाईल का ? आपल्याकडे नितीनभाऊनी सांगीतले म्हणजे हा वकील दुसरी आपण बघतो की खाजगी प्रतिष्ठान हे १०-१५ लाख रुपये एक-एका हेरींगचे सुप्रिम कोर्टात पैसे दयावे लागतात आणि तेथे आपला ५० हजार कॅलीबलरपासून सुरुवात होते. नाही टिकत ते कां तो तेथे त्याच्या बुध्दीचातुर्याचा पैसा घेतो. मग येथे फाईल तयार होते त्यावेळी हे नियमात तरतूद आहे कां ? मग इतके पैसे देणे उचित होईल कां ? मग अश्या पध्दतीने कॉम्प्रमाईज होते पुन्हा तेथे ऑर्डनरी वकील उभा केला जातो आणि तो कोर्टाचा निकाल आपल्या अगेन्स जातो. त्यामानाने महापालिका पैसा खर्च करते मात्र वकील पॅनलवर योग्य पध्दतीचे वकील याची नेमणूक करीत नाही. त्यामुळे असे आर्थिक फटके हे महानगरपालिकेस बसत असतात आणि ते कायम स्वरुपी बसत राहतील आणि महापालिका कधीच वरती येणार नाही.

**श्री.कुलभुषण पाटील,उपमहापौर :-** आयुक्त मॅडम हा गंभीर विषय आहे हा मागे असाच एक विषय पाईप पुरवण्याचा पाणी पुरविण्याचा त्यामध्ये आपल्याला अधिकाऱ्यांचया चुकीमुळे पैसे दयावे लागले. पण याच्यात आपण काही गांभीर्याने घेणार आहात कि नाही ? आपल्या अश्या काही गांभीर्यपुर्वक केसेस आहेत याच्यामध्ये मला असे वाटते की, असे जे हायकोर्टा मध्ये किंवा खालच्या कोर्टामध्ये किंवा आपण हायकोर्टात अपिलात गेलेले असू अश्या केसेससाठी एक चांगल्या लोकांची टिम नेमावी एक समिती नेमावी. जसे आता नितीनभाऊंनी सांगीतले की, वकीलांच्या बाबतीतमध्ये निश्चितच आपण प्रशासकीय सेवेमध्ये आहांत आपल्याला चांगला अनुभव आहे की, जर त्याठिकाणी हायकोर्टात चांगले प्रेझेंटेशन देणारे आपले वकील नसतील तर भविष्यात निश्चितच अशाप्रकारे भुर्दंड आपल्यावर येतच राहतील. तर मला असे वाटते की, आपले जे हायकोर्टातील आपले पॅनलवर घेतलेले वकील असतील किंवा आपले विधी शाखेतील अधिकारी/कर्मचारी आपण गुणवत्तापुर्वक दिले तर मला वाटते आपल्या कामामध्ये एम्लीमेंट होवून आपल्याला असे जे आर्थिक भुर्दंड सोसावे लागतात त्यास रोख बसून या कर्मचाऱ्यांना चाप बसून आपण स्वत: यामध्ये वैयक्तीक लक्ष देवून जे जे गांभीर्याने घेण्याचे प्रकरण आहेत मी मागे शेख साहेबाना सुध्दा सांगीतले होते की असे जे काही प्रकरण असतील किंवा विधी शाखेत सुध्दा मी मागे बाविस्कर साहेब यांना बोललो होतो की असे जे काही प्रकरण असतील याची एक यादी तयार करा व ती यादीवर आपले नितीनभाऊ आहेत, शुचिताताई आहेत आपले पोकळे साहेब आहेत ज्या लोकांना या विषयांमध्ये माहिती आहे किंवा जे याच्यामध्ये अभ्यासपूर्वक बाजू मांडू शकतात किंवा यामध्ये निर्णय घेवू शकतात अश्या लोकांच्या निर्दशनास या सर्व केसेस आणून दिल्या तर मला वाटते आपल्याला याच्यामध्ये काहीतरी निर्णय घेता येतील. तर मॅडम ही खुप गांभीर्याने घेण्याची गोष्ट आहे. मॅडम आपण आपल्या हातातून दिलेले आहे एक तर याची एक चौकशी करुन हे

कुठपर्यंत थांबवता येईल किंवा आपल्याला सुप्रिम कोर्ट किंवा हायकोर्टात याच्यामध्ये आपल्या चांगले वकील लावून आपल्याला चांगल्या प्रकारे कसे प्रेझेंन्टेशन कसे देता येईल त्यादृष्टीने प्रशासनाने प्रयत्न करायला हवे.

**मा.आयुक्त :-** ठिक आहे आपण एक चौकशी समिती गठीत करु त्यामध्ये विधीचेही अधिकारी बोलवु आणि मा.उपमहापौर यांनी जसे सांगीतले, सन २०२२ चे अगोदर अस होते की एचओडीच त्यांचे लेव्हलवर वकील दयायचे त्यामुळे फाईलच येत नव्हती. मग आम्ही सुरुवात येथूनच केली की वकीलपत्र देतांना त्यास सहाय्यक आयुक्त, उपायुक्त यांची मान्यता असावी ते वकीलपत्र, ॲफेडेव्हीट ते सुध्दा आयुक्त यांच्या मान्यतेने जेणेकरुन ॲफेडेव्हीट आपण काय संब्मीट केले आहे हे आयुक्ताला ज्ञात असले पाहीजे. २०२२ चे अगोदर काय होत होते की, एचओडीच आपले लेव्हलवर करायचे आणि काहीच आयुक्त, उपायुक्त यांना काहीच माहित नसायचे. ते सुध्दा आपण केले आहे आणि या केसमध्ये सुध्दा आपण निश्चितच इनक्वायरी लावू आणि दोषींवर कडक शासन देखिल करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** चौकशी समितीचा अहवाल किती दिवसात मागवणार ?

**मा.आयुक्त :-** याच्यामध्ये आपल्याला सात दिवसात चौकशी पुर्ण करता येईल.

**श्री.कुलभुषण पाटील,मा.उपमहापौर :-** ८/०५/२०२३ चे पत्र प्राप्त झालेले आहे, विषय असा आहे की, श्री.महादु गंगाराम गिरगांवकर, तत्कालीन शहर अभियंता जळगांव यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम १९७९ नूसार कारवाई करणेबाबत. याच्या संदर्भामध्ये मी जेंव्हा उच्च न्यायालयामध्ये गेलो त्यावेळेस तुम्ही सदरील पत्र हे मध्ये मंत्रालयाला पाठवले आहे. आता मला तुम्ही सांगा मला पुन्हा न्यायालयात जावे लागेल कां ? याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे की, सदर तक्रारीच्या अनुषंगाने याच्यामध्ये तत्कालीन सन्मा.महापौर,भारतीताई सोनवणे यांनी देखिल पत्र दिल होत, उपमहापौर यांनी देखिल पत्र दिल होत. त्यावेळेस मी ४ पत्र दिले आहेत २ वेळा स्मरणपत्र दिलेले आहेत, २ वेळा कारवाई संदर्भात पत्र दिलेले आहेत त्या पत्राच्या संदर्भासहीत मजीप्राने आपल्याला पत्र दिलेले आहे मागच्या महिन्यामध्ये सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारी अर्जासोबत पुराव्यादाखल कोणतेही कागदपत्र जोडलेले नाहीत सबब अर्जाचे अनुषंगाने आपलेस्तरावर योग्य ती तपासणी करुन दोषी आढळल्यास कारवाई करुन अहवाल इकडील कार्यालयास १९७९ ग नूसार शिस्तभंग कारवाई विषयी प्रस्ताव सादर करावा असे यामध्ये स्पष्ट मजीप्राने आदेशित केलेले आहे, सूचना दिलेल्या आहेत की आपण कारवाई करुन अहवाल सादर करावा. मला यामध्ये कुठेतरी चालढकल होत आहे. आपल्या ज्या आस्थापना विभागाचे अधिकारी , कर्मचारी आहेत त्यांना मी चारवेळा पत्र दिलेले आहेत. यांना पाठीशी घालण्याचा प्रकार चाललेला आहे मला समजत नाही हा काय प्रकार आहे कां यामध्ये उशिर कां होत आहे ?

**मा.आयुक्त :-** आस्थापना विभाग, पत्र आपण जरी दिले तरी कोणाकडुन माहिती मागविली ? कारण आधी मला हे माहित नव्हते नाहीतर मी हे थेट सांगीतले असते.

**श्री.गणेश सोनार,लिपीक,आस्थापना विभाग :-** मा.महापौर महोदया, आमच्या विभागाकडे पत्र प्राप्त झालेले आहे त्यानुसारच बांधकाम विभागाकडे पूढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे.

**मा.उपमहापौर:-** काय कार्यवाही केली ?

**श्री.चंद्रकांत सोनगीरे,शहर अभियंता :-** आमच्या विभागाकडे पत्र प्राप्त झालेले आहे आणि त्याअनुषंगानेच

**मा.उपमहापौर:-** कधी प्राप्त झाले आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगीरे,शहर अभियंता :-** एक महिना झाला.

**मा.उपमहापौर:-** मग हे दोन महिने कुठे पडुन होते ?

**श्री.गणेश सोनार,लिपीक,आस्थापना विभाग :-** हे आपण या आधीपण पत्र पाठविले आहे.

**मा.उपमहापौर:-** मग हे जे पत्र आहे ते दोन महिने झाले कुठे पडुन होते ?

**श्री.चंद्रकांत सोनगीरे,शहर अभियंता :-** एक महिन्यापूर्वीचे पत्र माझ्याकडे प्राप्त झालेले आहे आणि त्याअनुषंगाने कारवाई मध्ये त्यांनी जे म्हटले आहे.

**मा.उपमहापौर:-** ०८/०५ चे पत्र आहे.

**मा.आयुक्त :-** ०८/०५ चे पत्र एमजीपी ने दिलेले ते आस्थापनाने त्यांना कधी दिले ?

**श्री.गणेश सोनार,लिपीक,आस्थापना विभाग :-** दोघं पत्राची माहिती मागविली आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगीरे,शहर अभियंता :-** हो माझ्याकडे जे पत्र आलेले आहे एक महिन्यापूर्वी त्याच्यामध्ये आपण असे म्हटले आहे की, गिरगांवकर साहेबांचे बाबतीत आपण जे काही पुरावे देणे अपेक्षित आहे तर त्यांनी सांगीतले आहे की, पुरावेसह प्रस्ताव कारवाईसाठी आपल्याला तेथे पाठवायचा आहे.

**श्री.कुलभुषण पाटील,मा.उपमहापौर:-** तुम्हाला माहिती आहे कां, भारतीताईंनी पत्र दिलेले होते, पुरावे दाखल केलेले आहेत. याची चौकशी करण्यासाठी जेव्हा आपले सपकाळे साहेब होते त्यांनी प्रस्तावही रेडी करुन ठेवलेला आहे हे माहित आहे कां तुम्हाला ? ते सर्वच सर्व रेडी आहे मॅडम मात्र ते पाठवले जात नाही मॅडम हेतुपुरस्करपणे तो कां पाठवला जात नाही हा माझा आरोप आहे मॅडम आणि तो कां पाठवला जात नाही ?

**श्री.सोनगीरे,शहर अभियंता :-** ठिक आहे एक दोन दिवसात मी अहवाल पाठवतो.

**मा.उपमहापौर:-** नाही नाही सभागृहात शब्द दया चार साडेचार पाच महिन्यापासन याबद्दल पत्र आलेले असताना इतका गंभीर स्वरुपाचा हा प्रश्न असताना त्या गिरगांवकर यांनी जळगांव शहराचे इतके मोठे नुकसान केलेले असताना त्याला तुम्ही रिपोर्टवर घेत नाही बायोमायनींगच्या संदर्भात सुध्दा त्यांच्याकडुन उशिर झालेला आहे आपल्या पाणी पुरवठयाची अमृत २.० चा जो आता आपण प्रोजेक्ट तयार करत आहोत त्यासंदर्भातही त्यांच्याकडुन चूक झालेली आहे आणि जळगांव शहरामध्ये आता विकास कामांच्या संदर्भात जे सर्व सदस्य आक्रमक होवून मांडतायात त्याचे कारण सुध्दा गिरगांवकरच आहेत. अश्या व्यक्तीला पाठीशी घालण्याचे कारण काय ? किंवा आता जी कारवाई आपण त्यांचेवर प्रस्तावित करणार नाहीत जो कोणी दोषी असेल त्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार कार्यवाही करणार आहे किंवा नाही हे तुम्ही सभागृहाला सांगा.

**मा.आयुक्त :-** या अहवालाच्या अनुषंगाने प्रशासन, आस्थापना एमजीकडे देईल.

**मा.उपमहापौर :-** आतापर्यंत झालेल्या दिरंगाईच्या बाबतीत विचारत आहे मी मॅडम. आतापर्यंत झालेल्या दिरंगाईच्याबाबत सांगा कारण आताच नितीनभाऊनी इतका गंभीर प्रश्न उपस्थित केला होता फक्त त्याला आपले अधिकारी कर्मचारी जो आळसपणाने काम करीत आहे, चालढकल पणाने काम करत आहे त्यासाठी आपल्याला वेळोवेळी इतक्या मोठया प्रमाणावर भुर्दंड सोसावा लागत आहे त्याचा सिरीनीनेस, गांभीर्यपूर्वक व विचारपुर्वक सभागृहातील अनेक सदस्यांनी या चालढकल पणामुळे किंवा हे गांभीर्याने काम करीत नसल्यामुळे अनेकवेळा रोष व्यक्त केलेला आहे तरी सुध्दा कां सुधरत नाही आपले प्रशासन किंवा गतीमान कां होत नाही ? किंवा वेळावेळी कां आपण गतीमानता आणत नाही. आता तरी लोकप्रतिनिधी आहे म्हणून जळगांव शहरातील नागरीकांना सांगून समजावून काहीतरी त्यांना आश्वासन देवून त्यांना थांबवले आहे. उदया उठून लोकप्रतिनिधींची टर्म संपल्यानंतर जेंव्हा प्रशासन येथे याठिकाणी असेल तेंव्हा तर मग नागरीकांची कामे होणार नाही असे याचा अर्थ दिसतो आहे. तर हे थांबणार केंव्हा आहे , याच्यात गतीमानता येणार कधी आहे ? आतापर्यंत झालेल्या दिरंगाईबाबत तुम्ही आता सांगता आहे की, सात दिवसात होईल जेंव्हा की, मजीप्राने स्पष्ट पत्र पाठविलेले आहे की, नागरीसेवा १९७९ चे ग नूसार कारवाई प्रस्तावीत करुन पाठवावी. म्हणजे आपल्याला शासनाच्या पत्राचेही देणघेण नाही कां ? कां नाही होत हे सगळे वेळेवर ?

**मा.आयुक्त :-** त्यांचा अहवाल आल्यावर आपण कारवाई प्रस्तावीत करु.

**श्री.धिरज सोनवणे :-** मा.महापौरताई, काही तक्रारी व सूचना होत्या कारण आता दोन तीन महिने झाले पावसाची परिस्थिती त्यात खराब रस्ते , खड्डे आणि तेच फेस करीत असताना बऱ्याच भागांमध्ये म्हणजे माझ्याच प्रभागात नाही तर शहरातील प्रमुख रस्त्यांचे बाबतीत बोलत आहे बऱ्याच ठिकाणी एलईडी लाईट हे आठ आठ दिवस बंद असतात. मी ऑनलाईन स्वत: तक्रार केलेली आहे रिंग रोड, पूर्ण रिंगरोड, आकाशवाणी चौक ते स्वातंत्र चौक, कोर्ट चौक ते गणेश कॉलनी रोड असे जे शहरातील प्रमुख रस्ते आहेत त्याठिकाणी आज अशी परिस्थिती असते की संध्याकाळी सहा नंतर, सात नंतर त्याठिकाणी पूर्णच्या पुर्ण स्ट्रिट लाईट बंद आहेत याचे कारण काय ? जे नोडल ऑफिसर असतील त्यांनी उत्तर द्यावे अशी परिस्थिती कां आहे ? कारण ईएसल कंपनी आहे तीला मला वाटते ४ वर्ष झाले तो ठेका दिलेला आहे आणि दक्ष एन्टप्रायजेस हे काम बघते आहे. ८ दिवस झाले मी स्ट्रीट लाईट संदर्भात तक्रार केलेली आहे आजपर्यंत त्या तक्रारीनुसार कारवाई कां झाली नाही ?

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** आता जळगांव शहरात सध्या जे पावसाचे वातावरण आहे त्यामुळे जे काही फॉल्ट होत आहे म्हणजे महावितरण कंपनीने जी ओव्हरहेड लाईन आहे त्याचे लुज कनेक्शन वगैरे आहेत त्यासंदर्भात महावितरणकडे पाठपुरावा वेळोवेळी केलेला आहे परंतू त्यांच्याकडील मेंटेन्सचे काम ज्यापध्दतीने काम व्हायला पाहीजे तसे होत नसल्याकारणाने महावितरण कंपनीचे जे तार आहेत ते लुज असल्या कारणाने आणि त्यांचे मेंटेन्सचे प्राब्लेम असल्या कारणाने व थोडीशी जरी हवा आली तरी जे लुज कंडक्टर आहेत ते एकमेकांना टच झाल्याने त्याठिकाणी प्राब्लेम तयार होतो.

**श्री.धिरज सोनवणे :-** संपुर्ण जळगांव शहरात असे होत आहे कां ?

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** नाही नाही संपूर्ण शहरात नाही ज्या ज्या ठिकाणी लुज कंडक्टर आहे त्याठिकाणी किंवा ज्याठिकाणी त्यांचे डिपी कटआउट वगैरे आहेत त्याठिकाणी ते फॉल्ट होतो आणि तो फॉल्ट झाला म्हणजे आपले स्ट्रीट

**श्री.धिरज सोनवणे :-** नाही नाही तुम्ही असे काही कारण सांगुन कुठेतरी दक्ष किंवा तुमची जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करीत आहांत.

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** नाही नाही आमच्या जबाबदारी झटकण्याचा विषय नाही. दक्ष इलेक्ट्रीकलकडने हे काम चालु आहे. त्यांच्याकडे ज्या काही ऑनलाईन तक्रारी आलेल्या असतात त्यासाठी त्यांची एक स्वतंत्र टिम आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** किती टाईम टेबल आहे किती दिवसात ऑनलाईन तक्रारी निरसन होतात ?

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** तक्रार आल्यानंतर त्यांनी ४८ तासात चालु करायचे आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** आठ दिवस झाले मी ऑनलाईन तक्रार केलेली आहे ती अजुनपर्यंत झालेली नाही. किती लोकांची टिम आहे ?

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** त्यांची प्रत्येक प्रभाग समितीला टिम आहे आणि ऑनलाईन तक्रारींसाठी स्वतंत्र टिम आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** किती लोकांची टिम आहे ? किती माणस दिलेले आहेत त्यांनी ?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** एकच माणूस दिलेला आहे त्यांनी

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** प्रत्येक प्रभाग समितीला त्यांनी एक एक माणूस दिलेला आहे. ऑनलाईन तक्रारीसाठी आणि त्यांच्याकडील तक्रारींसाठी त्यांची स्वतंत्र टिम आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** वर्कऑर्डर किती लोकांची आहे ?

**श्री.धिरज सोनवणे :-** अक्षय इंटरप्रायजेस सोबत जे टेंडरचे ॲग्रीमेंट केलेले आहे त्यामध्ये चार चार माणसांच्या चार टिम १६ लोक त्यांना दयायचे आहेत. १६ लोक तिथे आज दिसत नाही ४ लोक त्यांची काम करता आहेत. आपले महानगरपालिकेचे माणस सुध्दा काम करत आहेत वाहन सुध्दा त्यांना लाईट विभाग दुरुस्तीसाठी देत आहे तर मला सांगा आपण त्यांचेकडुन काय फि वसुल करीत आहे ?

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** दुरुस्तीसाठी आपण आपले महानगरपालिकेचे वाहन देत नाही. महानगरपालिकेचे वाहन ज्याठिकाणी ईएसएलमार्फत एलईडी लावलेले नाहीत त्याठिकाणचा मेंटनन्स याच्या व्यतिरिक्त जे मेन लाईनवर जे काही फॉल्ट होत आहेत त्यासाठी महावितरणकडुन कर्मचारी उपलब्ध होत नाही त्यासाठी आपले वाहनाचा वापर करुन जे फॉल्ट आहेत त्याकरीता.

**श्री.धिरज सोनवणे :-** आजपण काम चालु नाही साहेब, ३ दिवस झाले त्यांचे माणस जळगांव शहरात नाही हे तुम्हाला माहिती आहे कां ?

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** नाही आजपर्यंत त्यासंदर्भात कोणत्याही युनिट इंजिनिअरनी माझ्याकडे कोणतीही फाईल वगैरे नाही.

**श्री.धिरज सोनवणे :-** युनिट इंजिनिअरांच्या सुध्दा तक्रारी येत आहेत साहेब, ते पण आम्हाला सांगतात की, साहेबांना आम्ही कळवितो भाऊ परंतु साहेब मनावर घेत नाही. प्रत्येकाला त्रास आहे. मला सांगा साहेब जर आम्ही प्रतिनिधी सॅटीसफाईड नाही दर महिन्याला त्याचे जे बिल निघंत त्याला तुमच्याकडंन सॅटीसफीकेशन सर्टीफीकेट कस दिले जाते का ? ४८ तासात त्याने लाईट दुरुस्ती करायला हवा तो होत नाही आठ आठ दिवसांपासून तक्रारी आहेत. हजारो नागरीकांच्या ऑनलॉईन तक्रारी आहेत त्याच्या. दर महिन्याला बिल निघण्याचे वेळेसच सर्टीफिकेट कसं काय दिल जातय त्याला ?

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** सर्टीफिकेट त्यांना जे दिल जातय ते फक्त त्यांनी जे काम केलेले आहेत व जे युनिट कार्यालये आहेत.

**श्री.धिरज सोनवणे :-** ते काम तुम्ही बघीतलेले आहे कां ? त्याने काय काम केले आहे तुम्ही बघीतलं कां ?

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** त्याने जे प्रत्यक्षात काम केलेले आहे त्याचे संदर्भात जो काही अहवाल प्राप्त होत आहे त्यावर संबंधीत युनिट अभियंता यांनी जो अहवाल होत आहे त्यानुसार संबधित इंजिनिअरने त्यांनी जे काम केलेले आहे त्यांचे व्हेरीफीकेशन केलेले आहे आणि त्याच्यानुसार आपण फक्त त्याला त्याने काम केल्याबाबातचे देयक आपण त्याला देतोय

**श्री.धिरज सोनवणे :-** त्याने किती केले आतापर्यंत

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** आपण आतापर्यंत त्यांना कोणतही पेमेंट अदा केलेले नाही आणि आपण जे दंडात्मक कार्यवाहीच्या संदर्भात त्यांच जे पेमेंट आहे त्याच्यामध्ये ५ टक्के आणि प्लस ३ टक्के असे ८ टक्क्याची जी रक्कम आहे ती आपण त्याच्यातुन कपात करतोय म्हणजे अजुनपर्यंत त्याच कोणतेच बिल आपण दिलेले नाही.

**श्री.धिरज सोनवणे :-** आता मी पाहीले आहे की त्याला पंधरा की विस हजार रूपये दंड झालेला आहे फक्त जो दंड लाखोमध्ये व्हायला पाहीजे. म्हणजे पुढे कधी हेच प्रकार घडत आहेत या आरोग्याच्या संदर्भात घडो की ESSL लाईटच्या संदर्भात घडो म्हणजे आधिकारी आणि एजन्सी याच्यामध्ये काहीतरी टाईप होत आहे. आठ आठ दिवस आपल्याला व नागरीकांना फेस कराव लागत आहे आणि त्यांच उत्तर बघितले तर अशा प्रकारचे उत्तर आपल्याला मिळतात.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** धिरजभाऊ याच एक उदाहरण देतो तुम्हाला भुसावलच्या कंपनीला काम दिलेले आहे तुम्ही जळगांव शहराचे आता मागचा ठराव झाला आहे. ११६५ आणि ११६६ नंबर आहे त्याचा आता त्याची संविदा आलेली आहे. तर त्या ठेकेदाराचे पत्र मी आमच्या कायदेतज्ञांना दिले. काम घेतलेले आहे आणि काम करत नाहीये वर्कऑर्डरची मुदत संपुन गेलेली आहे. तरी सुध्दा तुम्ही त्याला जळगांव शहरातील एलईडीचे काम देतात. हे भाऊ बरोबर आहे. तुम्ही म्हणतात. हे बघा मॅडम याला काय नोटीस काढाल तुम्ही

**श्री.धिरज सोनवणे :-** आयुक्त मॅडम आपण ज्यावेळेस हा ठेका द्यायचा होता तेव्हा सभागृहामध्ये चर्चा झाली होती. तर मी येथे मांडलेले होते की कशा पध्दतीने आणि कसे लाईट लावले जाणार आहे. काही प्रमुख रस्त्यांवर ७०/७५ वॅटचा , ६ मिटरच्या आतील रोड असला तर तिथे ४५ वॅटचे लाईट लावण्यात येतील असे तुम्ही आम्हाला सांगीतले होते. आजच्या परिस्थितीमध्ये ज्या रोडवर ज्या स्ट्रिट पोलवर ७० वॅटचा लाईट लावलेला होता तो आज तिथे आहे का?

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** ७० वॅटचा लाईट असलाच पाहीजे तिथे

**श्री.धिरज सोनवणे :-** आहे का ? माहिती तुम्हाला पाहीजे त्याची

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** नाही नाही भाऊ एक मिनिंट थांबा आता ७० वॅटचा लाईट तिथे लावलेला असेल

**श्री.धिरज सोनवणे :-** जर तिथे ७० वॅटचा लाईट लावलेला असेल तर तिथे ७० चाच लागायला पाहीजे. आज ती परिस्थिती तिथे नाहीये ही माझ्याजवळ माहिती आहे तुमच्याकडे आहे की नाही ते विचारतो आहे मी

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** नाही ७० वॅटचाच लाईट असला पाहीजे तिथे जर असे आढल्यास याच्यासंदर्भात मक्तेदाराला नोटीस देण्यात येईल.

**श्री.अश्विन सोनवणे :-** साहेब तुम्ही काम करत आहेत आणि ते बिल टाकत आहेत. तुम्ही कसे काय ते बिल सँक्शन करत आहेत मग पेमेंट देत नसतील तर

**श्री.धिरज सोनवणे :-** त्याला पुर्ण सुविधा पुरविल्या जात आहेत कर्मचारी आपले आहेत, वाहन आपले आहेत. पैसे ते काढत आहेत.दंड फक्त विस हजार रूपये लाखोंचा दंड व्हायला पाहीजे होता. त्या दक्ष एन्टरप्राईजेस चे बिल माझ्याकडे आहे. जे ESSL ने त्यांच्या वेंडर सोबत केलेले आहे. त्याच्यामध्ये दंड कसा घ्यायला पाहीजे काय केल पाहीजे हे सगळ दिलेले आहे. त्यांनी काय काय पुरवले पाहीजे सगळे दिलेले आहे. मग त्याप्रमाणे काय काम चालु आहे साहेब आणि जर चालु आहे तर मग आठ आठ दिवस, दहा दहा दिवस लाईट बंद आहे प्रमुख रस्ते आहेत शहरातील , गल्लीबोळात कोणी जात नसेल एखाद्या ठिकाणी पण प्रमुख रस्ते आहेत आणि पावसाळ्याचे दिवस आहेत. खड्डे पडलेले आहेत रस्त्यांवर आणि त्याच्यात हा अंधार , कसे काय चालतील नागरीक आणि तुम्ही त्याची बाजु मांडत आहेत येथे

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** भाऊ मी त्यांची बाजु मांडत नाही. त्यांना नोटीस दिलेली आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** तुम्ही त्याची बाजु मांडत आहेत येथे

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** भाऊ मी त्यांना नोटीस दिलेली आहे. आता मागच्या आठवडयात या संदर्भात आणि त्यांच म्हणण मागविलेले आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** तुम्ही साईटवर गेले का? तुम्ही मला आता माझ्यासोबत चला आणि दाखवुन द्या की ७० वॅटच्या ठिकाणी ७० चा लाईट आहे अस. ते जावु द्या तुम्ही मला ४८ तासांमध्ये तक्रार सॉल झालेली आहे अस दाखवुन द्या ऑनलाईन ज्या कंम्पलेंटस आहेत त्या

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** भाऊ त्याच्या संदर्भात आपल्याला माहिती घेण्यात येवुन माहिती पुरविण्यात येईल.

**श्री.धिरज सोनवणे :-** माहिती तुम्ही देतच नाही ना साहेब

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** हि माहिती आपले जे ऑनलाईन पोर्टल जे आहे आपले ते ऑनलाईन पोर्टल वरून माहिती घेवुन

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब आता तुम्ही जे सांगत आहेत आणि धिरजभाऊ सांगत आहेत त्याचे हे प्रुफ आहे आमच्याकडे सत्यम एजन्सीज भुसावळ याला वर्कऑर्डर देवुन आज चार महिने झाले आहे मुदत संपलेल्या आहेत. तरी तुम्ही त्याला काम देत आहेत. मुदतीनंतरही काम चालुच आहे ना त्याचे , हा आत्ताचा विषय आहे १४/ १५ दिवसापुर्वीचा याची काय कार्यवाही करणार तुम्ही ?

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** भाऊ आपण जो विषय करत आहात ना , कोणाचा

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** या भुसावळ वाल्यावर

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** सत्यम ईलेक्ट्रिकल ने काम न केल्यामुळे आपण दोन वेळा त्याला पत्र दिले होते काम करण्याच्या संदर्भात आणि आता आपण त्याच्या संदर्भात त्याने काम न केल्यामुळे त्यांनी मुदतवाढ आपल्याला मागीतलेली होती.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** टेंडरची मुदतच संपली ना मुदतवाढ कशी काय देता आहे तुम्ही

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** हो ना मग मुदतवाढीची त्यांनी मागणी केलेली होती. याच्या संदर्भात त्यावेळी

**श्री.धिरज सोनवणे :-** साहेब आता याच्यामध्ये तुम्ही फक्त येणाऱ्या महासभेपर्यंत जर सुधारणा नाही झाली तर कोणी कसे पैसे घेतलेले आहे. कसे कशा कशात पैसे खाल्लेले आहेत हे सर्व पुढच्या महासभेत मी पुराव्यांसह मांडेल. तोपर्यंत जर काम झाल तर ठिक आहे.

**मा.आयुक्त :-** पाटील साहेब आपल्याकडे ज्या ऑनलाईन तक्रारी आहेत.

**श्री.धिरज सोनवणे :-** माझ्याकडे पुर्ण पुरावे आहेत. छाती ठोकुन सांगतो कोणी किती पैसे घेतले आहेत आणि किती भ्रष्टाचार केलेला आहे. हे पुर्ण समोर आणेल मी महासभेमध्ये

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** सुधारणा व्हायला पाहीजे.

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** दंडात्मक कारवाई करण्यात येईल तो लाईट जर त्याने चालु नाही केला तर

**श्री.धिरज सोनवणे :-** ४८/४८ दिवस झाले आहेत तक्रारी सॉल झाल्या नाहीयेत. दंडाचे काय सांगत आहात. तुमच नियंत्रण आहे का त्याच्यावर , आपले कर्मचारी जात आहे बिचारे तिथे काम करत आहेत. आज तिन दिवस झाले तरी आले नाही माणस त्यांना विचारा मॅडम

**मा.आयुक्त :-** आपल्याकडे

**श्री.धिरज सोनवणे :-** कसा रिपोर्ट दिला जातोय कसे पैसे खाल्ले जात आहेत मी पुराव्यासहीत देईल मॅडम पुढच्या महासभेत

**श्री.दिलीप पोकळे :-** मॅडम विद्युत जे आहे अत्यावश्यक सेवेत आहे आणि अत्यावश्यक सेवेमध्ये हा विषय येतो. या सेवेच्या अनुषंगाने एखाद्याचा जिव जावु शकतो. पावसाच्या परिस्थिती मध्ये खड्डयांचा विषय झाला. तिथे चार माणसांची आवश्यकता आहे ते स्वत: सांगत आहेत की तिथे चार माणस आहेत हेडक्वॉर्टरमध्ये तिथे एकच माणुस आलेला आहे. तेही पाच पाच / आठ आठ दिवस येत नाहीत. १०० एलईडी सांगीतले १०० दिवस लागत आहेत. कार्यवाही करत नाही खात्यावर मला अस वाटत आहे मला

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मॅडम या वर्कऑर्डरच काय करायच आता

**मा.आयुक्त :-** मक्तेदाराने मुदतवाढ मागीतलेली आहे दोन वेळा माझ्या बैठका झाल्या होत्या. मुद्दा हा होता की ऑलरेडी ते काम दिलेले आहे. ते त्यांच काम संपलेल आहे २०२० ला जे काही ७ हजार लाईट बसवायचे होते, बदलायचे होते ते जे काही काम होते ते त्याचे २०२० ला संपले २०२० नंतर आपल्याला पुन्हा लाईट पाहीजे होते. काही बंद पडले किंवा आपण नविन पोल लावले. त्याचे एग्रिमेंट आपले ESSL शी मग ESSL असे म्हंटले की तुम्ही तुमच्या स्तरावर निर्णय घ्या आणि आता राज्य शासनाने सांगीतले की ESSL संदर्भात कोणतीही माहिती दिली जाणार नाही. तुम्ही जस म्हणत आहात की ४८ तासांत तक्रारी का सोडवल्या जात नाहीत. २०१८ ते २०२०

पर्यंत त्यांनी जे काम केल त्यांनी जी बिल दिले आहेत त्यांचे अजुनपर्यंत एक रूपयाही आपण दिलेला नाही. त्याच्यामध्ये आता आपण नविन सहा.आयुक्तांकडे विद्युत विभाग दिलेला आहे. ती आलेली संचिका पुन्हा एकदा तपासुन घ्यावी. नेमके कोणते दंड लावलेले आहेत कशा पध्दतीने लावलेले आहेत. ते आपण चेक करू त्याच सव्वादोन कोटींच बिल आपल्याकडे आहे. आपल्याकडे ज्या यासंदर्भात ऑनलाईन तक्रारी येतात तर मी त्यांना सांगीतले आहे की त्यांनी आम्हाला रिस्पॉन्स केले पाहीजे म्हणुन , त्याच्यामुळे त्यांनी चार माणसांऐवजी एकच माणुस ठेवला आणि ते म्हणाले की आम्ही फक्त तक्रारी ईन्टरटेन करणार आणि तेच विचारत होते की त्याच ॲग्रीमेंट किती दिवस अक्टिव आहे. किती दिवस आहेत आपल्याला आणि या अनुषंगाने पुढे जे आपल्याला काम करायच आहे त्यासाठी महानगरपालिकेसाठी नविन टेंडर काढु आपण कारण ESSL आपल्याला दर वाढवुन मागत आहे जे मार्केट रेट पेक्षा जास्त आहे. ते द्यायला नाही पाहीजे म्हणुन आपण टेंडर करू. मग त्या विषयावर एकदा चर्चा करून निर्णय घेवु हे रेट जास्त पडत आहेत की ESSL चे रेट जास्त पडत आहेत. की मनपानेच मटेरियल खरेदी करायचे आणि वापरायचे आपल्याला जे जास्त स्वस्त पडेल ते आपण पुढच्या मिटींगमध्ये प्रपोज करूयात.

**श्री.धिरज सोनवणे :-** मॅडम नागरीकांना सुविधा नाही मिळत आहे ना

**मा.महापौर :-** काय फरक पडणार आहे. भाऊ नागरीकांना सुविधा मिळत नाहीयेत ना काहीच फरक पडत नाही यांना

**श्री.धिरज सोनवणे :-** आज काय काम चालु आहे त्याच्यात

**मा.आयुक्त :-** आपली जी तक्रार आहे ना की आपण ४८ तासांपर्यंत सोडवत नाही तर आपण पाहु पोर्टलवर सुध्दा व्हेरीफाय करू की काय आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** चार वर्ष झाले ना मॅडम

**मा.आयुक्त :-** म्हणुन तर सांगीतले

**श्री.धिरज सोनवणे :-** महापालिका अभय देते का मग , त्याला लाखोंचा दंड व्हायला पाहीजे. तिसच हजार दंड आहे म्हणजे त्याने अस काय केल आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, आयुक्त मॅडम २२ जुलैची कंम्पलेंट आहे. लाईट नाहीये पोस्टल कॉलनी,प्लॉट नं-४ नेहा पाटील यांची कंम्पलेंट २२ जुलै २०२३ ला आलेली आहे. त्या दिवसापासुन दर दोन दिवसात त्यांचा मॅसेज असतो की लाईट लागला नाही. एकदा लागला एक दिवस चालतो नंतर परत बंद पडतो. तर तिथे जुना लावलेला असतो लाईट की काय केलेल असत.

**मा.महापौर :-** दुरूस्ती करून लावलेला असेल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** प्रत्येक घराबाहेर लाईट आहे पण बंद आहे आता पावसाचे दिवस आहेत. पुर्ण गवत वाढलेले आहे. आमचा परिसर म्हणजे पुर्ण शिक्षणाने भरलेला म्हणजे शाळा, कॉलेज, होस्टेलचा आहे. विद्यार्थ्यांची वर्दळ, ये-जा चालु असते आणि अशा परिस्थितीत लाईट बंद असले तर मुलींचे होस्टेल आहे तर त्याठिकाणी काही प्रकारचे गैरप्रकार लाईट बंद असल्यामुळे प्रश्न उदभवु शकतो. म्हणजे हसण्यावर जावु नका हा सिरियेस विषय आहे. साहेब हा विषय मी तुम्हालाही सांगीतलेले आहे मी वारंवार विद्युत विभागाला नेहमी कळवल जात. पण याच्यावर काहीही ॲक्शन घेतली जात नाहीये.

**मा.आयुक्त :-** हसण्याच कारण अस आहे मॅडम की तुम्ही जे म्हणाले ना कि एक दिवस लाईट लागतो आणि एक दिवस लागत नाही ते मी एस.एस.पाटील साहेबांना विचारले तर ते म्हणाले की काहीतरी प्रॉब्लेम होता म्हणुन मी हसले.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** एम.जेकॉलेजच्या परिसरमध्ये तिथले पुर्ण स्ट्रिट लाईट बंद असतात. मला त्या मावशींचे रोज आठ आठ फोन असतात. मग तुम्ही काही कारवाई करणार का?

**मा.आयुक्त :-** त्या अनुषंगाने सांगते की, त्या तक्रारी आपण व्हेरीफाय करू आणि आता सहा.आयुक्तांकडे पहिल्यांदा हे प्रकरण दिलेले आहे कारण ते आता नविनच जॉईन झालेले आहेत आणि आपण याची पारदर्शक पध्दतीने चौकशी करू आणि मग निर्णय घेवु आणि धिरज भाऊ जे बात आहेत की बिले जी लावलेली आहेत.

**श्री.धिरज सोनवणे :-** ESSL चा करार जो आहे तो सात वर्षा साठी मेंटेंनन्स चा आहे.

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** ESSL वाल्यांचा जो करार आहे तो या दक्ष एन्टरप्राईजेस शी झालेला आहे. तर आपल्याला याचे जे एलईडी लावायचे आहेत तर हे त्यांनाच मेंटेंन करायचे आहे तर ESSL वाल्यांनी तर दक्ष एन्टरप्राईजेस त्यांचे काम करत आहे आणि आपण जे म्हणत आहेत ना की २० हजारांचा दंड वगैरे तर आपल्याला बिलाची रक्कम जी त्यांनी बिल दिलेले आहे. त्याच्यावर आपण जर एक लाखाचे बिल दिलेले

असेल तर आपण त्याच्यातुन आठ टक्के प्रमाणे आठ हजार प्रमाणे कपात करीत आहोत. आपण त्यांना कुठल्याही प्रकारच त्यांना कोणतेही पेमेंट दिलेले नाहीये आणि आता त्याचे जे आपल्याकडे दोन सव्वादोन कोटी रूपये आहेत. त्याच्यामध्ये सुध्दा आपण ८ टक्के कपात केली आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** साहेब त्या बाकीच्या गोष्टी जाऊ द्या. मी एकच विषय करतो की येणाऱ्या महासभेपर्यंत याच्यात काही सुधारणा नाही झाली तर मी जे आरोप केलेले आहेत ते छाती ठोकुन केलेले आहेत. ते पुराव्यासहीत मांडेल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** उपमहापौर साहेब आपण मागच्या वेळेला विद्युत विभाग वेगळा काढला तर सतरा मजली अपुर्ण आहे का? की लाईट विभागाला येथे जागा नाहीये.

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** ताई आपण याच्यामध्ये असा निर्णय घेतलेला आहे की सकाळी गणपती नगरला आणि दुपारपासुन सतरा मजलीत आठव्या मजल्यावर आणि बांधकाम विभाग आहे तर आपण तेथे बसण्यासंदर्भात निर्णय घेतला आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नाही पण मग पुर्ण वेळ का नाहीये असा अर्धा -अर्धा वेळ करायचे कारण काय आहे. कोणालाही किंवा कोणत्याही नगरसेवकांना माहिती नाहीये.

**श्री.एस.एस.पाटील,क.अभियंता,विदयुत विभाग :-** ताई काय आहे की माझ्याही कार्यालयामध्ये फक्त चारच कर्मचारी

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नाही ते सांगु नका सगळ्या डिपार्टमेंटला तेच कारण आहे. विचारा तुम्ही सोनगिरे साहेबांना की त्यांच्याकडे किती स्टाफ आहे असे. आम्हाला कारण सांगायचे नाही की हे नाही ते नाहीये स्टाफ नाहीये अस. तुम्हाला आदेश झालेला आहे ठराव झालेला आहे की ईथे ऑफीस आणावे असा. मॅडम हे लवकरात लवकर करावे. आमची सतरा तारखेपर्यंत मुदत आहे तोपर्यंत हे ऑफीस ईथे आले पाहीजे. काय काहीही उत्तर सांगायचे का की सहा महिने झाले आहेत.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**मा.उपमाहपौर :-** साहेब मी काय म्हणतो की HOD जिथे बसतात तर त्या विभागाचे कार्यालय तिथेच असले पाहीजे. तिथे गणपती नगरचा जो स्टाफ असेल तर तो तिथे काही प्रमाणात राहु द्या. पण येथे सर्व HOD यांनी ऑफीसला असल पाहीजे. नागरीकांच्या ज्या काही तक्रारी असतात किंवा काही सदस्यांना समस्या सांगायच्या असतात तर ते तुमच्या पर्यंत सहज सांगु शकतात. बाकी ते या इमारतीमध्ये तुमच एक ऑफीस पाहीजे तर ते तुमच्या पध्दतीने करून टाका.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महापौरताई आता याने जळगांव शहराच काम घेतले आहे आता याच काय करायच सांगा.

**मा.महापौर :-** नवनाथभाऊ भरपुर चर्चा झाली आता

**श्री.चेतन सनकत :-** आयुक्त मॅडम मी तुम्हाला मागेही सांगीतले होते की, माझ्या प्रभागामध्ये निधी दिलेला आहे मा.मुख्यमंत्री महोदय श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब आणि मा.पालकमंत्री महोदयांनी दिलेला निधी त्याच्यामध्ये अडीच महिने झालेले आहेत वर्कऑर्डर देवुन मक्तेदार काम करत नाहीये. काम सुरू करत नाहीये आणि चार महिने त्याची कामाची मर्यादा आहे. काम का सुरू होत नाही रोडांची कामे आहेत कॉंक्रीटीकरणाचे

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ कस आहे की सध्या रेती उपलब्ध होत नाहीये त्यामुळे कामाला

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**मा.उपमाहपौर :-** साहेब तुम्ही ठेकेदार आहेत का?

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** नाही भाऊ

**श्री.मनोज चौधरी :-** ठेका तुम्ही घेतला आहे त्यांनी घेतला नाहीये अस वाटत आहे आम्हाला

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** नाही भाऊ

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.मनोज चौधरी :-** ठेकेदाराला सांगा ना मग का तुम्ही कॉन्ट्रक्ट घेतला आहे तो

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** नाही भाऊ कॉन्ट्रक्टरलाच विचारले ना भाऊ म्हणुन बालतो आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** काय बोलता आहे तुम्ही मुख्यअधिकारी असुन तुम्हाला हे शोभत नाही.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ तो जो कॉन्ट्रक्टर आहे त्याच्या सोबत जी चर्चा झाली होती तेव्हा मी त्यांना विचारले होते.

**श्री.मनोज चौधरी :-** पण हि मेंटेंलीटी बरोबर आहे का? टेंडर घेतले आहे ना त्याने

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ मी त्यांना तेच सांगीतले की तुम्हाला कोणत्याही परिस्थितीत काम करायच आहे आणि तुम्हाला जे करायचे असेल ते करा पण काम करून द्या आम्हाला

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.चेतन सनकत :-** साहेब वाळु कधी पासुन भेटत नाहीये तुम्हाला,

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** दोन महिन्यांपासुन

**श्री.चेतन सनकत :-** दोन महिन्यांपासुन मग पर्याय काय आहे त्याच्यावर

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** त्याला वर्कऑर्डर देण्यात आलेली आहे आणि त्याला मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**श्री.चेतन सनकत :-** जर हे काम मुदतीत झाले नाही. जर निधी रिटर्न गेला तर अधिकारी यांच्यावर कार्यवाही निश्चीत करण्यात यावी. निधी रिटर्न गेला तर मक्तेदाराला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे हि माझी मागणी आहे आणि मी मुख्यमंत्री महोदयांना रिटर्न पत्र पाठवणार आहे की मुदतीत काम जर नाही झाले तर त्याला जबाबदार प्रशासन आणि मक्तेदार राहणार आहे. अस मी SC/ST आयोगामध्येही तक्रार करणार आहे. कारण की ती सर्व जी कामांची यादी आहे त्यामध्ये सर्व नागरीक जे आहेत हा सर्व प्रभाग SC प्रभाग आहे आणि मी आजपर्यंत जेवढी-जेवढी मागणी करत आहे साहेबांकडे , मॅडमांकडे ती एकही मागणी पुर्ण होत नाही. मी SC कॅटेगिरीमधुन निवडुन आलेला आहे याची दक्षता घ्यावी आणि तुम्ही माझ्या सर्व प्रकरणांना केराची टोपली दाखवता आहे. मी आतापर्यंतच्या अगोदर अमृतकर साहेब कुठे आहेत? त्यांना फोन लावले, पत्रकार बांधव धमेंद्रभाऊ राजपुत येथे असतील ते त्यांच्या चार वर्षांच्या मुलीला घेवुन एका खड्डयामध्ये पडले. तो खड्डा आजपर्यंत बुजला गेलेला नाहीये. तिथुन कावड यात्रा गेली. कमीत कमी ५०० लोक होते तिथे तर त्या ठिकाणी मला आडोसा लावावा लागला मला कि तिथे अजुन कोणी पडू नये. हे सर्व विषय मी साहेबांना सांगीतलेले आहेत. पत्र दिलेले आहेत साहेबांना आणि अमृतकर साहेबांना दिलेले आहे. याच्या सहा महिन्यांअगोदर मी गुरूनानक नगर संदर्भात कलेक्टर ऑफीसमध्ये आपण DPDC मध्ये ठराव करून प्रस्ताव पाठवला आहे. तिथे प्रस्ताव पेंडींग असतांना तिथुन पत्र आलेले असतांना तुम्ही नगरपालिकेच्या फंडामध्ये ते काम मंजुर केले. त्याच्यामधील दुसरे काम होते त्यामुळे ती फाईल पेंडींग पडली. आपली मनपा निधीबाबत एवढी ही आहे का की शासनाच्या निधीची आवश्यकता नाहीये. मला अस वाटू लागले आहे मॅडम की मी मागासवर्गीय असल्यामुळे मला डावलण्यात येत आहे. अनुसुचित जाती/जमाती आयोगाचे कायदे आहेत त्यांचे मला आता कुठेतरी मार्ग घ्यावा लागेल.

**मा.उपमहापौर :-** चेतनभाऊ

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ एक मिनिंट, भाऊ दोन वर्षांपासुन माझी फाईल गहाळ झालेली होती.

**मा.उपमहापौर :-** आपण नंतर

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ दोन मिनिंट ऐका ना याच्यानंतर त्या रस्त्याची फाईल गहाळ झाल्यानंतर मॅडमांना तक्रार केली तिन महिन्यांनंतर ती फाईल सापडली हे हेतू पुरस्कर होत आहे अस मला वाटत आहे. फाईल गहाळ कशी होते.मग रिटर्न कशी सापडते

**मा.उपमहापौर :-** या कामांची जी वर्कऑर्डर आहे ती कॉंक्रीट आहे की डांबरीकरण आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** कॉंक्रीटीकरण आहे.

**मा.महापौर :-** सोनगिरे साहेब सांगा ना त्यांना की काय परिस्थिती आहे सध्या

**मा.उपमहापौर :-** आपण सगळ्या कामांच्या संदर्भात धोरण ठरविलेले आहे मागे

**मा.महापौर :-** मग ऐवढा उशिर का होत आहे त्या कामाला

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** आपण ज्यांना ज्यांना वर्कऑर्डर दिलेल्या आहेत ना आणि अशा ज्यांनी मागणी केलेली आहे ना की मुदतवाढीचे तर आपण तसे पत्र त्यांना देतोय. आपण कुणालाही थांबवलेले नाही.

**मा.उपमहापौर :-** त्या मक्तेदारांना बोलवुन घ्या आणि यांनाही बोलवुन घ्या आणि त्यांच्याशी यांचे बोलणे करून घ्या आणि यांना सुचना द्या की त्या कामांची लवकरात लवकर सुरूवात करावी.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ मी म्हणुन आज या सर्व विषयांच आपल्या समोर आणुन देतोय की गुरूनानक नगरमध्ये आजपर्यंत मनपा फंड का दिला गेला नाही. मी मागणी केल्यानंतर पण, मी काट्याफाईल मधील समोरचा रोड टाकलेला होता दलितवस्ती निधी मध्ये तो पण पेंडींग ठेवण्यात आला का केला नाही. मग मस्जिदमध्ये शेकडो लोक

नमाज पढायला जातात दररोज की मी मागणी करतोय म्हणुन हा विषय पेंडींग ठेवत आहेत का? कोणाचा दबाव असेल तर नांव सांगा.

**मा.उपमहापौर :-** चेतनभाऊ एक मिनिंट , त्यांनी जे पत्र दिले असतील ना तर आपण आता या नगरसेवक निधीमधुन हा रोड किती झाला पाहीजे किंवा कुठपर्यंत झाला पाहीजे. त्याची एक जे ही दलितवस्ती निधीवाले असतील त्यांना बोलवुन घ्या आणि त्याच ईस्टिमेट बनवुन घ्या. त्यांचे सन्मा.सदस्यांच पत्र घ्या. स्वत: त्या वॉर्डाची व्हिजीट करून घ्या आणि काय करता येईल ते मार्गी लावा.

**मा.महापौर :-** गरज पडल्यास मनपा फंड टाकुन घेण्यात येईल.

**मा.उपमहापौर :-** जर समजा त्याचा निधी मंजुर नसेल तर दुसऱ्या याच्यात आपल्याकडे निधी नसेल तर त्याचे नव्याने काम करता येत असेल तर त्याचे एक ईस्टिमेट तयार करा आणि

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ याच्यामध्ये २०२१ मध्ये याच्यासाठी ST आयोगामध्ये तक्रार दाखल केलेली होती. त्या अनुषंगाने कलेक्टर ऑफीसमध्ये एक पत्र आले होते की समान निधी वाटप करणेबाबत त्या समान निधीच्या अनुषंगाने आपण मागे पत्रकार परिषद घेतली, आता काही ठराव वगैरे मागवले ते सर्व त्याच्यामुळे होत आहे.मग माझ्या वॉर्डामध्ये मनपा निधी का भेटत नाही. मी सांगीतलेले काम का होत नाहीत.

**मा.उपमहापौर :-** चेतनभाऊ आता तुम्ही जो विषय मांडला ना तो

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ

**मा.उपमहापौर :-** तुमच्या वॉर्डातील कामांच्या वर्कऑर्डर दिल्या गेल्या

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ गरुनानक नगर मध्ये ज्या ठिकाणी SC कॅटेगिरीचे आरक्षण ज्यांच्या कॉलनीमुळे पडलेले आहे. त्या कॉलनीमध्ये एक रूपयाचे काम झालेले नाही. प्रस्तावित आहेत ना, बाकीचे जे उरलेले आहे ते ती वर्कऑर्डर झाली तो विषय वेगळा

**मा.महापौर :-** भाऊ सांगीतले ना आता त्यांना की जे झालेले नसतील ते मनपा फंडातुन टाका

**मा.उपमहापौर :-** त्या मक्तेदारांना बोलवुन घ्या आणि यांनाही बोलवुन घ्या आणि संयुक्तिक पाहणी करून घ्या आणि ईस्टिमेट तयार करून घ्या .

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ दोन मिनिंट मी जेईंना प्रति मागीतल्या होत्या. का मागीतल्या ते वॉर्डात येत नाहीये काम करत नाहीये. ती फाईली पेंडींग ठेवतो आहे ते हेतू पुरस्कर करीत आहे. म्हणुन मी त्याची बदली मागतोय. का करत नाहीये तुम्ही, कुणाचा दबाव आहे. ओपन नांव सांगा. मला ते रेकॉर्डवर नांव द्या. जे.ई ची बदली का करत नाहीयेत तो अडी-अडचणी आणतोय. फाईल गहाळ करतोय तो मक्तेदाराला लपवतो आहे. त्याची बदली का करत नाहीये तुम्ही नांव सांगा मला

**मा.आयुक्त :-** एकुण आपल्याकडे आठ इंजिनिअर आहेत. पाणी पुरवठ्याचा चार्ज आहे आणि त्यांना टि.पी. चाही चार्ज द्यावा लागला आणि स्ट्रिक्टली आपण त्यांची शिफ्टींग केलेली होती आणि दर सहा महिन्याला परवडत नाही तर आपण दर वर्षी मंजुर झालेले कामे जी असतात त्याचे ईस्टिमेट त्याने केलेले असते म्हणुन पुन्हा तुमच्या कडूनच नाहीतर अजुन दोन अशा तिन इंजिनिअरची बदलीची मागणी आहे माझ्याकडे आहे. आपण फक्त शफलिंग करू शकतो आणि आपल्याकडे भरमसाठ इंजिनिअर आहेत आणि तो काढुन घ्यायचा अस नाहीये.

**श्री.चेतन सनकत :-** मॅडम मी तस म्हणत नाहीये. फक्त कामाची जिम्मेदारी दुसऱ्या इंजिनिअरला द्या. मी हिच मागणी करतो.

**मा.आयुक्त :-** चालेल विचार करू आपण याच्यावर

**श्री.चेतन सनकत :-** कारण की काय आहे परिस्थिती हि आलेली आहे तो वॉर्डात येत नाही. त्याला कधी फोन लावला तर तो म्हणतो की भाऊ मी कोर्टात आहे. भाऊ मी हॉस्पीटलला आहे. चला एक दिवस नसेल दुसऱ्या दिवशी तर येवू शकतो. आठवड्यातुन येवू शकतो.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.चेतन सनकत :-** मी आता महासभा सुरू व्हायच्या अगोदर त्यांना फोन लावला की तुम्ही येथे उपस्थित रहा त्यांना महासभा सुरू व्हायच्या अगोदर त्यांना बोलावले होते की तुम्ही थांबा मी प्रश्न उपस्थित करणार आहे. मक्तेदाराचे तुम्ही नांव सांगा का करत नाही तुम्ही माहिती द्या. त्याच्यामध्ये त्यांना सोनगिरे साहेबांना त्यांना डायरेक्ट पाठवुन दिले.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ आप सभी पदाधिकारीयो से हात जोड के विनंती है के मै अगर SC कायदे तहत अगर अट्रासिटी दाखल करूंगा इनपे तो फिर मेरेको दोषी ठहराना नही. जो भी इसमे निगडीत रहेंगे उनपे मै कारवाई करूंगा.

**मा.महापौर :-** चेतनभाऊ त्यांना चान्स द्या. जर नाही केले तर मग

**श्री.चेतन सनकत :-** चान्स नाही मॅडम जी माहिती आता तशी मी रेकॉडला देतोय. ती माहिती त्यावेळी दिली अमृतकांरानी मला माफी मागीतली होती आणि त्यांनी सांगीतले की चुकुन माझ्याकडून अमुक अमुक व्यक्तिच्या दबावामुळे माझ्याकडून ठेवली गेलेली होती. त्याचे नांव सांगण्यासाठी मी त्यांना येथे बोलावत होतो. म्हणुन तो पळाला येथुन, त्याने माफी मागीतली तर पण तो सुधरणार नाहीये. SC कायद्याने मला कारवाई करायला भाग पाडू नका. मी माझ्या अधिकाराबद्दल बोलतोय. नागरीकांना सुविधा पुरविण्यासाठी मी फाईल ठेवतोय. मी स्वत:च्या स्वार्थासाठी फाईल ठेवत नाहीये.

**श्री.जितेंद्र मराठे :-** चेतनभाऊ आपण उपोषणाच्या संदर्भात , सिरियसली घ्या आपण उपोषणाला बसले पाहीजे. नाही खरच सिरियस विषय आहे हा

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ नंतर बसायचे कशाला आत्ता बसा ना भाऊ तिथपर्यंत काय होईल , चला मी बसतोय आता. जोपर्यंत माझे काम होणार नाही. तोपर्यंत बसा सर्वांनी आता चला

(सन्मा.सदस्य श्री.चेतन गणेश सनकत हे काही वेळेसाठी सभागृहात खाली येवुन बसले)

**मा.उपमहापौर :-** चेतनभाऊ

**श्री.जितेंद्र मराठे :-** चेतनभाऊ मी आत्ताच बोललो की, तुम्ही लगेच कसे बसत आहेत. अहो हे सिरियस मॅटर आहे की आपण उपोषणाला बसायला पाहीजे.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**मा.महापौर :-** चेतनभाऊ आपण विषय पत्रिकेला सुरूवात करत आहोत.

**श्री.चेतन सनकत :-** आठ दिवसांच्या आंत ते काम सुरू झाले पाहीजे. आठ दिवसांच्या आंत ते काम नाही झाले तर त्याला ब्लॅकलिस्टेड करा आणि दुसरे काम मनपा फंडामध्ये नविन प्रस्तावित करा.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई

**मा.महापौर :-** बोला भाऊ

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई , आपण अमृतच्या कनेक्शनच्या संदर्भात

**मा.उपमहापौर :-** जितुभाऊ बराच वेळ झालेला आहे आपल्याला पाच मिनिंटांत विषयांना सुरूवात करायची आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** एकच मिनिंटभाऊ एकदम थोडक्यात संपवतो. महापौरताई काही कॉंक्रीट व डांबरी रस्त्यांचे आपण काम वर्षभर पहिले सुरू केलेले आहेत. ज्याच्यामध्ये त्या नागरीकांचा रहिवास पण नव्हता पण त्यांच भविष्यात बांधकाम करायच प्लॅनिंग होत. तर अशा बऱ्याच जणांना आपण त्यावेळेला रस्ते पुन्हा खोदले जातील म्हणुन आपण त्यांना अमृतचे कनेक्शन घ्यायला लावले. आता त्यांना कमर्शियल नळपट्टी आकारली जाते आहे तर याच्यामध्ये त्यांना कुठेतरी एक मार्ग काढला पाहीजे. तिथे त्यांचा वापर पण नाहीये. त्याचे बांधकाम सुरू आहे आणि त्यांना पाण्याच कनेक्शनसाठी रस्त्यांसाठी आपण घ्यायला लावलेले आहेत. ते रस्ते खोदावे लागतील म्हणुन अगोदर घ्यायला लावलेले आहेत.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**मा.महापौर :-** भाऊ मी कुठे बोलत आहे तुम्हीच बोलत आहेत एक-एक जण तुम्ही बोलत आहात म्हणुन बोलत नाही आणि शांत आहे तुम्हाला बोलू देत आहे सगळ्यांना

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई तुमच मौनव्रत सोडा आता

**मा.महापौर :-** नेमाडे साहेब बोलत आहेत. त्यांना बोलू द्या. बोला साहेब

**श्री.नेमाडे, उपअभियंता,पाणी पुरवठा :-** आपण त्यांच्याकडून पावती फाडून घेतलेली आहे. परंतू कनेक्शन दिलेले आहे पण पाणी पुरवठा सुरू झालेला नाही. अशा नळ कनेक्शन धारकांची पाणीपट्टी आपण पुढील वर्षामध्ये त्याचे समायोजन करून घेतो. म्हणजे पाणीपट्टी आपण परत करत नाही. पंरतू पुढच्या वर्षी त्याचे समायोजन करून घेतो.

**मा.महापौर :-** म्हणजे जेव्हा पाणी येईल तेव्हा भरायचे आहे आणि सुरू होईल.

**श्री.अश्विन सोनवणे :-** कनेक्शन दिले आहे याद्या पाहा लोकांच्या

**मा.महापौर :-** भाऊ म्हणजे आपण पाणी देवु शकत नाही आणि सुरू झाल्यानंतर देवु आणि नंतर घेवू पाणीपट्टी

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई यातील पुढच्या वर्षामध्ये आपण हि पाणीपट्टी वर्ग होईल.

**मा.महापौर :-** ती वर्ग होईल.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मग आपल्या स्तरावरून त्यांना पत्रव्यवहार केले पाहीजे की ते पैसे पुढच्या वर्षी भरावे लागतील.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.जितेंद्र मराठे :-** आपले जे अधिकारी किंवा कर्मचारी आहेत ना त्यांना व्यवस्थित मार्गदर्शन होत नाहीये.

**श्री.नितीन बरडे :-** कनेक्शन देतांना पैसे घेतले जातात त्याच काय आहे.

**श्री.नेमाडे, उपअभियंता,पाणी पुरवठा :-** भाऊ याबद्दल मला काही माहिती नाहीये.

**श्री.नितीन बरडे :-** आणि तिसऱ्या नागरीकांने डायरेक्ट पत्रकारांना दिलेले आहे

**श्री.नेमाडे, उपअभियंता,पाणी पुरवठा :-** भाऊ घेतले असतील तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल.

**श्री.नितीन बरडे :-** काय म्हणत आहेत.

**श्री.नेमाडे, उपअभियंता,पाणी पुरवठा :-** तक्रारी अर्ज आल्यानंतर कारवाई करण्यात येईल भाऊ

**श्री.नितीन बरडे :-** साहेब हे ऐकुन आमचे डोके सफेद झाले आहे.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**मा.आयुक्त :-** सर आपण जर असे पेपरला दिले तर त्याचा गैरवापर होईल. समजा कुणी अर्ज केला की मला कनेक्शन पाहीजे आहे मला पाणी लागत आहे. मला समजा २०२० ला कनेक्शन दिले आणि त्याठिकाणी अमृतचे पाणी सुरू झाले आहे की नाही त्या ईंजिनिअरला विचारू की खरच पाणी सुरू झाले आहे का? मगच त्याला आपण अप्रुवल देतो. आपण जर भाऊ असे केले ना तर मग त्याचा गैरप्रकार होईल

**श्री.जितेंद्र मराठे :-** मॅडम स्पॉटला आपले अधिकारी नसतात आणि स्पॉटला कर्मचारी पण नसतात ना. ते देतात त्यावेळेला, त्यांचा

**मा.आयुक्त :-** या अनुषंगाने आपले एक परिपत्रकच आहे शासनाचे की ईंजिनिअरने तिथेच थांबले पाहीजे त्या अनुषंगाने आपण सुध्दा एक परिपत्रक काढलेले आहे. सर्व HOD यांनी आपल्या क्षेत्रामध्ये दुपारी ०३ ते ०५ यावेळेत त्यांनी कार्यालयातच थांबले पाहीजे. जेणेकरून नागरीकांच्या येणाऱ्या तक्रारी निकाली काढता यायला पाहीजे.

**मा.महापौर :-** राजुभाऊ विषय पत्रिकेवरील विषय सुरू करायचे आहेत.

**श्री.अनंती जोशी :-** महापौरताई यांचे तिन तिन/ चार चार राऊंड होवुन गेले माझा पहिला राऊंड तर होवू द्या.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**मा.महापौर :-** राजुभाऊ विषय पत्रिकेवरील विषय झाल्यानंतर बोलू ना आपण

**श्री.राजेंद्र पाटील:-** महापौरताई दोन मिनिंट या विषयावरच विषय आहे माझा

**मा.महापौर :-** राजुभाऊ दोन मिनिंट थांबा त्यांना बोलु द्या मग बोला तुम्ही खाली बसा आधी

**श्री.नितीन बरडे :-** तुमचे अधिकारी पैसे घेतात कनेक्शनचे दोन दोन हजार रूपये त्याच काय आहे?

**मा.महापौर :-** नेमाडे साहेब बोला.

**श्री.नितीन बरडे :-** त्याच्यावर काय कारवाई केली ?

**श्री.महेश चौधरी :-** महापौरताई

**मा.महापौर :-** महेशभाऊ बोला.

**श्री.महेश चौधरी :-** शांतारामदादा सोनवणे जेव्हा वैद्यकीय अधिकारी होते. तेव्हा जळगाव शहराच्या दवाखान्यांची स्थिती तुम्हाला आणि महापालिकेच्या सर्व नगरसेवकांना माहिती आहे आणि आजची स्थिती सर्वांना माहिती आहे. अश्विनभाऊंनी या विषयाला हात घातला त्याच्यासाठी मी ११ वाजेपासुन शिस्तीत हात वर करून पाहीले पण काही माझा नंबर लागत नव्हता. मॅडम तुम्हाला धन्यवाद की मला चान्स दिला. तर मला असे वाटत की प्रमुख वैद्यकीय अधिकारी जे आताचे हल्लीचे आहेत. हे स्लो पॉयझनची ट्रिटमेंट जळगांव शहराच्या दवाखान्यांना देता आहेत म्हणजे हळुहळु दवाखाने संपवायचे. एखाद्या संस्थेला पकडायच आणि त्या संस्थेच्या ताब्यात तो दवाखाना देवुन टाकायचा. आपण खुर्च्या तोडायच्या एवढ एकच काम चालु आहे आणि ते वरून शासनाचा जो आदेश आहे लहान मुलांच्या लसीकरणाचा असेल किंवा असेच लसीकरणाचा जो शासनाचा आदेश आहे. तेच काम फक्त नित्य नेमाणे होत असते. बाकी सर्व काम बंद झालेली आहेत. मला वाटत ताई आपण डॉक्टर आहेत. पण दुर्देवाने सांगाव लागत की आपण आल्यापासुन काही आपण लक्ष दिलेले नाही आणि आता आपण त्यांच्याकडे डिमांड जे दिले आहे. त्यात काय करतील ते काही सांगता येत नाही. कारण त्या दवाखान्यामध्ये अस आहे की प्रमुख वैद्यकीय अधिकारी अशी

काही गोळी खाऊ घालतात की ते सगळे नेम्मण होवुन जातात. काय असेल ते तर एक गोराणे साहेबांना मी मानतो आणि मी अभिनंदन करतो गोराणे साहेबांच की त्यांनी स्वत: त्या विषयाची लाईन लावली होती. पण काय जादु झाली गोराणे साहेबांची पण बदली झाली तर या विषयाला थोड गांर्भीयाने घ्याव अशी माझी विनंती आहे. शाहु महाराज रूग्णालयाचा विषय आता अश्विनभाऊंनी घेतला तर मी याबद्दल मी प्रमुख वैद्यकीय अधिकाऱ्यांना एप्रिल महिन्यामध्ये तक्रार दिली आहे. जळगांव शहराच्या जे सर्व रूग्णालय आहेत. महापौरताई जळगांव शहराच्या जनतेचे तर हाल होतच आहे आणि आपल्या महापालिकेमध्ये जळगांव शहराच्या जनतेचा काहीच फायदा होत नाही. पण जळगांव शहर महापालिकेच स्वत: नुकसान होत आहे. खुप मोठ्या प्रमाणात जळगांव महापालिकेचे नुकसान होत आहे. कोट्यावधी रूपये वर्षाला ती सदरची संस्था कमवते आहे आणि त्यांना आपण मोफत त्यांना जागा दिली आहे. म्हणजे त्या जागेचा जर आज तुम्ही विचार केला तर त्या जागेचे आपल्याला दहा लाख रूपये उत्पन्न आले पाहीजे. ती जागा आपण मोफत दिली आहे तिस वर्षांच्या कराराने आणि ती संस्था माझ्याकडे ऑडीट आहे त्यांचे ६ कोटी रूपये त्यांचा मागच्या वर्षाचा नफा आहे. ६ कोटी रूपये घेतली आहे का हि माहिती कोणी आणि या गोष्टींसाठी लोकांना पैसे लागतात. डिलेव्हरीचे बिल आहेत माझ्याकडे याच्यात डिलेव्हरीचे बिलाचे ७ हजार रूपये घेतले आहे त्यांनी कुठुन द्यायचे गरीबांनी पैसे सर्व शासकीय योजनांचा नफा चालु आहे. काय मिळतय महापालिकेला तुम्ही त्याची चौकशी करावी आणि उदय पाटील साहेबांनी चौकशीत हात घातला आहे. तर तीच कायम ठेवावी.

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई माझ बोलण दोन मिनिंटात होणार नाहीये.

**मा.महापौर :-** भाऊ बोला

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई आता तुम्ही पाहाता आहे की मी तिन तासांपासुन मी लागले तर शेवटी बोलेल किंवा पुढच्या मिटींगला बोलेल.

**मा.महापौर :-** भाऊ बोला.

**श्री.अनंत जोशी :-** आयुक्त मॅडम बोलवले आहे का त्यांना फुलमोगरे साहेबांना , आय.जी पाटील आणि आस्थापनाच्या लोकांना

**मा.आयुक्त :-** त्यांना कार्यालयात उपस्थित राहायला सांगीतले आहे महापौर मॅडमांनी

**श्री.अनंत जोशी :-** मॅडम ते उपस्थित राहील्याशिवाय मी बोलणार नाही माझा विषय अपुर्ण राहीलेला आहे गेल्या महासभेतला तो विषय मला पुढे घ्यायचा आहे.

**मा.महापौर :-** बोलवुन घ्या त्यांना मग बोलु.

**श्री.अनंत जोशी :-** शेवटी बोलवा लागेल तर महापौरताई, मला गर्दीपण नको आणि गोंधळ पण नको मी शेवटी आणि मला जे बोलायचे आहे ते मी तुमच्याशी एकदा बोलेल.

**मा.महापौर :-** ठिक आहे शेवटी बोलु आपण

**श्री.अनंत जोशी :-** शेवटी बोलवा लागेल तर

**मा.महापौर :-** कोणाकोणाला बोलवायच आहे.

**श्री.अनंत जोशी :-** प्रभाग अधिकारी फुलमोगरे साहेब, प्रभाग समिती ४ चे आय.जी. पाटील , आस्थापनाचे कर्मचारी त्यात त्या मॅडम होत्या पाहणीसाठी ते दोघे होते त्यांचे नांव मला लक्षात नाहीत. तिथे आपले फुलमोगरे आणि आय.जी.पाटील यांना बोलवा ते आल्यानंतर मी चर्चा करेल आणि बाविस्कर साहेबांनाही थांबायला सांगा. तुम्ही सांगाल तेव्हा बोलेल पण राष्ट्रगीतच्या आधी घ्या. मॅडम राष्ट्रगीतच्या आधी बोलु द्या.

**मा.महापौर :-** हो भाऊ, विषय पत्रिकेवरील विषय घेण्यात यावे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौरताई

**मा.उपमहापौर :-** राजुभाऊ विषय झाल्यावर आपण बोलु ना.

**मा.महापौर :-** राजुभाऊ हे संपुन जावु द्याना परत आपल्याला बोलायचच आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौरताई फक्त दोन मिनिंट बोलतो.

**मा.महापौर :-** बोला.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आता आपण जे कनेक्शन देतो आहे. त्याच्या आपण नागरीकांना तिस/तिस , पस्तीस/ पस्तीस हजारांच्या पावत्या देतोय नविन कनेक्शन साठी, आता रामेश्वर कॉलनीमध्ये एका प्लाटमध्ये चार ब्लॉक बांधले

गेलेले आहेत. तर त्या चारही नागरीकांनी नळ कनेक्शनसाठी अर्ज केलेला आहे. एका प्लॉटमध्ये चार कनेक्शन देण्यासाठी एक लाख चाळीस हजारांची आकारणी केली जाते आहे. रस्त्यांच इतक नुकसान होणार आहे का आपल तिथे की त्यांच्याकडून आपण एक लाख चाळीस हजार वसुल करणार आहोत. त्यांना मागणी केलेली आहे. एकाला चौरेचाळीस हजार, एकाला बत्तीस हजार, एकाला पस्तीस हजार अशी.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.राजेंद्र पाटील :-** नाही नविन रस्ता झालेला आहे म्हणुन, आता जर ते कनेक्शन जर रोडाच्या चारीतुन जाणार असेल तर त्याच्याकडून एक लाख चाळीस हजार कसे काय घेवु शकतात. एका जागेतुन चार कनेक्शन जावु शकतात ना , पण त्यांनी ब्लॉक आता घेतले आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** याच्यामध्ये कस झालेले आहे की आपण जे नळ कनेक्शन वारंवार पेपरमध्ये नळ कनेक्शन घेण्यासाठी नागरीकांना सुचनाही दिलेल्या होत्या. तरी देखील काही नागरीकांनी नळ कनेक्शन घेतले नसतील. तर रस्त्याचे जे नुकसान होत तर ते ठरलेल्या दरानुसार आपण पैसे घेवुन आणि त्यानुसार त्यांना पावत्या देतात विना पावत्यांच कनेक्शन देता येत नाही किंवा त्याच्यामध्ये बदल करता येत नाही. जेवढे पैसे आपण भरत आहोत तेवढ्याची पावती मिळते आणि कनेक्शन देतो. शेवटी रस्त्याच नुकसान होत. कॉक्रींट रोड आणि डांबरी रस्त्याचा वेगळा विषय असतो. कॉक्रींट रस्ता करता येत नाही तो खोदल्यानंतर तो खराबच होतो. त्यामुळे आपण ती आकारणी करत आहोत आणि ती आकारणी त्यांना आवश्यक आहे. कारण त्या रस्त्याच्या दूरूस्तीला पैसे आणणार कुठुन

**श्री.राजेंद्र पाटील :-** एक मिनिंट साहेब कॉक्रींट रस्त्यासाठी आणि डांबरी रस्त्यासाठी एकच चार्ज आहे का?

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** जर तो रस्ता कॉक्रींट आणि डांबरी रस्ता BM चा असेल तर

**श्री.राजेंद्र पाटील :-** आता हा रस्ता जो आहे तिथे डांबरीकरण झालेले आहे आणि चार कनेक्शन जर एका दिवशी मागत आहेत. तर चारही कनेक्शन एकाच चारीतुन चार कनेक्शन तुम्ही देवु शकतात.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** भाऊ जर एकाच चारीतुन होत असेल तर आपल्याला विचार करता येईल पण रस्ता तर पुर्ण खोदणार आहे एकासाठी पण आणि चारसाठी पण

**श्री.राजेंद्र पाटील :-** मग आता हे आपण एका चारीतुन त्यांना चारहींना कनेक्शन देवु शकतो. तर तो समजा एक फुट बाय नऊ मिटर तेवढी जर तुम्ही एक चारी करणार आहेत तर तुम्ही पस्तीस/ पस्तीस हजार चार जणांकडून कसे काय घेवु शकतात.

**श्री.नितीन बरडे :-** एकाच ठिकाणी आहे का?

**श्री.राजेंद्र पाटील :-** एकाच प्लॉटमध्ये आहे ना भाऊ

**श्री.नितीन बरडे :-** चारी जरी एकच असेल तरी कनेक्शन वेगवेगळ्या ठिकाणी जोडावे लागणार त्यांना

**श्री.राजेंद्र पाटील :-** रस्ता क्रॉस केल्यानंतर तर बाजुला त्यांचा रस्ता आहे ना

**श्री.नितीन बरडे :-** भाऊ रस्ता खोदुन जरी केले तरी चारींना वेगवेगळे आणि अंतरावर कनेक्शन द्यावे लागतील त्यांना

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** भाऊ तस जर असेल तुमच म्हणण जे आहे की एकाच चारीमधुन चारही कनेक्शन देता येतील.

**श्री.राजेंद्र पाटील :-** लागले तर एका चारीतुन दोन आणि दुसऱ्या चारीतुन दोन कनेक्शन तस करू शकता.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** भाऊ तस होवु शकत. तो पर्याय होवू शकतो पण तशी त्यांनी मागणी केली पाहीजे. आमचे इंजिनियर जावुन पाहणी करून

**श्री.राजेंद्र पाटील :-** मागणी केली पाहीजे म्हणजे नागरीकांना काय कळत साहेब, हे इंजिनियर लोकांनी ठरवल पाहीजे की याच्यातुन काय होवू शकत की नागरीकांचे दोन पैसे कसे वाचतील.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** नाही नाही त्या चारही लोकांची जर एकाच वेळी मागणी आली तर ते आपल्याला करता येईल.

**श्री.राजेंद्र पाटील :-** एकाच वेळी आली आहे

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** ठिक आहे मी बघतो.

**मा.महापौर :-** त्याठिकाणी संबंधित अधिकारी यांनी जावुन यावे. ते पाहुन कनेक्शन देण्यात यावे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** भाऊ मी इंजिनियरला पाठवुन करून देईन.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** महापौरताई कॉक्रींट रस्ता झालेला विनापरवानगी तोडलेला आहे माझ्या प्रभागामध्ये पाणी पुरवठ्याच्या अधिकाऱ्यांना माहिती नाही. बांधकामच्या अधिकाऱ्यांना माहिती नाहीये.

**श्री.सुनिल महाजन :-** गुन्हा दाखल करा. त्याने ते घेतलेले आहे कनेक्शन त्याच्यावर गुन्हा दाखल करा.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आणि विना परवानगीचे कनेक्शन दिले गेले आहे. आत्ता मागच्या महिनाभरापुर्वी एक डांबरी रस्ता झाला. त्यालाही आता खोदुन टाकले आहे. त्या वानखेडेला विचारले तर म्हणे मला माहितीच नाही. वाणी साहेबांना विचारले तर ते म्हणे मला माहितीच नाही. म्हणजे हे काय आहे आंधळ पिठ दळतय आणि कुत्र पिठ खातय. काय कार्यक्रम आहे हा

**मा.महापौर :-** साहेब याची चौकशी करावी.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** हि काय पध्दत आहे काय पध्दत लावली आहे अशी

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** भाऊ आपण याबाबतीत तुम्ही रायटींग मध्ये लेखी कंम्पलेंन्ट द्या आपण समक्ष जावुन बघु.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** अहो साहेब तुम्ही काय करत आहेत आम्ही जर रायटींग मध्ये द्यायला लागलो तर , तुमचे इंजिनियर काय करत आहेत. तुमचा युनिटवाला काय करतोय.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** भाऊ विषय कसा आहे आता हि जी तुम्ही कंम्पलेंन्ट करत आहेत. हि तक्रार मला आताच समजते आहे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** आयुक्त मॅडमांकडे तक्रार केली मी, वाणी साहेबांकडे तक्रार केली मी, वानखेडेला सांगीतले आहे. तुम्ही काय करता आहे मग

**मा.महापौर :-** साहेब नगरसेवकांनी जरी तोंडी तक्रार केली तरी तुम्ही पाहायला पाहीजे ना साहेब तुम्ही पाहायला पाहीजे की काय परिस्थिती आहे ती तर

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** ताई सभागृहात सांगता आहे ते भाऊ तक्रार मला काहीच माहिती नाही याची

**मा.महापौर :-** वाणी साहेबांकडे तक्रार केली आहे त्यांनी

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** ठिक आहे भाऊ

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** तुमचे लोक काय काम करता मग आम्ही लेखी तक्रार करायची तर

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** ठिक आहे तुम्ही लक्षात आणुन दिले म्हणुन मी सांगतो आहे तुम्हाला की तुमची जी तक्रार आहे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** लेखी का द्यायची पण आम्ही खोट बोलतोय का?

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** भाऊ कोणता रस्ता खोदला आहे अस म्हणतोय मी

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** फोटो देतो ना तुम्हाला मग

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** फोटो टाका मला मी करतो चौकशी

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** तुमचे लोक काय काम करता आहे मग

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** भाऊ कोणता

**श्री.नितीन लढ्ढा :-** सोनगिरे साहेब त्यांनी परिस्थिती लक्षात आणुन दिली ना त्या हिशोबाने तुम्ही चौकशी करा आणि कारवाई करायला लावा. कशाला उगाच वादविवाद करत बसता आहे.

**मा.उपमहापौर :-** ते तुमच्या लक्षात आणुन देत आहेत ते करा.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** महापौरताई ज्या माणसाने कनेक्शन घेतले आहे त्याच्यावर गुन्हा दाखल करायला लावा.

**मा.महापौर :-** नेमाडे साहेब याची पुर्ण चौकशी झाली पाहीजे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** महापौरताई हा गंभीर विषय आहे.

**मा.महापौर :-** याची पुर्ण चौकशी करून कारवाई झाली पाहीजे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** रोड खोदुन विना परवानगी दिले आहे नळ कनेक्शन, दुसरा विषय असा होता माझ्या प्रभागातील वैष्णवी पार्क मध्ये तिस वर्षांनंतर गटारी बनत आहेत. ते दोन पार्टमध्ये ईस्टिमेट बनले आहेत. एक ईस्टिमेटची वर्कऑर्डर झाली कामही झाले आहे. दुसरे जे ईस्टिमेट आहे त्याची वर्कऑर्डर झाली पण मागच्या दोन महिन्यापासुन कामाला सुरूवात झाली नाहीये. हे नाटक आजचे आहे समजा रेती नाही हे नाही ते नाही. खड्डे खोदुन ठेवले आहेत लोक बिचारे उड्या मारून घरातुन बाहेर पडत आहेत. म्हणजे चांगल्या रस्त्याला महानगरपालिका लोकप्रतिनिधींना बदनाम करायच काम करत आहेत. मी वाणी साहेबांना सांगीतले की तो काम करत नसेल तर त्याला ब्लॅकलिस्टेड करा आणि दुसऱ्याला काम देवुन द्या आणि ते म्हणतात की संबंधित मक्तेदार आमच काहीच ऐकत नाही. दुसऱ्याला देवुन टाकतो आणि मग लोक बोंबलत बसतात. तिस वर्षांनंतर काम होतय आणि लोक तिस वर्षांपासुन घरपट्टी भरत आहेत. म्हणजे दोषी कोण आहे त्याच्यामध्ये लोक आहेत का लोकप्रतिनिधी दोषी आहेत का? माझी मागणी आहे की त्याच्यावर तात्काळ कार्यवाही करा आणि असे जे ठेकेदार असतील जसे आता चेतनभाऊंनी सांगीतले त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहीजे आणि त्याला ब्लॅकलिस्टेड केले पाहीजे.

**मा.महापौर :-** सोनगिरे साहेब याची चौकशी करून कोण मक्तेदार आहे ते खोदुन ठेवतात आणि मग

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** दोन वर्कऑर्डर होत्या याच्या सोबतच्या एक वर्कऑर्डरच काम संपले आहे. वाळु चालु होती.

**मा.महापौर :-** ठिक आहे भाऊ , त्याच्या मागची काय कारण आहे ते बघुन घ्या सोनगिरे साहेब सुरू करायला सांगा त्याला तात्काळ

**श्री.प्रशांत नाईक :-** शौचालयाबाबत मला माहिती द्यावी.

**मा.महापौर :-** सोनगिरे साहेब

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** माझ बोलणेही झाले होते या विषयावर आणि आमची दोघांची बैठकही झाली होती. एस.आय आणि निरंजन यांनी संयुक्त कार्यवाही करायाची होती. भाऊंच्या वॉर्डापासुन सुरूवात करायची अस भाऊंनी सांगीतले होते. परंतू ज्या दिवशी सुरूवात करायची होती त्या दिवशी आमच्या जे.सी.बीची बेअरींग खराब झाल्यामुळे ते काम थांबलेले होते.

**श्री.प्रशांत नाईक :-** सोनगिरे साहेब याचा एक ठराव झालेला आहे आणि प्रत्येक नगरसेवकाच लेटर घेतले होते. आयुक्त मॅडम ज्यावेळेस हा ठराव झाला होता. प्रत्येक प्रभागातील दोन नगरसेवकांचे लेटर घेतले होते की किती शौचालये तोडायचे आहे आणि एस.आय आणि आरोग्य अधिकारी त्यावेळी उदयबापू होते. सगळ्यांची रिपोर्टींग झाली आहे आणि आता कोणती पाहणी करत आहे. काय पाहणी करत आहेत सांगा बर काय निर्णय घेता आहे तुम्ही मला.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** आता पाहणीची गरज नाहीये कारण ठरलेले आहे किती शौचालये तोडायचे आहे ते

**श्री.प्रशांत नाईक :-** आकडा देवुन टाकला आहे अगोदर सांगा त्यांना उदयबापु

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** ऑर्डर तशी झाली आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** ऑर्डर तशी झाली आहे. ठरावासाठी पण पत्र दिले होते नगरसेवकांनी की एवढे शौचालये तोडण्यात यावे म्हणुन प्रत्येक नगरसेवकांचे तुम्ही पत्र घेतलेले आहेत. एस.आय चा रिपोर्ट आहे. बापुंचा रिपोर्ट आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** तोडायचे आहे ना भाऊ

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई काय निर्णय झाला सांगा ना, आयुक्त मॅडम काय करणार आहे सांगा तर खर

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई सांगा ना सांगीतले ना आता

**मा.उपमहापौर :-** उद्यापासुन सुरूवात होईल. सोनगिरे साहेब त्या वॉर्डातील जे नगरसेवक आहेत त्यांना सर्वांना कल्पना द्यायची आहे की आम्ही तोडायला सुरूवात करतो अशी

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझ्या प्रभागामधील एक ठराव झालेला होता त्याची वर्कऑर्डर सुध्दा दिली गेलेली आहे. १४ महिन्यापहिले कलेक्टर ऑफीसला मी प्रकरण पाठवले होते. आता पिंप्राळयासाठी परवानग्या बरोबर आल्या. यांच्या पुतळयासाठी बरोबर आल्या मग आमच्या पुतळयासाठी का नाही आल्या.

**मा.उपमहापौर :-** वेगवेगळे आहे का?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अल्लग नाही पण तुमची जबाबदारी नाहीये का महापौराची , प्रशासनाची जबाबदारी नाही आहे का परवानग्यांची , नगरसेवकांची जबाबदारी आहे का? यांनी सांगाव की पाठपुरावा करा म्हणुन

**मा.उपमहापौर :-** नवनाथभाऊ मी सांगतो तुम्हाला ज्या दिवशी मिटींग झाली या संदर्भातील त्या दिवशी आयुक्तांनी आणि महापौरांनी छत्रपती शिवाजी नगरच्या पुतळयाच्या बाबतीत विचारणा केली होती. त्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळयाच्या संदर्भात पण ज्या दिवशी मिटींग झाली त्यादिवशी आयुक्तांनी व महापौरांनी कलेक्टर साहेबांना पुतळयाविषयी माहिती दिली. त्यांच्याकडून हि माहिती मिळाली होती की आम्ही त्याची स्कुटिनी करून त्या शासनाच्या मान्यतेबाबतची मागणी केलेली होती. लगेच आयुक्तांनी आपले उपस्थित अधिकाऱ्यांना सांगीतले की NOC झालेली आहे का तर सोनगिरे साहेब म्हणाले होते की त्याची NOC झालेली आहे. आता वास्तुशास्त्रज्ञांकडे त्या ठिकाणचे डिझाईन द्यायचे असल्याकारणाने ती परवानगी बाकी आहे आणि त्याचा पाठपुरावा तुमच्या पेक्षा जास्त आम्ही करत आहेत. तुम्हाला काही माहिती आहे का आता आम्हालाही माहिती आहे का? तर तुम्ही जो आरोप करत आहात तो चुकीचा आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आरोप नाही करत आहे. ठराव कधीचे झाले आहे.

**मा.उपमहापौर :-** नवनाथभाऊ एक मिनिंट ऐका ना, प्रत्येक परवानगी साठी प्रत्येक दिवशी ज्या ज्या वेळेस याबाबतचे पत्र येतात त्यावेळेस आम्ही स्वत: वैयक्तिक पाठपुरावा करत आहेत दोघेही करत आहे नाही करत आहे अस नाहीये. परंतू प्रत्येक गोष्टीला एक वेळ आणि काळ असतो. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळयाच्या बाबतीतल्या कला संचालनालयाच्या आणि बाकी च्या परवानग्या आहेत त्या झाल्यानंतर वास्तुशास्त्रज्ञांची सुनिलभाऊंनी स्वत: पाठपुरावा करून स्वत: गेले व ती परवानगी आणलेली आहे. एस.पींची परवानगी जी होती ती स्वत: सुनिलभाऊंनीच जावुन आणलेली आहे. परंतू त्याठिकाणी आपल्या छत्रपती शिवाजी नगरच्या संदर्भात थोडा कुठेतरी तुम्ही हो म्हणा किवा नाही म्हणा थोडा वेळ घेवुया जर आपण स्वत: त्याचा वैयक्तिक पाठपुरावा केला तर मला वाटत ते सर्व लवकर होईल. पोकळे साहेबांनी पण सांगीतले ते तिथे आलेले होते की ते येवुन गेले म्हणुन, परंतू त्याठिकाणी जे स्क्रुटीनी करून पाठवलेले होते त्या ज्या NOC घेण्याच्या बाबतीतील विषय होता. त्या सर्व NOC आपल्या महानगरपालिकेला दिल्या गेलेल्या आहेत. तुम्ही वास्तुशास्त्रज्ञांकडे एकदा जाऊन या तिथे तुम्ही पाठपुरावा करा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** केला मी पण

**मा.उपमहापौर :-** ते मंजुर झाले की कला संचालनालयाला पाठवली की एस.पींची परवानगी सांगतील किंवा कुठली सांगतील ती परवानगी ते आणतील.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मी पण पाठपुरावा केला आहे. आता तुम्ही सांगता आहे की कला संचालनालयाच्या परवानग्या लागतील तर आता ते आम्हाला माहिती नाही तर आम्हाला सांगेल कोण

**मा.उपमहापौर :-** भाऊ आम्हाला माहिती होत ना तुम्हाला माहिती जरी नसल ना तरी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने ती प्रोसेस चालु आहे. आता जशी तुमची ईच्छा आहे ना तशीच या सभागृहातील सर्व सदस्य, पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची सर्वांचीच तिच ईच्छा आहे.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**मा.आयुक्त :-** महापौरताई एक मिनिंट सर्वांसाठी माहितीस्तव की चव्हाण सर (IAS) प्रोबिशनली पिरियेड साठी आलेले आहेत नविन तर आपल्या महानगरपलिकेच कामकाज आणि त्याचा अभ्यास करण्यासाठी त्यांची ऑर्डर झालेली आहे. त्याअनुषंगाने ते जनरल बॉडीचे कामकाज पाहण्यासाठी ते येत आहेत. तर ते दहा पंधरा मिनिंटात आपल्याकडे येतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ११ वाजेपासुन बोलवले असते तर त्यांना जास्त अभ्यास झाला असता.

**मा.आयुक्त :-** सर त्यांना बोलवले होते.

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई आता नवनाथ भाऊंनी पुतळयांचा विषय काढला तर त्या अनुषंगाने एक विचारायचे होते की यांच्या पेपरला बातम्या आलेल्या होत्या. कुलभुषणभाऊ शिवस्मारकासाठी १० सप्टेंबरची तारीख तुमची देण्याबद्दलचा , उध्दव ठाकरे साहेब येत आहे त्याबद्दलचा फक्त एक विचारायच आहे मला येथे की ज्या पुतळयासाठी कुलभुषणभाऊंनी वैयक्तिक प्रयत्न खुप केलेले होते. ते सगळयांना ज्ञात आहे. त्याच क्रेडीट हे त्यांना १०० टक्के मिळणारच आहे. पण शेवटी हा पुतळा शासकीय जागेवर होतो आहे तर खालचा तो आपण बसवतो आहे. तर हा प्रोटोकॉल नुसार कार्यक्रम होणार आहे की कशा पध्दतीने कारण सभागृहात कुणाला अस अपेक्षित होत की

प्रशासनाकडून याच्याबद्दल काहीतरी माहिती येईल. १० सप्टेंबरला हा नियोजित कार्यक्रम होणार आहे. यामध्ये सगळ्यांना ईनव्हॉल्व करून घेतल जाणार आहे.

**मा.उपमहापौर :-** बिलकुल १०० टक्के तुमच ताई याच उत्तर देतो.

**अॅड. शुचिता हाडा :-** कारण काय आहे की ज्यावेळेला पुतळ्याच आगमन झाल त्यावेळेला सगळ्यांना ईनव्हॉल्व करून घेतल असत तर निश्चितच आम्हाला आनंद झाला असता.

**मा.उपमहापौर :-** आता ताई आपण ज्यावेळेला पुतळ्याच अनावरण करणार आहोत. त्यावेळेला आपले सर्व सन्मा.नगरसेवक असतील किंवा जो काही प्रोटोकॉल असेल तो निश्चितच फॉलो केला जाईल आणि ज्यादिवशी आपण पुतळा आणला त्यावेळेस आता मला ते सभागृहात सांगायच नाहीये की त्यामध्ये काय काय त्रास झालेला आहे आणि काय काय अडचणी निर्माण झालेल्या आहेत. परंतू निश्चितच अनावरणाच्या ठिकाणी अजुन जरी कार्यक्रम हा जरी वृत्तपत्रातुन आलेला असला तरी आमचे माजी मुख्यमंत्री आमचे पक्षप्रमुख मा. उध्दवजी ठाकरे साहेब यांनी याच्यासंदर्भामध्ये कर्न्फमेशन दिलेले नाही. परंतू त्यांचा दौरा निश्चित झाल्यानंतर जेव्हा कार्यक्रम निश्चित केला जाईल. त्यावेळेस निश्चितच आपल्याला कळविले जाईल.

**अॅड. शुचिता हाडा :-** आयुक्त मॅडम हा प्रशासकीय कार्यक्रम होणार की कशा पध्तदतीने ?

**मा.आयुक्त :-** हा प्रशासकीय कार्यक्रम होईल आणि प्रशासकीय प्रोटोकॉलनुसारच होईल.

**मा.महापौर :-** विषय पत्रिकेवरील विषय घेण्यात यावे.

**नगरसचिव -विषय क्र.१ :-** दि.०७/०७/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे तसेच दि.०१/०८/०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या तहकूब विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कार्यवृत्त कायम करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२२१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.०७/०७/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे तसेच दि.०१/०८/०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या तहकूब विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२ :-** जळगाव शहर महानगरपालिकेची विकास योजना सुधारीत करणे. (विकास योजना सुधारीत करणेसाठी महानगरपालिका क्षेत्राचा विदयमान जमिन वापर (ELU) नकाशा वस्तुस्थिती नुसार व दि.२५/०१/२०१९ व दि.१७/०६/२०१९ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे अदयावत करणे तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ नुसार नकाशे नगररचना विभागास संगणीकृत करुन देण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करुन कंत्राटदार नियुक्त करणे) बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराकरीता शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५८८/१९४/सि.आर-९७/युडी-९ दि.०६/०१/१९९३ अन्वये सुधारीत विकास योजना जळगांव (जुनी हद्द) मंजुर केलेली असून उक्त विकास योजना दि.१५/०२/१९९३ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) शासनाने आदेश क्र.टी.पी.एस.३५९९/७३८/सी.आर.१४२ (ए) युडी-९ दि.११/०२/२००२ अन्वये मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दि.०७/०४/२००२ पासुन अंमलात आहे तसेच उर्वरीत वगळलेल्या भागाची विकास योजना (इ.पी) शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५०३/४९३/सी.आर-१०२ (ए)/०३ युडी-९ दि.१०/०८/२००४ व्दारे मंजुर

केलेली आहे व ती दि.०१/१०/२००४ पासुन अंमलात आलेली आहे. जळगांव शहर महानगरपालिकेच्या मुळ हद्द व वाढीव हद्दीचे एकुण क्षेत्रफळ ६८२४.२७ हेक्टर आहे.

शासनाचे नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.टीपीएस-१८१८/१६४७/प.कं.२५२/१८/नवि-१३, दि.१५/१०/२०१८ नुसार जळगांव महानगरपालिकेच्या दोन्ही भागांच्या विकास योजना एकत्रित सुधारीत करण्यासाठी जळगांव महानगरपालिकेव्दारे दि.२०/०२/२०१८ रोजी महासभा क्र.५४ ठराव क्र.८४० विषय क्र.०२ अन्वये मुळ हद्दीसह वाढीव हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करणेसाठी ठराव पारीत केलेला असुन सदर ठरावात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ व ३८ अन्वये इरादा जाहीर करणे, कलम २४ अन्वये प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक नगररचना जळगांव यांची नगररचना अधिकारी म्हणून नेमणूक करणे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २५ नुसार विदयमान जमीन वापर नकाशा तयार करण्यासाठी निविदा प्रसिध्द करणे कामांचा समावेश करण्यात आलेला होता.

उपरोक्त मंजुर ठरावानुसार जळगांव शहर महानगरपालिकेव्दारे जळगांव महानगरपालिका हद्दीची विकास योजना सुधारीत करण्यासाठी दि.२८/०५/२०१९ रोजी ई-निविदा जाहिरात क्र.१३४१/२०१९-२०२० प्रसिध्द करण्यात आलेली असुन महानगरपालिकेव्दारे प्रसिध्द ई-निविदेनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २५ अन्वये विदयमान जमीन वापर (कख्छ) नकाशा तयार करणे, नगररचना विभागास कलम २६ व ३० नुसार नकाशे संगणीकृत करण्यासाठी नगररचना विभागास सहकार्य करणे तसेच विदयमान जमीन वापराचे व प्रस्तावित जमीन वापराचे क्षेत्रफळ तपशिल सादर करणे या कामाचा समावेश करण्यात आला होता सदर कामासाठी सर्वात कमी दराची ई निविदा स्थायी समिती सभा क्र.१५ विषय क्र.०४ व मंजुर ठराव क्र.१५१ दि.०४/०९/२०१९ नुसार मंजुर करण्यात आलेली आहे. जळगांव शहर महानगरपालिकेव्दारे जा.क्र/नर/वि.यो/१२३०/२०१९ दि.११/०९/२०१९ नुसार कार्यादेश देवुन कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेव्दारा नियुक्त कंत्राटदाराने कार्यदेशान्वये करारनाम्यातील पुढील प्रमाणे टप्पा निहाय कामे पुर्ण केलेली आहेत.

१) टप्पा क्र.१ - महानगरपालिका हद्दीत ड्रोनव्दारे हवाई सर्व्हेक्षण करणे.
२) टप्पा क्र.२ - महानगरपालिका हद्दीत डी.जी.पी.एस.सर्व्हेक्षण करुन बेंच मार्क कायम करणे.
३) टप्पा क्र.३ - महानगरपालिका हद्दीत टोटल स्टेशन सर्व्हेक्षण करुन इमारतीची बाहेरुन मोजणी करणे.
४) टप्पा क्र.४ - महानगरपालिका हद्दीतील नगरभुमापन आराखडयाचे संगणकीकरण व एकत्रित करणे.
५) टप्पा क्र.५ - महानगरपालिका हद्दीत समाविष्ट गावांचे नकाशे संगणीकृत करुन एकत्रित करणे.
६) टप्पा क्र.६ - महानगरपालिका हद्दीत नगररचना विभाग, महानगरपालिकेव्दारे मंजुर रेखांकनांचे संगणकीकरण करुन आधारभुत नकाशात समावेश करणे.
७) टप्पा क्र.७ - महानगरपालिका हद्दीतील इमारतींचे सर्व्हेक्षण करुन विदयमान जमीन वापर माहिती संकलीत करणे.
८) टप्पा क्र.८ - विदयमान जमीन वापराची संकलीत माहिती व अदयावत आधारभुत नकाशाची सांगड घालुन जळगांव महानगरपालिका हद्दीचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २५ अन्वये विदयमान जमीन वापर नकाशा तयार करणे.

नियुक्त कंत्राटदाराने उपरोक्त टप्पा निहाय कामे पुर्ण करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २५ अन्वये विदयमान जमीन वापर नकाशा जागेवर पडताळणीसाठी महानगरपालिकेकडे दि.१८/०८/२०२० रोजी सादर करण्यात आलेला आहे.

तथापि, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये राज्यातील नगर परिषदा व नगर पंचायतीच्या विकास योजना ह्या भौगोलिक माहिती प्रणाली वापरुन द्दतगती पध्दतीने करण्यासाठी महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने शासन निर्णय क्र.टीपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३, दि.२५/०१/२०१९ रोजी निर्गमीत केलेला असून राज्यातील सर्व नगर पंचायती/नगर परिषदा/नियोजन प्राधिकरणांनी विकास योजनेची कामे शासन निर्णय क्र.टीपीएस-१८१८/१४८९/प्र.क्र.३०३/१८/नवि-१३, दि.२५/०१/२०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील निर्देशानुसार

पुर्ण करण्याचा आदेश दिलेला आहे. करोना टाळेबंदी मुळे जळगांव शहर महानगरपालिकेच्या विकास योजनेसाठी राजपत्रात इरादा जाहिर करणे आणि विकास योजनेसाठी विकास योजना विशेष घटक व नगररचना अधिकारी नियुक्ती होऊ शकली नसल्याने कंत्राटदाराने तयार केलेला महापालिकेचा विदयमान जमिन वापर नकाशा जागेवर पडताळणी करुन हस्तांतरणाची वैधानीक कार्यवाही वेळेत पुर्ण होऊ शकली नाही. कोरोना टाळेबंदी/कालावधी संपल्यानंतर दि.२२ ते २८ जुलै २०२१ दरम्यान महानगरपालिकेव्दारा महाराष्ट्र शासन नाशिक विभागातील राजपत्रात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ व कलम ३८ अन्वये विकास योजना सुधारीत करणे बाबत इरादा घोषीत करण्यात आलेला आहे. जळगांव शहर महानगरपालिकेच्या विकास योजनेसाठी शासनाव्दारे दि.१६/०२/२०२३ रोजी विकास योजना विशेष घटक या कार्यालयाची स्थापना झाली असुन सदर कार्यालयाचे दि.२२/०२/२०२३ पासून कामकाज सुरु झालेले आहे.

दि.११/०५/२०२३ रोजी विकास योजनेबाबत आयुक्त, महानगरपालिका जळगांव यांचे दालनात बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत सहायक संचालक,नगररचना विभाग जळगांव म.न.पा. व अधिकारी, तसेच नगररचनाकार जळगांव शहर मनपा विकास योजना विशेष घटक व अधिकारी तसेच कंत्राटदार संस्थेचे प्रतिनीधी उपस्थित होते. सदर बैठकीत विकास योजनेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कोरोना टाळेबंदीनंतर जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रात झपाटयाने विकास होत असून आज रोजीच्या वस्तुस्थितीनुसार कंत्राटदार संस्थेने ऑगस्ट २०२० मध्ये सादर केलेल्या विदयमान जमिन वापर नकाशात पुढील प्रमाणे अतिरीक्त कामे पुर्ण करुन सुधारणा होणे आवश्यक तसेच बंधनकारक असल्याचे नगररचनाकार जळगांव महानगरपालिका विकास योजना विशेष घटक यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

उक्त कामासाठी अंदाजित ३००० रुपये प्रती हेक्टर प्रमाणे अंदाजित दोन कोटी खर्च अपेक्षित आहे.

१) अदयावत स्थितीसाठी महानगरपालिका हद्दीत ड्रोनव्दारे हवाई सर्व्हेक्षण करणे.
२) ड्रोनव्दारे प्राप्त हवाई छायाचित्रानुसार शहरात सन २०१९ नंतर झालेला विकास (इमरती,रस्ते,पुल, उड्डाण पुल इ.) दर्शवुन विदयमान स्थितीनुसार नकाशा तयार करणे.
३) सन २०१९ नंतर महानगरपालिका हद्दीत नगर रचना विभाग महानगरपालिका यांचे व्दारे मंजुर झालेले अभिंन्यास रेखांकन संगणीकृत करुन नकाशा अदयावत करणे.
४) सुधारीत नकाशानुसार शहरात दि.२५/०१/२०१९ चा शासन निर्णय व दि.१७/०६/२०१९ चे शुध्दीपत्रकानुसार विदयमान जमीन वापराबाबत फेर अचुक सर्व्हेक्षण करुन उक्त शासन निर्णयातील सुचनेप्रमाणे भौगोलिक माहिती प्रणालीव्दारे जळगांव शहर महानगरपालिकेचा विदयमान जमीन वापर नकाशा तयार करणे.
५) विकास योजनेचा सविस्तर अहवाल (डी.पी.रिपोर्ट) तयार करणे व अहवालाच्या प्रती सादर करणे.
६) विकास योजनेचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ अन्वये नकाशे तयार करणे.

उपरोक्त प्रमाणे जळगांव शहर महानगरपालिकेची विकास योजना सुधारीत करुन मंजुरी प्राप्त करुन घेण्यासाठी महानगरपालिकेचा विदयमान जमीन वापर नकाशा (कख्छ) नकाशा वस्तुस्थितीनुसार व दिनांक २५/०१/२०१८ व दि.१७/०६/२०१९ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे अदयावत करणे तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ अन्वये नकाशे भौगोलिक माहिती प्रणालीव्दारे नगर रचना विभागास संगणीकृत करुन देणे (वरील अ.क्र.१ ते ६ नुसार कामे) या कामांसाठी ई-निविदा प्रसिध्द करुन कंत्राटदार यांची नियुक्त करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३ :-** जळगांव शहर महानगरपालिकेची विकास योजना सुधारीत करणे (महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ (१) अन्वये विकास योजना सुधारीत करण्यासाठी राजपत्रात इरादा जाहिर करणे) बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२२३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराकरीता शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५८८/१९४/सि.आर-९७/युडी-९ दि.०६/०१/१९९३ अन्वये सुधारीत विकास योजना जळगांव (जुनी हद्द) मंजुर केलेली असून उक्त विकास योजना दि.१५/०२/१९९३ पासुन अंमलात आलेली आहे. तसेच मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) शासनाने आदेश क्र.टी.पी.एस.३५९९/७३८/सी.आर.१४२ (ए) युडी-९ दि.११/०२/२००२ अन्वये मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दि.०७/०४/२००२ पासुन अंमलात आहे तसेच उर्वरीत वगळलेल्या भागाची विकास योजना (इ.पी) शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५०३/४९३/सी.आर-१०२ (ए)/०३ युडी-९ दि.१०/०८/२००४ व्दारे मंजुर केलेली आहे व ती दि.०१/१०/२००४ पासुन अंमलात आलेली आहे. जळगांव शहर महानगरपालिकेच्या मुळ हद्द व वाढीव हद्दीचे एकुण क्षेत्रफळ ६८२४.२७ हेक्टर आहे.

शासनाचे नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.टीपीएस-१८१८/१६४७/प्र.क्र.२५२/१८/नवि-१३, दि.१५/१०/२०१८ नुसार जळगांव महानगरपालिकेच्या दोन्ही भागांच्या विकास योजना एकत्रित सुधारीत करण्यासाठी जळगांव महानगरपालिकेव्दारे दि.२०/०२/२०१८ रोजी महासभा क्र.५४ ठराव क्र.८४० विषय क्र.०२ अन्वये मुळ हद्दीसह वाढीव हद्दीचा विकास आराखडा सुधारीत करणेसाठी ठराव पारीत केलेला असुन सदर ठरावात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ व ३८ अन्वये इरादा जाहीर करणे, कलम २४ अन्वये प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक नगररचना जळगांव यांची नगररचना अधिकारी म्हणून नेमणूक करणे, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २५ नुसार विदयमान जमीन वापर नकाशा तयार करण्यासाठी निविदा प्रसिध्द करणे कामांचा समावेश करण्यात आलेला होता.

उपरोक्त मंजुर ठरावानुसार जळगांव शहर महानगरपालिकेव्दारे जळगांव महानगरपालिका हद्दीची विकास योजना सुधारीत करण्यासाठी दि.२८/०५/२०१९ रोजी ई-निविदा जाहिरात क्र.१३४१/२०१९-२०२० प्रसिध्द करण्यात आलेली असुन महानगरपालिकेव्दारे प्रसिध्द ई-निविदेनुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २५ अन्वये विदयमान जमीन वापर (ELU) नकाशा तयार करणे, नगररचना विभागास कलम २६ व ३० नुसार नकाशे संगणीकृत करण्यासाठी नगररचना विभागास सहकार्य करणे तसेच विदयमान जमीन वापराचे व प्रस्तावित जमीन वापराचे क्षेत्रफळ तपशिल सादर करणे या कामाचा समावेश करण्यात आला होता सदर कामासाठी सर्वात कमी दराची ई निविदा स्थायी समिती सभा क्र.१५ विषय क्र.०४ व मंजुर ठराव क्र.१५१ दि.०४/०९/२०१९ नुसार मंजुर करण्यात आलेली आहे. जळगांव शहर महानगरपालिकेव्दारे जा.क्र/नर/वि.यो/१२३०/२०१९ दि.११/०९/२०१९ नुसार कार्यादेश देवुन कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

कोरोना टाळेबंदी मुळे जळगांव शहर महानगरपालिकेच्या विकास योजनेसाठी राजपत्रात इरादा जाहिर करणे आणि विकास योजनेसाठी विकास योजना विशेष घटक व नगररचना अधिकारी नियुक्ती होऊ शकली नसल्याने कंत्राटदाराने तयार केलेला महापालिकेचा विदयमान जमिन वापर नकाशा जागेवर पडताळणी करुन हस्तांतरणाची कार्यवाही वेळेत पुर्ण होऊ शकली नाही. कोरोना टाळेबंदी/कालावधी संपल्यानंतर दि.२२ ते २८ जुलै २०२१ दरम्यान महानगरपालिकेव्दारा महाराष्ट्र शासन नाशिक विभागातील राजपत्रात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ व कलम ३८ अन्वये विकास योजना सुधारीत करणेबाबत इरादा घोषीत करण्यात आलेला आहे. जळगांव शहर महानगरपालिकेच्या विकास योजनेसाठी शासनाव्दारे दि.१६/०२/२०२३ रोजी विकास योजना विशेष घटक या कार्यालयाची स्थापना झाली असुन सदर कार्यालयाचे दि.२२/०२/२०२३ पासून कामकाज सुरु झालेले आहे.

दि.११/०५/२०२३ रोजी विकास योजनेबाबत आयुक्त, महानगरपालिका जळगांव यांचे दालनात बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत सहायक संचालक,नगररचना विभाग जळगांव म.न.पा. व अधिकारी, तसेच नगररचनाकार जळगांव शहर मनपा विकास योजना विशेष घटक व अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीत विकास योजनेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आलेली असुन महानगरपालिकेव्दारे विकास योजना सुधारीत करण्याचा ठराव पारीत होऊन ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी पुर्ण झालेला असल्याचे तसेच विकास योजना सुधारीत करण्याचा इरादा राजपत्रात प्रसिध्द करुन दोन वर्ष कालावधी पुर्ण झालेला असल्याने महानगरपालिकेची विकास योजना सुधारीत करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ (१) सह कलम ३८ अन्वये विकास योजना तयार करणेबाबत नव्याने ठराव पारीत करणे आवश्यक असल्याचे नगररचनाकार जळगांव शहर महानगरपालिका विकास योजना विशेष घटक यांनी निदर्शनास आणुन दिले.

उपरोक्त प्रमाणे जळगांव शहर महानगरपालिकेची विकास योजना सुधारीत करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ (१) सह कलम ३८ अन्वये विकास योजना तयार करणेबाबत महानगरपालिकेव्दारे ठराव पारीत करणे व नगररचनाकार यांची नेमणूक करणे गरजेचे आहे. तसेच पारीत ठरावानुसार राजपत्रात विकास योजना सुधारीत करण्याचा इरादा प्रसिध्द करणे आवश्यक असल्याने जळगांव शहर महानगरपालिकेची विकास योजना सुधारीत करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ (१) सह कलम ३८ अन्वये विकास योजना सुधारीत करण्याच्या प्रस्तावास व राजपत्रात इरादा प्रसिध्द करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४ :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील विकसित हरित क्षेत्र देखभाल दुरुस्तीसाठी सामाजिक संस्थाना कराराने देण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. यासंदर्भात या ज्या हरित स्पेसेस डेव्हलप केलेल्या आहेत आणि महानगरपालिके कडील मनुष्यबळ पाहाता या सुस्थितीमध्ये ठेवण्याच्या संदर्भातही बऱ्याचश्या अडचणी निर्माण होत आहेत. आता याच्यासंदर्भात आपण जाहिर निविदा मागवण्याच्या संदर्भात प्रशासनाने भुमिका सभागृहासमोर ठेवलेली आहे. यासंदर्भात मी जैन उद्योग समुहाचे अध्यक्ष श्री.अशोकभाऊ जैन यांच्याशी सुध्दा चर्चा केलेली आहे की ज्याप्रमाणे ते महात्मा गांधी उद्यान आणि भाऊंचे उद्यान हे दोघेही मेंटेंन करत आहेत. त्याच पध्दतीने आपण त्यांना विनंती केली की जर कधी या हरितक्षेत्र विकसित झालेल्या जागा जर ते देखभाल दुरूस्ती साठी घेत असतील तर महानगरपालिकेवर त्याचा आर्थिक बोजाही येणार नाही आणि त्यांचा पुर्वीचा फ्लो पाहाता त्या जागा अतिशय चांगल्या पध्दतीने विकसित करतील आणि मेंटेंनही ठेवतील. तर मला वाटत की तसा एक धोरणात्मक निर्णय याबाबत आपण घेण उचित होईल आणि त्या अनुषंगाने या जर कधी जागा त्यांनी संमती दिल्यास, त्यांच्या संस्थेला दिल्यास या जागा दिर्घ कालावधीसाठी सुस्थितीत राखण्यामध्ये मदत होईल.

**मा.आयुक्त :-** वानखेडे साहेब एखाद्या संस्थेला आपल्याला जागा म्हणजे ठराव करून देण्याला काही नियमाने अडचण येईल का ? म्हणजे ऑडीट वगैरे काही

**श्री.चंद्रकांत वानखेडे :-** मला अस वाटत की डायरेक्ट जर दिले आपण तर त्याचा ऑडीटमध्ये प्रश्न उदभवु शकतो. त्यांनी जर ऑफर लेटर दिले तर ते अधिकृतपणे देता येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे ना ऑफर लेटरबद्दल आपल्याला त्यात काही वाद नाहीये. म्हणजे आता जो विषय निघाला अशा पध्दतीने हा पुन्हा तो काही कमर्शियल चा विषय नाहीये. याच्यातुन काही व्यावसायिक हित साध्य होवू शकत नाहीये. उलट पक्षी याच्यावर कुठल्याही संस्थेला लॉंग टर्म खर्च परवडत नाही. आता रोटरीच्या माध्यमातुन देतो किंवा अनेक संस्थांच्या माध्यमातुन देतो. परंतू कालांतराने काय होते की त्या दुर्लक्षित होतात आणि मग पुन्हा नविन संस्थांचा शोध घ्यावा लागतो. आपण ऑफर मागवता आहात तर ऑफरही मागवु शकतो त्याबद्दल वाद नाहीये आणि सभागृहाला पटत असेल तर अशा पध्दतीच्या त्यांनी ऑफर मागवाव्यात. ऑफर मागवण्यास काही हरकत नाहीये.

**श्री.अश्विन सोनवणे :-** भाऊ कमर्शियल वापर होतो, काय होवून जाते आता समजा ज्या ओपनस्पेस आहेत. वास्तविक पाहाता त्या ओपनस्पेस वर त्या भागातील त्या नागरीकांचा अधिकार असतो. जर आपण एखाद्या संस्थेला दिली तर ते

त्याचा वापर करतात पण त्या तिथल्या लोकांना काही कार्यक्रम घ्यायचा असला तर त्यांना पैसे मागतले जातात तरच त्यांना परवानगी दिली जाते तस व्हायला नको.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही याच जे मुळ उद्दीष्ट जे असेल आणि याच्या संदर्भातील ज्या काही अटी शर्ती मनपाला लावायच्या असतील. त्या निश्चितपणे लावु शकते आणि त्या अटी शर्तीमध्ये जे येईल त्यावेळेला मनपाने या जागा त्यांना देण्याच्या संदर्भातील भुमिका घ्यावी. कारण

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्या परिसरातील नागरीकांनाही विचारून घ्यायला पाहीजे की आम्ही हे ताब्यात देतोय तर याची देखभाल दूरुस्ती करा असे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अश्विनभाऊ प्रॅक्टिकल मध्ये ते शक्य होत नाही. आज आपण बघतो की भाऊंच उद्यान विकसित केले. आज ते त्यांच्या ताब्यात आहे म्हणुन ते आजही सुस्थितीत राखले जात आहे. हे ते डेव्हलप करतील आणि त्याच देखभालही करतील. कारण शेवटी त्या भागातील नागरीकांसाठीच ती सोय राहणार आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नाही भाऊ नंतर जर त्यांनी तेथील नागरीकांना अडवल नाही पाहीजे.

**मा.आयुक्त :-** सर गार्डनमध्ये एन्ट्री फ्री असते.

**ॲड. शुचिता हाडा :-** त्या भागातील एखादी जर संस्था असेल आणि ते जर मागत असतील तर त्यांना प्राधान्याने ती द्यायलाच हवी कारण ती त्याच्या परिसरासाठी आहे.

**मा.आयुक्त :-** एकुण ५० ओपनस्पेसेस आहेत तिच माहिती घेत होती मी आता जस नितीनभाऊंच म्हणण आहे की भाऊंच उद्यान दिले ते व्यवस्थित डेव्हलप करेल. अश्विनभाऊंच म्हणण आहे की सगळयांना तिथे जायला मुभा असली पाहीजे. काही एन्ट्री फीस लावली नाही पाहीजे एवढच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपल्याला जस ताई म्हणत आहे किंवा अश्विनभाऊ म्हणत आहेत. त्यांची जर मेंटेन करायची तयारी असेल तर निश्चितपणे द्या त्याबद्दल वाद नाहीये. यांचा आपण पुर्वीचा अनुभव पाहाता जस भाऊंच उद्यान म्हणा किंवा गांधी उद्यान म्हणा आज जवळपास पाच पाच वर्ष झालेली आहेत आणि त्या उद्यांनाच मेंटेंनन्स मला अस वाटत की आपण जळगांव शहरात अनेक संस्थानांही दिलेले आहेत. जस आज काव्यरत्नावली चौक असेल. स्वातंत्र्य चौक असेल त्यांचा लुक पाहाता कारण काय असत शेवटी काम मोठ्या संस्थामध्ये काय असत की एजन्सीज असतात मेंटेंन करणाऱ्या छोट्या मोठ्या संस्था ज्या आहेत ना या हौसेपोटी घेतात किंवा कॉलनीतील लोकांनाही दिले ते हौसेपोटी घेतात.

**ॲड. शुचिता हाडा :-** नितीनभाऊ तुमच म्हणण बरोबर आहे. याच्यामध्ये विषयाच्या डॉकेट मध्ये जे आहे ते मी तुम्हाला वाचुन दाखवते याच्या ऑफर्स स्विकारून संबंधितांना अटी शर्तीबाबतचा करारनामा करून घेवुन सदरची हरितक्षेत्र देखभाल व्यवस्था व विकसित करणेकामी देणे शक्य होईल. त्यामुळे हरितक्षेत्र विकसित केल्याने मनपावरील आर्थिक बोजा कमी होईल व कदाचित ऑफर मध्ये व मनपास उत्पन्न देखील प्राप्त होवू शकते. व मनपास उत्पन्न देखील प्राप्त होवू शकते या वाक्यामुळे याच्याकडे बघण्याचा हा ऐंगल बदलला की, नेमक प्रशासन हे काय करू ईच्छीत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** कारण हे ईनिशियल आहे. म्हणजे तुम्ही याच्यातुन

**मा.आयुक्त :-** याच्यामध्ये एक भुमिका अशी होती की ऑफर लेटर घ्यायचे परंतू नितीनभाऊंच सबमिशन अस आहे की त्यापेक्षा एका वेलनोन एजन्सीला द्या. त्यामध्ये जैन इरिगेशनचा प्रस्ताव आहे. जशी आता चर्चा झालेली आहे अस डायरेक्टली दिले तरी आता जसे महात्मा गांधी गार्डन आहे, भाऊंच उद्यान आहे. तर ते अस डायरेक्टली द्यायचे असा त्यांचा प्रस्ताव आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** आयुक्त महोदया

**श्री.अश्विन सोनवणे :-** म्हणजे मेंटेनन्सचा खर्च द्यावा लागेल का ? आधी जस झाल आहे तस व्हायला नको म्हणुन

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय आहे मी ज्यावेळेला महापौर असतांना भाऊंच उद्यान हे देखभाल दुरूस्ती सह विकसित करण्यासाठी आपण भुमिका स्विकारलेली होती. परंतू कालांतराने आपण ज्यावेळेला गांधी उद्यानच बघितल तर गांधी उद्यानाची अत्यंत दुरावस्था झालेली होती आणि त्यांनी त्यांची भुमिका अत्यंत स्पष्टपणे सांगीतली होती की गांधी उद्यान तुमच्या शब्दाखातीर हे विकसित करून देतो परंतू चालवण्याची जबाबदारी आम्ही स्विकारणार नाही. त्यांनी त्याच्यावर साधारणत: तिन चार कोटी रूपये खर्च करून महात्मा गांधी उद्यान विकसित करून महापालिकेकडे ताब्यात देण्याच्या संदर्भातील त्यांची भुमिका होती. परंतू आपण स्वत: त्या दृष्टीकोनातुन विचार केला की जर कधी त्यांनी त्याच्यावर तिन चार कोटी रूपये खर्च करून ते जर कधी महानगरपालिकेकडे हॅन्डओव्हर केल्यानंतर त्या उद्यानाची दुरावस्था पुन्हा सहा महिन्यामध्ये ज्या पध्दतीने आपण इतर उद्यानांची पाहतो आता शामा प्रसाद मुखर्जी उद्यान आहे.त्यांच्याकडून आपण

वेळोवेळी १० ते पंचविस लाख रूपये खर्च करीत असतो परंतू आज तिथे ढुकुंनही पाहण्याची ईच्छा होत नाही. अशा परिस्थितीत ते उद्यान आहे. पारिख पार्कच उद्यान आहे त्याची परिस्थिती सुध्दा तीच आहे. त्याच्यानंतर आपण बहिणाबाईच उद्यान आहे परंतू बहिणाबाई सुस्थितीत याच्यासाठी चालली आहे की त्याच्यावर महानगरपालिका मेंटेंनन्सचा खर्च करते आहे. ज्या पध्दतीने महानगरपालिका त्याच्यावर मेंटेंनन्सचा खर्च करते आहे. त्या पध्ततीने आपण यांना सांगीतल की तो मेंन्टेंनन्सचा खर्च महानगरपालिका तुम्हाला देईल. त्यांच मागच्या १५ दिवसांपुर्वी महापालिकेला पत्र सुध्दा आलेल आहे की मेंन्टेंनन्सच्या बाबतीत तो खर्च तुम्ही आम्हाला देताय त्या खर्चामध्ये ते उद्यान देखभाल दुरूस्ती आणि मेंन्टेंनन्स ठेवण हे परवडत नसल्याकारणाने अतिरीक्त तुम्ही देत असाल तर ठिक आहे नाहीतर महानगरपालिकेला ताब्यात देण्याच्या संदर्भात त्यांनी पत्र व्यवहार सुध्दा केलेले आहे. परंतू या उद्यानांच्या संदर्भातील भुमिका जी आहे. ती सर्वस्वी जबाबदारी ते स्विकारत असतील महानगरपालिकेला त्याचा कुठलाही अतिरिक्त मोबदला द्यायची गरज पडणार नाही. या अटी-शर्तीवर ते जर घेत असतील तर देण्याच्या संदर्भातील भुमिका आपण स्विकारायला पाहीजे.

**ॲड. शुचिता हाडा :-** नितीनभाऊ याच्याबद्दल विरोध नाही किंवा कोणताही वाद नाही. प्रशासन म्हणत आहेच की ऑफर लेटर मागवावे आणि याच्यातुन उत्पन्न मिळु शकेल मनपाला कदाचित यातुन तर मग याचा अर्थ मनपाला काय अपेक्षित आहे. मनपाला उत्पन्न कस मिळणार यातुन नेमक त्या संस्थेला काय काय अधिकार आपण तिथे देणार आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** याबाबतीत बोललो मी ताई की विषय असा आहे की बऱ्याचश्या जागा ज्या आहेत जस मोठ्या जागा आहेत आपले रायसोनी नगरच गार्डन आहे या सर्व मोठ्या जागा आहेत आणि याला देण्याच्या बाबतीत आपण हे हरितक्षेत्र आहेत आज त्यावेळेला आपल्याला शासनाने पैसा दिलेला होता आणि शासकीय निधीतुन आपण हे विकसित करायचे कामे केलीत आणि त्याच कामांमध्ये वर्कऑर्डर मध्ये त्याच्या मेंटेंनन्सचा टारगेट जो दिलेला होता तोही संपुन बरेच वर्ष झाले आणि आता त्याची परिस्थिती थोडी-थोडी खालावते आहे. याच्यावर जो खर्च केलेला वाया जाईल आणि हे विकसित झालेले गार्डन हे झिरो होतील.

**ॲड. शुचिता हाडा :-** साहेब ते द्यायला काहीच विरोध नाहीये पण

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** हो ताई

**ॲड. शुचिता हाडा :-** हि सगळी संमती आहे पण आम्हाला या शब्दाचा अर्थ सांगा की उत्पन्न मिळणार म्हणजे काय मिळणार आणि काय अधिकार संस्थेला देणार आहोत.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** ताई मी माझी जी भुमिका ठेवलेली आहे की या खाजगी संस्था , वृक्षप्रेमी संस्था किंवा नामांकीत कंपन्या याच्यात ईन्वव्हॉल्व होतील आणि त्यांच्याकडून आपण देकार मागवतो आहे. एखादी संस्था म्हणेल की आम्ही महापालिकेला एकही रूपया महापालिकेला देणार नाही ती ओपनस्पेस आम्ही स्वखर्चाने मेंटेंन करू आणि हे महापालिकेला जे काही धोरण ठरविले असेल आणि हा विषय यासाठीच ठेवलेला आहे की, याच्या बाबतीत काय काय आयडीयास येतात काय काय आता जस अश्विनभाऊ म्हणाले की कॉलनीतील लोकांना द्याव ओपनस्पेस त्यांना प्रवेश करायला द्यायला पाहीजे बरोबर आहे. तसेच त्याठिकाणी छोटे मोठे कार्यक्रम ठेवायचे काहीतरी करायचे त्याची परमिशन द्यायची किंवा नाही द्यायची. आता रायसोनी नगरच्या गार्डनमध्ये बर्थडे असला तर ठेवायचे की नाही आणि ते अधिकार त्या कंपनीला किंवा संस्थेला द्यायचे किंवा नाही द्यायचे. या सर्वांवर चर्चा करून येथे धोरण ठरवायच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुमच जे म्हणण आहे ना बरोबर आहे की उत्पन्न आपण अपेक्षित धरतोय का?

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ आता रायसोनी नगरच्या गार्डनचेच उदाहरण देतो की जी ओपनस्पेस आहे तर तिथे काही छोटा मोठा कार्यक्रम करायचा असेल तर ती संस्था

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे की त्याचा ते व्यवसायिक वापर करतील अस.

**ॲड. शुचिता हाडा :-** मग आपल्याला उत्पन्न अपेक्षित आहे का नितीनभाऊ आपल्याला

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** ताई ते धोरण ठरवायच आहे आपल्याला म्हणुन मांडले आहे की आपण अस करू शकतो की त्यांच्याकडून ते मेंटेंन पण होईल आणि तो जो व्यक्ति ते मेंटेंन करेल. त्याच्यातुन जे दोन पैसे भेटतील आणि कदाचित त्याच्यापेक्षा जास्त पैसे भेटतील तर महापालिकेलाही त्याचा फायदा होईल आपण जर सभेत ठरवले की त्याच्याकडून उत्पन्न घ्यायच आहे परंतू त्याला त्याचा कमर्शियल वापर करता येणार नाही. अस धोरण ठरवा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे वापर करावा परंतू कमर्शियल वापर करू नये.

**ॲड. शुचिता हाडा :-** मग अस ठरवा कमर्शियल वापर कसा काय करणार.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ पिण्याचे पाणी आणि ईलेक्ट्रिसिटी आपल्याला त्याला द्यायचीच आहे. परंतू त्याला त्याठिकाणी कमर्शियल वापर करता येणार नाही. अस धोरण ठरवा आपण

**ॲड. शुचिता हाडा :-** दिल्यानंतर जर कमर्शियल वापर झाला तर

**श्री.नितीन लढ्ढा :-** कमर्शियल वापराबाबत काहीतरी धोरण पाहीजेच.

**ॲड. शुचिता हाडा :-** त्याचा वापर पाहीजेच परंतू कमर्शियल झाल्यानंतर , कमर्शियल वापर झाल्यानंतर त्याला खुप वेगळा विषय आहे आता याच्यामध्ये मेहरूण चौपाटी जवळच्या खुप जागांचा आहे. म्हणजे भविष्यात येथे खुप अतिक्रमण वाढणार आणि त्यामुळे आपल्याला खुप मोठी डोकेदुखी तयार होणार. कमर्शियल झाल्यानंतर तिथे खुप मोठ्या प्रमाणात दुकाने वाढणार आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ या जागांचा जर कमर्शियल वापर सुरू झाला ना

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय आहे की याचा कमर्शियल वापर सुरू झाला ना कमर्शियल वापर सुरू झाला ना

**ॲड. शुचिता हाडा :-** त्या अटी-शर्तींचा काहीच उपयोग नाही होणार.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** ताई आपण याच्याबाबतीत धोरण ठरवावे आणि ठराव करावा त्याच्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पण मग ते आता वानखेडे साहेब बोलले ना की याबाबत काहीतरी बोलले ते या विषयावर

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** त्यांनी एका संस्थेचे बोलले.

**ॲड. शुचिता हाडा :-** डायरेक्टली दिले तर ऑडीट निघेल अस त्यांच म्हणण आहे.

**श्री.अनंत जोशी :-** आपण त्याला डायरेक्टली परवानगी दिली तर येईल.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**ॲड. शुचिता हाडा :-** त्या परिसरातील नागरीकांना प्राधान्य असले पाहीजे ही पहिली अट असली पाहीजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई शेवटी काय आहे की जस आपण म्हणतो की, ओपन स्पेस आहेत हे आपले

**ॲड. शुचिता हाडा :-** ते आपण देणे योग्य गोष्ट आहे नितीनभाऊ जे दिले आहे ते शहरातील मुख्य उद्याने आहेत. पण हे त्या-त्या परिसरातील उद्याने असणार आहेत. या जागांवर पहिला हक्क त्या-त्या परिसरातील नागरीकांचा असणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई नाही नाही परंतू ओपन स्पेस जे आहे ना.

**ॲड. शुचिता हाडा :-** भाऊ ओपन स्पेसही चालेल, आपण या सगळ्या जागा एकाच संस्थेला दिल्यानंतर

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**ॲड. शुचिता हाडा :-** भाऊ आपण एखाद्या संस्थेला दिल्यानंतर आपल्याला अनुभव आहे की, त्या परिसरातील नागरीकांना त्या उद्यानात एन्ट्री नाकारली जाते. तर अशा काही गोष्टी होवू नये. त्याच्यामुळे जस आता ज्या अटी शर्ती म्हणत आहे प्रशासन तर त्या अटी-शर्ती सोबत द्यायला हव्या होत्या सोनगिरे साहेब तुम्ही, की नेमके काय काय अपेक्षित आहे. ऑफर आपण मागवणार आहोत तर आपल्याला कशा ऑफर अपेक्षित आहेत.

**श्री.दिलीप पोकळे :-** भाऊ आता आपण मागच्या काही महासभेत या ओपनस्पेस संदर्भात आणि या त्या-त्या प्रभागातील ओपनस्पेस आहेत आणि ओपनस्पेस या ओपनस्पेस एखादया संस्थेला , एखाद्या व्यक्तिला किंवा एखाद्या बाहेरच्या कंपन्यांना देण्यासाठी आपण जी प्रक्रीया राबवतो आहे ती पुन्हा एकादा राबवावी. आपण त्या लोकांचे संमती पत्र त्यांचे लेआऊट आणि जे काही कागदपत्र हे स्कुटीनी करून घेण्यात यावेत. कंपनीला देण्यासाठी हि प्रक्रीया राबवली जाईल का? हि महानगरपालिकेच्या मालकीची जागा आहे. ओपनस्पेस आहे, मागच्या महासभेत आपण चार तास चर्चा केली. ओपनस्पेस संदर्भात चर्चा केली होती की असे कोणत्याही संस्थेला ओपनस्पेस द्यायचे असेल तर तो शासकीय प्रस्ताव आला पाहीजे. मग हा शासकीय प्रस्ताव आला का?

**मा.महापौर :-** भाऊ हा प्रस्ताव प्रशासकीयच आलेला आहे अशासकीय कुठे आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** मॅडम दोन मिनिंट हे देण्यासाठी संस्थांना देण्यासंदर्भातील जो विषय आहे. तर त्याठिकाणी स्थानिक नागरीकांचा काय सहभाग असणार आहे आणि त्यांच्याकडून आपण काय संमती घेणार आहेत ते शहर अभियंत्यांनी मला सांगावे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** या ओपनस्पेसच्या जागा ज्या आहेत ज्या विकसित केलेल्या आहेत आणि ह्या मेंटेंन करणे आवश्यक आहे. तर आपण या ओपनस्पेस कोणत्याही संस्थेला कायमस्वरूपी देत नाही. आपण डेव्हलप केलेला बगीचा त्यांनी मेंटेंन करायचा आहे आणि त्याची देखभाल दुरूस्ती करायची आहे. एवढेच अपेक्षित आहे. करार

असा होणार नाही की ती जागा त्यांच्या ताब्यात दिली की त्यांनी त्याच्यावर बांधकाम कराव अस काहीच नाही. आज आपण येथे ज्या अटी-शर्ती ठरवु.

**श्री.दिलीप पोकळे :-** सर मेंटेंन साठी जर असेल ना तर त्यांच्या ताब्यात द्यायची नाही. संबंधित ओपनस्पेस जागा त्या प्रभागातील नागरीकांच्या आहेत. त्या एरियातील त्या प्लॉट धारकांनी त्यांनाच देण्यात यावे आणि मागच्या महासभेमध्ये हेच धोरण ठरलेले आहे. मग महानगरपालिकेच्या व्यतिरिक्त मेंटेंनन्स करावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पोकळेसाहेब तुम्ही जे म्हणत आहात ना की

**श्री.दिलीप पोकळे :-** भाऊ दोन मिनिंट या जागा महानगरपालिकेच्या मालकीच्या आहेत आणि याच्या व्यतिरीक्त कुठल्या संस्थेला द्यायच्या असेल कुणालाही द्यायच्या असेल तर आपण काय धोरण राबवणार आहे ते सांगा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** एक्झ्याटली पाहीले तर परिसरातील नागरीकांचा त्या जागांवर कायदेशीर रित्या त्यांचा अधिकार आहे. त्यांच्या अधिकारांना कुठेही बाधा न येता. आपला प्रस्ताव काय आहे की जे उद्याने आपण हरित प्रक्रीया विकसित केलेले आहेत. त्याची देखभाल दुरूस्तीचा विषय आहे जी देखभाल दुरूस्ती करण्याच्या संदर्भातील भुमिका असेल त्या विकासकाची तिथपर्यंत मर्यादित असेल. नागरीकांचा अधिकार जो आहे तो अबाधित राहील. ती त्या ठिकाणी त्या नागरीकांना कुठल्याही प्रकारे मज्जाव करण्यात येणार नाही. फक्त ऐवढेच आहे की त्याच्या संदर्भातील ज्या काही नियम अटी-शर्ती असतील की जी कोणती जागा या वेळेपासुन या वेळेपर्यंत गृहीत राहील. म्हणजे भविष्यात त्याउ परिसरातील कोणीही नागरीक येईल आणि सांगेल की आता तुम्ही आम्हाला हे करून द्या. कुठेतरी काहीतरी त्याला डिसीप्लिनही लावावे लागतील. म्हणजे कोणालाही दिली आणि कोणी एखादा नागरीक जावुन तिथे लोक आपल्याला उलटपक्षी म्हणतील की बारा वाजता की ते मला उघडुन द्या.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आंबेडकर उद्यानात ते झाले आहे ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बिलकुल बरोबर आहे भाऊ.

**मा.आयुक्त :-** सर याच्या संदर्भात मी एक सांगते की ओपनस्पेस संदर्भात जी झाडे लावलेली आहेत ती झाडे मेंटेंन करण्यासाठी आपल्याला प्रशासन डायरेक्टली एखाद्या संस्थेला देवू शकत नाही. म्हणुन आपण देकार ऐवजी ऑफर हा शब्द वापरला. हा प्रस्ताव आपण याच्यासाठीच ठेवला की, यामध्ये आपल्याला नेमक काय करता येईल किंवा त्यांना सगळ्यांना ओपन स्लॉट ठेवायच आहे का? वेळ काय असेल त्यांना मेंटेंनन्स साठी मनपा पैसा देणार का नाही? सर आपण जेव्हा त्यांना देवु तेव्हा आपण त्यांना सांगु की मनपा त्यांना देखभाल दुरूस्तीला पैसा देणार नाही आणि कोणतीही सामाजिक संस्था याला घेण्यास किंवा चालवण्यास ईच्छुक आहे का? असाच प्रस्ताव आहे कारण टेक्निकल ऑडीटचा प्रॉब्लेम काय आहे की आपण सरसकट एखाद्या संस्थेला देता येईल का? म्हणुन वानखेडे साहेबांना सांगीतले की एखाद्या एजन्सीला डायरेक्टली देता येईल का?

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे. वास्तविक पाहाता की हा काही कमर्शियल अँगलचा काही विषय नाहीये. एक त्यांना रूचि आहे आणि ते चांगल्या पध्दतीने करतात म्हणुन आपण मी स्वत: त्यांच्याशी बोललेलो आहे. म्हणजे हा काही त्यांच्याकडुन आलेला प्रस्ताव नाहीये. हि एक त्यांच्याशी झालेली चर्चा आहे आणि संदर्भातील झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने त्यांना हि विनंती केलेली आहे. आपण याच्या संदर्भात जर कधी प्रशासनाला किंवा सभागृहाला वाटत असेल की, यासंदर्भात खुल्या ऑफर मागवण्यात याव्यात. तर खुल्या ऑफरच्या संदर्भातील प्रयत्न सुध्दा प्रशासनाने करावा. त्या बद्दलही वाद नाहीये. परंतू काम देतांना योग्य संस्थेला द्या की जेणेकरून लाँगटर्म पर्यंत आपल्या जागा मेंटेंन राहतील नाहीतर काय होईल की कोणीतरी हौसेने येतील. हौसेने प्रस्ताव देतील आणि आपण तो स्विकारतो. सहा-आठ महिने, वर्ष दोन वर्षानंतर पुन्हा तीच परिस्थिती होते. नंतर त्या गोष्टींकडे दुर्लक्ष होत आणि नागरीकही त्याच्यापासुन वंचित होतात आणि आपण खर्च करून डेव्हलप केल्याचा खर्च सुध्दा पाण्यात जातो. तर यासंदर्भात जर वाटत असेल सभागृहाला तर निश्चितपणे आपण देकार मागवावे आणि देकार मागवतांना ज्या काही अटी-शर्ती सभागृहाला वाटत असतील त्यापध्दतीच्या अटी-शर्ती त्याच्यामध्ये ईनकार्पोरेट कराव्यात आणि तातडीने त्या संदर्भातील ऑफर मागवुन एक साधारणत: महिन्याभरामध्ये त्याचा निर्णय घ्यावा.

**ॲड. शुचिता हाडा :-** भाऊ जैन ने मेंटेंन केलेले आहे पण कॅपॅसिटी त्यांची आहे आणि ते करू शकतात आणि त्यांना आवड आहे हि सगळी वस्तुस्थिती मान्य आहे. फक्त प्रशासनाच्या दिलेल्या वाक्यामुळे हा सगळा संभ्रम होत आहे. कमर्शियल करायच असेल तर मग त्याला प्रॉपर कमर्शियल करा. मग त्याच्या नियम अटी वगैरे काय असतील हे सगळ सभागृहासमोर आणा आणि मग करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई प्रशासनाने कमर्शियल हा शब्द टाकायला पाहीजे होता.

**ॲड. शुचिता हाडा :-** हो भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** कमर्शियल हा शब्द टाकल्यानंतर काय होत माहिती आहे का की दुसरे कार्यक्रमही साजरे होतील आणि त्यावेळेला

**ॲड. शुचिता हाडा :-** भाऊ आणि त्या ओपनस्पेसच्या आपल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांची जी परिस्थिती आहे. आज आपण याच्या लिगल रूल्स ॲन्ड नोटीफीकेशन्स फिक्स करतोय हे सगळ या संदर्भात होणार. अतिक्रमण जी या शहराची समस्या आहे ती या शहरामध्ये परत भविष्यात वाढणार त्याला आपण कमर्शियल अधिकार दिला तर

**श्री.नितीन लढ्ढा :-** कमर्शियल अधिकार दिले तर अनेक संस्था पुढे येतील.

**ॲड. शुचिता हाडा :-** येतीलच

**श्री.नितीन लढ्ढा :-** कमर्शियल परंतू आपल्याला त्याचा व्यायसायिक वापर करू द्यायचा नाहीये. आपल्याला ते उद्यान म्हणुन सामान्य नागरीकांना त्या परिसरातील लोकांना मिळायला पाहीजे अशा अटी-शर्तींच्या लागल्या तर आपल्याला निविदा मागवायच्या असतील तर त्या निविदा मागवण्यात याव्या. त्या बद्दलही काही वाद नाहीये.

**ॲड. शुचिता हाडा :-** आणि ज्या संस्थांना आपण देणार आहोत कोणती संस्था देखभाल दुरूस्ती आणि मेंटेंन करणार आहेत कारण कोणती संस्था लवकर करू शकते हे प्रशासनाने सांगाव.

**मा.आयुक्त :-** आपण देखभाल दुरूस्ती आणि अटी-शर्ती हे शब्द वापरलेले आहेत कदाचित उत्पन्न मिळेल अस ते वाक्य आहे त्यामध्ये आपल्याला सभागृहाला ते ठरवायच आहे की काय करायच आहे. त्याच्यानंतर फायनल ठराव करणार.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्या संदर्भात देखभाल दुरूस्ती आणि मेंटेंनन्स सह देकार मागविण्यात यावेत आणि संस्था हि कॅपेबल पाहीजे. काय होत नागरीकांचा समुहही येईल समोर एखादी सोसायटीही येईल. परंतू आपल्याला याची खात्री असायला पाहीजे की ते याला लाँगटर्म पर्यंत मेंटेंन करू शकतील काय आपण ज्या खुल्या जागा दिल्या तर स्थानिक नागरीक मेंटेंन करू शकतील. अशा अनेक खुल्या जागा ज्या आहेत त्या अशाच दुरावस्थेकडे पडलेल्या आहेत आपल्या, तर यादृष्टीकोनातुन अशा पध्दतीची अटी-शर्तीसह आपण देकार मागवावे.

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई याच्यामध्ये अटी-शर्तीमध्ये वाढवण्यात यावे की तिथे बांधकाम करता येणार नाही. हे तिनच विषय महत्वाचे आहे जी संस्था येईल. त्याला बांधकाम करता येणार नाही आणि कॉलनीतील नागरीकांना ओपन राहील ते आणि कमर्शियल वापर करता येणार नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही बांधकामच्या संदर्भातील फक्त थोडासे हे करावे की आवश्यकतेनुसार थोडेसे बांधकाम केले तर आऊटहाऊस असतील अशा पध्दतीने , कायमस्वरूपी वॉचमन असेल किंवा तिथला माळी असेल. तर तेवढ सर्व सोडले तर

**श्री.अनंत जोशी :-** भाऊ ते ठरवतील ना , तुम्ही ठरवुन द्या ना वॉचमनची खोली असेल किंवा जो काही स्टाफ असेल तिथला तर ते त्याच्यात घेवुन घ्या त्याच्यात मेंन्शन करा तुम्ही

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** भाऊ आता आपण परवानगी

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही आवश्यकतेनुसार म्हणजे व्यवसाय करण्याच्या दृष्टीकोनातुन बांधकाम करता येणार नाही.

**मा.आयुक्त :-** त्यांना व्यावसायिक वापर करता येणार नाही. स्थानिक लोकांना एन्ट्री फ्री राहील आणि बांधकाम करून

**श्री.अनंत जोशी :-** बस त्याच्यात म्हणुन घ्या की तुम्ही किती बांधकाम परवानगी देत आहेत. कारण काय आहे की तुम्ही जे म्हंटलेले आहे ती माहिती मोघम स्वरूपाची ठेवलेली आहे आणि उद्या उठुन ते हॉल बांधुन टाकतील आणि कमर्शियल वापर होईल त्याचा

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** भाऊ आता माझ अस म्हणण आहे की त्याचा कार्यकाळ ठरवावा की किती वर्षांकरीता देण्यात येईल. किती वर्ष पाच वर्ष , दहा वर्ष

**सौ.ज्योति चव्हाण :-** तिन वर्ष भरपुर होतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही तिन वर्ष नाही पाच दहा वर्ष तरी ठेवण्यात यावा.

**मा.आयुक्त :-** तिन वर्षांसाठी काय आहे.

**श्री.अनंत जोशी :-** तिन वर्ष काय आहे मॅडम कारण की कमीत कमी त्यालाही ते

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** नऊ वर्ष नगररचना विभागाचा नियम आहे. नगररचना विभागाकडून ज्या जागा देतात त्याचा नियम नऊ वर्षांचा आहे.

**श्री.अनंत जोशी :-** ठिक आहे

**ॲड. शुचिता हाडा :-** नऊ वर्ष आहे तर मॅक्झिममच द्यायचे आहे का?

**श्री.अनंत जोशी :-** पाच वर्ष देवु. सोनगिरेसाहेब याच्यात तुम्ही फक्त स्पेसिफिक कायदा आणि जे काही नियम असतील अटी असतील ते तपासुन आणि कमर्शियल वापर करता येणार नाही आणि त्या परिसरातील नागरीकांना विचारात घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही परिसरातील नागरीकांना विचारात घेण्यापेक्षा त्या नागरीकांच्या सोईच्या दृष्टीकोनातुन ते उपलब्ध करून देवु या. त्यांचा तिथे जे काही आपली महापालिका ठरवुन देईल तितक्या पिरियेड मध्ये त्या-त्या परिसरातील नागरीकांचा मुक्त वापर त्याठिकाणी राहील. म्हणजे आपण जस मुख्य उद्यानांची वेळ ठरवुन दिलेली आहे त्यापध्दतीने

**सौ.ज्योति चव्हाण :-** कमर्शियल वापर जर तिथे होत असेल आणि एखाद्या सदस्यांने जर कंम्पलेंट केली तर त्याच्यावर लगेच तिथे कारवाई झाली पाहीजे.

**श्री.अनंत जोशी :-** ताई आपण बरेच दिले आहे आता हे आपले पोकळे साहेब आपले जितुभाऊ पाच वर्ष झाले नंतर काहीच होणार नाही. नंतरचा विषय काहीच होणार नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे आता चर्चा झाल्यानुसार देकार मागविण्यात यावे.त्याचा कालावधी मला वाटत दहा वर्ष असा मिनिमम ठेवायला पाहीजे.

**ॲड. शुचिता हाडा :-** नितीनभाऊ नाही आपण दहा वर्ष देवुच शकत नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अस कोण म्हणत की नऊ वर्ष द्या. अस कुठल्या कायद्यात आहे की नऊ वर्षच द्या. तिस-तिस वर्षाकरीता शॉपिंग कॉम्पलेक्स देत नाही का आपण, ते तर धोरण जे हे सभागृह ठरवेल ते या सभागृहाचे अधिकार आहेत.

**ॲड. शुचिता हाडा :-** प्रशासनाचा जो मुळ प्रस्ताव आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई , नऊ वर्षांचा कालावधी हा नगरपालिका ॲक्टचा होता. तोही तिन वर्षाचाच होता आणि मॅक्झिमम नऊ वर्षांपर्यंत द्यायचा हि नगरपालिका ॲक्टला तरतूद होती. आज महानगरपालिकेच्या ॲक्टमध्ये कुठेही मेन्शन केलेले नाहीये की तरी सुध्दा आपण महानगरपालिकेच्या मालकीचे शॉपींग सेंटर जे आहेत ते तिस तिस वर्षांच्या कालावधी साठी देतोय ना. एखादी संस्था त्याच्यामागच बघा नऊ वर्ष आणि दहा वर्ष याच्यात काही फरक नाहीये. एखाद्या संस्थने त्याच्यावर देखभाल दुरूस्ती साठी मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला असेल आणि दहा वर्षांनंतर पुन्हा दुसरी एखादी संस्था येवुन तिथे म्हणेल की आता आम्ही चालवतो ही

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ पाच वर्षासाठी द्या. त्यांनी चांगली प्रोग्रेस केली चांगले काम केले तर मुदतवाढ देता येईल त्यांना आपण तिस वर्षाचा करारनामा करून देवु. काय होत नितीनभाऊ तुम्ही जे म्हणतात ना तसाच विषय आहे शाहु महाराजचे आपण दिलेले आहे तिस वर्षासाठी पण काय होत आहे.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** व्हेरीफाय करा ना तुम्ही ते अधिकार आपल्याला आहेत आणि ते आपणच करतो.

**श्री.अनंत जोशी :-** विशालभाऊ मेंटेंनन्सचा विषय आहे आणि तेही तेच करतील भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** एक सांगु का अश्विनभाऊ जर जैन जर कधी ईच्छा नाही दर्शवली ना तर मी म्हणतो याला प्रतिसादही मिळणार नाही आणि मी म्हणतो की पुढच्या दोन वर्षात त्याची माती होवुन जाईल सगळी

**श्री.अनंत जोशी :-** भाऊंशी सहमत आहे मी की प्रतिसाद मिळणार नाही आणि ज्या संस्था येतील त्या नंतर कधीच दिसणार नाही तुम्हाला

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता:-** मला एक सांगायचे आहे की जी जागा आपण विकसित केली ती जर त्यांनी घेतली तर त्यांची अशी अपेक्षा असते की पाणी आणि लाईटची व्यवस्था महापालिकेने केली पाहीजे

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे. त्याला ईलेक्ट्रिसिटी आणि पाणी हे महानगरपालिकेलाच करावी लागेल. कारण काय आहे की त्याच्यातुन व्यावसायिक , काय आहे की देखभालीचा याच्यावरचा जो खर्च आहे ना तो खुप कमी प्रमाणातला आहे. त्यात वॉचमन आहे गार्डनर आहे. सगळ्याच गोष्टी येतात म्हणजे मेंटेंनन्स करणे इतक सोप नाहीये. जेव्हा आपण घरातील उद्यान मेंटेंन करतो ना तेही आपल्याला महिन्याला त्याचा खर्च विस पंचविस हजार रूपये येतात.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आपण पण करतो आहे की आपण जर स्वत: करत आहोत तर तिथे लाईट पाणी आपणच देवु. उद्याही आपल्याच करायच आहे समजा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे. तेच ना

**मा.उपमहापौर :-** सदर ठरावाला सभागृहातील सन्मा .सदस्य नितीनभाऊंनी सुचविलेल्या सुचनेनुसार संबंधित संस्थांकडून देकार मागवुन जसे आता बंटीभाऊंनी सन्मा.सदस्यांनी व शुचिताताईंनी ज्या सुचना मांडल्या आहे की त्या जागेवर अनावश्यक बांधकाम करता येणार नाही. त्याठिकाणी व्यावसायिक वापर करता येणार नाही. त्याठिकाणी राहणारे

नागरीकांना तिथे निशुल्क येणे-जाणे हे पुर्णपणे राहील. त्याठिकाणी तिथले वॉचमन किंवा तिथला सिक्युरिटी आहेत आणि आपल्या ज्या सुचना आहेत याच्या व्यतिरिक्त बांधकाम त्या क्षेत्रामध्ये होणार नाही या सर्वांच्या सुचनांच पालन करून संबंधित ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ आता याच्यामध्ये

**श्री.जितेंद्र मराठे :-** कुलभुषणभाऊ आता याच्यामध्ये माझ अस म्हणण आहे की आता १३ च का दिले आहे आपले हे जे २९ हरित क्षेत्र असतील त्यापुर्ण रेकॉर्डवर घ्याना.

**मा.उपमहापौर :-** हो पुर्ण बरोबर आहे आपण म्हणताहेत एकुण २९ जे हरित क्षेत्र आहेत ना

**श्री.जितेंद्र मराठे :-** पुर्ण २९ घ्या.

**मा.उपमहापौर :-** हो पुर्ण २९ घेत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना मग पुर्ण २९ घेत आहे बरोबर आहे.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ आज जे आपल्या १०० टक्के रेकॉर्डवर जे २९ कम्प्लीट गार्डन आहेत ते आज आपण पहिल्या टप्प्यात घेतलेले आहेत. उर्वरित जे आहेत की कुठे काय आहेत काही विकसित करण्याचे बाकी आहेत कारण माझ्याकडे जे आलेले नाहीत आणि कंम्पलिट नाहीयेत तर याच्यामध्ये त्याचा समावेश केलेला नाहीये.

**मा.उपमहापौर :-** हो आलेले नाहीयेत सभागृहात पण जे उर्वरित जे हरित क्षेत्र आहेत उद्याने आहेत आणि जे पुर्ण होतील ना ते पण घ्या. ते जी संस्था असेल त्यांना द्या.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ आता या ठरावामध्ये माझी एक सुचना अशी राहील की जस आपण म्हंटले की त्याठिकाणी बांधकाम करू नये तर जो विकासक आहे आणि त्याला कुठलेही बांधकाम करायचे तर त्याला आपल्याकडे रितसर परमिशन घेतली पाहीजे.

**श्री.अनंत जोशी :-** सोनगिरे साहेब , बरोबर आहे तुम्ही जे म्हणत आहेत.

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ काय आहे.

**श्री.अनंत जोशी :-** नाही नाही साहेब तुम्ही विषय ऐकुण घ्या. ते जर माळी साठी , सिक्युरिटीसाठी , वॉर्डनसाठी तुमच्याकडे परवनगी घ्यायला येईल. पुढचा कोण येईल साहेब , अहो काय हा

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ काय आहे की

**श्री.अनंत जोशी :-** अहो तुमच्याकडे परवानगी घ्यायला यायची का

**मा.उपमहापौर :-** साहेब या ठरावामध्ये आपली परवानगी घेतल्याशिवाय बांधकाम करू नये.त्याठिकाणी पाणी असेल आणि ईलेक्ट्रिसिटी असेल ती आपल्यालाच द्यावी लागेल त्याच्या व्यतिरिक्त बांधकाम परवानगी असेल तर ते बांधकाम करण्यापुर्वी

**श्री.चंद्रकांत सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ काय आहे की त्या बगीच्यामध्ये सोईसुविधा आहेत सुशोभिकरण आहे.

(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज येत नाही.)

**मा.उपमहापौर :-** साहेब सुशोभिकरण करणे हा विषय वेगळा आहे.

**श्री.अनंत जोशी :-** ते जे काही आपले हरितक्षेत्र आहे त्याला गार्डनिंग करायचे आहे, कारंजा करायचा आहे,सुशोभिकरण करायचे आहे तर परवानगी घ्यावी तर घेणारे जे आहेत ते घेणार नाहीत.

**मा.उपमहापौर :-** साहेब तुम्ही जे म्हणत आहेत की सुशोभिकरण पण होवु नये , बांधकामही होवू नये अस नाही ना.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई पुर्ण २९ जे हे आहेत सोनगिरेसाहेब

**मा.महापौर :-** २९ साठी आपल्याला लागू करावे लागेल.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई कंम्लीट झालेले आहेत ना २०१९ पासुन झालेले आहेत ना हे , सहा सहा महिन्याच्या ठेकेदाराला मुदत दिल्या होत्या ना या हरितक्षेत्रासाठी सांभाळण्यासाठी , आता आपण याच्यामध्ये म्हणतोय स्पॉटवर जावुन बघा तिथे लॉन पण जळालेले आहे , सगळ जळालेल आहे मग काय डेव्हलपमेंट करणार आहे आणि काय सांभाळणार आहे तिथे

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही जितुभाऊंच म्हणण बरोबर आहे की आता २९ जी हरितक्षेत्र आपण विकसित केलेली आहेत ना , समजुन घ्या की त्यातील काही अपुर्णावस्थेत आहेत जी पुर्ण नाहीयेत परंतू पॉलीसी फिक्स करतांना आपण २९ च्या बाबत पुर्ण निर्णय घ्या. जे काही त्यांचे बाकी असतील त्यांचे जे कंम्प्लायंस व्हायचे बाकी असेल ते कंम्प्लायंस पुर्ण होतील तेव्हा त्याचे ऑफर लेटर्स काढा. पॉलीसी धोरणात्मक निर्णय म्हणुन २९ च्या २९ ला मान्यता देण्यात येत आहे आणि यासंदर्भात एक सुचना अशी राहील माझी की जो कोणी विकासक याच्यामध्ये समोर येईल, जो कोणी

विकासक असेल तो त्याच्या संस्थेच्या नावावर करेल आणि त्याच्या नावाला सुध्दा आपल्याला मान्यता द्यावी लागेल की जळगांव शहर महानगरपालिका आणि जो कोणी विकासक असेल यांच्या संयुक्त विद्यमाने त्याच्या संदर्भातील नांव तिथे लावेल. नाहीतर काय होईल की देखभाल दुरूस्ती कोण करेल आणि महानगरपालिका आपला टेंभा मिरवेल. तर जो कोणी असेल तर त्याच्या नावाच श्रेय मिळायला पाहीजे.

**श्री.दिलीप पोकळे :-** भाऊ आता आपण जे

**श्री.सुनिल खडके :-** भाऊ आपण आता त्यांना हे १० वर्षासाठी देतो आहे तर तो विकास कधी करणार , म्हणजे १ वर्षा की दोन वर्षात , पहिल्यावर्षी

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही या आपल्या जागा ज्या आहेत त्या विकसित झालेल्या आहेत. त्या देखभाल दुरूस्तीसाठी त्याला द्यायच्या आहेत. म्हणजे याच्या पुढच मेंटेंनन्स त्याला करायच आहे. या पुर्ण विकसित झालेल्या आहेत आणि या अटींवर त्यांना द्यायच आहे.

**अॅड.श्री.दिलीप पोकळे :-** आता जो विषय चालु होता. आता जो ठराव आहे. आलेला प्रस्ताव आहे देखभाल दुरूस्तीचाच आहे फक्त. १३ जागा डेव्हलप झालेल्या आहे. उरलेल्या ज्या जागा आहे जेथे काहीच झालेले नाही. मग त्याची देखभाल दुरूस्ती कशी होईल.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** भाऊ याच्यामध्ये हरीत क्षेत्राचा टेन्डर असे होते की, त्यांनी १००% डेव्हलप केल्यानंतर एक वर्ष मेनटेन करायचे होते. त्याचे त्याले कुठलेच बेनिफीट मिळणार नव्हते. त्याच दरामध्ये त्यानी ते करायचे होते. त्याच पैश्यांमध्ये आणि एक वर्ष मेनटेन केल्यानंतर आपल्याला ताब्यात द्यायचे आहे. आता ही जी पुर्ण झालेली क्षेत्र आहेत. ही ऑलरेडी डेव्हलप झालेली आहे. १००% त्यांचेमेनटेनन्स १ वर्षाचा होऊन गेलेला आहे. आता नाव घ्याचे असले तर देशमुख मामांनी चंदु अण्णा नगरचे केलेले आहे ते स्वत: मेनटेन केलेले आहे. रायसोनी नगरचे ज्यांना कॉन्ट्रॅक्ट दिलेले होते ते नारखेडेच आहे. त्यांची मुदत संपुन गेली पण दोन वर्षापासुन ते आजही काम करत आहे.म्हणजे स्वखर्चाने कुठलाही मोबदला न घेता, त्यांची मेहनत आहे, त्यांना आवड आहे, त्यांनी त्या ठिकाणी काम केलेले आहे. आणि त्यांनी तेथे इन्व्हालमेंट केलेले आहे म्हणुन. ते वारंवार सांगत आहे की, ताब्यात घ्या.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पाणी ही नाही तेथे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** हो, पाणी ही नाही तेथे, त्यांनी गटारीच्या पाण्याला आडा घालुन पाणी उंगाळुन तेथे पाणी दिलेले होते. त्यांना आवड होती म्हणुन त्यांनी ते केले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्यांनी ज्या सुचना मांडलेल्या आहे तश्या सामाजिक संस्थेंकडुन सुचना मागवुन पुर्ण अटीशर्तींचा त्यात समावेश करून त्यात कुठल्याही प्रकारची आर्थिक बाब न ठेवता, पुर्ण २९ हरीत क्षेत्रासाठी मान्यता देण्यात येत आहे. सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** ताई २९ नका म्हणा, याच्या अंतर्गत येणारे म्हणा.

**मा.महापौर :-** संपुर्ण हरीत क्षेत्रांना सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

**नगरसचिव** :- या ठिकाणी मा.अरपीत चव्हाण साहेब, जिल्हाधिकारी हे उपस्थित झालेले आहेत. त्यांचे जळगांव शहर महानगरपालिका सर्व सन्मा.सदस्य, सन्मा.महापौर महोदया आणि सर्व अधिकारी यांच्यावतीने आपले या ठिकाणी स्वागत आहे. धन्यवाद सर. एक मिनीट विषय क्र.४ जो आहे तो किती वर्षासाठी दिलेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** १० वर्षासाठी

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२२४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रात अमृत अभियाना अंतर्गत सन २०१५ ते २०१८ या कालावधीत विविध भागात कोटयावधी रुपये खर्च करुन हरित क्षेत्राचा विकास करण्यात आलेला आहे. सदरची कामे ही विहित कार्यालयीन कार्यपध्दतीने निविदा मागवुन पात्र मक्तेदारांकडुन करुन घेण्यात आलेली आहेत. निविदा अटी शर्ती नुसार काही ठराविक कालावधीसाठी सदर मक्तेदाराने त्या त्या हरित क्षेत्राची देखभाल दुरुस्ती (Maintenance) करायची होती. त्या नुसार बहुतेक सर्वच विकसित हरित क्षेत्रांची देखभाल दुरुस्तीची मुदत संपलेली असल्याने सदर हरित क्षेत्रे देखभाल दुरुस्ती अभावी उजाड होण्याची शक्यता आहे. पर्यायाने सदर अभियाना अंतर्गत करण्यात आलेला कोटयावधी रुपयांचा खर्च पाण्यात / वाया जाण्याची शक्यता आहे. तरी खालील यादीनुसार अ.क्रं.०१ ते १३ हरित क्षेत्रे देखभाल दुरुस्तीसाठी शहरातील

सामाजिक संस्थांच्या सहभागातुन प्रयत्न करणे योग्य होईल. त्याकामी सदर विविध सामाजिक संस्थांकडुन त्यांना इच्छा असलेल्या हरित क्षेत्रांबाबत प्रस्ताव मागवुन निर्णय घेणे योग्य होईल.

शासनाच्या अमृत योजने अंतर्गत हरित क्षेत्र विकसित करणेकामी निधी प्राप्त झाले नुसार त्यासाठीचे प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करुन मान्यता प्राप्ती नंतर मनपा क्षेत्रातील विविध भागात हरित क्षेत्र विकसित करण्यात आले आहेत. मात्र सदर विकसित हरित क्षेत्राची देखभाल व्यवस्था ठेवणे व त्यासाठी येणारा खर्च मनपा निधीतुन करणे मनपास शक्य होणार नाही.

शहरातील अनेक खाजगी संस्था, वृक्षप्रेमी संस्था अथवा नामांकीत कंपन्या मनपाने विकसित केलेले हरित क्षेत्र स्व खर्चाने देखभाल - व्यवस्था ठेवुन त्याचा विकास करण्यास तयार असल्यास त्यांच्या मार्फत ऑफर लेटर मागवुन मनपास योग्य वाटेल अशी ऑफर स्विकारुन संबंधीतांशी अटी व शर्ती बाबतचा करारनामा करुन घेवुन सदरची हरित क्षेत्र देखभाल - व्यवस्था, दुरुस्ती व विकसित करणे कामी देता येणे शक्य होईल त्यामुळे हरित क्षेत्र विकसित राहतील, मनपाचा आर्थिक बोजा कमी होईल व कदाचित ऑफरमध्ये मनपास उत्पन्न देखिल प्राप्त होऊ शकते.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार तसेच सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांनूसार जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील खालील नमुद यादीनुसार अ.क्रं.०१ ते १३ तसेच इतर १६ हरित क्षेत्र असे एकूण २९ विकसित हरित क्षेत्र देखभाल दुरुस्तीसाठी सामाजिक संस्थाना कराराने मनपा अटी-शर्तीनूसार देण्यासाठी जाहिर देकार मागविणेस तसेच सदर काम करणेस पात्र संस्थेस १० वर्षाकरीता उपरोक्त नमूद २९ विकसित हरित क्षेत्र देखभाल दुरुस्तीसाठी १० वर्षाकरीता देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मात्र सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांनूसार हरित क्षेत्र देखभाल दुरुस्तीसाठी पात्र व दिर्घ अनुभव असलेल्या संस्थांचा प्राधान्याने विचार करावा. संस्थेस १) सदर जागेचा व्यावसायिक वापर करता येणार नाही, २) परिसरातील नागरीकांना निशुल्क प्रवेश दयावा लागेल., ३) सदर जागेत फक्त माळी यांचेसाठी रुम बांधकाम करता येईल इतर दुसऱ्या प्रकारचे बांधकाम करता येणार नाही., ४) सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत विज व पाण्याची सुविधा पुरविणेत येईल इत्यादी.

शहर अभियंता यांनी पात्र संस्थेस हरित क्षेत्र देखभाल दुरुस्तीसाठी देतांना सभागृहात झालेल्या चर्चेनूसार तसेच सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांनूसार देकार मागवितांना सर्व अटी-शर्ती नमूद कराव्यात. अटी-शर्तीची पूर्तता झाल्यानंतरच पात्र संस्थेस हरित क्षेत्र देखभाल दुरुस्तीसाठी देण्याची कार्यवाही करावी.

**अमृत अभियान अंतर्गत हरीत क्षेत्र विकास कार्यक्रम**

| अ.नं. | भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | मेहरुण स.नं.४६४/४ब-५अ, ४६४/५ब खुली जागा | १११७८.७५ चौरस मिटर | रायसोनी नगर |
| २ | निमखेडी शिवार गट नं.७८ खुली जागा | ३२९०.०० चौरस मिटर | हायवे दर्शन कॉलनी |
| ३ | जळगांव टी.पी.स्किम क्र.०२ अंतिम भुखंड क्र.५५८ खुली जागा | ४२०५.६० चौरस मिटर | सरदार वल्लभभाई पटेल उदयान,गणेश वाडी |
| ४ | पिंप्राळा गट नं.२८ खुली जागा | ४२७४.०० चौरस मिटर | मुक्ताई नगर |
| ५ | टी.पी.स्कीम नं.०२ अंतिम भुखंड क्र.४७४ (विवेकानंद नगर) | १८८५ चौरस मिटर | विवेकानंद नगर |
| ६ | मेहरुण तलावालगत हरीत क्षेत्र विकसित करणे | | मेहरुण तलाव |
| ७ | निमखेडी गट नं.१०५ खुली जागा | ४०६४ चौरस मिटर | मयुर सोसायटी |
| ८ | निमखेडी गट नं.११२ खुली जागा | २२०० चौरस मिटर | हीरागौरी पार्क |
| ९ | गट नं.५४ पिंप्राळा शिवार शिव कॉलनी व गट नं.५९ शिव कॉलनी | २१०० चौरस मिटर<br>१६०० चौरस मिटर | शिवार शिव कॉलनी<br>शिव कॉलनी |
| १० | मेहरुण स.नं.४५२ खुली जागा नुतन वर्षा कॉलनी | २९४० चौरस मिटर | हनुमान कॉलनी जवळ |
| ११ | मेहरुण स.नं.४४९ खुली जागा (वृंदावन बगिचा) | २४८९ चौरस मिटर | मोहन नगर |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | मेहरुण स.नं.४५५/४ खुली जागा मोहाडी ते कोल्हे हिल्स १०० फुटी रोड लगत | १७२१ चौरस मिटर | संभाजी नगर |
| १३ | जळगांव स.नं.२७६ हनुमान मंदिर रिंगरोड लगत | १६३६ चौरस मिटर | रिंगरोड |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.५ :-** BSNL.OFC केबल टाकणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**मा.उपमहापौर :-** विषय क्र.५ मध्ये असे आहे भाऊ, याच्यामध्ये शहर अभियंत्यांचा किंवा खाते प्रमुखांचा अभिप्राय, याच्यामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे. त्या ठिकाणी जे रस्ते ते खोदणार आहे. त्याची दुरुस्ती करणार नाही. बांधुन देणार नाही. तर मला असे वाटते की, हा जरी राज्य शासनाचा शासन निर्णय असला तरी आपले ज्या ठिकाणचे रस्ते चालु आहे किंवा जे पुर्ण झालेले आहे. ते आपले महानगरपालिकेचे नुकसानच होणार आहे. जर याच्यामध्ये शासनाला जर आपण कळविले की, जर आपण केबल टाकणार असाल तर आम्हाला नव्याने पुर्ण रस्त्यांची दुरुस्ती करुन मिळावी. किंवा पुन्हा ते रस्ते बांधुन मिळावे किंवा दुसरा काही पर्याय असेल रस्ते न खोदता तर त्या पध्दतीने केबल टाकण्यात याव्या. मला वाटत प्रशासनाच्या वतीने सुचविले. आता आपण शासनाकडे पाठपुरावा करुन निधी आणतो आहे. रस्त्यांचे कामे करतो आहे. अश्या पध्दतीने जर पुन्हा रस्ते खोदले. जवळपास ८-१० रस्ते आहे ते. ६ रस्ते आहे. तर या ६ रस्त्यांमुळे खुप मोठे महानगरपालिकेचे नुकसान होणार आहे. तर मला वाटते की, यांना एन.ओ.सी.देतांना या सर्व गोष्टींचा विचार झाला पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामध्ये स्थानिक प्राधिकरणाच्या परवानगीची सुध्दा आवश्यकता नाही असे म्हटले आहे. आता सदर बाबत बी.एस.एन.एल. मार्फत परवानगी मिळणेबाबत पत्र प्राप्त झालेले आहे. पत्रासोबत महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन परिपत्रक सो ॲण्ड सो दि.०५ ऑगस्ट २०१४ चे जोडलेले आहे. यात मुद्दा क्र.०९ब नुसार कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाची पुर्व परवानगीची आवश्यकता नाही. मग मला सांगा पुर्वपरवानगीची आवश्यकताच नाही. तर हा प्रस्ताव आला कसा काय आपल्याकडे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** भाऊ हा प्रस्ताव घेण्याचे कारण असे आहे की, त्यांनी असे म्हटले आहे वरील अ.क्र.२ मध्ये याबाबत संबंधीत विभागांना व एम.ई.सी.बी. विभागाची ईलेक्ट्रीक केबलबाबत त्या विभागाची एन.ओ.सी. घेणे आवश्यक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता हे फक्त पाणी पुरवठा बांधकामबाबत आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** हो हे आपले नुकसान होणेची शक्यता आहे. म्हणुन त्यांनी एन.ओ.सी. मागितली. म्हणुन आपल्याला माहिती पाहिजे की, आपण कुठल्या रस्त्यांची एन.ओ.सी.दिली. आणि काम करतांना आपला अधिकारी तेथे पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता रस्ता नुकसान भरपाई संदर्भात काय ?

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** त्यांनी रस्त्यात फक्त जे खोदकाम केलेले आहे ते मटेरियल व्यवस्थीत करुन घ्यायचे आहे. पुर्वी आपण त्यांच्याशी रस्ता दुरुस्तीचे पैसे आकारत होतो आता ते पैसे आकारत नाही.

**मा.उपमहापौर :-** त्यांना एन.ओ.सी.देतांना सभागृहात झालेल्या या सर्व गोष्टींचा समावेश करा. आणि तसे पत्र शासनाला पाठवुन द्या.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मागे पण काही कंपन्यांनी खोदलेले होते. काय कार्यवाही केली तुम्ही. काहीच कार्यवाही नाही केली. गोल गोल गोल गोल गोल. काय कार्यवाही केली. दंड काय केले सांगा तुम्ही. तुम्ही कार्यवाही करणार होते. १२ कोटींची त्यांची डिमांड नोट होती. काय केले तुम्ही.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** ती जी डिमांड नोट होती आपण त्यांना दिल्यानंतर त्यांनी पैसे ही भरले नाही आणि कामे ही केले नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** दंड करा ना त्यांना. नाही तर काढुन टाका केबल.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** त्यांनी कामच केले नाही तर दंड कसे करु. कामच केले नाही त्यांनी.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मागच्या महासभेला फोटो दाखवले आणि म्हणत आहे कामच केलेले नाही.

**मा.उपमहापौर :-** केलेले आहे ते काम.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** अशी ऑफिसीयल परमिशन कोणालाही दिलेली आहे.

**मा.**उपमहापौर :- पण शहरात काम झाले ते सांगत आहे मी. माझ्या वार्डात झालेले आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** एखाद्या ठिकाणी त्यांनी दुरूस्ती वगैरे केली असेल ते आपण समजु शकतो. तरी सुध्दा मागच्या महासभेत जे ठरलं होतं. ऐकुन घ्या ना.

**श्री.अश्विन सोनवणे :-** महापालिकेचा फायदा पहा ना त्यांचा काय फायदा पाहता आहे. दुरूस्ती केली असेल म्हणतात. फोटो देतो ना मी तुम्हाला. किती मोठमोठया केबल टाकल्या आहे. टॉवरपर्यंत केबल नेलेले आहे त्यांनी.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** भाऊ, मागच्या महासभेत हा विषय झाला ना. सर्व इंजिनिअरांना, आपण ती दिलेली परवानगी सन २०१८ ची आहे. त्याच्या व्यतिरिक्त कुठेही खोदलेले असेल तर त्याचे अहवाल मागविलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सोनगीरे साहेब, याच्या संदर्भात जसे वाघुर वरून रेतीच्या १० ब्रासची परवानगी घेतली जाते आणि १०० ब्रासची वाहतुक केली जाते. परवानगी ही काही जागांची घेतलेली आहे परंतु त्याच्यापेक्षा जास्त केबल टाकली गेलेली आहे. आता या सगळया गोष्टी व्हेरीफाय कोणी करायच्या. आता सदस्यानी जाऊन गाव गाव फिरायचे का ? की परवानगी किती दिलेली आहे आणि किती खोदाई झालेली आहे. याच्यात ही गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** २०२२ पासुन केबल टाकत आहे ते. यांच्या लक्षात येत नाही आणि दुरूस्ती केली असे सांगत आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** सोनगीरे साहेब तुम्ही म्हणत आहात की, आपण अहवाल मागितलेला आहे आपल्या इंजिनिअर्स कडुन, तुमचे इंजिनिअर्स येतात का वार्डात पाहणी करायला. आजपर्यंत दिसलेले नाही. हे सगळ सांगण बोलण असत, कधीच समोर येत नाही. लोकप्रतिनिधी तक्रार करून करून थकुन जातात. विषय शेवटी सोडुन देतात आणि याच पध्दतीने हे कामे पुढे चालु राहतात.

**मा.उपमहापौर :-** सोनगीरे साहेब केबल तर आहेतच पण त्यांनी जागो जागी पोल पण उभारलेले आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** माहित आहे ना भाऊ,

**श्री.अश्विन सोनवणे :-** यांच्याकडुन शब्द घ्या, मी कार्यवाही करेल, दंड करेल. १२ कोटीचा विषय आहे. १२ कोटी कशाला म्हणतात,

**मा.उपमहापौर :-** पुढच्या महासभेत अहवाल द्या.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** मी आजच ऑर्डर काढतो. ७ दिवसात अहवाल मागवितो.

**श्री.अश्विन सोनवणे :-** सोनगिरे साहेब, माझ्याकडे फोटो आहेत. आणि हे म्हणतात दुरूस्ती केली असेल.

**मा.उपमहापौर :-** हा विषय तिसऱ्यांदा झाला आता महासभेत.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नाही तर पैसे वसुल करा त्यांच्याकडुन.

**मा.उपमहापौर :-** डिमांड नोट कितीची दिली होती त्यांना माहित आहे का ?

**श्री.अश्विन सोनवणे :-** १२ कोटीची होती ना.

**मा.उपमहापौर :-** १६ करोडची होती, १६ करोड.

**मा.आयुक्त :-** पुढचा स्टेटस सांगा ना त्या बद्दल तेच तर विचारत आहे ते.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** आपण जी १२ कोटीची डिमांड दिली होती ना, जळगांव शहर म्हणजे बराच मोठा मार्ग होता. हायवे क्रॉसींग होता, भुसावळ पर्यंत ते जाणार होत. परंतु त्या पिरीयड मध्ये नंतर कोविड चालु झाला, डिमांड दिल्यानंतर त्यांचे बरेच प्रस्ताव बारगडले आणि त्याच्यानंतर ते पुन्हा आपल्याकडे डिमांड द्यायला पण आले नाही. किंवा पैसे ही भरायला आले नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** पुर्ण शहरात त्यांनी केबल टाकुन दिलेली आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** त्यांनी सगळ काम करून टाकलेले आहे. परत ते डिमांड द्यायला आलेच नाही तुमच्याकडे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** २०१८ ला दिलेली परवानगी माझ्याकडे आहे. आणि ज्या रस्त्यांच्या खोदकामांची परवानगी त्यांनी मागितलेली होती.

**मा.उपमहापौर :-** आता हे जे टाकले गेलेले आहे त्याची शाहनिशा कशी होईल.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** चेक करता येईल ना.

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्यांनी पोल जे टाकलेले आहे. त्याचा मागच्या महासभेमध्ये आपण ठराव ही केला होता. पोल टाकणे चालु आहे त्याचे. ते काबरं थांबविले नाही. ते जिओवाले पोल पण टाकत आहे. तुम्ही खोटं बोलत आहात.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** पोल हे पुर्वी टाकलेले आहे.

**मा.उपमहापौर :-** मागच्या महासभेत सांगितले मी हे की, सहा महिन्याभरापुर्वी पोल टाकलेले आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** भाऊ, ती स्मार्ट पोलची स्कीमच कॅन्सल झाली.

**मा.आयुक्त :-** मी याचा दोनदा आढावा घेतला एकही कॉंक्रीट माहिती माझ्यासमोर आली नाही.

**ॲड.शुचिता हाडा :-** प्रशासनच मान्य करत आहे. दोनदा आढावा घेऊन ही आयुक्तांना माहिती देत नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** सोनगीरे साहेब तुम्ही कुठे राहतात, आयोध्या नगरला ना, तिथला सुध्दा फोटो आहे माझ्याकडे , तुमच्या घराजवळचा, आणि तुम्ही कसे काय सांगत आहात की, काम केलेले नाही. पोल तर जाऊ द्या पोल तर आहेच अंडरग्राऊंडचे पण फोटो आहे माझ्याकडे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** भाऊ मी वारंवार सांगत आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही फक्त कार्यवाही करा, अहवाल द्या. कार्यवाही करा, कोर्टात जाण्याची तयारी ठेवा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची चर्चा आमच्या कानावर आहे. खरं खोटं काय आहे आम्हाला माहित नाही. परंतु गैरव्यवहार झाल्याच्या मोठया चर्चा आहे. आणि याच्या संदर्भातली जी काही पारदर्शक भुमिका असेल. ती पारदर्शक भुमिका सभागृहापुढे येणे अपेक्षित आहे.

**श्री.सुनिल खडके :-** एक साहेब येतात म्हणतात मागच्यांनी केले आम्हाला माहित नाही याच्यामुळेच सर्व अस घडतं.

**ॲड.शुचिता हाडा :-** जश्या आता तुम्ही सुचना दिल्या ना, शासनाला कळवावे लागणार आहे. तो एक विषय. दुसरी गोष्ट परवानगी द्यायची असेल. तर आपल्याला आपले बांधकाम, पाणी पुरवठा विभाग यांचा समन्वय ठेवावा लागेल कारण त्यांचेच सगळयात जास्त नुकसान होणार आहे. ड्रेनेज, पाणी पुरवठा आणि बांधकाम या विभागाचे. आणि तिसरा विषय असा याच्यामध्ये साईड पट्टीचीच परवानगी दिली पाहिजे. आणि जे काही क्रॉसींग आहे. क्रॉसींगच्या ठिकाणी एच.डी.बी.एक पध्दत असते, आडवा बोर ज्याला म्हणतो आपण, मागे सुध्दा सभागृहाला मी हे मांडले होते. त्या पध्दतीनेच फक्त त्या कामांना परवानगी दिली गेली पाहिजे. म्हणजे कमीत कमी नुकसानाला आपल्याला सामोरे जाता येईल. साईडपट्टीने आणि जेथे क्रॉसींग आहे तेथे आडवा बोर पध्दतीने. त्यांना देऊ शकतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सब्जेक्ट टु कन्डीशन परवानगी द्यायची की,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** याच्यामध्ये हे शासनाचे परिपत्रक ५ ऑगस्ट २०१४ चे आहे. आणि तो ग्रामविकासासाठी आहे. महानगरपालिकेसाठी नाही. मग हा प्रस्ताव घेऊन कसा ठेवला, मग ज्यांनी प्रस्ताव घेऊन कसा ठेवला की, महापालिकेला काहीच मिळणार नाही किंवा काय ? ५ ऑगस्ट २०१४ चा शासनाचे परिपत्रक ग्रामविकास विभागाचे आहे. तो ग्रामीण भागासाठी आहे .नगरविकास विभागाचा शहरी भागासाठी असतो. तर शहरी विभागासाठी काही परिपत्रक आहे का ?

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** भारत संचार निगम यांचेकडील पत्र दि.१५/११/२०२२. च्या पत्राचा संदर्भ घेऊन हे दिलेले आहे. त्याच्यासोबत त्यांनी त्या अटीशर्ती टाकलेल्या आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याच्या सोबत ते पत्र ही अद्यावत करा ना, कारण संदर्भ टाकल्यानंतर संदर्भावरुन आम्हाला काय कळणार आहे.

**मा.उपमहापौर :-** प्रस्ताव पुर्ण नाही, जे संदर्भीय पत्र त्यात म्हटले आहे. त्या संदर्भीय पत्राचे त्यात उल्लेख असले पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कुलभुषणभाऊ मला काय वाटत आहे. आपण हा विषय आता स्थगित ठेवावा आणि परिपुर्ण प्रस्ताव जे जे काही शासन निर्णय असतील. ते जोडुन प्रस्ताव पुढील महासभेत प्रस्तावीत करावा.

**मा.उपमहापौर :-** तरी ही आपण शासनाला कळवायला पाहिजे की, जळगांव शहरामध्ये रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी किंवा नव्याने बांधण्यासाठी निधी उपलब्ध नाही. मला वाटत, २-३ कि.मी चे रस्ते खोदणार आहे ते. इतके मुख्य रस्ते जर तुम्ही खोदणार असाल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** डॉकेट मध्ये म्हटलेनुसार, दि.१५/११/२०२२ भारत सरकारच्या निर्देशानुसार बी.एस.एन.एल.च्या वतीने सर्व ग्रामपंचायतींना ओ.एफ.सी. ब्रॉडबँड कनेक्शन देऊन म्हणजे काय ग्रामपंचायतीसाठी आहे तो पण.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** विषय असा आहे की, त्यांनी जी.आर.मध्ये स्पष्ट म्हटले आहे.

**मा.महापौर :-** जरी आपण तहकुब ठेवला भाऊ, तर रस्त्यांचा विषय आहे आपण कसे काय त्यांनी दुरुस्ती करणार आहे. मला असे वाटते की, यांनी शासनाला पत्र पाठवावे. आम्ही ड वर्गामध्ये येतो आमची तशी परिस्थिती नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही ताई आपण धोरण असे ठरवु. रस्ते पुर्ववत करुन देण्याचे अनुषंगाने.

**मा.आयुक्त :-** रिस्टोरेशन आहे त्याच्यामध्ये.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** राजुभाऊंच्या प्रभागात एक कनेक्शनसाठी आपण रु.३५०००/- घेतो आहे, छोटासा रस्ता फोडण्यासाठी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, हा प्रस्ताव तहकुब करण्यात यावा आणि पुढील महासभेमध्ये परिपुर्ण प्रस्ताव सादर करण्यात यावा. जे काही शासन निर्णय असतील त्याच्यासोबत परिपुर्ण प्रस्ताव पुढील महासभेत ठेवण्यात यावा. परंतु या विषयाचे अनुषंगाने टॉवरच्या संदर्भातील उत्पन्नाच्या संदर्भातली परिस्थिती काय आहे. शहरात अधिकृत टॉवर किती आहे आणि अनधिकृत टॉवर किती, आणि अनाधिकृत टॉवरच्या संदर्भात प्रशासनाची भुमिका काय आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.आयुक्त :-** कोण माहिती देत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याच्या पासुन उत्पन्न होत आहे की नाही होत आहे. किंवा थकबाकी असेल तर किती असेल.

**मा.महापौर :-** आदी विषय मंजुर करुन घेऊ द्या. विषय क्र.०५ च्या संदर्भात शासनाकडुन मार्गदर्शन मागविण्यात यावे आणि परिपुर्ण प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा आणि त्यांच्याकडुन मार्गदर्शन मागविण्यात यावा आणि ते मार्गदर्शन सर्व सन्मा.सदस्यांना कळवावे. त्यानंतर परिपुर्ण हा प्रस्ताव महासभेत ठेवण्यात यावा. त्यानुसार विषय क्र.०५ सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**श्री.गणेश चाटे, सहा.आयुक्त :-** मार्गदर्शक सुचनेनुसार जे टॉवर होते त्यांना रेग्युलराईज करण्यात येणार. मला वाटते ३० जुलै पर्यंत परमिशन दिलेली होती. आणि यासाठी त्यांनी एक खिडकी महासंचार पोर्टल विकसीत केलेली आहे. त्याला सेंट्रल गव्हर्नमेंटने इमपोस्ट केलेले आहे. आणि या ॲप्लीकेशन मध्ये त्यांनी डॅक्युमेंट्स वगैरे सगळं दिलेले आहे. जे अनाधिकृत आहे त्यांना अधिकृत करायचे आहे. असे ते ॲप्लीकेशन आपल्याकडे प्राप्त झालेले होते. त्याच्यापैकी बरेच आपण केलेले आहे. दोन तीन मंजुर झाले बाकी त्यांनी रिजेक्ट केलेले आहे. आणि त्यांनी एक फॉर्म्युला ठरवुन दिलेला आहे. मागच्या वर्षाची जी बाकी आहे ती कशी घ्यायची आणि किती घ्यायची. त्याच्यानुसार जी फी आहे ती आपण भरतो आणि बऱ्यापैकी मागच्यावर्षी चांगली वसुली झालेली आहे. थकबाकी साठी फॉर्म्युला ठरवुन दिलेला आहे त्याच्या प्रमाणे क्यालक्युलेट करुन त्यांना परवानगी द्यायची आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-**थकबाकी जी आपण वसुल केलेली आहे तर ती किती आहे थकबाकी.

**श्री.गणेश चाटे, सहा.आयुक्त :-** मागच्या वर्षी आपण जेव्हा सुरवात केली होती ती १२ कोटी होती. त्याच्यानंतर रेग्युलरचे आणि दंडाचे आकडे आता माझ्याकडे नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुढच्या महासभेला द्या.

**मा.उपमहापौर :-** त्याच्या एक खिडकी योजना मध्ये असे प्रश्न उद्‌भवतात. अस्तित्वात असलेले टॉवरच्या बाबतीत माहिती संकलन करुन कशी द्यायची माहिती आहे का तुम्हाला.

**श्री.गणेश चाटे, सहा.आयुक्त :-** नाही, नाही. ज्यांनी परवानगी घेतलेली नाही ते अनाधिकृत झाले.

**मा.उपमहापौर :-** आता इतक्या दिवसापासुन ते टॉवर आपल्या शहरात उभे आहे. ज्या बिल्डींगवरती उभे आहे त्या बिल्डींगचे सगळयात पहिले आपल्याकडे ऑडिट रिपोर्ट नाही. त्या ठिकाणी ज्या बिल्डींगवर उभे आहे ते आज कालबाहय झालेले आहे. काही ज्या ठिकाणी रस्त्यावर आहे , प्लॉटवर आहे. त्याचे घरपट्टी, खुलाभुखंडाचा महसुल आपल्याकडे नाही. हे टॉवर कुठल्या ठिकाणी आहे ते आपल्याला माहित नाही. ते अनाधिकृत झाले ना सगळे. मग आपण त्याचे करणार काय ?

**श्री.गणेश चाटे, सहा.आयुक्त :-** अशी सगळी आपल्याकडे माहिती आहे. परंतु शासनाचे जे नियम आहे ना, त्याच्यामुळे आपण कार्यवाही करु शकत नाही. त्यांना रेग्युलराईज करायला आपण ठरविलेले आहे. आपली थकबाकी याच्यासाठी वाढलेली आहे की, आपण त्यांना जे बिले देत होतो. ती आपण आपल्या आकारणीनुसार बिले देत होतो. आणि ती खुप जास्त होती. तर आता शासनाने जो फॉर्म्युला ठरवुन दिलेला आहे. त्या फॉर्म्युल्यानुसार त्यांना बिल भरायचे आहे. ते जर त्यांनी भरले नाही मागच्या वर्षांची तर ते रेग्युलर होणार नाही.आणि जे रेग्युलर होणार नाही त्याची माहिती आपल्याला राज्य शासनाला कळवायची आहे. त्याची एक राज्य स्तरीय समिती नेमलेली आहे. ती समिती त्याच्यावर डिसीजन घेईल. त्याच्या स्तरावर त्यांनी पत्र दिले तर आपण कार्यवाही करु शकतो.

**मा.उपमहापौर :-** तर आता जे अनाधिकृतबाबत एक खिडकी योजनेचे जे शासन निर्णय आहे तर त्यासाठी काही लिमीटेशन किंवा बॉंडींग असेल ना की, इतक्या दिवसात करा.

**श्री.गणेश चाटे, सहा.आयुक्त :-** अगोदर ३१ मार्च होती, ज्यांचे ज्यांचे झाले नाही त्यांचे सगळयांचे अहवाल आपण राज्य शासनाकडे पाठविलेले आहे. किती अनाधिकृत आहे. राज्य शासन आपल्याला आता पुढची गाईडलाईन देणार आहे.

**मा.उपमहापौर :-** त्याच्या संदर्भातली कॉपी नितीनभाऊंना सभा झालेनंतर अवगत करा.

**नगरसचिव :-** येथे ठिकाणी मा.जिल्हाधिकारी चव्हाण साहेब आलेले आहेत.ते त्यांचा परिचय देऊ ईच्छितात.मा.महापौर यांच्या संमतीने ते येथे परिचय देत आहे.

**श्री.चव्हाण, जिल्हाधिकारी :-** मै सन २०२२ बॅच का आय.एस.ऑफिर हु. उत्तराखंड से में हु. अभी ट्रेनिंग के लिए मैं यहाँपर आया हु. जळगांव डिस्ट्रीक्टमध्ये १ साल की मेरी ट्रेनिंग है. तो अभी असीस्टंट कलेक्टर की पोस्टपर अॅस ट्रेनी मुझे रखा गया है. तो सब डिपार्टमेंटस मे अट्याचमेंट के लिए जाने का मेरा काम है. तो आज मॅडमने बोला इधर मिटींग है तो मिटींग मे आकर मिटींग अटेन्ड करे. एक साल के ट्रेनिंग के बाद हमारी पोस्टींग होंगी.अभी २०२४ तक मुझे ट्रेनिंग के लिए जलगांव रहना है. उसके बाद हमारी पोस्टींग होंगी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२२५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, BSNL.OFC केबल टाकणे बाबत प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे. प्रशासनाने BSNL.OFC केबल टाकणेकामी होणाऱ्या खोदकामामुळे शहरातील रस्त्यांचे नुकसान होणार असल्यामुळे यामध्ये जळगांव शहर महानगरपालिकेचे नुकसान होणार असल्याने याकामी ज्या रस्त्यांचे नुकसान होणार आहे ते रस्ते दुरुस्ती शासनाकडुन करणे कामी किंवा सदरचे काम विना खोदकाम करता येवु शकते कां ? याबाबत शासनाचे मार्गदर्शन मागविणेत यावे तसेच यासंदर्भातील जे-जे शासन निर्णय असतील ते सर्व जोडून सविस्तर परिपूर्ण प्रस्ताव पूढील महासभेपूढे सादर करावा.

**सर्वानुमते तहकूब**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.६ :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शहरातील ०१ ते ०८ विकास कामे शासन निर्णयानुसार सार्वजनीक बांधकाम विभाग,जळगांव मार्फत करण्याबाबत मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** विषय क्र.०६ मध्ये करेक्शन आहे. प्रभाग १३ करायचे आहे १४ झालेला आहे.

**मा.महापौर :-** अ.क्र.१ मध्ये जळगांव शहरातील प्रभाग क्र.१४ म्हटलेले आहे त्या ठिकाणी प्रभाग क्र.१३ करायचे आहे. यानुसार बदल करुन विषय क्र.०६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२२६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम विभाग, जळगांव यांचे पत्र क्रं.साबांविज/४१७७/२०२३ दि.०९/०६/२०२३ चे पत्र प्राप्त झाले त्यानुसार खाली नमुद ०१ ते ०८ कामे ही जळगांव महानगरपालिका क्षेत्रातुन जाणारे रस्ते असल्याने सार्व.बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२३/प्र.क्रं.८७-ब-१२०/नवि-१६ मंत्रालय मुंबई दि.११ एप्रिल २०२३ अर्थसंकल्पात मंजुर झालेले असल्याचे पत्रात नमुद आहे. त्या अनुषंगाने सार्व बांधकाम विभागाने महानगरपालिकेकडुन ना-हरकत प्रमाणपत्र व महानगरपालिकेचे सभेचे ठराव मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (लक्ष) |
|---|---|---|
| १. | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१३ अंतर्गत लेक रेसिडेन्सी ते गणेश घाट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ५०.०० |
| २. | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१४ अंतर्गत गट नं.४१४ कंपाऊंड च्या आतील मुख्य रस्ता व इतर लहान पाच रस्ते डांबरीकरण करणे. | ६०.०० |
| ३. | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.०६ व १६ अंतर्गत रुख्मा टेंट हाऊस ते सुपारी कारखाना व गणेश अपार्टमेंट ते पर्श्वनाथ प्लास्टिक पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | २१०.०० |
| ४. | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.०६ अंतर्गत रामदेव बाबा मंदिर ते लिटल स्टेप प्ले स्कुल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ३८.२५ |

| | | |
|---|---|---|
| ५. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत अक्झॅन ब्रेन हॉस्पिटल पासुन ते श्री.प्रमोद बसेर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ६७.२५ |
| ६. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत श्री.टोके यांच्या घरापासुन ते श्री.झवर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ३२.५० |
| ७. | प्रभाग क्रं.११ अंतर्गत रामानंद नगर रिक्षा स्टॉप पासुन ते श्री.अत्तरदे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २२.०० |
| ८. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत श्री.डोंगरे यांच्या घरापासुन ते श्री.अमोल चौधरी यांच्या घरापर्यंत ते श्री.सुर्यवंशी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २०.०० |
| | एकुण रक्कम :- | ५००.०० |

सदरहु रस्ते मनपा हद्दीमध्ये असल्यामुळे शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२३/प्र.क्रं.८७-ब-१२०/नवि-१६ मंत्रालय मुंबई दि.११ एप्रिल २०२३ अन्वये कार्यान्वयन यंत्रणा सार्व.बांधकाम विभाग,जळगांव असल्याने प्रस्तुत विकास कामे सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांच्या मार्फत करण्यात येणार असल्याने उक्त ०१ ते ०८ कामांना सार्व.बांधकाम विभाग यांच्या मागणी नुसार मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. दि.१५/०२/२०२३ च्या मनपा सर्वसाधारण (महासभेत) सभेत विविध योजने अंतर्गत शासकीय विभागा मार्फत मागणी केलेल्या ना हरकत दाखले महासभेच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन ना हरकत दाखले देण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली त्यानुसार मागणी केलेले ना हरकत दाखले महासभेच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन ना हरकत दाखले देण्यास आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे त्यानुसार वर नमुद ०१ ते ०८ कामांना ना- हरकत दाखला देण्यास व सदर कामांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सन्मा.सदस्य,श्री.जितेंद्र भगवानराव मराठे यांनी वर नमूद अ.नं.०१ मध्ये प्रभाग क्र.१४ ऐवजी प्रभाग क्र.१३ अशी दुरुस्ती करणेची मागणी केलेनूसार त्याप्रमाणे दुरुस्ती करणेस सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.७ :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शहरातील ०१ ते ३५ विकास कामे शासन निर्णयानुसार सार्वजनीक बांधकाम विभाग,जळगांव मार्फत करण्याबाबत मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.७ मंजुर करावा. किती काय हे दिलेले नाही.

**मा.उपमहापौर :-** रक्कम काही दिलेली नाही. दुसरा विषय असा आहे की, ज्या ज्या ठिकाणी कॉंक्रीट रस्ते आहे त्या त्या ठिकाणी आता प्रस्तावीत असलेली भुयारी गटार योजना किंवा आता नव्याने आपण ज्या क्षेत्रात पाणी पुरवठा योजना करणार आहोत.त्या ठिकाणी आपल्या महानगरपालिकेने आता जसे हे चाललेले आहे वाद आपला तो रस्ता पी.डब्ल्यु.डी.करणार आहे महानगरपालिका करणार आहे जीवन प्राधिकरण करणार आहे. तर तशी समस्या निर्माण होऊ नये. दुसरी गोष्ट ज्या अटीशर्ती आपण यापुर्वी आपण सार्वजनिक विभागाला कॉंक्रीट रस्ते बांधतांना ज्या अटीशर्ती टाकुन दिलेल्या आहेत. ती अमृत २.० योजना कार्यान्वीत करण्यासाठी ते जे निकष आहे.त्या सर्वच्या सर्व अटीशर्तीचा ज्या ज्या ठिकाणी कॉंक्रीट रस्ते होणार आहे. त्या सर्वांमध्ये त्या अटीशर्तीचा समावेश करण्यात यावा. तो कोणत्याही लेखाशिर्षाचा असो, मनपा फंडातला असो, अजुन त्या राज्य शासनाकडुन मिळणाऱ्या निधीतला असो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** किती कोटीचे आहे हे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** त्याची आकडेवारी अजुन आलेली नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे माहिती सुध्दा नाही सभागृहाला.

**मा.उपमहापौर :-** आता या विषयपत्रिकेत आलेले काही रस्ते झालेले आहे भाऊ, आता तो निधी तो फंड दुसऱ्या ठिकाणी युटीलाईज करण्यात यावा. जे या ठिकाणचे कामे झालेले असतील. आहेत मार्क करुन ठेवलेले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभागृहापुढे प्रस्ताव सादर करतांना सभागृहाला ही सुध्दा कल्पना नाही. असे मोठमोठया कामांचे. म्हणजे सभागृहाला योग्य ती कल्पना पाहिजे की, प्रभाग क्र.०९ मध्ये १० कोटीचे कामे मंजुर झाले की, ५ कोटीचे झाले की, ४ कोटीचे झाले, नाही तर येऊन जाऊन काय होत काही मोजक्या प्रभागांवरतीच सगळयांचा रोष असतो की, याच प्रभागात कामे होत आहे आणि इतर प्रभागात होत नाही. परंतु येथे आकड्यांचा उल्लेखच नसल्या कारणाने हे कळायलाच मार्ग नाही की, किती कोटीचे हे प्रस्ताव आहे. म्हणजे फक्त नावालाच मान्यता द्यायची आहे. रस्ता १

कोटीचा आहे, २ कोटीचा आहे की, १० कोटीचा आहे की, २५ कोटीचा आहे. हे सगळे प्रस्ताव असे कसे काय आणतात तुम्ही. आपण जबाबदारीने सांगायला पाहिजे ना त्यांना.

**मा.उपमहापौर :-** रस्ते जास्त रकमेचे आहे की, बाकडे आणि हायमस्ट लॅम्प पुरविणे जास्त रकमेचे आहे. बाकडे पुरविणे, हायमस्ट लॅम्प पुरविणे, ओपनस्पेस सुशोभिकरण करणे हे पण कामे आहेत रस्त्यांचे पण आहेत. त्याच्यात हेच समजत नाही की, म्हणजे मुलभुत सोईसुविधांवर जास्तीचा खर्च करणार आहे की, सुशोभिकरणावर जास्तीचा खर्च करणार आहे.

**मा.महापौर :-** याचे तर आपण विष्लेशन केल होत ना, कितीचे बाकडे आहे, कितीचे ओपनस्पेस आहे विष्लेशन केलेले होते आपण.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** ते जे बाकडे आहे ते एकत्रित होते. एक एकाची ही अमाऊंट नाही.

**मा.उपमहापौर :-** अश्विनभाऊ आपल्याला पण विनंती आहे आपण सन्मा.आमदार महोदयांना आमच्या सभागृहाच्या वतीने विनंती करा की, आपण जळगांव शहरामध्ये मुलभुत सोईसुविधांचे कामे हातात घेतले पाहिजे. नक्कीच काही ठिकाणी ओपनस्पेस सुशोभिकरणाचे किंवा बाकड्यांची मागणी होत असेल. त्या ठिकाणी निश्चितच केलीच पाहिजे. त्याबद्दल वाद नाही. परंतु आज जळगांव शहर ज्या समस्यांमधुन जात आहे. त्या मुलभुत सुविधांमध्ये गटारी असतील, रस्ते असतील. आमची सभागृहाची विनंती आहे की, आपण आमदार महोदयांना खासदार महोदयांना सांगावे.

**मा.महापौर :-** खाली शेरा माझा आहे की, या कामांना मान्यतेसाठी प्रस्तावीत करावे.जर सन्मा.सदस्य मान्य करत नाही तर.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** याच्यात आपण अमृत योजनेचे कामे गृहीत धरुन.

**मा.उपमहापौर :-** त्यात अटीशर्ती दिलेली असतांना त्या ठिकाणी रस्त्यांचे कामे हाती घेणार आहोत त्या ठिकाणी आमच्या इंजिनिअरची संयुक्त पाहणी करुन त्यांच्या सुचना, समस्या लक्षात घेऊन दक्षता घेऊन तद्नंतर योग्य ती त्या ठिकाणी परिस्थिती असेल. तरच त्या कामांची सुरवात करण्यात यावी. कारण काय होतं ते आपल्या इंजिनिअरला विश्वासात घेत नाही. आपल्या इंजिनिअरला माहित नसतं. हाच विषय काय मंजुर झाला ते म्हणतात आम्हाला माहित नाही.कुठलेही सन्मा.सदस्यांनी विचारले तर ते म्हणतात आम्हाला माहित नाही. त्या ठेकेदारांनी सन्मा.सदस्यांना न सांगता, रस्ता उंच केला असेल किंवा कसा ही असेल, त्याचे सपाटीकरण करतांना अश्या पध्दतीने काम करुन ते चालले जातात. परंतु त्या ठिकाणी समस्यांना स्थानिक नगरसेवकांना सामोरे जाव लागते, नागरीकांना सामोरे जाव लागते. तुम्ही या संदर्भामध्ये सर्व समस्यांचा या ठिकाणी पत्र देतांना या सर्व समस्यांचा त्याच्यामध्ये उल्लेख करायचा आहे.या सर्व सुचनांचा त्यांच्यामध्ये उल्लेख करायच आहे की, आपल्या जेईनी संयुक्तीक पाहणी केल्याशिवाय संयुक्तीक शेरा दिल्याशिवाय, त्या ठिकाणचे सर्व भागांचे निरिक्षण केल्याशिवाय रस्त्यांच्या कामांची तुम्ही एन.ओ.सी.देऊ नये. आणि दिले तर त्या ठिकाणी तो रस्ता टेक्नीकली होईल अश्या पध्दतीने काम करावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि विषय क्र.१० मध्ये बघा तुम्ही क्रमांक ४१ मध्ये सेम प्रस्ताव आहे. पण याच्यामध्ये रकमा दिसत नाही ना.

**मा.उपमहापौर :-** समजा विशालभाऊ यांच्या घरापासुन नितीनभाऊ यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे किंवा नितीनभाऊ यांच्या घरापासुन विशालभाऊ यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. एकच रस्ता आहे. एक उदाहरण सांगत आहे मी, आता कागदपत्र येथे नाही तर कसे होणार. रक्कमा वेगवेगळे असले तरी ते काम एकच आहे आणि दोन वेगवेगळया प्रस्तावांमध्ये दोन वेगवेगळया निधींमध्ये आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** रक्कमा तर दिल्या असतील ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** रक्कमा नाही टाकलेल्या आहे ना. कमीत कमी सभागृहात येण्याच्या संदर्भात नॉलेजला येण्याच्या संदर्भात कुठेतरी परिपुर्ण माहिती यायला पाहिजे ना. हे तर सगळा संभ्रम संभ्रम दिसत आहे. निधी कोणता आहे किती रक्कमेचा आहे.आपण कमीत कमी ती माहिती दिली पाहिजे. पण प्रॉब्लेम काय आहे. तिकडुनच माहिती मिळत नसेल ना.

**मा.आयुक्त :-** ६ आणि ८ च्या प्रस्तावात रक्कमा दिलेल्या आहे बाकीच्यांमध्ये रक्कमा नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांना एन.ओ.सी. दिलेल्या आहेत. म्हणजे उद्या काही घडले तर तुम्ही एन.ओ.सी. दिलेल्या होत्या.

**मा.महापौर :-** सभागृहाची सुध्दा त्याच्यासाठी मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. प्रशासनानेच देऊन टाकायला पाहिजे. आपल्याला तर काही कळतच नाही त्याच्यातले. आपल्याला रकमा कळत नाही. ज्या गोष्टीची आवश्यकता नाही ते त्यात घेतलेल्या असतात. डबल डबल रस्ते घेतलेले आहे.

(सभागृहात अनेक सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही)

**श्री.राजेंद्र पाटील :-** एकच काम दोन असेल तर बदल करता येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्यता देण्यात येत आहे परंतु अजुन ही मी या सभागृहाला विनंती करतो आहे की, आता पर्यंत प्राप्त झालेला निधी. कुठल्याही हेड मधुन आलेला असेल. १०० कोटी असेल, ८५ कोटी असेल. विविध शासन योजनांच्या माध्यमातुन मिळालेला निधी असेल.याच्या संदर्भातली एक विस्तृत माहिती अभ्यास या सभागृहाला होण्याच्या दृष्टीकोणातुन तशी माहिती प्रत्येक सभागृह सदस्याला अवगत करण्यात यावी. आणि प्रत्येक निधीचा आजच्या दिनांकाला स्टेटस काय आहे. आज काय होते की, गावातल्या कुठल्याही व्यक्तीने विचारल्यानंतर आपल्याला माहिती नाही. आपण हेच म्हणतो तुम्हाला, काम मंजुर हो गया है. कोणत्या निधीत आहे. आपण सांगतो, ८५ कोटी मध्ये आहे, १०० कोटी मध्ये आहे. परंतु वस्तुस्थिती जी आहे. अजुनही खऱ्या अर्थाने कोणाला कळत नाही. तर नेमके कोणते कोणते कामे झालेले आहे. कोणत्या कोणत्या निधीतुन मंजुर झालेले आहे याचा संपुर्ण एक विस्तृत अहवाल या संपुर्ण सभागृहाला अवगत करण्यात यावा.

**मा.आयुक्त :-** मागील दोन आर्थिक वर्षामध्ये ज्यांना आपण एन.ओ.सी. दिलेल्या आहेत. वर्कऑर्डर आहेत. कामे आहे तर कोणत्या लेअर टाकुन झालेले आहे. असे एक डिटेल द्या.

**मा.महापौर :-** पण अजुन ही कामाची काय स्थिती आहे लक्षात येत नाही आपल्याला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तिकडचे ही कामे मार्गी लागत नाही. पर्यायाने आपण दुसऱ्या निधीत पण आपल्या त्या कामांचे नियोजन करु शकत नाही. आणि कामे सगळी वरगळीत दिसतात. १०० कोटीमध्ये मी ऐकत आहे. साधारणता ६ महिन्यापासुन त्यांची ती तळमळ चालु आहे. परंतु जर कधी या १०० कोटीचा स्टेटस आपल्याला कळलेले असते की, हे पुढचे ६ महिने होऊ शकत नाही. तर त्यांच्या निधीच्या संदर्भात दुसरा काही मार्ग आपल्याला निवडता आला असता.

**मा.उपमहापौर :-** आता ज्या सुचना आपल्याला केलेल्या आहे किंवा ज्या अटीशर्ती आपल्याला दिलेल्या आहेत यांचे ठरावामध्ये आणि आपण एन.ओ.सी. पाठवतांना या सर्व गोष्टींचा समावेश करावा.

**मा.महापौर :-** विषय क्र.७ मध्ये सन्मा.सदस्य उपमहापौर यांनी दिलेल्या सर्व सुचनांचा समावेश करुन विषय क्र.०७ मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** महापौरताई, गुजराल पेट्रोल पंपापासुन जुने हायवे रोड तो मुख्य रस्ता आहे. तो रस्ता आपण टाकु शकत नाही. किंवा मनपा फंडात टाकणे हे म्हणणे आहे तुमचे. एक विनंती अशी राहील की, मुख्य रस्ता आहे. पुर्ण जुन्या हायवे पासुन येणाऱ्या नविन हायवे पर्यंत ज्या ही मोठया ट्रक असतील,सिमेंटच्या असतील, काही बसेस असतील. काही स्कुल बसेस त्या रस्त्याने प्रामुख्याने चालतात. त्या रस्त्याची दशा भाऊ एकदम खराब आहे. मनपा फंडात तो रस्ता आणि अजुन एक मुख्य रस्ता दादावाडी पासुन तर शिवराम नगर जुन्या हायवे पर्यंत. मनपा फंडातुन हे दोन रस्ते, तर नितीनभाऊ अशी विनंती राहील. आयुक्त मॅडम आपण सांगावे की, हा रस्ता मला मनपा फंडातुन करुन द्यावा. असा शब्द दिला पाहिजे. आणि दुसरा रस्ता नॅशनल हायवे पासुन शिवरामनगर जुन्या हायवे पर्यंत. हे दोघी प्रामुख्याने चांगले रस्ते आहे. म्हणजे तेथुन वाहतुक खुप प्रमाणात आहे. तर हे दोघी रस्ते मनपा फंडात टाकण्यात यावे.

**मा.आयुक्त :-** रस्ता जर मोठा असेल तर ईस्टीमेट मोठे होईल. त्यामुळे स्कीममध्ये करावे लागेल.

**श्री.मनोज चौधरी :-** मॅडम मग परत आले ना तेच. केव्हा होईल ते किती वर्ष लागतील त्याला.

**मा.उपमहापौर :-** प्रकरण तयार करुन घ्या.

**श्री.मनोज चौधरी :-** भाऊ अंदाजपत्रक तयार आहे ना. ७० लाखाचा तयार आहे ना, गुजराल पेट्रोल पंपापासुन जुन्या हायवे पर्यंतचा रस्ता आपण डांबरीकरणाचा प्रस्ताव केलेला आहे त्याचा.

**मा.आयुक्त :-** दुसरा कोणता आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** दुसरा एक दिड कोटीचा आहे दोन नाही तर एक तर टाका.

**मा.आयुक्त :-** ७० लाखाचा करुन घेऊ आपण.

**श्री.मनोज चौधरी :-** हो मॅडम, धन्यवाद.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, उपविभागीय अधिकारी सार्व.बांधकाम उपविभाग,जळगांव यांचे पत्र क्रं.साबांविज/४९५०/२०२३ दि.०७/०७/२०२३ चे पत्र प्राप्त झाले त्यानुसार खाली नमुद ०१ ते ३५ कामे हे जळगांव महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास या योजनेअंतर्गत सन २०२३-२४ या वर्षासाठी शासन निर्णय

क्रमांक मनपा-२०२३/प्र.क्रं.३१६(२)/नवि-१६ दि.०६ जुलै २०२३ अर्थसंकल्पात मंजुर झालेले असल्याचे पत्रात नमुद आहे. त्या अनुषंगाने सार्व बांधकाम विभागाने महानगरपालिकेकडुन ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री.बडगुजर ते श्री.वामनराव पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| २. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री.चौधरी ते श्री.पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| ३. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री.मुकुंदा कुलकर्णी ते श्री.ठाकरे यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| ४. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री.वाणी ते श्री.कुलकर्णी यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| ५. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत शंकर आप्पा नगर येथील श्री.उमेश चव्हाण यांच्या घरापासुन ते पिंप्राळा बाजार रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| ६. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री.कष्टभंजन हनुमान मंदिराशेजारील रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| ७. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री.पाटील ते श्री.महेश कुलकर्णी यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| ८. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री.दाभाडे ते श्री.झोपे यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| ९. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री.चौधरी ते श्री.नाईक यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| १०. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत शंकरआप्पा नगर येथील श्री.नरेंद्र नाईक ते पिंप्राळा रथ मार्ग पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| ११. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत वृंदावन सोसायटी अमृत प्ले स्कुल ते श्री.एच.बी.पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| १२. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत वृंदावन सोसायटी येथील श्री.विरप्पन ते श्री.प्रेमल बंगलो पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| १३. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत वृंदावन सोसायटी येथील आय डी बी आय एटीएम ते श्री.पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| १४. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत वृंदावन सोसायटी येथील श्री गीते ते श्री गजानन पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| १५. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत वृंदावन सोसायटी येथील श्री.सावंत ते श्री.प्रफुल्ल पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| १६. | प्रभाग क्रं.८ अंतर्गत वृंदावन सोसायटी येथील अंतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे. |
| १७. | प्रभाग क्रं.८ अंतर्गत चंदुअण्णा नगर येथील गट नं.२६ हनुमान मंदिराजवळील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |
| १८. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत गट नं.०८ सर्वे नं.२९० अ/२ब/३ येथील जेष्ठ नागरिक संघ जवळील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |
| १९. | प्रभाग क्रं.८ अंतर्गत गट नं.९० येथील साईबाबा मंदिराजवळील ओपनस्पेस मध्ये ओपन जिम साहित्य पुरविणे. |
| २०. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत गट नं.३५० पिंप्राळा गावठाण कुंभार वाडा येथे सभागृह बांधणे. |
| २१. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत पिंप्राळा स्मशानभुमी सुशोभिकरण करणे. |
| २२. | प्रभाग क्रं.१९ अंतर्गत गट नं.१६८/२अ सुप्रीम कॉलनी येथील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |
| २३. | प्रभाग क्रं.१९ अंतर्गत गट नं.१६६/१+४ सुप्रिम कॉलनी येथील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |
| २४. | प्रभाग क्रं.०१ व ०२ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. |
| २५. | प्रभाग क्रं.०३ व ०४ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. |
| २६. | प्रभाग क्रं.०८ व ०९ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. |
| २७. | प्रभाग क्रं.१० व ११ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. |
| २८. | प्रभाग क्रं.१२ व १३ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. |
| २९. | प्रभाग क्रं.१४ व १७ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. |
| ३०. | प्रभाग क्रं.१९ व ०३ अंतर्गत ठिकठिकाणी बाकडे पुरविणे. |
| ३१. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत लिलापार्क येथे श्री.किसन मराठे यांच्या घरापासुन ते श्री.अटाळे यांच्या घरापर्यंत रस्ता व आर.सी.सी.गटार बांधणे. |
| ३२. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत लिलापार्क येथे गट नं.१३६ श्री.शिंदे साहेब यांच्या घरापासुन ते श्री.ललित चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता व आर.सी.सी.गटार बांधणे. |
| ३३. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत लिलापार्क मधील रस्ते व आर.सी.सी.गटार बांधणे. |
| ३४. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत ऑफिसर्स क्लब सुशोभिकरण करणे. |
| ३५. | प्रभाग क्रं.०१ अंतर्गत गट नं.६५/३, बहिणाबाई नगर येथील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |

उक्त ०१ ते ३५ कामांना सार्व.बांधकाम विभाग यांच्या मागणी नुसार मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. दि.१५/०२/२०२३ च्या मनपा सर्वसाधारण (महासभेत) सभेत विविध योजने अंतर्गत शासकीय विभागा मार्फत मागणी केलेल्या ना हरकत दाखले महासभेच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन ना हरकत दाखले देण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली त्यानुसार मागणी केलेले ना हरकत दाखले महासभेच्या कार्योत्तर

मान्यतेच्या अधिन राहुन ना हरकत दाखले देण्यास आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. त्यानुसार वर नमुद ०१ ते ३५ कामांचे ना- हरकत दाखला देण्यास व सदर कामांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

शहर अभियंता यांनी सभागृहात झालेल्या चर्चेनूसार याकामी अटी-शर्ती नमूद कराव्यात तसेच यापूर्वीच्या पारित झालेल्या प्रस्तावांमध्ये ज्याप्रमाणे अटी-शर्ती नमूद केलेल्या आहेत त्याप्रमाणेच कार्यवाही करुन ना-हरकत दाखला देण्याची कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.८ :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शहरातील ०१ ते ११ विकास कामे शासन निर्णयानुसार सार्वजनीक बांधकाम विभाग,जळगांव मार्फत करण्याबाबत मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये पण तिच सुचना आहे. ज्या मागच्या प्रस्तावांना दिलेल्या आहे. माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२२८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, उपविभागीय अधिकारी सार्व.बांधकाम उपविभाग, जळगांव यांचे पत्र क्रं.साबां (बांध)उविज/७४१/२०२३ दि.२१/०७/२०२३ चे पत्र प्राप्त झाले त्यानुसार खाली नमुद ०१ ते ११ कामे हे जळगांव महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास या योजनेअंतर्गत सन २०२३-२४ या वर्षासाठी शासन निर्णय क्रमांक मनह-२०२३/प्र.क्रं.३१६(२)/भाग-२/नवि-१६ दि.१३/०७/२०२३ अर्थसंकल्पात मंजुर झालेले असल्याचे पत्रात नमुद आहे. त्या अनुषंगाने सार्व.बांधकाम विभागाने महानगरपालिकेकडुन ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | रक्कम रु.(लक्ष) |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत रायसोनी नगर येथील श्री सदगुरु कृपा सुपर शॉपी ते मोहाडी रोड पर्यंत रस्ता तयार करणे. | ३५.०० |
| २. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत रायसोनी नगर येथील ग्रीन स्ट्रीन अपार्टमेंट ते पवन हाईट पर्यंत रस्ता तयार करणे. | ३८.०० |
| ३. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत रायसोनी नगर येथील पवन हाईट ते जे.के.इंग्लिश स्कुलपर्यंत रस्ता तयार करणे. | ४९.०० |
| ४. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत रायसोनी नगर येथील श्री.किरण खर्चे यांच्या घरापासुन ते जे.के.इंग्लीश स्कुलच्या मागील बाजु पर्यंत रस्ता तयार करणे. | २९.०० |
| ५. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत रायसोनी नगर येथील अलंकार बिल्डींग ते जे.के.इंग्लिश स्कुल ते मोहाडी रोड पर्यंत रस्ता तयार करणे. | ४९.०० |
| ६. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत श्री सनिका कॉर्नर ते श्री.भोळे यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. | ९०.०० |
| ७. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत श्री.नेहेते यांच्या घरापासुन ते अजिता अपार्टमेंट पर्यंत रस्ता तयार करणे. | २७.५० |
| ८. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत अजिता अपार्टमेंट ते श्री.भिरुड ते श्री.पी.आर.पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. | १६.५० |
| ९. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत श्री.भंगाळे यांच्या घरापासुन ते श्री. हरि मंदिर पर्यंत रस्ता तयार करणे. | ४८.०० |
| १०. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत श्री.महेंद्र वाणी यांच्या घरापासुन ते श्री.बोंडे ते श्री.जावळे यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. | १८.०० |
| ११. | प्रभाग क्रं.१४ अंतर्गत आदित्य चौक ते मेहरुण स्मशानभुमी जवळील मुक्ताई मंदिरा पर्यंत रस्ता तयार करणे. | १००.०० |
| | एकुण रक्कम :- | ५००.०० |

उक्त ०१ ते ११ कामांना सार्व.बांधकाम विभाग यांच्या मागणी नुसार मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. दि.१५/०२/२०२३ च्या मनपा सर्वसाधारण (महासभेत) सभेत विविध योजने अंतर्गत शासकीय विभागा मार्फत मागणी केलेल्या ना हरकत दाखले महासभेच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन ना हरकत दाखले देण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली त्यानुसार मागणी केलेले ना हरकत दाखले महासभेच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन ना हरकत दाखले देण्यास आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे त्यानुसार वर नमुद ०१ ते ११ कामांना ना- हरकत दाखला देण्यास व सदर कामांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

शहर अभियंता यांनी सभागृहात झालेल्या चर्चेनूसार याकामी अटी-शर्ती नमूद कराव्यात तसेच यापूर्वीच्या पारित झालेल्या प्रस्तावांमध्ये ज्याप्रमाणे अटी-शर्ती नमूद केलेल्या आहेत त्याप्रमाणेच कार्यवाही करुन ना-हरकत दाखला देण्याची कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.९ :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शहरातील ०१ ते ३१ विकास कामे शासन निर्णयानुसार सार्वजनीक बांधकाम विभाग,जळगांव मार्फत करण्याबाबत कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे त्यास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२२९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, उपविभागीय अधिकारी सार्व.बांधकाम उपविभाग, जळगांव यांचे पत्र क्रं.साबांविज/७८२/२०२३ दि.०२/०८/२०२३ चे पत्र प्राप्त झाले त्यानुसार खाली नमुद ०१ ते ३१ कामे हे जळगांव महानगरपालिका क्षेत्रात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत सन २०२३-२४ या वर्षासाठी शासन निर्णय क्रमांक साविओ-२०२३/प्र.क्रं.३२९/अजाक दि.३१/०७/२०२३ अर्थसंकल्पात मंजुर झालेले असल्याचे पत्रात नमुद आहे. त्या अनुषंगाने सार्व.बांधकाम विभागाने महानगरपालिकेकडुन ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. खालील अटी शर्तीच्या अधिन राहुन

१. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद कामाची जागा मनपा कब्जेवहीवाटीतील आहे.
२. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद काम आपल्या कार्यालयाकडून पूर्ण झाल्यानंतर मनपाकडे हस्तांतरीत झाल्यानंतर कामाची दोष दायीत्व पुर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल व दुरुस्ती मनपा जळगांव मार्फत करण्यात येईल.
३. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद प्रस्तावित केलेले काम कोणत्याही योजनेतुन मंजुर अथवा प्रस्तावित नाही.
४. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद प्रस्तावित केलेल्या कामांची जागा अतिक्रमण विरहीत आहे.
५. ज्या रस्त्यांवर भुमिगत गटारींचे काम झालेले नाही अश्या रस्त्यांच्या क्रॉक्रीटीकरणाच्या प्रस्तावात सदर रस्त्यावर भविष्यात भुमिगत गटारीसाठी खोदकाम करण्यात येणार असलेने त्यासाठी रस्त्यांचे नुकसान होणार नाही अश्या प्रकारचे नियोजन करणे व त्याकरीता आवश्यक बाबींचा समावेश अंदाजपत्रकीय प्रस्तावात करणे आवश्यक राहील.
६. रस्त्यावर मलनिस्सार योजनेचे असलेली मुख्य चेंबर व घरजोडणी चेंबर कोणत्याही परिस्थितीत रोड खाली दबाई होणार नाही याची दक्षता घ्यावी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार पाणी पुरवठा व मलनिस्सारण सेवा अत्यावश्यक सेवेत समाविष्ट असल्याने अशी कृती नियमांचे उल्लंघन करणारी ठरेल. रस्त्याखाली दबाई झाल्यास आपण नियुक्त केलेले मक्तेदार यांनी तात्काळ स्वखर्चाने पुर्ववत व सुस्थितीत करण्याचे नियोजन ठेवणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.
७. सदर रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्यासाठी रोड स्क्रपींग करणे, खोदकाम करणे, हि कामे करीत असतांना जलवाहीनीची अथवा नागरीकांचे नळ संयोजनाचे कोणतेही नुकसान झाल्यास, तुट फुट झाल्यास, त्याची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक राहील.
८. रस्त्याचे काम करतांना त्या रस्त्यावरील भुमिगत मलनिस्सारण योजनेची चेंबर असल्यास त्याची तुट फुट होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील, तसेच सदर चेंबर रस्त्याच्या पृष्ट भागाशी समतल करणे आवश्यक राहील व त्यासाठी अंदाजपत्रकात देखिल तरतुद करणे आवश्यक राहील.

९. प्रस्तावातील कोणत्याही रस्त्याचे काम सुरु करण्यापुर्वी सात दिवस आधी सुचित करणे आवश्यक राहील, त्यामुळे त्या रस्त्यावरील पाईपलाईन दुरुस्ती नळ संयोजन अथवा इतर आवश्यक कामे मनपा मार्फत पुर्ण करुन घेणे शक्य होईल.

| अ.क्रं. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | प्रभाग क्रं.१० आनंदवन कॉलनी मधील अंतर्गत रस्ते तयार करणे. |
| २. | प्रभाग क्रं.१० त्रिमुर्ती कॉलनी गट नं.१९४/१/१ व १९४/१ मधील रस्ते तयार करणे. |
| ३. | प्रभाग क्रं.१० गट नं.१९०/३, १९०/४ बँक कॉलनी मधील रस्ते तयार करणे. |
| ४. | प्रभाग क्रं.१० वृंदावन कॉलनी येथील श्री नाईक यांच्या घरापासुन ते श्री.राजु जाधव यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| ५. | प्रभाग क्रं.१० वृंदावन कॉलनी येथील श्री.सुरेश महाजन यांच्या घरापासुन ते श्री.वाणी यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| ६. | प्रभाग क्रं.१० वृंदावन कॉलनी येथील श्री.अतुल बारी यांच्या घरापासुन ते श्री शिव मंदिरा पर्यंत रस्ता तयार करणे. |
| ७. | प्रभाग क्रं.१० वृंदावन कॉलनी येथील श्री.सुरेश बेहळदे यांच्या घरापासुन ते श्री.सुतार यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| ८. | प्रभाग क्रं.०३ श्रीराम कॉलनी येथील रस्ता तयार करणे. |
| ९. | प्रभाग क्रं.०३ गट नं.९१ दशरथ नगर येथील रस्ता तयार करणे. |
| १०. | प्रभाग क्रं.०३ गट नं.६२ मधील विलास हॉटेल पासुन ते ज्योतिराम पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| ११. | प्रभाग क्रं.०३ गट नं.६२ मधील श्री.महेश चिरमाडे घरापासुन ते स्वामी किराणा पर्यंत रस्ता तयार करणे. |
| १२. | प्रभाग क्रं.०३ गट नं.६२ मधील श्री.चेतन पाटील यांच्या घरापासुन ते श्री.सुमीत पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| १३. | प्रभाग क्रं.०३ गट नं.६२ मधील श्री.किरण कदम यांच्या घरापासुन ते श्री.मणिकलाल पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| १४. | प्रभाग क्रं.०३ गट नं.६२ मधील श्री.दिलीप बाविस्कर यांच्या घरासमोरील रस्ता तयार करणे. |
| १५. | प्रभाग क्रं.०३ गट नं.६२ मधील श्री.महेंद्र पाटील यांच्या घरापासुन ते श्री.मधुकर शिंदे यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| १६. | प्रभाग क्रं.०३ गट नं.६२ मधील श्री.संदीप रामभाऊ पाटील यांच्या घरापासुन ते श्री हरि कडू पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| १७. | प्रभाग क्रं.०३ गट नं.६२ मधील स्वामी किराणा ते श्री.ज्ञानेश्वर पुंडलिक पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| १८. | प्रभाग क्रं.०३ गट नं.६२ मधील श्री.प्रमोद पाटील यांच्या घरापासुन ते श्री.मोहन पवार यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| १९. | प्रभाग क्रं.०१ अंतर्गत धनाजी काळे नगर येथील अंतर्गत रस्ते तयार करणे. |
| २० | प्रभाग क्रं.०१ अंतर्गत धनाजी काळे नगर येथील श्री.कासार यांच्या घरापासुन ते श्री.नारायण उबाळे यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| २१. | प्रभाग क्रं.०१ अंतर्गत धनाजी काळे नगर येथील श्री.बाविस्कर यांच्या घरापासुन ते श्री.कोळी यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| २२. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत महाराणा प्रताप चौक माऊली नगर परिसरातील रस्ते तयार करणे. |
| २३. | प्रभाग क्रं.०३ तळेले कॉलनी येथील दत्त मंदिर परिसरात आर.सी.सी.गटार तयार करणे. |
| २४. | प्रभाग क्रं.१० आनंदवन कॉलनी मधील आर.सी.सी.गटार तयार करणे. |
| २५. | प्रभाग क्रं.०३ तळेले कॉलनी येथील साईबाबा मंदिर परिसरात आर.सी.सी.गटार तयार करणे. |
| २६. | प्रभाग क्रं.१३ मधील चितरंजन नगर मधील आनंद निवास बंगलो परिसरातील रस्ते तयार करणे. |
| २७. | प्रभाग क्रं.१० गट नं.२७७ सोनी नगर येथील रस्ते तयार करणे. |
| २८. | प्रभाग क्रं.१० सोनी नगर येथील अंतर्गत रस्ते तयार करणे. |
| २९. | प्रभाग क्रं.१० गट नं.२७७ सोनी नगर येथील ओपन स्पेस सुशोभिकरण करणे. |
| ३०. | प्रभाग क्रं.०७ पंचशील हाऊसिंग सोसायटी पोहोच रस्ता तयार करणे. |
| ३१. | प्रभाग क्रं.१३ गजानन कॉलनी साईरंग अपार्टमेंट पासुन ते गौरी हाईट पर्यंत रस्ता तयार करणे. |

उक्त ०१ ते ३१ कामांना सार्व.बांधकाम विभाग यांच्या मागणी नुसार मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. दि.१५/०२/२०२३ च्या मनपा सर्वसाधारण (महासभेत) सभेत विविध योजने अंतर्गत शासकीय विभागा मार्फत मागणी केलेल्या ना हरकत दाखले महासभेच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन ना हरकत दाखले देण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली त्यानुसार मागणी केलेले ना हरकत दाखले महासभेच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन ना हरकत दाखले देण्यास आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे त्यानुसार वर नमुद ०१ ते ३१ कामांना ना- हरकत दाखला देण्यास व सदर कामांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

शहर अभियंता यांनी सभागृहात झालेल्या चर्चेनूसार याकामी अटी-शर्ती नमूद कराव्यात तसेच यापूर्वीच्या पारित झालेल्या प्रस्तावांमध्ये ज्याप्रमाणे अटी-शर्ती नमूद केलेल्या आहेत त्याप्रमाणेच कार्यवाही करुन ना-हरकत दाखला देण्याची कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१० :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शहरातील ०१ ते ७० विकास कामे शासन निर्णयानुसार सार्वजनीक बांधकाम विभाग,जळगांव मार्फत करण्याबाबत मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२३० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, उपविभागीय अधिकारी सार्व.बांधकाम उपविभाग,जळगांव यांचे पत्र क्रं.साबांविज/४९५१/२०२३ दि.०७/०७/२०२३ चे पत्र प्राप्त झाले त्यानुसार खाली नमुद ०१ ते ७० कामे हे जळगांव महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास या योजनेअंतर्गत सन २०२३-२४ या वर्षासाठी शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२३/प्र.क्रं.८७- अ-३६/नवि-१६ दि.०७ जुन २०२३ अर्थसंकल्पात मंजुर झालेले असल्याचे पत्रात नमुद आहे. त्या अनुषंगाने सार्व बांधकाम विभागाने महानगरपालिकेकडुन ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | प्रभाग क्रं.०४ अंतर्गत श्री.किशोर झोपे यांच्या घरापासुन श्री.चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| २. | प्रभाग क्रं.०४ अंतर्गत श्री साई सलून पासुन ते श्री.बंडु भाई खाटीक यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ३. | प्रभाग क्रं.०६ अंतर्गत विवेकानंद नगर, संतुलन हॉस्पिटल ते श्री.झोपे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ४. | प्रभाग क्रं.०६ अंतर्गत विवेकानंद नगर, फोटोमी ते श्री.तळवेलकर गुरुजी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ५. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत शंकर आप्पा नगर येथील श्री.वामन पाटील यांच्या घरावजळील परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे. |
| ६. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत संत सेवा महाराज मंदिर श्री.चंदु कहाणे यांच्या घरावजळील परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे. |
| ७. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत गट नं.२/२ब, शिंदे नगर श्री.मंगलसिंग पाटील यांच्या घरापासुन ते श्री.मधुकर पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ८. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत टेलिफोन नगर पश्चिम व पारख नगर परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे. |
| ९. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत देवेंद्र नगर व रायसोनी नगर परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे. |
| १०. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत नवीन पोस्टल कॉलनी, आराधना कॉलनी येथे आर.सी.सी.गटार बांधणे. |
| ११. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत संमित्र कॉलनी व भुषण कॉलनी परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे. |
| १२. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत नेहरु नगर परिसरातील मेहरुण सिटी सर्वे नं.४१२ येथील रस्ता डांबरीकरण करणे. |
| १३. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत साई पार्क, आयोध्या नगर परिसरातील आर.सी.सी.गटार बांधणे. |
| १४. | प्रभाग क्रं.१४ अंतर्गत एकनाथ नगर मधील साईबाबा मंदिर जवळ रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| १५. | प्रभाग क्रं.१४ अंतर्गत एकनाथ नगर मधील श्री.रमेश लाडवंजारी यांच्या घराजवळील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| १६. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत गट नं.१९०/४ मधील नर्मदेश्वर महादेव मंदिर ते श्री.मुकेश बारी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| १७. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत गट नं.१९०/४ मधील श्री.परदेशी यांच्या घरापासुन ते श्री.किरण पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| १८. | प्रभाग क्रं.०६ अंतर्गत दत्त कॉलनी मधील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| १९. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत गट नं.९९/६ येथील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| २०. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत गट नं.५०/१/ब रेणुका माता मंदिर ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे. |
| २१. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत गट नं.३०/१/२८/४ केसी नगर ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे. |
| २२. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत गट नं.१४१/२ महादेव मंदिर ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे. |
| २३. | प्रभाग क्रं.११ अंतर्गत गट नं.१५४/१ वाघ नगर येथील ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड करणे. |
| २४. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत सर्व्हे नं.१४७/१ब ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे. |
| २५. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत गट नं.१० विनायक नगर खेडी ओपनस्पेसला वॉल कंपाऊंड करणे. |

| | |
|---|---|
| २६. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत गट नं.५१/२ काशिनाथ नगर ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |
| २७. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत प्रेम नगर येथील अश्विनी महिला मंडळ जवळील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |
| २८. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत गट नं.०१ महानुभव दफन भुमीला वॉल कंपाऊंड करणे. |
| २९. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत गट नं.६३/१ पत्रकार कॉलनी खेडी ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड करणे. |
| ३०. | प्रभाग क्रं.१४ अंतर्गत गट नं.२६६/१ब विश्वकर्मा नगर येथे ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड करणे. |
| ३१. | प्रभाग क्रं.१९ अंतर्गत गट नं.१६८/२अ सुप्रीम कॉलनी ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड करणे. |
| ३२. | प्रभाग क्रं.१९ अंतर्गत गट नं.१६६/२+३ सुप्रीम कॉलनी ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |
| ३३. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत गट नं.५१/१/१ श्रावण नगर ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड करणे. |
| ३४. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत गट नं.५०/२ अ ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड करणे. |
| ३५. | प्रभाग क्रं.०१ अंतर्गत नाथजोगी स्मशानभुमीला वॉल कंपाऊंड करणे. |
| ३६. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत गट नं.१/२ पांढरे प्लॉट परिसरात आर.सी.सी.गटार तयार करणे. |
| ३७. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत गुरुकृपा रेसेडेन्सी ते बुऱ्हानी प्रोव्हिजन पर्यंत रस्ता तयार करणे. |
| ३८. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत श्री.लोढा यांच्या घरापासुन ते श्री.परदेशी यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| ३९. | प्रभाग क्रं.१९ अंतर्गत श्री.प्रशांत पाटील चौक ते शालिक धनगर यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| ४०. | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत श्री.बन्सीलाल पाटील ते संपू कोळी यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| ४१. | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत ऑफिसर्स क्लब येथे सुशोभिकरण करणे. |
| ४२. | प्रभाग क्रं.०१ अंतर्गत राजमालती नगर येथील बौध्द विहार विकसित करणे. |
| ४३. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत गट नं.१/१ आंबेडकर नगर येथील बौध्द विहार विकसित करणे. |
| ४४. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत पंचशील हाऊसींग सोसायटी येथील गट नं.०५ सप्तशृंगी माता मंदिर सुशोभिकरण करणे. |
| ४५. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत नागवंशी बौध्द विहार विकसित करणे. |
| ४६. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत गट नं.११८/६ व्दारका नगर येथील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |
| ४७. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत गट नं.९० येथील साईबाबा मंदिराजवळील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |
| ४८. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत कृष्णा मोटर्स ते ज्योती ताई यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंकीटीकरण करणे. |
| ४९. | प्रभाग क्रं.१७ अंतर्गत श्री.नारायण गिरधर खडके यांच्या घरापासुन ते श्री.बारी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंकीटीकरण करणे. |
| ५०. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत श्री.वानखेडे यांच्या घरापासुन ते श्री.गुट्टे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंकीटीकरण करणे. |
| ५१. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत बहिणाबाई उदयान सुशोभिकरण करणे. |
| ५२. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत आर.एम.एस. कॉलनी येथे श्री.धनगर यांच्या घरापासुन ते श्री.गुट्टे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंकीटीकरण करणे. |
| ५३. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत श्री.विनोद ढगे यांच्या घरापासुन ते श्री.उदय पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंकीटीकरण करणे. |
| ५४. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत श्री. उदय पाटील यांच्या घरापासुन ते हेरंब अपार्टमेंट पर्यंत रस्ता कॉंकीटीकरण करणे. |
| ५५. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत श्री.विजय नागले यांच्या घरासमोरील रस्ता कॉंकीटीकरण करणे. |
| ५६. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत गणेश प्लाझा ते अशोक बागुल यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंकीटीकरण करणे. |
| ५७. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत श्री.बागुल यांच्या घरापासुन ते हेमंत मेडिकल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. |
| ५८. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत जिव्हाळा नर्सिंग होम शेजारील रस्ता डांबरीकरण करणे. |
| ५९. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत श्री.चंद्रभान पाटील ते बापुसिंग पाटील यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. |
| ६०. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत इंद्रनील सोसायटी मंगलमुर्ती प्लाझा ते हायवे पर्यंत जाणारा रस्ता डांबरीकरण करणे. |
| ६१. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत इंद्रनील सोसायटी सत्यानंद शिसोदे यांच्या घरासमोरील रस्ता डांबरीकरण करणे. |
| ६२. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत इंद्रनील सोसायटी ऑक्सिजन पार्क शेजारील रस्ता डांबरीकरण करणे. |
| ६३. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत इंद्रनील सोसायटी श्री.भास्कर एस पाटील यांच्या घरासमोरील रस्ता डांबरीकरण करणे. |
| ६४. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत इंद्रनील सोसायटी मयुर हाऊसिंग सोसायटी ते हायवे पर्यंत जाणारा रस्ता डांबरीकरण करणे. |
| ६५. | प्रभाग क्रं.०४ अंतर्गत प्रसाद प्रोव्हिजन ते श्री.शिंदे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ६६. | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत गट नं.७८/५ शंकर राव नगर येथील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |
| ६७. | प्रभाग क्रं.०८ अंतर्गत गट नं.११८/३ निमखेडी शिवार येथील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |
| ६८. | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत गट नं.५९ शिव कॉलनी येथील ओपन स्पेस मध्ये खेळणी बसविणे. |
| ६९. | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत गट नं.४५२ संभाजी नगर येथील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |
| ७०. | प्रभाग क्रं.०१ अंतर्गत के.सी. पार्क येथील गट नं.३७१/२ येथील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे. |

दि.१५/०२/२०२३ च्या मनपा सर्वसाधारण (महासभेत) सभेत विविध योजने अंतर्गत शासकीय विभागा मार्फत मागणी केलेल्या ना हरकत दाखले महासभेच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन ना हरकत दाखले देण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली त्यानुसार मागणी केलेले ना हरकत दाखले महासभेच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन ना हरकत दाखले देण्यास आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे त्यानुसार वर नमुद ०१ ते ७० कामांचे ना-हरकत दाखला देण्यास व सदर कामांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

शहर अभियंता यांनी सभागृहात झालेल्या चर्चेनूसार याकामी अटी-शर्ती नमूद कराव्यात तसेच यापूर्वीच्या पारित झालेल्या प्रस्तावांमध्ये ज्याप्रमाणे अटी-शर्ती नमूद केले ल्या आहेत त्याप्रमाणेच कार्यवाही करुन ना-हरकत दाखला देण्याची कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.११ :-** प्रभाग क्र.१० गट नं.२०४/२ पिंप्राळा परिसरातील चौकास संत रुपलाल महाराज चौक असे नामकरण करुन स्व:खर्चाने सदर नावांची सिमेंट कॉंक्रीटची कमान उभारणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** एक मिनीट येथे ११ मध्ये जे आहे. ठिक आहे. माझे अनुमोदन आहे. याच्यासोबतच एक सुचना सुचवतो. पिंप्राळा चौकात शिवाजी महाराजांचा एक अश्वरुळ उभा राहिलेला आहे. त्या चौकाला पण तेथील हरकती घेऊन त्या ठिकाणी देखील त्या चौकाला छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवणेरी असे त्या चौकाचे नांव करण्यात यावे.

**मा.महापौर :-** विषय क्र.११ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. येथे सन्मा.सदस्य उपमहापौर यांनी सुचविलेल्या सुचनेचा सुध्दा समावेश करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२३१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन्मा.सदस्य, सौ.शोभाताई दिनकर बारी यांचे दि.०३/०४/२०२३ अन्वयेचे पत्र प्राप्त झाले असुन त्यांनी प्रभाग क्र.१० गट नं.२०४/२ पिंप्राळा परिसरातील चौकास संत रुपलाल महाराज चौक असे नामकरण करुन स्व:खर्चाने सदर नावांची सिमेंट कॉंक्रीटची कमान उभारणे कामी परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव महासभेपुढे सादर करण्यास व त्यास मंजुरी देण्यात यावी अशी मागणी केली आहे.

या कामी स्थळ निरिक्षण केले असता या परिसरास यापुर्वी कोणतेही नांव दिले असल्याचे दिसुन किंवा आढळुन येत नाही. तसेच स्थानिक नागरिक यांना विचारणा केली असता कोणतेही नांव या परिसरात दिलेले नाही. याबाबत स्थानिक वृतपत्रात दै.दिव्य मराठी मध्ये दि.१५/०७/२०२३ रोजी जाहिर सुचना प्रसिध्द करुन हरकती मागविले होत्या या बाबत ०५ दिवसाची मुदत दिली असुन या बाबत कोणत्याही हरकती प्राप्त झाल्या नसल्याने प्रभाग क्र.१० गट नं.२०४/२ पिंप्राळा परिसरातील चौकास "संत रुपलाल महाराज चौक" असे नामकरण करुन स्व:खर्चाने सदर नावांची सिमेंट कॉंक्रीटची कमान उभारणेस महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार मा.उपमहापौर यांनी केलेल्या सूचनेनूसार पिंप्राळा येथील मेन चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे राहीलेले आहे त्या चौकाला हरकती किंवा नोटीस देवुन त्याठिकाणी त्या चौकाला "शिवनेरी चौक" असे नामकरण करण्यात यावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१२ :-** प्रभाग क्र.०९ गट नं.१३ पिंप्राळा चौकास भगवान बारी चौक असे नामकरण करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन्मा.सदस्या, सौ.शोभा दिनकर बारी यांचे दि.०३/०४/२०२३ चे पत्र जशमनपा सार्व.बांधकाम पदाधिकारी/ आ.क्र./२६ दि.१३/०४/२०२३ अन्वयेचे पत्र प्राप्त झाले असुन त्यांनी प्रभाग क्र.०९ गट नं.१३ पिंप्राळा चौकास भगवान बारी चौक असे नामकरण करणेबाबत परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव महासभेपुढे सादर करण्यास व त्यास मंजुरी देण्यात यावी अशी मागणी केली आहे.

या कामी स्थळ निरिक्षण केले असता या परिसरास यापुर्वी कोणतेही नांव दिले असल्याचे दिसुन किंवा आढळुन येत नाही. तसेच स्थानिक नागरिक यांना विचारणा केली असता कोणतेही नांव या परिसरात दिलेले नाही. याबाबत स्थानिक वृत्तपत्रात दै.दिव्य मराठी मध्ये दि.१५/०७/२०२३ रोजी जाहिर सुचना प्रसिध्द करुन हरकती मागविले होत्या या बाबत ०५ दिवसाची मुदत दिली असुन या बाबत कोणत्याही हरकती प्राप्त झाल्या नसल्याने प्रभाग क्र.०९ गट नं.१३ पिंप्राळा चौकास “भगवान बारी” चौक असे नामकरण करणेस महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१३ :-** प्रभाग क्र.०९ गट नं.१/२ परिसरात यश नगर असे नामकरण करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२३३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन्मा.सदस्या, सौ.शोभा दिनकर बारी यांचे दि.०३/०४/२०२३ अन्वये चे पत्र प्राप्त झाले असुन त्यांनी प्रभाग क्र.०९ गट नं.१/२ परिसरात यश नगर असे नामकरण करणेबाबत परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव महासभेपुढे सादर करण्यास व त्यास मंजुरी देण्यात यावी अशी मागणी केली आहे.

याकामी स्थळ निरिक्षण केले असता या परिसरास यापुर्वी कोणतेही नांव दिले असल्याचे दिसुन किंवा आढळुन येत नाही. तसेच स्थानिक नागरिक यांना विचारणा केली असता कोणतेही नांव या परिसरात दिलेले नाही. याबाबत स्थानिक वृत्तपत्रात दै.दिव्य मराठी मध्ये दि.१५/०७/२०२३ रोजी जाहिर सुचना प्रसिध्द करुन हरकती मागविले होत्या याबाबत ०५ दिवसाची मुदत दिली असुन या बाबत कोणत्याही हरकती प्राप्त झाल्या नसल्याने प्रभाग क्र.०९ गट नं.१/२ परिसरात “यश नगर” असे नामकरण करणेस महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१४ :-** शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान - जळगांव विभाग (शिवतीर्थ मैदान येथे) धर्म ध्वजस्तंभाची उभारणी करणेस परवानगी मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२३४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अर्जदार शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान,जळगांव विभाग यांनी श्री.छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक (शिवतिर्थ मैदान जि.एस.ग्राऊंड) येथे ५१ फुट उंचीचा धर्मध्वजस्तंभ उभारणी करणेची संपूर्ण जबाबदारी श्री.शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान मार्फत सर्व शिवप्रेमी घेण्यास तयार आहे. तसेच भविष्यात धर्म ध्वजस्तंभाची देखभाल दुरुस्ती व निगा राखणे इत्यादी कामे करण्याची तयारी दर्शविली आहे.

शिवतीर्थ मैदान येथे श्री.छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकुती पुतळा असुन पुतळयाच्या पाठीमागील बाजुस असलेल्या मोकळया जागेत ध्वजस्तंभाची उभारणी करता येवु शकते. परंतु श्री.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या फाउंडेशनला कोणत्याही प्रकारे धक्का न पोहचविता प्रस्तृतच्या ध्वजस्थंभाची उभारणी करणे बाबत परवानगी देता येईल.

अर्जदार यांना खालील अटी व शर्तीस बंधनकारक राहुन परवानगी देता येईल.

अटी व शर्ती :-

१) प्रस्तुत कामाचा संपुर्ण खर्च शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान यांनी करावयाचा आहे. सदर कामी होणारा खर्च भविष्यात देखील आपल्या संस्थेस मनपा मार्फत देण्यात येणार नाही.

२) प्रस्तुत काम अनुभवी स्ट्रक्चरल इंजिनिअर मार्फत व त्यांच्या मार्गदर्शनाखाली करावे व पुतळयास कोणत्याही प्रकारची हानी पोहचणार नाही याची जबाबदारी घ्यावी लागेल.

३) सदरच्या ध्वजस्तंभाची देखभाल व दुरुस्ती व निगा राखणे याची संपुर्ण जबाबदारी आपल्या संस्थेची राहील.

४) सदरच्या ध्वजस्तंभाचे व ध्वजाचे संपुर्ण मालकी हक्क मनपा कडे राहील.

५) प्रस्तृत कामाबाबत कोणत्याही न्यायालयीन वाद अथवा दावा दाखल झाल्यास त्यास मनपा जबाबदार राहणार नाही.

६) प्रस्तुत कामास विरोध झाल्यास सदरची परवानगी नाकारण्याचा अधिकार मनपास राहील त्या बाबत आपली कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही.

७) भविष्यात मनपास सदर जागेची आवश्यकता भासल्यास आपणास स्वखर्चाने ध्वजस्तंभ काढुन घ्यावा लागेल.

वरील अटी व शर्तीस बंधनकारक राहुन शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान - जळगांव विभाग यांना श्री.छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक (शिवतिर्थ मैदान जि.एस.ग्राऊंड) येथे धर्म ध्वजस्तंभाची उभारणी करणेस परवानगी देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१५ :-** मेहरुण तलावाच्या परिसरात हुतात्मा स्मारक व उंच तिरंगा स्तंभ उभारणे व त्याचे सुशोभिकरण करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्यात येत असुन त्या निमित्ताने शासनाच्या सुचनेनुसार शहरातील पाणथळयाच्या ठिकाणी हुतात्मा स्मारक उभारणे कामी सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील मेहरुण तलाव येथे त्या अनुषंगाने हुतात्मा स्मारक व उंच तिरंगा स्तंभ उभारण्याकामी व परिसर सुशोभिकरण करण्याकामी जागा सुनिश्चित करण्यात आली असुन त्यासाठी शहरातील जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.

आणि भवरलाल & कांताबाई जैन फाऊंडेशन ही संस्था स्वखर्चाने हुतात्मा स्मारक व उंच तिरंगा स्तंभ उभारण्याकामी व परिसर सुशोभिकरण करण्यास व त्याची संपुर्ण देखभाल व व्यवस्था स्वखर्चाने ठेवण्यास तयार असुन त्यांनी त्याबाबत दिलेले पत्र या विभागास प्राप्त झालेले आहे. सदर संस्थेने यापुर्वी देखील शहरातील अनेक भागात स्वखर्चाने विविध उपक्रम राबवुन शहराच्या सौंदर्यीकरणात व सुशोभिकरणात मोलाची भर घातलेली आहे. त्याअनुषंगाने मेहरुण तलाव येथील पूर्व दक्षिण बाजुस असलेल्या तलावाच्या जागेत स्वखर्चाने हुतात्मा स्मारक उभारण्यास व उंच तिरंगा स्तंभ उभारण्यास व परिसर सुशोभिकरण करण्यास महानगरपालिकेच्या अटी शर्तीस बंधनकारक राहुन परवानगी देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१६ :-** महानगरपालिका प्रशा.ईमारत लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल टॉवर या ठिकाणी नव्याने बसविण्यात आलेल्या एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई या कंपनीच्या ६ उद्वाहकांच्या वार्षीक देखभाल दुरुस्ती (AMC) कामी एजन्सीची नियुक्ती करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका प्रशा.ईमारत लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल टॉवर या ठिकाणी नव्याने बसविण्यात आलेल्या एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई या कंपनीच्या ६ उद्वाहकांचा हमी कालावधी संपल्याने वार्षीक देखभाल दुरुस्ती (AMC) कामी एजन्सीची नियुक्ती करणे आवश्यक असल्याने प्रथम मुळ मक्तेदार एस्के ईलेव्हेटर्स प्रा.लि.मुंबई यांना पत्र देवून दर मागविले असता त्यांनी मनपा आवक क्रं.१२६४४ दि.२३/१२/२०२३ अन्वये रक्कम रु.३७,७०,६९०/- मात्रचे दर सादर केलेले होते. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मुळ मक्तेदार (एजन्सी) यांना वाटाघाटी/दर कमी करण्यासाठी पत्र देवून आमंत्रित केले असता त्यांनी त्यांचे पत्र देवून दर कमी करण्याबाबत असमर्थता दर्शविली असल्याने मा.महापौर सो यांची कार्योत्तर मान्यता घेवून (म.महासभा ठराव क्रं.१०२८ दि.२१/०३/२०२३ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.) https:/mahatenders gov.in वर ई-निविदा प्रसिध्द करणे कामी शहर अभियंता यांची मान्यता घेवून ई-निविदा सुचना क्रं.२०५ प्रसिध्द करुन त्याबाबतचे माहिती पत्रक दै.नवभात टाईम्स,मुंबई या वृत्तपत्रात दि.१८/०४/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आले. बीड सबमीशनच्या विहित मुदतीत दोनच मक्तेदारांनी सहभाग घेतला.

सदरची ई-निविदा स्पर्धात्मक होण्याच्या दृष्टीने दि.२१/०३/२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तदनंतर विहित मुदतीत शासनाच्या वेब साईटवर https:/mahatenders gov.in एकुण तिन ई निविदाधारकांनी सहभाग घेतला असता त्यातील आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पाहता लघुत्तम निविदा धारक/मक्तेदार अंबीका इलेक्ट्रीकल्स,धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १३.७८% कमीचे आलेले होते. त्यानुसार सदर कामी एकुण रक्कम रु.३२,५१,०००/- मात्रचा खर्च अपेक्षीत होता. लघुत्तम ई-निविदाधारक अंबीका इलेक्ट्रीकल्स,धुळे यांचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार अंबीका इलेक्ट्रीकल्स,धुळे यांना उदवाहनाच्या दराबाबत वाटाघाटीसाठी आंमत्रित करण्यात आलेले होते. शहर अभियंता यांच्या समवेत झालेल्या चर्चेनुसार त्यांनी दि.०८/०६/२०२३ रोजी नवीन सुधारीत दर दिलेले होते. त्यानुसार जळगांव शहर महानगरपालिकेने सदरचे काम हे ०१ वर्षा ऐवजी ०३ वर्षाकरिता दिल्यास आमचे दर हे रक्कम रु.३२,३१,०००/- मात्र प्रति वर्ष असा असेल सदरच्या दरात आम्ही ०३ वर्षात कुठलीही दरवाढ मागणार नाही. तसेच आपण काढलेलया ई-निविदेत मी सादर केलेले दर हे एका वर्षासाठी दिलेले असुन सदरचे काम एका वर्षासाठी

करावयाचे झाल्यास मी सादर केलेल्या रक्कम रु.३२,५१,०००/- मात्रच्याच रक्कमेत काम करण्यास तयार आहे असे पत्र अंबीका इलेक्ट्रीकल्स,धुळे यांनी मनपास दिलेले होते.

मुळ उत्पादक कंपनी एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई यांनी सुरुवातीस दि.८/१२/२०२२ रोजीचे पत्रानुसार त्यांच्या कंपनीच्याच ६ उदवाहकांचा वार्षीक देखभाल दुरुस्ती (AMC) कामी रक्कम रु.३७,७०,६९०/- मात्रचा खर्च दिलेला होता. तदनंतर मनपाचे सदर दर जास्तीचे असल्याने त्यांना वाटाघाटी करणे कामी आमंत्रित केले होते. परंतु त्यांनी दि.०८/०२/२०२३ रोजीचे पत्रात कुठलेही वाटाघाटी न करणेबाबत कळविले होते. तदनंतर मनपामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. ई-निविदा प्रक्रियेमध्ये मुळ उत्पादक कंपनी एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई यांनी सहभाग घेतलेला नाही तथापी सदर कामाची ई-निविदा प्रक्रिया सुरु असतांना व दराचा लिफाफा क्रं.२ उघडणेपूर्वी मक्तेदार एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई यांनी दिलेल्या मनपास प्राप्त झालेल्या दि.०६/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर कामी एक वर्षाकरिता ६ उदवाहकांचा वार्षीक देखभाल दुरुस्ती (AMC) (comprensive maintanance) कामी रक्कम रु.२४,००,०००/- मात्रचा दर दिलेला होता.

मुळ उत्पादक कंपनी एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई यांनी निविदेत सहभाग न घेता सदर कामाचा एक वर्षाचा ६ उदवाहकांचा वार्षीक देखभाल दुरुस्ती (AMC) कामी रक्कम रु.२४,००,०००/- (GSTसह) मात्रचा दर दिलेला होता. तथापि सदरहु दर हे प्रत्यक्षात निविदा प्रक्रियेत भाग न घेता निविदा प्रक्रिया सुरु असतांना निविदा दराचे पाकिट उघडण्याचे अगोदर पत्राव्दारे कळविलेले आहेत. तसेच वरीलप्रमाणे अंबीका इलेक्ट्रीकल्स,धुळे ई-निविदेत सहभाग घेवून सदर कामाचा एक वर्षाचा ६ उदवाहकांचा वार्षीक देखभाल दुरुस्ती (AMC) कामी रक्कम रु.३२,५१,०००/- मात्रचा दर तसेच सदरचा कामाचा कालावधी हा ०१ वर्ष ऐवजी ०३ वर्ष देण्यात आल्यास दर हे रक्कम रु.३२,३१,०००/- मात्र प्रति वर्ष असा दिलेला आहे. ई-निविदेत सहभागी लघुत्तम दर असलेले निविदाधारक अंबीका इलेक्ट्रीकल्स,धुळे यांचे दर अवाजवी असल्याने यांचे दर स्विकारणे योग्य नसल्याचे निविदा समितीने अभिप्राय दिलेले आहे.

मुळ उत्पादक एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई यांनी १००% अग्रीम धनाची मागणी केलेली असून त्यांचे प्रस्तावात दि.०१/०४/२०२३ ते दि.३१/०३/२०२४ असा कालावधी नमुद केलेला होता. सदर मुळ कंपनीने यापुर्वी कॉम्प्रेसीव्ह वार्षीक देखभाल दुरुस्ती कामी १ वर्ष कालावधी करिता रक्कम रु.३७,७०,६९०/- मात्रचे दर दिलेले होते. त्यांनी दर कमी करुन रु.२४ लक्ष मात्र या दरात काम करणेची तयारी दर्शविलेली आहे. एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई यांचे १ वर्ष कालावधी करिताचे रक्कम रु.२४,००,०००/- मात्रचे दर हे निविदेतील लघुत्तम निविदाधारक अंबीका इलेक्ट्रीकल्स,धुळे यांचे आलेले लघुत्तम दरापेक्षा कमीचे असल्याने सदरचे दर स्विकारणेस हरकत नसल्याबाबत निविदा समितीने अभिप्राय दिलेला आहे. तसेच ही कंपनी मुळ उत्पादक कंपनी असल्याने त्यांचेकडेस उदवाहक दुरुस्ती कामी लागणारे विविध सुटेभाग यांची उपलब्धता सहजरित्या होणार असल्याने तसेच उदवाहकांचे प्रोग्रॅमींग मध्ये काही तांत्रिक दोष निर्माण झाल्यास ते मुळ उत्पादक कंपनी असल्याने व त्यांचेकडे प्रोग्रॅमींगचा संपुर्ण डाटा उपलब्ध असल्याने तांत्रिक दोष लवकरात लवकर दुर करता येणे शक्य आहे. यांचे वाजवी दर त्यांनी दिलेली १००% अग्रीम धनाची मागणीची अट मान्य न करता स्विकारणेस हरकत नाही. मुळ उत्पादक कंपनी एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई यांना त्यांचे दर मंजुर झालेपासुन त्यांचेशी करण्यात येणाऱ्या दर कराराच्या दिनांका पासून १ वर्ष कालावधीपर्यंत तसेच झालेल्या करारानुसार दर तीन महिन्यानीं देयकाची अदायगी करता येईल. एकंदरीत महानगरपालिकेच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजात उदवाहक बंद अभावी अडचण निर्माण होणार नाही.

या करिता तात्काळ AMC कामी एजन्सी नियुक्त करणे आवश्यक असल्याने मुळ उत्पादक कंपनी यांना AMC चा मक्ता देणे उचित होईल. उदवाहकांचा AMC कामी निविदा प्रक्रिया अंती लघुत्तम निविदाधारक अंबीका इलेक्ट्रीकल्स,धुळे यांचे आलेले लघुत्तम दर हे अवाजवी असल्याने व ते दर स्विकारणे महानगरपालिकेच्या हिताचे नसल्याने निविदा अटीशर्तीनुसार कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे हे मनपा आयुक्त यांचे अधिकार असल्याने व शासन निर्णय क्रं./भांखस-२०१४/प्रक्रं.८२/भाग-III/उदयोग-४ दि.१ डिसेंबर २०१६ अन्वये परिपत्रकामधील मुद्दा क्रं.५.५ मधील बाबीनुसार सदरची निविदा प्रक्रिया रद्द करण्यास निविदा समितीने शिफारस केलेली आहे.

मुळ उत्पादक कंपनी एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई यांचे दर रक्कम रु.२४ लक्ष मात्र आहेत. रक्कम रु.२५ लक्ष पर्यंतच्या खर्चाच्या मान्यतेसह संविदा करण्याचे अधिकार आयुक्त यांना आहे. तथापी मुळ कंपनी एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई यांनी ई-निविदेत सहभाग घेतलेला नाही. शासन निर्णय क्रं./भांखस-२०१४/प्रक्रं.८२/भाग-III/उदयोग-४ दि.१ डिसेंबर २०१६ अन्वये परिपत्रकामधील मुद्दा क्रं.३.२.७ मधील बाबीनुसार मुळ उत्पादक कंपनीचे प्रस्ताव स्विकारणे

बाबतची तरतुद आहे. मुळ उत्पादक कंपनी एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई यांचे सदरचे दर योग्य असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ संविदा प्रकरण ५ नियम २ (२) मध्ये असलेले तरतुदीनुसार निविदा न मागविता आयुक्त यांना मुळ उत्पादक कंपनीचे दर (१००% अग्रीम धनाची मागणीची अट मान्य न करता) स्विकारुन त्यांचेशी संविता करता येईल. तथापी या करिता स्थायी सिमतीची मान्यता तथा स्थायी समितीने संविदा करणेस आयुक्त यांना प्राधिकृत करणे आवश्यक आहे.

कामाची निकड विचारात घेता महानगरपालिका प्रशा.ईमारत लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल टॉवर या ठिकाणी नव्याने बसविण्यात आलेल्या एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई या कंपनीच्या ६ उद्वाहकांच्या वार्षीक देखभाल दुरुस्ती (AMC) कामी एजन्सीची नियुक्ती करणे कामी सुरु असलेली निविदा प्रक्रिया रद्द करणेस तसेच मुळ उत्पादक कंपनी एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई यांचे दर प्रति वर्ष रक्कम रु.२४ लक्ष स्विकारणेसह मक्तेदार यांनी सहमती दर्शविल्यास दोन वर्षाकरिता वार्षीक देखभाल दुरुस्तीचा मक्ता देणेस, येणारे पर्यायी खर्चास व मुळ उत्पादक कंपनी एस्के एलेव्हेटर्स प्रा.लि. मुंबई यांचेशी संविदा करणेस आयुक्त यांना प्राधिकृत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१७ :-** १७ मजली प्रशासकीय ईमारत/वल्लभदास वालजी मार्केट (गोलाणी मार्केट) येथे सोलर एनर्जी पॉवर प्लॅन्टची उभारणी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेच्या १७ मजली प्रशासकीय ईमारत/वल्लभदास वालजी मार्केट (गोलाणी मार्केट) च्या व्यापारी संकुल छतावर सोलर एनर्जी पॉवर प्लॅन्टची / संयत्र बसविणे बाबत महापौर यांनी सुचना केलेल्या होत्या. नगररचना विभागाकडील माहितीनुसार व.वा.व्यापारी संकुलाच्या छताची जागा ही साधारण ७५ हजार स्क्वे.फुट इतके आहे. सदरचा प्रकल्प राबविण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देणे बाबत व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य ऊर्जा विकास अभिकरण जळगांव यांना इकडील पत्र जा.क्र/विदयुत/१७३/२०२२-२३ दि.२५/०८/२०२२ अन्वये पत्र देवून व्यापारी संकुलाच्या छतावर सोलर एनर्जी प्लॅन्टची उभारणी करुन त्याची जोडणी प्रशासकीय ईमारतीच्या विज कनेक्शनला देण्याचे प्रस्तावित असून या संदर्भात सोलर एनर्जी प्लॅन्ट उभारणीचा प्रकल्प राबविण्याकामी केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या योजना संदर्भात माहिती तसेच अनुदान उपलब्धतेबाबत माहिती मागविण्यात आलेली होती. जिल्हा व्यवस्थापक महाऊर्जा जिल्हा कार्यालय जळगांव यांनी उत्तरादाखल त्यांच्याकडील पत्र क्रं./जि.का.ज./शा.ई./२०२२-२३/१५१ दि.२७/०९/२०२२ च्या पत्रान्वये सदयस्थितीत अशा प्रकल्पांना अनुदान उपलब्ध नाही, सदर प्रकल्पासाठीचा खर्च स्वनिधीतुन करावा लागेल, नेट मिटरची मर्यादा ५०० किलो वॅट क्षमतेची, लोड वाढविणे व महावितरणाशी निगडीत बाबींचा खर्च महापालिकेस करावा लागेल, विदयुत देयक निरंक असणे अनिवार्य तसेच थकबाकी असल्यास ती निरंक करावी, महानगरपालिकेकडुन प्रस्ताव प्राप्त झाल्यास प्राथमिक सर्वेक्षणाची कार्यवाही महाऊर्जा विभागाकडुन केली जाईल याकामी शासन निर्णय नुसार एकुण प्रकल्प खर्चाच्या १% (18% GST सह) महाऊर्जास अदा करावा लागेल अशा स्वरुपाचे पत्र दिलेले आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय ईमारतीचे विज देयक दरमहा सरासरी २ लक्ष इतके असुन व.वा.व्यापारी संकुलाच्या छतावर सोलर एनर्जी प्लॅन्ट / संयत्र महाऊर्जा विभागाशी समन्वय करुन

त्यांचे मार्गदर्शनाखाली कार्यान्वीत केल्यास जळगांव शहर महानगरपालिकेचे साधारणता वार्षीक २४ लक्ष रुपये विज देयकापोटीची बचत होणार असल्याने १७ मजली प्रशासकीय ईमारत/वल्लभदास वालजी मार्केट (गोलाणी मार्केट) येथे सोलर एनर्जी पॉवर प्लॅन्टची उभारणी करणेस तसेच या कामी येणाऱा अनुषंगीक खर्च शासकीय निधी अथवा CSR निधीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१८ :-** श्री.संजय गुलाब लोंढे, लिपीक यांची सेवा यवतमाळ जिल्हयातील (स्व:जिल्हयातील) नगरपरिषद आर्णी/नगरपंचायत मारेगाव अथवा स्व:जिल्हयातील कोणतीही नगरपरिषद/नगरपंचायत येथे लिपीक संवर्गातील रिक्त पदावर बदलीने नेमणूक होणेकामी विशेष बाब म्हणून मान्यतेचा ठरावाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** १८ व १९ दोघी मंजुर करण्यात यावे. आणि यांना या महिन्या अखेर रिलिज करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** यामध्ये सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊंनी मांडलेल्या सुचनेनुसार त्यांना लवकरात लवकर करावे. सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊंनी मांडलेल्या सुचनेची नोंद घ्यावी. विषय क्र.१८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२३८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.संजय गुलाब लोंढे यांचा दि.०५/११/२०२०, दि.२९/१२/२०२०, दि.१२/१०/२०२१ व दि.११/११/२०२२ चे अर्ज प्राप्त झालेले असून श्री.संजय गुलाब लोंढे यांनी, मारेगाव नगर पंचायत / आर्णी नगर परिषद जि.यवतमाळ यांचेकडेस असलेल्या लिपीक संवर्गातील रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणूक देणेबाबत, ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत म.न.पा.सभेचा निर्णय घेऊन तसा ठराव पारीत करुन मिळण्याची विनंती केली आहे.

श्री.संजय गुलाब लोंढे यांचा म.न.पा. सेवेचा कार्यकाळ सुमारे १० वर्षाचा झाला आहे. उक्त बाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करता श्री.संजय गुलाब लोंढे यांचा जिल्हा बदलीने पदस्थापना देणेबाबतचा विशेष बाब म्हणुन दि.११/११/२०२२ च्या अर्जानुसार विशेष बाब म्हणून केलेली विनंती अर्जास आयुक्त,म.न.पा.जळगांव यांनी मान्यता दिलेली आहे. शासनाने आंतरजिल्हा बदलीस विशेषबाब म्हणून मान्यता दिलीतरी सदयस्थितीत जळगांव महानगरपालिकेत कर्मचारी संख्या कमी असून आकृतीबंध शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. आकृतीबंध मान्यतेनंतर नविन कर्मचारी भरती प्रक्रिया झालेवर अनुकंपा तत्वावर किंवा मनपाला कर्मचारी उपलब्ध झालेनंतरच प्रशासनाने श्री.संजय गुलाब लोंढे यांना जळगांव मनपा येथून आंतर जिल्हा बदलीच्या जागी हजर होणेस कार्यमुक्त करणे योग्य राहील. असा महासभा ठराव क्र.९६७ दि.२३/१२/२०२२ पारीत झालेला आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र.ज.म.न.पा./आस्था/२३८९/२०२३ दि.१३/०२/२०२३ अन्वये मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. तसेच मा.कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांचेकडील दि.१४/०२/२०२३ व दि.२७/०२/२०२३ रोजीच्या ई-मेल संदेश वरुन इकडील पत्र क्र.ज.म.न.पा./आस्था/२६३१/२०२३ दि.०८/०३/२०२३ अन्वये कागदपत्रे पाठविण्यात आलेले आहे.

श्री.संजय गुलाब लोंढे यांची सेवा बदलीने मारेगाव नगर पंचायत, जि.यवतमाळ यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्याबाबतच्या शासन निर्णय क्र.जमपा-२०२३/प्र.क्र.१४२/नवि-२५ दि.२३ जून, २०२३ प्राप्त झालेला असून त्याची एक छायांकित प्रत श्री.लोंढे यांना जा.क्र./आस्था/७८/२०२३ दि.१०/०७/२०२३ अन्वये देण्यात आलेली आहे. त्यामध्ये खालीप्रमाणे अटी व शर्ती नमुद आहेत.

| | |
|---|---|
| १) | सदरच्या प्रस्तावास जळगांव महानगरपालिका व मारेगाव नगरपंचायत यांनी ठराव करुन दिलेल्या सहमतीनुसार मान्यता देण्यात येत आहे. |
| २) | बदलीने नियुक्ती झाल्यानंतर श्री.लोंढे यांना सेवाजेष्ठतेबाबत कोणतेही हक्क मागता येणार नाही. |
| ३) | श्री.लोंढे यांची त्याच्या विनंतीनुसार बदली करण्यात येत असल्याने, सदर बदलीच्या अनुषंगाने त्यांना पदग्रहण अवधी, बदली अनुदान, प्रवास भत्ता व तदनुषंगिक लाभ अनुज्ञेय होणार नाहीत. |
| ४) | या बदलीच्या संदर्भात कोणतेही न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.<br>०२. आयुक्त,जळगांव महानगरपालिका,जळगांव यांना कळविण्यात येते की, श्री.संजय गुलाब लोंढे, लिपीक यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याकरीता त्यांच्या सेवा विषयक बाबींची पुर्तता करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच, मुख्याधिकारी, मारेगाव नगरपंचायत यांनी, श्री.संजय गुलाब लोंढे,लिपीक यांना मारेगाव नगरपंचायत येथील लिपीक या समकक्ष पदावर रुजू करुन घेण्याबाबत कार्यवाही करावी. |

उपरोक्त अट क्र.१ पाहता सदरच्या प्रस्तावास जळगांव महानगरपालिका व मारेगाव नगरपंचायत यांनी ठराव करुन दिलेल्या सहमतीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

मारेगाव नगर पंचायत कडील दि.०३/११/२०२० चा ठराव / ना-हरकत पहाता त्यात श्री.लोंढे ज्या संवर्गातून लागलेले आहेत त्या संवर्गाचे पद रिक्त असल्यामुळे त्यांना रिक्त पदावर घेण्यास तयार आहे अशी मान्यता दिसून येते. मात्र मारेगाव नगरपंचायत यांचेकडील ठराव / ना-हरकत दाखल्यात प्रवर्गाचे पद रिक्त असलेबाबत नमुद नाही. शासन निर्णय दिनांक १५/०५/२०१९ मधिल मार्गदर्शक सुचना ८.(४) मध्ये नमुद केलेनुसार संबंधित कर्मचाऱ्याची नियुक्ती सामाजिक आरक्षणानुसार ज्या प्रवर्गातील आहे. त्या प्रवर्गाचे रिक्त पद उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्या प्रवर्गातुन नियुक्ती झाली आहे तो प्रवर्ग बदलून अन्य प्रवर्गाच्या पदावर कायमस्वरुपी समावेशन अनुज्ञेय राहणार नाही. तसेच शासन निर्णयासोबतच्या नमुना आदेशात श्री.लोंढे यांची ज्या संवर्गातून व प्रवर्गातून नियुक्ती झालेली आहे. त्या संवर्गाचे व प्रवर्गाचे पदाबाबत त्यांच्या कार्यमुक्ती आदेशात नमुद करणेबाबत नमुद आहे. मात्र त्याबाबतचा कोठेही उल्लेख मारेगाव नगरपंचायत यांचे ठरावात वा ना-हरकत पत्रात दिसुन येत नाही. त्यामुळे शासन निर्णय क्र.जमपा-२०२३/प्र.क्र.१४२/नवि-२५ दि.२३ जून, २०२३ अन्वये मारेगाव नगर पंचायत, जि.यवतमाळ यांच्या आस्थापनेवर सेवा वर्ग करण्याबाबत शासन निर्णयान्वये श्री.लोंढे यांना तात्काळ कार्यमुक्त करण्यास मान्यता दिलेली आहे त्याअनुषंगाने श्री.संजय गुलाब लोंढे यांना कार्यमुक्त करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच दि.१५/०५/२०१९ च्या शासन निर्णयात नमुद केलेनुसार श्री.संजय गुलाब लोंढे ज्या संवर्गातून, प्रवर्गातून लागलेले आहेत त्यासंवर्गाचे पदावर मारेगाव येथे रुजू होणेसाठी कार्यमुक्त करावे असे प्रस्तावात नमूद केल्यानूसार श्री.संजय गुलाब लोंढे यांना कार्यमुक्त करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाचा प्रस्ताव व शासन निर्णय क्र.जमपा-२०२३/प्र.क्र.१४२/नवि-२५ दि.२३ जून, २०२३ नूसार श्री.संजय गुलाब लोंढे,लिपीक यांना मारेगाव नगर पंचायत, जि.यवतमाळ या बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याकरीता सभागृहात झालेल्या चर्चेनूसार दिनांक ३१ ऑगस्ट २०२३ पूर्वी तात्काळ कार्यमुक्त करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१९ :-** श्री.गणेश गंभीर आडे, लिपीक यांची सेवा यवतमाळ जिल्हयातील (स्व:जिल्हयातील) नगरपरिषद आर्णी/नगरपंचायत मारेगाव अथवा स्व:जिल्हयातील कोणतीही नगरपरिषद/नगरपंचायत येथे लिपीक

संवर्गातील रिक्त पदावर बदलीने नेमणूक होणेकामी विशेष बाब म्हणून मान्यतेचा ठरावाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा आणि त्यांना या महिने अखेरपर्यंत रिलिज करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, नितीनभाऊंनी सांगितल्याप्रमाणे विषय क्र.१८ आणि १९ या महिन्याच्या ३१ तारखेपर्यंत त्यांना कार्यमुक्त करण्यात यावे. १ तारखेला त्यांची सही तिकडे झाली पाहिजे अश्या पध्दतीने लवकरात लवकर करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२३९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.गणेश गंभीर आडे यांचा दि.०५/११/२०२०, दि.२९/१२/२०२०, व दि.११/११/२०२२ चे अर्ज प्राप्त झालेले असून श्री.गणेश गंभीर आडे यांनी, मारेगाव नगर पंचायत / आर्णी नगर परिषद जि.यवतमाळ यांचेकडेस असलेल्या लिपीक संवर्गातील रिक्त पदावरील जागी बदलीने नेमणूक देणेबाबत, ना-हरकत पत्र मिळणेस व त्याबाबत म.न.पा.सभेचा निर्णय घेऊन तसा ठराव पारीत करुन मिळण्याची विनंती केली आहे.

श्री.गणेश गंभीर आडे यांचा म.न.पा. सेवेचा कार्यकाळ सुमारे १० वर्षाचा झाला आहे. उक्त बाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करता श्री.गणेश गंभीर आडे यांचा जिल्हा बदलीने पदस्थापना देणेबाबतचा विशेष बाब म्हणुन दि.११/११/२०२२ च्या अर्जानुसार विशेष बाब म्हणून केलेली विनंती अर्जास आयुक्त,म.न.पा.जळगांव यांनी मान्यता दिलेली आहे. शासनाने आंतरजिल्हा बदलीस विशेषबाब म्हणून मान्यता दिलीतरी सदयस्थितीत जळगांव महानगरपालिकेत कर्मचारी संख्या कमी असून आकृतीबंध शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. आकृतीबंध मान्यतेनंतर नविन कर्मचारी भरती प्रक्रिया झालेवर अनुकंपा तत्वावर किंवा मनपाला कर्मचारी उपलब्ध झालेनंतरच प्रशासनाने श्री.गणेश गंभीर आडे यांना जळगांव मनपा येथून आंतर जिल्हा बदलीच्या जागी हजर होणेस कार्यमुक्त करणे योग्य राहील. असा महासभा ठराव क्र.९६८ दि.२३/१२/२०२२ पारीत झालेला आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र.ज.म.न.पा./आस्था/२३९६/२०२३ दि.१४/०२/२०२३ अन्वये मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. तसेच मा.कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांचेकडील दि.२४/०२/२०२३ व दि.२७/०२/२०२३ रोजीच्या ई-मेल संदेश वरुन इकडील पत्र क्र.ज.म.न.पा./आस्था/२६३३/२०२३ दि.०८/०३/२०२३ अन्वये कागदपत्रे पाठविण्यात आलेले आहे.

श्री.गणेश गंभीर आडे यांची सेवा बदलीने आर्णी नगरपरिषद, जि.यवतमाळ यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्याबाबतच्या शासन निर्णय क्र.जमपा-२०२३/प्र.क्र.१४१/नवि-२५ दि.२३ जून, २०२३ प्राप्त झालेला असून त्याची एक छायांकित प्रत श्री.आडे यांना जा.क्र./आस्था/७७/२०२३ दि.१०/०७/२०२३ अन्वये देण्यात आलेली आहे. त्यामध्ये खालीप्रमाणे अटी व शर्ती नमुद आहेत.

| | |
|---|---|
| १) | सदरच्या प्रस्तावास जळगांव महानगरपालिका व आर्णी नगरपरिषद, जि.यवतमाळ यांनी ठराव करुन दिलेल्या सहमतीनुसार मान्यता देण्यात येत आहे. |
| २) | बदलीने नियुक्ती झाल्यानंतर श्री.गणेश गंभीर आडे यांना सेवाजेष्ठतेबाबत कोणतेही हक्क मागता येणार नाही. |
| ३) | श्री.गणेश गंभीर आडे यांची त्याच्या विनंतीनुसार बदली करण्यात येत असल्याने, सदर बदलीच्या अनुषंगाने त्यांना पदग्रहण अवधी, बदली अनुदान, प्रवास भत्ता व तद्नुषंगिक लाभ अनुज्ञेय होणार नाहीत. |
| ४) | या बदलीच्या संदर्भात कोणतेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.<br>०२. आयुक्त,जळगांव महानगरपालिका,जळगांव यांना कळविण्यात येते की, श्री.गणेश गंभीर आडे, लिपीक यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याकरीता त्यांच्या सेवा विषयक बाबींची पुर्तता करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच, मुख्याधिकारी, आर्णी नगरपरिषद, जि.यवतमाळ यांनी, श्री.गणेश |

| | |
|---|---|
| | गंभीर आडे, लिपीक यांना आर्णी नगरपरिषद, जि.यवतमाळ येथील लिपीक या समकक्ष पदावर रुजू करुन घेण्याबाबत कार्यवाही करावी. |

उपरोक्त अट क्र.१ पाहता सदरच्या प्रस्तावास जळगांव महानगरपालिका व आर्णी नगरपरिषद, जि.यवतमाळ यांनी ठराव करुन दिलेल्या सहमतीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

आर्णी नगरपरिषद, जि. यवतमाळ कडील दि.१६/०७/२०२० चा ठराव / ना-हरकत पहाता त्यात श्री.आडे ज्या संवर्गातून लागलेले आहेत त्या संवर्गाचे पद रिक्त असल्यामुळे त्यांना रिक्त पदावर घेण्यास तयार आहे अशी मान्यता दिसून येते. मात्र आर्णी नगरपरिषद, जि. यवतमाळ यांचेकडील ठराव / ना-हरकत दाखल्यात प्रवर्गाचे पद रिक्त असलेबाबत नमुद नाही. शासन निर्णय दिनांक १५/०५/२०१९ मधिल मार्गदर्शक सुचना ८.(४) मध्ये नमुद केलेनुसार संबंधित कर्मचाऱ्याची नियुक्ती सामाजिक आरक्षणानुसार ज्या प्रवर्गातील आहे. त्या प्रवर्गाचे रिक्त पद उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्या प्रवर्गातुन नियुक्ती झाली आहे तो प्रवर्ग बदलून अन्य प्रवर्गाच्या पदावर कायमस्वरुपी समावेशन अनुज्ञेय राहणार नाही. तसेच शासन निर्णयासोबतच्या नमुना आदेशात श्री.आडे यांची ज्या संवर्गातून व प्रवर्गातून नियुक्ती झालेली आहे. त्या संवर्गाचे व प्रवर्गाचे पदाबाबत त्यांच्या कार्यमुक्ती आदेशात नमुद करणेबाबत नमुद आहे. मात्र त्याबाबतचा कोठेही उल्लेख आर्णी नगरपरिषद, जि. यवतमाळ यांचे ठरावात वा ना-हरकत पत्रात दिसुन येत नाही. त्यामुळे शासन निर्णय क्र.जमपा-२०२३/प्र.क्र.१४१/नवि-२५ दि.२३ जून, २०२३ अन्वये आर्णी नगरपरिषद, जि.यवतमाळ यांच्या आस्थापनेवर सेवा वर्ग करण्याबाबत शासन निर्णयान्वये श्री.आडे यांना तात्काळ कार्यमुक्त करण्यास मान्यता दिलेली आहे त्याअनुषंगाने श्री.गणेश गंभीर आडे यांना कार्यमुक्त करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच दि.१५/०५/२०१९ च्या शासन निर्णयात नमुद केलेनुसार श्री.गणेश गंभीर आडे ज्या संवर्गातून, प्रवर्गातून लागलेले आहेत त्यासंवर्गाचे पदावर आर्णी नगरपरिषद, जि. यवतमाळ येथे रुजू होणेसाठी कार्यमुक्त करावे असे प्रस्तावात नमूद केल्यानूसार श्री.गणेश गंभीर आडे यांना कार्यमुक्त करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाचा प्रस्ताव व शासन निर्णय क्र.जमपा-२०२३/प्र.क्र.१४१/नवि-२५ दि.२३ जून, २०२३ नूसार श्री.गणेश गंभीर आडे,लिपीक यांना आर्णी नगरपरिषद, जि.यवतमाळ या बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याकरीता सभागृहात झालेल्या चर्चेनूसार दिनांक ३१ ऑगस्ट २०२३ पूर्वी तात्काळ कार्यमुक्त करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२० :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील सन्मा.सदस्य यांचेकडून मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडेस विविध विकास कामे करून मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झालेले असून सोबतचे यादीतील एकूण ०१ ते ११३ कामे जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना/ नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना/नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेच्या निधीतुन करणेबाबत मा.महापौर ,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा परंतु मा.महापौरताई, या संदर्भात सी.टी.सी.- ८० ची काही नोटीस आयुक्त महोदया आपल्याला देण्यात आलेली आहे.

**मा.आयुक्त :-** पेपरला वाचले मी.

**मा.उपमहापौर :-** भाऊ हा अशासकीय प्रस्ताव आहे आणि अशासकीय प्रस्ताव असल्यामुळे आपल्याला शासन स्तरावर डी.पी.डी.सी.ची कामे आहेत त्याच्यामध्ये हे प्रस्ताव पाठवायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** डी.पी.डी.सी.चेच ना. याच्या संदर्भात

**मा.उपमहापौर :-** भाऊ नाही नाही , बरोबर आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जळगांव शहरातील एक विधीतज्ञ, काही दोन तीन राजकीय पक्षाच्या संघटना आणि काही अशासकीय संघटना, यांनी आता चार दिवसापुर्वी प्रेस कॉन्फ्रन्स घेतली आणि त्याच्यावर मा.आयुक्त मॅडम यांना सी.पी.सी. ८० ची नोटीस पाठवलेली आहे की, हा निधी जर कधी तुम्ही आता दिला तर याच्यामध्ये भ्रष्टाचार होऊन हा पैसा निवडणुकीमध्ये वापरला जाईल. अशी शक्यता नाकारता येत नसल्याने सदरहु निधीला मान्यता देण्यात येऊ नये. आता मला सांगा की जळगांव शहराचा कारभार या महानगरपालिकेने ठरवावा, या प्राधिकरणाने ठरवावा की, उद्या कोणीही प्रेस कॉन्फ्रन्स घेऊन वाटेल तश्या पध्दतीची भुमिका घ्यायची. जरी कायद्याचे ज्ञान प्राप्त झालेला असेल, विधी सल्लागार झालेले असतील. याचा अर्थात कमीत कमी या गोष्टीचा विचार करायला पाहिजे होता की जसा हा जिल्हा नियोजन कडुन मिळणारा २५-२५ लाख रुपयांचा निधी, मा.महापौरताईंनी घेतलेले ते समान २५-२५ लाखाचा निधी प्रत्येक सदस्याला वितरीत करण्यात यावा. त्या मागची भुमिका त्यांची होती की, शहरातील प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागामध्ये एक समान पध्दतीने २५-२५ लाख रुपयाचे कामे मार्गी लावावी. परंतु ज्या पध्दतीने त्या प्रेस कॉन्फ्रन्समध्ये आक्षेप घेण्यात आलेले आहे की, जसा तो २५ लाखाचा निधी प्रशासन प्रत्येक नगरसेवकाच्या वैयक्तीक खात्यामध्ये RTGS करणार आहे. त्या निधीला घेऊन तो नगरसेवक निवडणुकीला सामोरे जाणार आहे म्हणजे कधी कधी बुध्दीजिवी लोकांच्या डोक्याची सुध्दा किव करावी अशी वाटते आणि सी.पी.सी.-८० ची नोटीस पाठवुन दिली म्हणजे काय चाललेले आहे. बुध्दीजिवी माणसे जर कधी, हा एखाद्या झोपडपट्टीत राहणाऱ्या सामान्य नागरीकाने हा प्रश्न उपस्थित केला असता, तर आपण समजु शकलो असतो की, तिच्या बुध्दीची किव करावी असे वाटते, परंतु सुशिक्षित मंडळी, कायद्याचे ज्ञान प्राप्त केलेली मंडळी या शहराच्या जनतेची अशा पध्दतीने दिशाभुल करत असेल तर मला वाटते अश्या कृतीचा या सभागृहाने निषेध केला पाहिजे. सर्वांनी निषेध करायला पाहीजे.

(सभागृहात या वेळी अनेक सन्मा.सदस्य निषेध निषेध अशी घोषणा करायला लागले)

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे नगरसेवकाच्या प्रतिमेवरती हे अश्या पध्दतीने आक्षेप उभे करण्यात आलेले आहे. जसे काही नगरसेवक म्हणजे हा चोर आहे की, महानगरपालिकेच्या मिळालेल्या निधी वरतीच त्या नगरसेवकांची नजर आहे. आता या बॉडीतल्या नगरसेवकांची प्रतिमा काही व्यक्तींनी अश्या पध्दतीने मलीन करण्याचा प्रयत्न चाललेला आहे. आणि शेवटी हे कळायला पाहिजे की, याच्यासाठी एक प्रोसिजर आहे. सभागृह येथे प्रस्ताव मांडत आहे. त्याचे विविध नगरसेवक त्यांच्या भागातील कामांच्या रस्त्यांचे प्रस्ताव मांडत असतो. त्याला ही प्रशासकीय प्रोसिजर आहे की, ते प्रस्ताव इकडे तयार होऊन जिल्हाधिकाऱ्यांकडे जातील,जिल्हाधिकाऱ्यांकडुन मान्यता होऊन त्याच्या निविदा प्रक्रिया होतील, निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर त्याचे कार्यादेश होतील, कार्यादेश दिल्यानंतर ते प्रत्यक्ष काम झाले की नाही त्याच्या संदर्भात बिले रेकॉर्डींग होतात. त्याच्या संदर्भात नंतर त्या बिलांची अदायगी होते. परंतु ज्या पध्दतीने आक्षेप नोंदविलेले गेलेले आहे. त्या नोटीसीच्या अनुषंगाने ते अत्यंत चुकीचे आहे आणि बेजबाबदारपणाचे लक्षण आहे. त्या जे कोणी त्या संघटनेचे प्रतिनिधी असतील किंवा जो कोणी विधीतज्ञ असतील त्यांच्या डोक्याची किव करावीशी वाटते. तर आता अश्या पध्दतीने ठराव याच्यासोबत पारित करण्यात यावा. अश्या पध्दतीने आता या सभागृहाने सर्वसन्मतीने आणि सर्वसमावेशक अश्या पध्दतीचे प्रस्ताव दिलेले आहे. तर मला वाटते यापुर्वी सुध्दा जर कधी, जो निधी आपल्याला प्राप्त होत आहे. साधारणता दलितेत्तर आणि नगरोत्थान याच्या माध्यमातुन १५ कोटी रुपये आणि दलित वस्तीच्या माध्यमातुन १५ कोटी रुपये, त्याचे समान निधीच्या दृष्टीकोणातुन मा.महापौर ताईंनी त्यांच्या सभागृहात बैठक घेतली होती. त्या पध्दतीने त्यांनी जाहिर वाच्छेता ही केलेली होती. आणि त्या अनुषंगाने मला वाटते सर्व समावेशक प्रस्ताव या महासभेसमोर आलेले आहे. फक्त प्रशासनाला एवढीच विनंती आहे की, यापुर्वी जिल्हा नियोजन मंडळाचे जे काही प्रस्ताव आपण पाठविलेले असतील त्याचा कुठलाही विचार न करता, या ३० कोटीच्या निधीच्या अनुषंगाने याच प्रस्तावांच्या बाबतीतला विचार करण्यात यावा. या पुर्वी जिल्हा नियोजन मंडळाकडे पाठविलेले जे प्रस्ताव असतील ते रद्द समजण्यात यावे. एवढी माझी सभागृहाला विनंती आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** या विषयाला धरुन मला एक विषय मांडायचा आहे, भाऊंनी आज जो एक विषय केला, कोट्यावधी रुपयांचे. मा.महापौर महोदयांनी समान निधीचा विषय येथे आणलेला आहे हा चांगला आहे. समान निधीला हरकत घ्यायची, विरोध करायचे काही हरकत नाही. समान निधीची व्याख्या ठरवितांना महापौर महोदयांनी किंवा सभागृहाने प्रभाग क्र.१ ते १९ या सर्व प्रभागांमध्ये १०० कोटी, ८५ कोटी, ८ कोटी, ५ कोटी हा किती खर्च झाला आहे कसा खर्च झाला आहे. याचा सर्व अहवाल किंवा त्याची पुर्ण माहिती त्यांनी सभागृहासमोर ठेवावी. ही सर्व माहिती आल्यानंतर ज्या प्रभागामध्ये निधी खर्च झालेला आहे आणि ज्या प्रभागांना निधी भेटलेला नाही. तर त्या प्रभागांना

सर्व प्रथम निधी देण्यासंदर्भात या सभागृहाने निर्णय घ्यावा. एखादा निधी असा आहे की, तेथे शासकीय निधी गेलेला नाही या सभागृहाने सगळयात पहिले त्याचा विचार करावा आणि त्याच्यानंतर सभागृहाने समान निधी देण्याचा ठराव पारीत करावा. ३-३-३, एकाला ३, एकाला ३, एकाला ३ एकाला १ आणि त्याच्यानंतर आले समान, मग शेवटच्याला ४ च भेटतील ना, हे ६-६ होतील. याच्यामुळे समान निधीची व्याख्या ठरवितांना सभागृहाने सगळयात पहिली माहिती सभागृहापुढे ठेवायला पाहिजे होती. मा.महापौरांनी आधी सर्व ठिकाणी सर्व जाहिर केले, जाहिर केल्यानंतर त्यांनी सर्व नेत्यांची मिटींग बोलवली, मिटींग बोलविल्यानंतर सुध्दा हा विषय आला आणि मी त्या मिटींगमध्ये पण या लोकांनी हेच म्हणणे मांडले,

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आपण नव्हते का त्या मिटींगला.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** दोन मिनींट, समान निधीची व्याख्या ठरविणे आवश्यक आहे. आता भाऊंनी जे मांडले की, मागचे झालेले ठराव, आमचे असे म्हणणे आहे की, याच्याआधी मागच्या सभेत या जळगांव महापालिकेमध्ये सर्व सन्मा.सदस्यांनी जे ठराव मांडले त्याला काहीच अर्थ नाही. त्याची अंमलबजावणी नाही. ते विकासाचे प्रस्ताव आहे हे विकासाचे प्रस्ताव आहे.  हे कसे काय म्हणत आहे भाऊ, सभागृहाला असे सांगण्यात आले की, मागचे सर्व ठराव रद्द करुन टाकायचे. माझ्या प्रभागामध्ये मला नितीनभाऊंनी सांगावे. माझ्या प्रभागामध्ये मागच्या २५ कोटीचे ठराव मी दिलेले आहे. आणि त्या ठरावांची अंमलबजावणी करत असतांना त्या कामांच्या संदर्भात मागच्या ६ महिन्यापासुन मी पाठपुरावा करत आहे. ते प्रस्ताव मा.आयुक्त महोदयांकडे पडलेले आहे. नितीनभाऊंनी आणि विरोधी पक्षनेत्यांनी सांगावे की, ते सगळे ठराव बेकायदेशीर आहे. २५ कोटीचे केलेले ठराव, याच महासभेने मंजुर केलेले ठराव, याच महासभेच्या महापौरांनी पिठासीन अधिकाऱ्यांनी मंजुर केलेले ठराव हे बेकायदेशीर आहे. सभागृहासमोर सांगावे. कुठल्या निर्णयाने, कुठल्या अधिकाराने आणि कुठल्या माहितीने तुम्ही असे म्हणत आहे की, मागचे ठराव रद्द करा.

**मा.उपमहापौर :-** मागचे ठराव रद्द करा असे नाही म्हटले आहे. मागच्या नियोजन मंडळाला पाठविलेले जे प्रस्ताव आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मागच्या डी.पी.डी.सी.चे प्रस्ताव मा.आयुक्तांनी पाठविलेले आहे. तो अधिकार त्यांचा आहे. मागच्या काळामध्ये कुठल्याही कुठल्याही सदस्यानी, कुठल्याही प्रभागातले डी.पी.डी.सी.कडुन शासनाला पाठविलेला प्रस्ताव हा बेकायदेशीर आहे का ? हे पहिले दाखवा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता निधी ३० कोटी आलेला आहे आणि ३० कोटी निधीचे

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** हा ३० कोटीचा निधी दर वर्षी येतो, दर वर्षी हा सामान्य निधी येतो. मागच्या ५ वर्षात सुध्दा हा निधी दर वर्षी येत होता. त्यावेळेस समान का नाही घेतले, त्यावेळेस समान निधी कुठे गेला होता आणि त्या वेळेस हे पाठविलेले प्रस्ताव रद्द करावे अशी भुमिका सन्मा.नितीनभाऊंनी का घेतली.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आज निधी आपल्या समोर ३० कोटीचा आहे. ३० कोटीमध्ये या विषयाच्या संदर्भातले प्रस्ताव मान्य करण्यात येतील. या निधी मध्ये यापुर्वी पाठविलेल्या प्रस्तावाचा विचार करता कामा नये. ही माझी सुचना आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** विरोध आहे, पालकमंत्र्याचे यापुर्वी याच सभागृहाने जे ठराव मंजुर केलेले होते. त्यांची अंमलबजावणी प्रशासन करत आहे आणि त्या ठरावाच्या अनुषंगाने हे प्रस्ताव कलेक्टर ऑफिसला जात आहे. हे प्रस्ताव पाठवायचे किंवा नाही पाठविणे ही सभागृहाचा निर्णय आहे. आमचे मागचे केलेले प्रस्ताव त्यांचे काय ?

**मा.महापौर :-** मागचे कोणते ?

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मागच्या ज्या महासभा झाल्यात प्रत्येक प्रभागाचे विकास कामांचे ठराव केलेले आहे आणि त्या ठरावांची अंमलबजावणी करणेची संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची आहे आणि आम्ही प्रशासनाला वारंवार कळविलेले आहे की, हे प्रस्ताव जिल्हाधिकारींकडे पाठवा. त्या विषयावर बोला.

**मा.उपमहापौर :-** मॅडम ते जे सांगत आहे. सन २०२२-२३ मध्ये काही प्रस्ताव पाठविलेले आहे. माझ्या माहितीनुसार भाऊ हा जो जिल्हा नियोजन मंडळातर्फे महानगरपालिकेला मिळणारा निधी आहे. त्या जळगांव जिल्हा नियोजन समितीने जे पत्र दिलेले आहे. आणि पत्राच्या अनुषंगाने आयुक्तांना त्याच्यात जी सुचना दिली गेलेली आहे की, आपल्या महानगरपालिका क्षेत्रामधील दलित वस्ती, दलितोत्तर आणि नगरोत्थान या निधी अंतर्गत आपण त्या ठिकाणी प्रस्ताव महानगरपालिकेकडुन सभागृहाच्या ठरावानुसार इकडील कार्यालयास पाठवावे. जेणे करुन त्या निधीचे वितरण वेळेत होऊन विनियोग हा योग्य पध्दतीने करता येईल. असे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पत्र आलेले आहे. तर मला सांगा मॅडम आपण जिल्हाधिकारी साहेबांचे डी.पी.डी.सी.चे पत्र मिळाल्यानंतर काही प्रस्ताव पाठवले आहे का पहिले ते सांगा. नाही पत्र मिळाल्यापासुन.

**श्री.मनोज चौधरी :-** मॅडम, एक मिनीट ऐकुन घ्या, जे पत्र आपल्या महापालिकेला मिळाला, तुम्ही जे म्हणत आहे ना २९ कोटी रुपये.

(सभागृहात अनेक सदस्य एकाच वेळी चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही)

**श्री.मनोज चौधरी :-** एक मिनीट ऐका ना तुम्ही माझी गोष्ट समजुन घ्या. भाऊ जे सांगत आहे ना की, फक्त या कामांचा समावेश करण्यात यावा,इतर कामांचा विचार करण्यात येऊ नये. आम्ही काय सांगतो आहे. ३ कोटी रुपयांचे मी पालकमंत्र्यांना पत्र दिलेले आहे. याच योजने मधुन, सुनिलभाऊ हेच सांगतो आहे. मी जे रु.३ कोटीच पत्र दिलेले होते. त्याच प्रस्तावासाठी मी मागे लागलेलो होतो. सोनगीरे साहेबांना बोलवा २ मिनीटासाठी ते सांगतील तुम्हाला व्यवस्थीत माहिती, त्यांनी काय सांगितले तुम्ही पत्र आणा, म्हणजे कलेक्टर ऑफिस मधुन, पत्र आणले प्रस्तावासाठी, मग त्यांनी पुर्ण पत्र तेथुन आणला २९ कोटी रुपयांचे की, या या योजनेमध्ये मनोज चौधरीनी पालकमंत्र्यांचा पत्र आलेल आहे. तर तुम्ही प्रस्ताव पाठवा, त्यांनी प्रस्ताव पाठविलेले नाही. पत्र पाठविण्या एवजी त्यांनी काय सांगितले की, बेसिक पत्र आणा की, प्रभागामध्ये असे असे कामे या प्रभागासाठी दिले गेले आहे. त्याच्यासाठी माझे ३ कोटीचे कामे थांबले ना भाऊ, माझे ते म्हणणे आहे ना. आमचा या विषयाला विरोध नाही, माझ्या वार्डात पण टाकले आहे तुम्ही पैसे मी काही नाही म्हणत नाही. पण ६० लाख रुपये आणि ३ कोटी रुपये खुप फरक आहे ना भाऊ. हे म्हणणे आहे भाऊ २९ कोटीचे पत्र आलेले आहे, त्या पत्रासाठी अश्विन पाटील आणि मीच फिरलेला आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** मॅडम मी काय म्हणतोय.

**श्री.मनोज चौधरी :-** भाऊ तुमचे म्हणणे आहे ना की, महापौर ताईंनी सर्वांचा विचार केलेला आहे नगरसेवकांचा, तर माझे म्हणणे आहे की, त्या पत्राचा विचार का केला नाही महापौरताईंनी आणि यांनी विचारायला पाहिजे. आणि एक मिनीट, जसे आता झाले ना,नितीनभाऊ ६२ कोटी मध्ये माझ्या वार्डात १० कोटी किंवा ८ कोटी रुपये नव्हते कुलभुषणभाऊ, फक्त १ कोटी १५ लक्ष रुपये मिळालेले होते डी.पी.डी.सी. मधुन, याचे काय करायचे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** हे पहा निधी सगळयांना मिळायला पाहिजे, कोणीही असो, प्रत्येकाच्या विभागात लोकं राहतात. स्वत:च्या प्रभागात ५-५, १०-१० कोटी रुपये टाकत आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** समजले का हीच विनंती आहे अश्विन भाऊ, सगळयांना जर न्याय द्यायचाच आहे ना. ज्या नगरसेवकांना पहिल्या डी.पी.डी.सी.मधुन ५ कोटी १० कोटी पैसे मिळालेले आहे ना. त्यांना निधी देऊच नका ना तुम्ही.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले समजत नाही)

**श्री.विशाल त्रिपाठी :-** त्यावेळेस तर भाजपाच्या एकही नगरसेवकांला निधी मिळालेला नाही.

**मा.उपमहापौर :-** नितीनभाऊंनी मांडलेल्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** या विषयाला ज्याचा विरोध आहे त्यांचा विरोध नोंदवा.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** ऐका ऐका, मला मा.आयुक्त महोदयांना माझा हा प्रश्न आहे की, दि.२३/०६/२०२३ ला पहिले पत्र आल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन जळगांव महापालिकेला प्रस्ताव पाठवा असा १६ किंवा १७ तारखेचे पत्र आहे. ते पत्र आल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातुन दि.२०/०६/२०२३ ला प्रभाग क्र.१ चे प्रस्ताव त्वरीत पाठविण्यात यावे असे पत्र आलेले आहे. त्याच्याबाबत काही कार्यवाही नाही. ते प्रस्ताव या क्षणी प्रलंबीत आहे, त्याच्याबद्दल काही कार्यवाही नाही. ते प्रस्ताव पाठविण्यासाठी या मिनीटाला प्रलंबीत आहे. ते का थांबविले कोणाच्या सांगण्यावरुन थांबविले.

**मा.उपमहापौर :-** मा.आयुक्त महोदया, याचे पण उत्तर द्या, तर प्रभाग क्र.१५ च्या, प्रभाग क्र.१० च्या, प्रभाग क्र.०५ च्या, प्रभाग क्र.१२ च्या प्रभाग क्र.१८ च्या हे सर्वच्या सर्व निविदा स्तरावर असलेले मंजुर असलेले प्रस्ताव, प्रशासकीय मान्यता असलेले प्रस्ताव कोणाच्या सांगण्यावरुन रद्द करण्यात आले हे पण सांगा,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझा विषय पहिले क्लियर करा.

**मा.उपमहापौर :-** तुमचा विषय नंतरचा आहे, हा विषय पहिल्याचा आहे. हा विषय सुध्दा पहिले क्लियर करा, हे सर्व कोणाच्या दबावा मध्ये येऊन या सर्वच्या सर्व प्रभागांमधील निधी हा रद्द करण्यात आले. तुम्ही पहिले याचे उत्तर द्यावे.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले समजत नाही)

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** उपमहापौर साहेब माझा हा प्रश्न महापौरांना आहे.

**मा.उपमहापौर :-** पहिले माझे उत्तर द्यावे कोणाच्या दबावा खाली पाच सात प्रभागांच्या निविदा मंजुर झालेल्या असतांना प्रशासकीय मान्यता स्तरावर असतांना ज्याचे नियोजन समसमान झालेले असतांना ते कोणाच्या दबावा

खाली व राज्य शासनाचा १५ कोटी रूपयाचा निधी प्रभाग क्र. १४ आणि १५ मध्ये आलेला असतांना कोणाच्या दबावा खाली ही संबंधीत कामे रद्द करण्यात आली हे देखील पहिले प्रशासनाने सभागृहाला सांगावे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौर महोदया, ५ कोटीचा निधी प्रभाग क्र.१० मध्ये जो निधी गेला तो कोणाच्या दबावा खाली गेले ते पण सांगावे.

**मा.उपमहापौर :-** प्रभाग क्र.१८ आणि १९ मध्ये प्रभाग क्र.१३ मध्ये ५ कोटी ऐका.

**मा.महापौर :-** ज्याचा विरोध असेल त्याचा विरोध नोंदविला जाईल आणि बहुमताने ठराव मंजुर करण्यात येत आहे. (सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले समजत नाही)

**मा.उपमहापौर :-** जर कधी ठरावाचा वापर करून जर कधी इतर नगरसेवकांना निधीतुन वंचित ठेवला जात असेल तर त्याचा मी या ठिकाणी निषेध करतो आणि नितीनभाऊंनी मांडलेल्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** नितीनभाऊंनी जे पुर्वीचे ठराव रद्द करण्याचा विषय केलेला आहे, त्या गोष्टीला माझा विरोध आहे.

**मा.उपमहापौर :-** आता हा ठराव जो करायचा आहे. आता जो विषयपत्रिकेवरचा विषय आहे. त्या विषयावर आपली सुचना मांडायची आहे किंवा हरकत असेल तर हरकत घ्यायची आहे. मी सांगितले ना नितीनभाऊंनी मांडलेल्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२० बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** याच्यामध्ये एक सुचना आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** या सभागृहाने...

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले समजत नाही)

**मा.उपमहापौर :-** आताच थोडया वेळा पुर्वी सन्मा.सदस्य चेतनभाऊंनी सांगितले की, कलेक्टर साहेबांना आणि पालकमंत्रींना

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले समजत नाही)

**मा.उपमहापौर :-** आता तुमच्या दोघांमध्येच मतभेत आहे एकमेकांमध्ये, यांचा विरोध नोंदवुन घ्या आणि माझे या विषयाला अनुमोदन आहे.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे त्या गोंधळात कोण काय बोलले समजत नाही)

**मा.महापौर :-** या विषयामध्ये जर काही सुचना आहे त्या सुचनांची नोंद घ्यावी. पोकळे साहेब आता पर्यंत तुम्हीच बोलत होते. खाली बसा आता.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मागच्या काळामध्ये या सभागृहाने जे ठराव केलेले आहे. भाऊ दोन मिनीट.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया जे दलित प्रभाग आहे ७४ लाखाची तरतुद केलेली आहे प्रत्येक नगरसेवकाला, ज्या प्रभागामध्ये ज्या नगरसेवकाचे ७४ लाख सुटलेले असतील हे त्यांचे घेण्यात यावे आणि काही नगरसेवकांचे ३० लाखांचे जे प्रस्ताव राहिलेले असेल तो प्रस्ताव सुध्दा याच्या मध्ये ॲड करण्यात यावे.

**मा.महापौर :-** ज्या नगरसेवकांना कामाचे प्रस्ताव द्यायचे असतील त्यांनी लेटरपॅड वर द्यावे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, महापौरताई, प्रभाग क्र.०४ मध्ये

**मा.उपमहापौर :-** जितुभाऊ ज्या प्रभागामध्ये

**श्री.जितेंद्र मराठे :-** ऐका ना, सुचना मी मांडुन देतो, ७४-७४ प्रमाणे अ,ब,क,ड भारतीताई सोनवणे, मुकुंदा सोनवणे, चौधरीताई यांच्या प्रभागामध्ये जसे यांनी ७४-७४ प्रमाणे सांगितले अ,ब,क,ड प्रमाणे ते घ्यायचे. आणि प्रभाग क्र.१३ मध्ये पण अ,ब,क,ड प्रमाणेच ज्यांचे पत्र नसतील त्या ठिकाणी समसमान ७४-७४ प्रमाणे घ्या.

**श्री.मनोज चौधरी :-** अहो भाऊ हे अ,ब,क,ड कुठुन आणल, कुठुन आणल हे, प्रभाग सगळयांचा आहे लोकांनी अ,ब,क,ड पाहुन नाही निवडुन दिलेले आहे तुम्हाला, हा शब्द बंद करा तुम्ही,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मा.महापौर माझे फक्त ऐवढे म्हणणे ऐकुन घ्या.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे त्या गोंधळात कोण काय बोलले समजत नाही)

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** भाऊ, दोन मिनीट भाऊ, माझे ऐवढे म्हणणे ऐकुन घ्या.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, ज्यांचा विरोध असेल त्यांचा विरोध नोंदवुन घ्या.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौर महोदया,

**श्री.अश्विन सोनवणे :-** महापौरताई, यांचे ३०-३० लाखाचे प्रस्ताव घ्या. ज्यांचा विरोध असेल विरोध घ्या, जे तटस्थ असतील तटस्थ घ्या.

**श्री.मनोज चौधरी :-** कुलभुषणभाऊ, कुलभुषणभाऊ, एक मिनीट, एक मिनीट, फोन आलेले नाही, पण परत सांगतो मी तुम्हाला दर महासभेला महापौर कार्यालयातुन फोन येतात की, तुमची विकास कामांची यादी द्या. भाऊ खोटं बोलत नाही मी, दर महासभेला महापौर कार्यालयातुन फोन यायचा,

**मा.उपमहापौर :-** मनोजभाऊ मी काय म्हणतोय.

**श्री.मनोज चौधरी :-** ऐकुन घ्या ना भाऊ, हे पहा कुलभुषण भाऊ,

**मा.उपमहापौर :-** आपल्याला सगळयांना समसमान निधी द्यायचे आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** निधी द्या ना तुम्ही द्या ना त्या बद्दल वाद नाही. फक्त नितीनभाऊ जे बोलले की, जे पहिले विकास कामे असतील, त्याला विरोध आहे आमचा.

**मा.उपमहापौर :-** सुधारणा झाली ना ती आता,

**श्री.मनोज चौधरी :-** तेवढे शब्द काढुन घ्या तुम्ही, फक्त तेच सांगतो, जे पहिले कामे दिलेले आहे तर ते टाकुच नका ना. निविदा झालेल्या आहे ना त्याच्या,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आधी केलेले ठराव सुध्दा याच महासभेने केलेले आहे, आधी केलेले विकास कामांचे ठराव पण याचा महासभेचे आहे. त्यांना अडचण काय आहे.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना कोण काय बोलले समजत नाही.)

**मा.महापौर :-** विषय क्र.२० मध्ये ज्या सन्मा.सदस्यांचे प्रस्ताव प्राप्त झालेले नाही त्यांनी आपल्या लेटर पॅडवर त्या कामाचे नांव देवुन या कार्यालयाकडे सादर करावे. ते सुध्दा यात समाविष्ट करण्यात येईल. विषय क्र.२० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** थांबा, थांबा, ऐका ऐका, आम्हाला भुमिका मांडु द्या आमची.

**मा.महापौर :-** तुम्हीच तर बोलत आहेत.

**श्री.सुनिल महाजन :-** तुम्हीच बोलत आहात.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मला सभागृहाच धोरण कळल, मला बोलुन घेऊ द्या. या सभागृहाने मागच्या काळामध्ये मागच्या महासभेमध्ये जे विकास कामांचे प्रस्ताव मंजुर केलेले आहे आणि प्रशासनाला अंमलबजावणीसाठी सांगितले आहे. ते प्रस्ताव प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवावे. नितीनभाऊंनी केलेल्या सुचनेला माझा विरोध आहे. या ठरावासाठी आमची तटस्थ म्हणुन भुमिका घेत आहे.

**मा.महापौर :-** कोण कोण आहे तटस्थ ? सन्मा.सदस्य, नवनाथ साहेब, पोकळे साहेब,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आणि नितीनभाऊंनी जे सांगितले मागचे ठराव घेऊ नये त्याचा निषेध करतो.

**श्री.मनोज चौधरी :-** आम्ही ठरावाला तटस्थ नाही. तुम्ही लक्षात घ्या. तुम्ही जे विकास कामे मंजुर करत आहात आम्हाला त्याचा विरोध करायचा नाही. फक्त जे नितीनभाऊंनी मांडले की, जे शब्द की, पहिले कामे असतील ते वगळुन घ्या. या शब्दाला विरोध आहे आमचा.

**श्री.विक्रम सोनवणे :-** प्रस्तावाला विरोध नाही.

**मा.उपमहापौर :-** आता ते क्लिअर झाले सभागृहामध्ये, आता आपला जो ठराव आहे, ऐका ना विषयपत्रिकेवरील विषयाला विरोध आहे का

**मा.महापौर :-** या विषयाशी संबंधीत बोला, बहुमत घेऊ की, सर्वानुमते मंजुर करायचा आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** या विषयामध्ये, नितीनभाऊंनी जो विषय मांडला, मागचे ठराव पाठवण्यात येऊ नये, त्याचा मी विरोध करीत आहे. आणि या विषयाला आमची भुमिका तटस्थची आहे.

**मा.महापौर :-** कोण कोण आहे तटस्थ.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** यासभागृहाला विचारा ना, मी तटस्थ आहे.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना कोण काय बोलले समजत नाही.)

(सभागृहात व्यासपिठावर मा.महापौर, मा.उपमहापौर ,मा.आयुक्त, नगरसचिव व सन्मा.सदस्य श्री.नितीन लढ्ढा , श्री.अश्विन सोनवणे हे आपआपसांत चर्चा करीत होते.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई विषय क्र.२० च्या अनुषंगाने जिल्हा नियोजन मंडळाकडुन सन २०२३-२४ साठी उपलब्ध असलेल्या निधी मधुन आज सभागृहाने या प्रस्तावाद्वारे जे जे काही कामे प्रस्तावीत केलेली आहे ते समसमान निधीच्या अनुषंगाने या संदर्भातला प्रस्ताव जो आहे तो पारित करण्यात यावा. प्रशासनाने या व्यतिरिक्त दुसरा कुठलाही प्रस्ताव पाठवु नये आणि पाठविलेला असल्यास त्याची नोंद घेण्यात येऊ नये. याच कामांना या सभागृहाकडुन मान्यता

देण्यात येत आहे. याची प्रशासनाने नोंद घ्यावी. या व्यतिरिक्त कुठल्याही प्रस्तावाला यापुर्वी मान्यता दिलेली असेल ती रद्द समजण्यात यावी.

**श्री.मनोज चौधरी :-** का बर भाऊ कशासाठी ? कशासाठी ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** सन २०२३-२४ साठी उपलब्ध असलेल्या निधीच्या अनुषंगाने.

**श्री.मनोज चौधरी :-** का रद्द आम्ही या कामांना थोडी विरोध करत आहे भाऊ.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** ज्याला भेटीन त्याला भेटीन.

**श्री.मनोज चौधरी :-** ही कोणती भुमिका आहे तुमची. कशासाठी म्हणजे आम्ही पैसे आणलेले आहे ना. आम्हाला पैसे वापरायला भेटतील ना. आमच्या वार्डात कामे झालेले नाही ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सन २०२३-२४ ला मिळालेला निधी हा सभागृहाने ठरविल्याप्रमाणे समसमान प्रमाणात सर्वांना वितरीत करण्याच्या दृष्टीकोणातुन होईल.

**श्री.मनोज चौधरी :-** नितीनभाऊ, नितीनभाऊ, नितीनभाऊ, या कामाला आमचा विरोध नाही. हे विकास कामे आहे प्रभागातले सगळे नगरसेवकांचे. या कामांना विरोध नाही. पहिली बात, तुम्ही बोलतांना जे बोलले भाऊ. पहिले जे प्रस्ताव किंवा हे प्रस्ताव सोडुन दुसरे प्रस्ताव पाठवायचे नाही. आमच्या पालकमंत्र्यांनी पत्र दिल होत त्याचे करायचे काय ? उत्तर द्या मॅडम याचे उत्तर तुम्ही द्या. अश्विनभाऊ याच निधी दिलेली आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** कुलभुषणभाऊ बहुमताने मंजुर करण्यात यावा.

**श्री.मनोज चौधरी :-** याच निधीतुन आम्हाला कामे मिळणार आहे. हे तर हुकुमशाही झाली,ही तर तुम्ही हुकुमशाही वापरत आहे ना. हुकुमशाही सारख बोलत आहात तुम्ही की, प्रस्ताव पाठवायचे नाही.

**मा.उपमहापौर :-** नितीनभाऊंनी मांडलेल्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** तुम्ही असे कसे म्हणु शकता, तुम्ही असे म्हणु शकत नाही ना. आम्ही या प्रस्तावाला विरोध करतो आहे का ? आमच्या कामांचा प्रस्ताव तुम्हाला पाठवावा लागेल ना.

**मा.उपमहापौर :-** तुम्ही असे समजत आहे. मी काय सांगतो आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** भाऊंचे म्हणणे आहे ना. एक मिनीट भाऊंनी जी सुचना मांडली ना ती परत मांडुन दाखवावी. ते भाऊ म्हणत आहे ना, कुलभुषणभाऊ म्हणत आहे ना. याच्या व्यतिरिक्त कोणताही प्रस्ताव पाठवु नये म्हणजे ही कोणती पध्दत झाली.

**श्री.सुनिल महाजन :-** तुम्हाला विरोध करायचा आहे का ?

**श्री.मनोज चौधरी :-** विरोध नाही, हे पहा भाऊ. विरोध नाही करत आहे, म्हणजे तुमचे काय म्हणणे आहे आम्हाला निधी मिळु द्यायचा नाही का आमच्या प्रभागात,

**श्री.सुनिल महाजन :-** मी कुठे नाही म्हणत आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** मग हेच झाले ना.

**मा.महापौर :-** तुम्ही समावेश करत नाहीयेत आणि विरोध पण करत नाहीये मग करायच काय, तुम्ही पण द्याना प्रस्ताव आम्ही कुठे नाही म्हणत आहे.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना कोण काय बोलले समजत नाही.)

**श्री.मनोज चौधरी :-** एक मिनीट मला आयुक्त मॅडमांचा खुलासा पाहीजे आहे.

**मा.उपमहापौर :-** एक मिनीट मनोजभाऊ, हे सभागृह आहे, सभागृहामध्ये आपली चर्चा चालु आहे शांततेत मांडा, एक एक मांडा,

**श्री.मनोज चौधरी :-** भाऊ सभागृह आहे ना चर्चा ही झाली पाहीजे आणि चर्चाच करतो आहे आम्ही समजुन घ्या, भाऊंनी जी सुचना मांडली, भाऊंनी म्हणतांना काय म्हटलं, या व्यतिरिक्त जे प्रस्ताव असतील ते मनपाने पाठवायचे नाही. याचा उद्देश काय झाला.

**मा.उपमहापौर :-** एका मागुन एक शांततेत मांडा, एक एक मांडा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रत्येकाला समसमान निधी मिळायला पाहीजे.

**श्री.मनोज चौधरी :-** एक मिनीट, तुमको अच्छा समझता तुम सिनिअर नगरसेवक है. हा आपला अधिकार आहे का डी.पी.डी.सी.कडुन पैसे द्यायच, फक्त मॅडम याचे उत्तर मला द्या तुम्ही. हा अधिकार महापौरताई असतील, उपमहापौर असतील किंवा तुम्ही असाल. हा आपला अधिकार आहे का ?

**श्री.सुनिल महाजन :-** सभागृहाचा अधिकार आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** फक्त प्रस्ताव पाठवायचा आहे तुम्हाला, प्रस्ताव पाठवायचा आहे. तुमची पुढची भुमिका मी सांगीतली ना काय आहे पुढची भुमिका, पालकमंत्री पैसे देत नाही ही भुमिका राहील तुमची पुढची. मला माहित आहे ना काय आहे ते तर, मॅडम मला याचा खुलासा करा.

**मा.उपमहापौर :-** सभागृहाला तुमचेही प्रस्ताव द्या, तुमचे प्रस्ताव घेत नाही असे म्हटले कुठे ?

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना कोण काय बोलले समजत नाही.)

**मा.महापौर :-** फक्त तुम्हाला दोघांनाच पत्र दिले होते का ? हे पत्र आल्यानंतर सर्व सभागृहाला कळविणे आवश्यक होते. हे कोणालाच कळविले गेले नाही.

**श्री.दिलीप पोकळे :-** याच्या आधी याच सभागृहात मंजुर झालेले आहे प्रस्ताव

**श्री.मनोज चौधरी :-** हो हो माहिती आहे ताई मान्य आहे आम्हाला

**श्री.राजेंद्र पाटील :-** ताई, ज्याचा प्रस्ताव नसेल तर आपण ॲड करायला म्हणत आहे ना.

**मा.महापौर :-** तयार आहे समाविष्ट करायला आपण

**श्री.मनोज चौधरी :-** मी काय म्हणतो राजुभाऊ थोडी शांतता घ्या. या विषयाला विरोध नाहीये आमचा, आमचे जे काही प्रस्ताव कामे आम्ही मंजुर करुन ठेवलेले आहे आम्हाला जर निधी जास्त मिळत असेल तर, ते जर बरखास्त केले तर तुम्हाला काय उपयोग आहे त्याचा , मी काय म्हणतो भाऊ

**श्री.अश्विन सोनवणे :-** मग आम्ही निधी घ्यायचे नाही का ? म्हणजे तुम्ही त्याच्यातुन ३ करोड घ्याल आणि आम्ही काय घ्यायचे.

**श्री.मनोज चौधरी :-** चला ठिक आहे, तुमचे म्हणणे आहे ना अश्विनभाऊ.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही ३०-३० लाखाचे द्या ना प्रस्ताव.

**श्री.मनोज चौधरी :-** अश्विनभाऊ ऐकुन घ्या ना. मागच्या डी.पी.डी.सी. मधुन ६२ कोटी मधुन सर्वात जास्त निधी कोणत्या प्रभागात मिळाला,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ही पुर्ण यादी आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** कोणत्या कोणत्या प्रभागाला किती किती निधी मिळाला, तेव्हा विरोध करायला काय झाले.

**मा.उपमहापौर :-** अश्विनभाऊ तो निधी कसा आला सर्व सभागृहाला माहिती आहे. कशाला त्याच्यावर चर्चा करत आहे. त्याच्यावर चर्चा करायची आहे का ते सांगा. त्या पैश्यांच्या संदर्भातली चर्चा करायची आहे का सभागृहात ? तो कसा आला निधी हे सगळयांना माहिती आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** भाऊ मी काय म्हणतोय ऐकुन घ्या, आम्ही तुमच्याकडुन न्याय मागतो आहे. न्याय करावा लागेल तुम्हाला, तुम्ही तसे बोलु शकता कसा मिळाला, काय मिळाला, बरं ठिक आहे. मग आम्ही तुम्हाला उपमहापौर म्हणुन मतदान नाही केले आहे का ?

**मा.उपमहापौर :-** आम्ही नाही म्हटलो का ?

**श्री.मनोज चौधरी :-** आम्ही तुमच्याकडून न्याय मागतोय,आमचा अधिकार तुम्हाला दिला नाही का ?

**मा.उपमहापौर :-** ऐकुन घ्या, प्रस्ताव घ्यायचे नाही. असे कोणी म्हटले का ?

**श्री.मनोज चौधरी :-** तुम्ही ते बोलू शकता. भाऊ म्हणत आहे ना सरळ सरळ. तुम्ही एक काम करा ना. ज्या प्रभागात, ज्या प्रभागात निधी मिळालेला आहे बर ठिक आहे. मग आम्ही महापौर च्या वेळी मतदान दिले नाहीये का ,त्यांना निधीच देऊ नका ना.

**मा.उपमहापौर :-** आम्ही ते म्हणत नाहीये.

**श्री.मनोज चौधरी :-** मतदान केल नाहीये का

**मा.उपमहापौर :-** ऐका ना

**श्री.मनोज चौधरी :-** भाऊ म्हणत आहे ना सरळ सरळ.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना कोण काय बोलले समजत नाही.)

**श्री.मनोज चौधरी :-** मी काय म्हणतोय की ज्या प्रभागाला जास्त निधी मिळाला आहे त्या प्रभागात निधी देवूच नका ना.

**मा.उपमहापौर :-** संपला विषय मान्य आहे.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना कोण काय बोलले समजत नाही.)

**श्री.सुनिल महाजन :-** ते पण मान्य, मनोजभाऊ, मनोजभाऊ.

**मा.महापौर :-** जे प्रस्ताव दिले आहेत ते काम झालेले नाहीयेत त्यांना खरं तर सगळ निधी द्यायला पाहिजे.

**मा.उपमहापौर :-** प्रभाग क्र.६, प्रभाग क्र.१७, या दोन प्रभागांमध्ये टोटल काम झाले नाहीयेत.

**श्री.मनोज चौधरी :-** अश्विनभाऊ, ऐका ना.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझ्या प्रभागात १०० कोटीचे कामे अपेक्षीत आहे.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना कोण काय बोलले समजत नाही.)

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझा प्रभाग क्र.१, तुमच्या प्रभागाला तुम्ही सिंगापुर करा, हॉंगकॉंग करा,

**मा.महापौर :-** पोकळे साहेब तुमच भांडण्याचे अर्थ काय आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** याच्या अगोदर पाठविलेले प्रस्ताव का मंजुर नाही करायचे.

**श्री.मनोज चौधरी :-** आम्हाला तेवढेच म्हणायचे आहे.

**मा.महापौर :-** आम्ही समसमान निधीचा विचार केलेला आहे. यामध्ये तुम्ही तुमचे कामे द्या ते इन्क्ल्युड होतील.

**श्री.सुनिल महाजन :-** चला पुढे घ्या.

**श्री.मनोज चौधरी :-** मॅडम, आयुक्त मॅडमांना विचारायचे आहे मला की, जी आता नितीनभाऊंनी सुचना मांडली, जसे नितीनभाऊंनी सांगितले की, या कामा व्यतिरिक्त जे ही विकास कामे असतील त्यांचा प्रस्ताव पाठविण्यात येऊ नये. तर आपण पाठविणार नाही का ? आपण पाठविणार आहेत की नाही इतके सांगा मला.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊंनी दिलेल्या सुचनेची ठरावामध्ये नोंद घेऊन विषय क्र.२० बहुमताने मंजुर करण्यात येत आहे. ज्या ज्या नगरसेवकांची कामे दिलेली नसतील त्यांचा सुध्दा समावेश करण्यात यावा. या अनुषंगाने विषय क्र.२० बहुमताने मंजुर करण्यात येत आहे. पुढचा विषय घेण्यात यावा.

**श्री.मनोज चौधरी :-** मॅडम मला उत्तर नाही मिळाले, आयुक्त मॅडम आपल्याकडुन उत्तर नाही मिळाले, एक मिनीट एक मिनीट कुलभुषणभाऊ, मॅडम उत्तर द्या. तुम्ही यादी पाठवायचे नाही म्हणत आहे ना. कलेक्टर ऑफिस मधुन आपल्याला काही पत्र मिळाले की, प्रभाग ८ साठी इतका निधी, प्रभाग एवढयासाठी इतका इतका निधी तर आपण प्रस्ताव पाठवणार की नाही. इतक सांगा फक्त.

**मा.आयुक्त :-** विकास कामे ठरविण्याचा पुर्णत: अधिकार हा सर्वसाधारण आपल्या सभेचा आहे. काही प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार डी.पी.डी.सी.च्या अनुषंगाने मा.पालकमंत्री महोदयांना आहे. आता आपला हा जो प्रस्ताव आपला झालेला आहे हा २०२३-२४ चा आहे आणि प्रशासकीय स्तरावर आहे आणि मागचे मी प्रस्ताव मागविलेले होते किंवा पाठविलेले होते तर त्यावर आपले आर्थिक वर्षच नमुद केलेले नाही.

**श्री.मनोज चौधरी :-** मागच्या प्रस्तावांचे काही महत्व नाही आहे का ? मॅडम मागच्या प्रस्तावांना जसे तुम्ही बोलले की, या वर्षाच्या या प्रस्ताव आपण पाठवु. पण मागचे जे प्रस्ताव पाठविलेले आहे त्यातील अनेक कामे मंजुर करण्याचे अधिकार महासभेला आहे. बरोबर तुमच्या म्हणणे प्रमाणे, ते आम्ही मंजुर केलेले आहे. कामे मंजुर आहेत आमचे महासभेत. एक मिनीट, एक मिनीट भाऊ. विकास कामे आमचे मंजुर आहे फक्त तुम्ही प्रस्ताव पाठविणार की नाही. ऐवढेच विचारत आहे.

**मा.आयुक्त :-** जसे नितीनभाऊंनी जशी सुचना मांडलेली आहे तसे जर करायचे असले तर आपल्याला कायदेशीर प्रक्रिया फॉलो करावी लागेल.

**मा.उपमहापौर :-** आपण याच्यापुर्वी मिळालेल्या संदर्भीय पत्रानुसार प्रस्ताव पाठविलेले आहे का ?

**मा.आयुक्त :-** नाही.

**मा.उपमहापौर :-** आणि प्रस्ताव जर पाठविलेले नसतील तर त्याच्यावर चर्चा करायची कशाला.

**श्री.मनोज चौधरी :-** कुलभुषण भाऊ, ते पत्र इकडे आले समजा कलेक्टर साहेबांच, कलेक्टर साहेब प्रस्तावासाठी पत्र मागतात ते पत्र आले तर प्रस्ताव पाठविणार नाही का तेच विचारत आहे मी फक्त.

**मा.उपमहापौर :-** नाही म्हणत आहेत ना मॅडम

**श्री.मनोज चौधरी :-** पाठवतील की नाही ऐवढेच विचारात आहे मी. पाठवतील की नाही फक्त तेच विचारतो आहे मॅडम मी. तुम्ही पाठवाल की नाही. तुम्हाला जर पत्र आले की, प्रभाग क्र.८ साठी ऐवढे ऐवढे निधी उपलब्ध करुन दिलेले आहे या या विकास कामांना समाविष्ट करुन आपण प्रस्ताव पाठविण्यात यावा. तर आपण प्रस्ताव पाठवणार की नाही. ऐवढेच विचारायचे आहे. विकास कामांचा ठराव झाला आहे ना ताई. ठराव झाला आहे. विकास कामांचा ठराव झालेला आहे. नविन कामे नाही त्याच्यात जुनेच वर्ष दोन वर्षापुर्वीचे आपले जे ठराव झालेले आहे महासभेत तेच कामे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग या ठरावाचे काय होईल. २०२३-२४ साठी जे आपण निर्धारीत करुन देतो आहे येथे. मग त्याचे काय होईल. म्हणजे पुन्हा त्याच्यात गोंधळ होईल. कारण आपण तो गोंधळ निर्माण व्हायला नको.

**मा.उपमहापौर :-** जर मागच्या वर्षाचे कामांचा विचार करायचा असेल तर मग जे आपल्याला पाठवलेले प्रस्ताव आहे याच्यापुर्वी त्यांचा विचार केव्हा होईल. जे तुम्ही हे

**श्री.मनोज चौधरी :-** कुलभुषणभाऊ एक मिनीट थांबा, येथेच थांबा, हेच मी सांगत आहे की, मी पत्र पाठविले होते ना, पालकमंत्र्यांनी मला डी.पी.डी.सी.साठी पत्र दिल होत. मी ते पत्र इकडे पाठविले, साहेब काय बोलले मला, बेसिक पत्र पाहिजे नाही तर माझे कामे मंजुर होऊन गेले असते. हा जो तुमचा आकडा २९ चा आहे तो २६ वर आला असता, २४ वर आला असता, हेच म्हणणे आहे माझे कोणी केले हे डिले अधिकाऱ्यांनी केले ना भाऊ, मी ते भांडत आहे तुमच्या लक्षात येत नाही. मी काय बोलत आहे. हे काम अधिकाऱ्यांमुळे डिले झाले ना. नितीनभाऊ माझे म्हणणे काय आहे तुमच्या लक्षात आले का ? मी जे पत्र पालकमंत्र्यांनी दिल होत डी.पी.डी.सी.साठी ते मी कलेक्टर ऑफिसला दिल, यांनी सांगितले की, प्रस्तावांसाठी तुम्ही पत्र आणा, मी पत्र आणुन दिल. इकडुन यांचे म्हणणे होते की, बेसिक पत्र पाहिजे. हे सांगत आहे भाऊ मी. द्याल की नाही मॅडम.

**मा.आयुक्त :-** या अगोदर ही या सभागृहात बऱ्याच वेळी चर्चा झाली,भाऊ मी तुमच्याशी ही बऱ्याच वेळी बोललेली आहे .आपण जे अशासकीय ठराव करतो हे निधी मान्यतेच्या अनुषंगाने करत नाही. आपले कोट्यावधीचे ठराव झालेले आहे. म्हणुन आपल्याला कलेक्टर ऑफिस कडुन पत्र लागते की, नेमका कितीचा प्रस्ताव पाठवायचा,कोणता प्रस्ताव पाठवायचा, मागच्या वर्षीपण आपल हेच झालं होत.

**श्री.मनोज चौधरी :-** आल आल मॅडम लक्षात आल. पण ते पत्र त्यांनी दिले बेसिक प्रभाग ८ साठी ३ कोटी रुपयांचा निधी, तुम्ही याला प्रस्ताव पाठवा, तर तुम्ही प्रस्ताव पाठवणार की नाही. ऐवढच विचारत आहे मी तुम्हाला,

**मा.आयुक्त :-** जो पर्यंत प्रस्ताव रद्द होत नाही महानगरपालिकेकडुन मनपाकडुन तो पर्यंत तो प्रस्ताव ॲक्टीव्ह आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** कोणते प्रस्ताव

**मा.आयुक्त :-** जे काही झालेले आहे याच्या अगोदर.

**श्री.मनोज चौधरी :-** बरोबर आहे.

**मा.आयुक्त :-** जो पर्यंत कायदेशीर प्रक्रिया होऊन ते रद्द होत नाही तो पर्यंत तो प्रस्ताव ॲक्टीव्ह आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** ॲक्टीव्ह आहेत ना मॅडम. पुन्हा पत्र द्यावे लागेल का मॅडम.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पण या ठरावाला अडचण येऊन जाईल ना.

**श्री.सुनिल महाजन :-** ओ गोराणे साहेब चला पुढचा विषय घ्या ना. तटस्थ आहे ना सांगितले ना त्यांनी तटस्थ आहे.

**नगरसचिव :-**आता याला, नाही नाही एक मिनिंटभाऊ सभागृहाला विनंती आहे की, कायदेशीर बाबी आहे. आता इतकी चर्चा झाली तर २ मिनीट फक्त, आता हा जो ठराव आहे. विषय क्र.२० जो आहे.हा सर्वानुमते मंजुर आहे का?

**मा.उपमहापौर :-** विषय क्र.२० ला तुमची भुमिका काय तटस्थची आहे का ? कोणा कोणाची ?

**श्री.सुनिल महाजन :-** दोन जण आहेत.

**नगरसचिव :-** तटस्थ कोण कोण आहे. विनंती करतो त्यांनी हात वर करायचे आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** केले आहे साहेब, ऐवढे करु का ?

**मा.उपमहापौर :-** ४ लोकं आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग यांच्या कडुन आलेल्या निधीच्या प्रस्तावाचा विचार करायच की नाही.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** भाऊ, आम्ही ऑलरेडी निधीचा प्रस्ताव देऊन टाकलेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे हे सदस्य सोडुन, या निधीचा विनीयोग करावा लागेल निधीचा

**श्री.मनोज चौधरी :-** ज्याला मिळेल त्याला मिळेल निधी.

**श्री.सुनिल महाजन :-** चला पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-** सभागृहात ४ लोकं तटस्थ आहे. तटस्थ जे सदस्य आहे त्यांचे नांव वाचा, प्रिझेंट जितके सदस्य आहे त्यांचे नांव वाचा, विषय क्र.२० संदर्भात सभागृहात मा.श्री.नितीनभाऊ लढ्ढा यांनी जी सुचना मांडली आहे. त्यासुचनेच्या बाजुने किती सदस्य आहे ते सांगा.

**श्री.मनोज शर्मा, गणक :-** एकुण ४० सदस्य उपस्थित आहे. त्यापैकी ४ सदस्य जे आहे ते तटस्थ आहे आणि सन्मा.सदस्य जे तटस्थ आहे त्यांचे नावे आहे, श्री.दिलीप पोकळे, श्री.दारकुंडे, श्री.मनोज चौधरी, श्री. विक्रम किसन.

**नगरसचिव :-** ४ सदस्य तटस्थ आहे बाकीचे जे उपस्थित आहे त्यांचे नांव वाचा. नितीनभाऊ यांच्या सुचनेला अनुमोदन आहे.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत होते त्यामुळे कोण काय बोलले ते समजत नाही)

**नगरसचिव :-** नाही नाही रितसर घेवु द्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आम्हीच सांगुन देतो ना एक एक उठुन.
**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ॲड.शुचिता हाडा,
**सौ.दिपमाला काळे :-** दिपमाला मनोज काळे.
**सौ.मिनाक्षी पाटील :-** मिनाक्षी गोकुळ पाटील
**सौ.मंगला चौधरी :-** मंगला संजय चौधरी,
**नगरसचिव :-** यांना वाचु द्या, यांच्याकडे लिस्ट आहे. यांना वाचु द्या.
**मा.उपमहापौर :-** ते सांगत आहे ना तिकडुन तुम्ही गलत का करत आहे.
**श्री.मनोज शर्मा, गणक :-** उपस्थित सर्व सदस्यांचे नांवे पुढील प्रमाणे, चौधरी चेतना किशोर, सोनवणे मुकुंदा भागवत, काळे अमित पांडुरंग, चौधरी मंगला संजय, ॲड.शुचिता हाडा, सोनवणे धीरज मुरलीधर, भोळे सिमा सुरेश, काळे दिपमाला मनोज, सोनवणे अश्विन शांताराम, पाटील चंद्रशेखर शिवाजी, कापसे मयुर चंद्रकांत, पाटील विजय पुंडलीक, बेंडाळे उज्वला मोहन, राणे गायत्री इंद्रजित, तायडे सुरेखा नितीन, मराठे जितेंद्र भगवान, सोनवणे अंजनाबाई प्रभाकर, पाटील राजेंद्र झिपरु, खडके विश्वनाथ सुरेश, सोनवणे सुरेश माणिक, बारी शोभा दिनकर, नेरकर सरिता अनंत, बाविस्कर किशोर रमेश, कोल्हे प्रविण रामदास, शेख हसीनाबी शरीफ, पाटील कुलभुषण विरभान, चव्हाण ज्योती बाळासाहेब, पाटील मिनाक्षी गोकुळ, खडके सुनिल वामनराव, जोशी अनंत हरिश्चंद्र, महाजन सुनिल सुपडु, महाजन जयश्री सुनिल, नाईक प्रशांत सुरेश, पटेल ईब्राहिम मुसा, बागवान रियाज अहमद अब्दुल करीम, जे ४ लोकं तटस्थ आहे त्यांचे नांव मी पुर्वी जाहिर केलेले आहे. श्री.लढ्ढा नितीन बालमुकुंद.
**नगरसचिव :-** विषय क्र.२० ला ४ सन्मा.सदस्य तटस्थ आहे. बाकीचे जे उपस्थित आहे त्यांची मा.श्री.नितीनभाऊ लढ्ढा यांचे सुचनेला अनुमोदन आहे. मा.पिठासीन अधिकारी यांनी विषय क्र.२० हा सर्वानुमते मंजुर केलेला आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२४० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका सर्व सन्मा.नगरसेवकांनी विकास कामांचे प्रस्ताव सादर केलेले असुन ते विविध शासकीय योजनांतुन घेणे बाबत विनंती केलेली आहे. सदर विकास कामे जिल्हा नियोजन मंडळ तसेच राज्य शासनाच्या निधीतुन घेणेबाबत मा.महापौर कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना/ नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना/नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेच्या निधीतुन कामे सुचविलेली असुन त्यास मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेले आहे. तरी यासोबत सादर केलेल्या यादीतील अ.क्र.०१ ते ११३ या विकास कामांना मान्यता प्रदान करण्यात येत असून याव्यातिरिक्त ज्या सन्मा.सदस्यांचे यामध्ये कामे नमूद नाहीत त्या सन्मा.सदस्यांनी प्रस्ताव सादर करावेत त्यांचे प्राप्त झालेले प्रस्ताव सुध्दा यामध्ये समाविष्ट करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार, सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांनूसार व मा.पिठासिन अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानूसार उपरोक्त नमूद यादीतील अ.क्र.०१ ते ११३ या विकास कामांसोबतच सन्मा.सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावानूसार यादीतील नमूद अ.क्र.०१ ते १७ या विकास कामांना सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जिल्हा नियोजन मंडळाकडुन सन २०२३-२४ साठी उपलब्ध असलेल्या निधीमधून सभागृहाने या प्रस्तावाव्दारे जे जे कामे प्रस्तावीत केलेली आहेत ते समसमान निधीच्या अनुषंगाने प्रस्ताव आहेत. प्रशासनाने या व्यतिरिक्त दुसरा कुठलाही प्रस्ताव पाठवु नये आणि पाठविलेला असल्यास त्याची नोंद घेण्यात येऊ नये. याच कामांना या सभागृहाकडुन मान्यता देण्यात येत आहे. या निधी मध्ये यापुर्वी पाठविलेल्या प्रस्तावांचा विचार करण्यात येऊ नये असे जिल्हा नियोजन मंडळास प्रशासनाने अवगत करावे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल** | **- ३६** | **प्रतिकूल - ००** | **तटस्थ - ०४** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** | | |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** | | |

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव.

महासभा ठराव क्र.-१२४० विषय क्र.२० दि.२३/०८/२०२३

| अ. क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | **जिल्हा वार्षिक योजना सन 2023-24 (रुपये 30 कोटी निधी)** | |
| **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना/नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना/नागरी दलित वस्ती सुधारणा योजना** | | | | |
| 1 | खान रुकसाना बी सौ.प्रिया जोहरे | 1 | प्र.क्र.1 गेंदालाल मील परिसरातील मुख्य पाच रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 14800000 |
| 2 | श्रीमती सरिता नेरकर | 1 | प्र.क्र.1 अंतर्गत सिटी कॉलनी परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे व गटारी बांधणे | 7400000 |
| 3 | सौ. गायत्री शिंदे | 2 | प्रभाग क्र. 2 शिवाजी नगर वेताळबाबा मंदिरापासून ते विकास दुधाच्या केंद्रापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 4 | | | प्रभाग क्र. 2 बारशे कॉलनी रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1500000 |
| 5 | | | प्रभाग क्र. 2 शिवाजी नगर हुडको व शिवाजी नगर येथे ठिकठिकाणी नवीन स्लॅब कल्व्हेट व गटारीचे काम करणे | 500000 |
| 6 | श्री. किशोर बाविस्कर | 2 | प्र.क्र. 2 मधील कडु बोवा बिडकर यांच्या घरापासुन ते पाटील काका यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 3000000 |
| 7 | | | प्र.क्र. 2 मधील गुप्ताजी रिक्षावाले यांच्या घरापासुन ते मोहन मराठे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | |
| 8 | | | प्र.क्र. 2 मधील मधुकर चौधरी यांच्या घरापासुन ते मुरली बारी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | |
| 9 | | | प्र.क्र. 2 मधील अशोक सोनवणे यांच्या घरापासुन ते बापु माळी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | |
| 10 | | | प्र.क्र. 2 मधील हनुमान मंदीरापासुन ते रमेश इंगळे यांच्या घरापर्यत रस्ता कॉक्रीटी करण करणे | |
| 11 | | | प्र.क्र. 2 मधील धडें किराणा पासुन ते रिक्षावाले वाणी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | |
| 12 | | | प्र.क्र. 2 मधील निलेश सपकाळे यांच्या घरापासुन ते सोनार कटलरीवाले यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | |
| 13 | सौ.कांचन सोनवणे | 2 | प्रभाग क्रं. 2 मधील मनपा कर्मचारी पुंडलिक नामदेव सोनवणे यांचे घरापासुन ते मनपा कर्मचारी चैत्राम सपकाळे यांचे घरापर्यंत वाणी मंगल कार्यालय गल्लीतील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | |
| 14 | | | प्रभाग क्रं. 2 मधील आसोदा रोड ते साईबाबा मंदीरापर्यंत दोन्ही बाजुस आर.सी.सी. गटार बांधणे. | |
| 15 | | | प्रभाग क्रं. 2 मधील साईबाबा मंदीरासमोर रतीलाल यांचे घरापासुन साईबाबा मंदीर गेट पर्यंत एका बाजुस आर.सी.सी. गटार बांधणे. | 2980000 |
| 16 | | | प्रभाग क्रं. 2 मधील चुनीलाल बाविस्कर यांचे घरापासुन घरकुल कोपरा इंगळे यांचे घरापर्यंत एका बाजुस आर.सी.सी. गटार बांधणे. | |
| 17 | | | प्रभाग क्रं. 2 मधील हरिओम नगर ते अनिल व्हॉलमन यांचे घरासमोरील मंगलाबाई यांचे घरापासुन ते आसोदा रोड पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | |
| 18 | सौ.चेतना चौधरी | 4 | प्र.क्र.4 क मध्ये रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 7400000 |
| 19 | श्री.मुकूंद सोनवणे | 4 | प्र.क्र.4 ड मध्ये रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 7400000 |
| 20 | सौ.भारती सोनवणे | 4 | प्र.क्र.4 ब मध्ये रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 7400000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 21 | श्री. नितीन लड्ढा | 5 | प्र.क्र.05 जामनगरी रेस्टॉरंन्ट ते हेमनानी किराणा (जुना कापड बाजार रोड) पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 1987552 |
| 22 | | | प्र.क्र.05 गुरुदत्त मंदिर ते दाणा बाजार पर्यत पिपल्स बँक मागील रस्ता डांबरीकरण करणे | 1197844 |
| 23 | | | प्र.क्र.05 एकविरा मेटल्स ते प्रितम चहा पर्यत गांधी मार्केट मागील रस्ता डांबरीकरण करणे | 1878381 |
| 24 | | | प्र.क्र.05 सदानंद व्हिडीओ ते पोस्ट ऑफिस (अशोक टॉकीज रोड) पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 1864774 |
| 25 | | | प्र.क्र.05 मराठा मटन हॉटेल ते एम एम मास्टर (तिजोरी गल्ली रोड) पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 2638146 |
| 26 | | | प्र.क्र.05 हंबर्डीकर बेकरी ते पी.के. प्लाझा व दादाजी दरबार ते सागर लाईट व बालाजी प्लाझा ते जरवारी ट्रेडींग पर्यतचे रस्ते डांबरीकरण करणे | 2021253 |
| 27 | सौ.मंगला चौधरी | 6 | श्री.दिलीप ढाके ते लक्ष्मी निवास रस्ता कॉक्रीटचा करणे | 725000 |
| 28 | | | सोपान भोळे ते संतोष वाणी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीट करणे | 830000 |
| 29 | | | राम निवास ते श्री पटेल यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 625000 |
| 30 | | | दरबार हाऊस ते तायडे ते एम.जी. जोशी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1340000 |
| 31 | श्री.अमित काळे | 6 | प्रभाग क्र. 6 अंतर्गत जेडीसीसी बँक कॉलनी परिसरामध्ये आरसीसी गटार बांधणे | 3000000 |
| 32 | | | प्रताप नगर ढाके कॉलनी परिसर मध्ये रस्ते तयार करणे | |
| 33 | श्री.धिरज सोनवणे | 6 | मुस्लीम कॉलनी ते जिवन प्राधिकरण पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1500000 |
| 34 | | | श्री. प्रदीप तळवेलकर यांच्या निवासस्थानापासुन ते डॉ.स्नेहल फेगडे यांच्या निवासस्थाना पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1500000 |
| 35 | ॲड.सौ.शुचिता हाडा | 6 | प्र.क्र.6 मधील टागोर नगर व परिसरातील गटारी व कल्व्हेट बांधणे | 3000000 |
| 36 | सौ.दिपमाला काळे | 7 | प्र.क्र.7 मध्ये प्रोफेसर कॉलनी गंधंव कॉलनी गणेश कॉलनी भागात सिमेंट कॉक्रीटच्या नविन गटारी करणे | 3000000 |
| 37 | डॉ.श्री.अश्विन सोनवणे | 7 | प्रभाग क्र. 7 मध्ये गजानन कॉलनी व इतर परिसरातील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 38 | सौ.सिमा भोळे | 7 | प्रभाग क्र. 7 अंतर्गत मित्र नगर, श्री.सतीश पाटील यांच्या घरापासून ते श्री.अतुल भोळे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 999000 |
| 39 | | | प्रभाग क्र. 7 अंतर्गत मित्र, नगर मधील प्रवीण बुक डेपो पासून ते निर्मल दीप हॉस्पिटल पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 999000 |
| 40 | | | प्रभाग क्र. 7 अंतर्गत मित्रनगर, मधील प्रसायदान बिल्डींग पासून ते नाल्यापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 999000 |
| 41 | प्रा.डॉ.सचिन पाटील | 7 | प्रभाग क्र. 7 मधील गट नं. 60 मध्ये डांबरी रस्ते तयार करणे | 3000000 |
| 42 | सौ. दिपमाला काळे | 7 | प्रभाग क्र. 7 मध्ये प्रोफेसर कॉलनी, गंधर्व कॉलनी व गणेश कॉलनी भागात सिमेंट कॉक्रीटच्या नविन गटारी करणे | 3000000 |
| 43 | डॉ.चंद्रशेखर पाटील | 8 | प्रभाग क्र. 8 शिनू बंगलो, म्हाडा कॉलनी व परिसर मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 3000000 |
| 44 | सौ. प्रतिभा पाटील | 8 | प्रभाग क्र. 8 मधील गट नं. 117 व्दारका नगरमध्ये आरसीसी गटार बांधणे | 3000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 45 | श्री.विजय पाटील | 9 | प्र.क्र.9 मधील गट नं. 348/2 जीवन पाटील ते मुकेश पाटील यांच्या घरापर्यत रोड कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 46 | | | प्र.क्र.9 मधील जिल्हा बँक कॉलनीमध्ये रोड कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 47 | | | प्र.क्र.9 गट नं. 343/1 मध्ये आरसीसी गटार तयार करणे | 500000 |
| 48 | | | प्र.क्र.9 गट नं. 24 मध्ये सुरेश पाटील (पिठाची गिरणी) ते चौधरी सर (धोबीची टपरी) पर्यत आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट तयार करणे | 500000 |
| 49 | श्री.मयुर कापसे | 9 | प्र.क्र.9 गट नं. 22,23 मध्ये ठिकठिकाणी आरसीसी गटार बांधणे | 1000000 |
| 50 | | | प्र.क्र.9 पिंप्राळा गट नं.25 मध्ये विविध ठिकाणी आरसीसी गटार बांधणे | 1000000 |
| 51 | | | प्र.क्र.9 पिंप्राळा गट नं.24 मध्ये विविध ठिकाणी आरसीसी गटार बांधणे | 1000000 |
| 52 | सौ.प्रतिभा कापसे | 9 | प्र.क्र.9 पिंप्राळा ओमशांती नगर व महेश क्लासेस येथे कॉक्रीट रोड तयार करणे | 2500000 |
| 53 | | | प्र.क्र.9 पिंप्राळा परिसरात विविध ठिकाणी आरसीसी गटारी बांधणे | 500000 |
| 54 | श्री.कुलभूषण पाटील | 10 | प्र.क्र.10 मध्ये मयुर कॉलनीच्या नाल्यावरती पुलाचे बांधकाम करणे व नाल्याला संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे तसेच उर्वरीत जोड रस्त्यांचे डांबरीकरण करणे | 7400000 |
| 55 | श्री.सुरेश सोनवणे | 10 | गट नं. 219 मधील शाळा क्र.19 येथील रस्ता बनविणे सैय्यद नायकच्या घरापासून ते मौलाना आझाद मनपाचा शाळा क्र. 19 पर्यत नविन रोड बनविणे | 2500000 |
| 56 | | | गट नं. 217 मध्ये ख्यॉजानगरी येथिल नविन रस्ता बनविणे - रईस भाई च्या घरापासून ते अयूब भाऊच्या घरापर्य | 3000000 |
| 57 | | | अयुबभाऊच्या घरापासून ते जाकिर पठाण याच्या घरापर्यत | 2000000 |
| 58 | सौ.शोभाताई बारी | 10 | प्र.क्र.10 मधील गट नं. 191 सिध्दीविनायक कॉलनीतील रस्ते डांबरीकरण करणे | 2450000 |
| 59 | | | प्र.क्र.10 पिंप्राळा गावठण मधील हलवाई गल्ली मधील रोड कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 60 | | | प्र.क्र.10 पिंप्राळा मधील बारीवाडा मधील रोड कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 61 | | | प्र.क्र.10 पिंप्राळा मधील हरी बारी ते अनिल जावरे यांच्या घरापर्यत रोड कॉक्रीटीकरण करणे | 930000 |
| 62 | | | प्र.क्र.10 त्रिमुर्ती कॉलनी मधील आरसीसी गटार तयार करणे | 1000000 |
| 63 | | | प्र.क्र.10 मधील गट नं. 171 मध्ये आरसीसी गटार बांधणे | 720000 |
| 64 | | | प्र.क्र.10 मध्ये बसण्यासाठी बाकडे तयार करुन लावणे | 500000 |
| 65 | हसीना बी शरीफ शेख | 10 | प्र.क्र.10 मधील न्यु ख्वॉजा नगर रिक्षा स्टॉप पोलिस चौक समोर ते बिलाल चौकापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 7490000 |
| 66 | सौ.उषाताई पाटील | 11 | प्रभाग क्र. 11 राजपुत गल्ली मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 67 | | | प्रभाग क्र. 11 तडवी गल्ली मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 68 | | | प्रभाग क्र. 11 तडवी गल्ली जवळील भिलाटी मधील 2 गल्ल्यांमध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 69 | सौ.पार्वताबाई भिल | 11 | प्रभाग क्रं. 11 मधील शाम नगर मध्ये आर.सी.सी. गटारी बांधणे. | 1000000 |
| 70 | | | प्रभाग क्रं. 11 मधील तडवीवाडा परिसरातील आर.सी.सी. गटारी बांधणे. | 1000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 71 | | | प्रभाग क्रं. 11 मधील वडरवाडया परिसरातील आर.सी.सी. गटारी बांधणे. | 1000000 |
| 72 | सौ.उज्ज्वला बेंडाळे | 12 | सर्वे नं.561/2 मेहरुण अनुराग स्टेट बँक कॉलनी9 मीटर रस्ता डांबरीकरण करणे श्री.आनंद कुलकर्णी यांचे घर ते प्रा.घुगे सर यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 3000000 |
| 73 | | | सर्वे नं.563/3 प्लॉ.नं.21 (यांचे) श्री.निवृत्ती पाटील यांचे घरापासुन ते श्री.मनोज जवरे प्लॉ.नं.12 यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे तसेच प्लॉ.नं.16 मनोज नसते ते प्लॉ.नं.20 रस्ता डांबरीकरणे | |
| 74 | | | प्र.क्र.12 मधील टेलिफोन नगर पच्छिम धांडे कोचींग क्लासेसच्या दोन्ही साईड आरसीसी गटार बांधणे | |
| 75 | | | प्र.क्र.12 मधील संमित्र कॉलनी, पारख नगर, श्रध्दा कॉलनी येथील परिसरात आरसीसी गटार बांधणे | |
| 76 | सौ.गायत्री राणे | 12 | प्रभाग 12 अंतर्गत लक्ष्मी नगर मधील डिबी.महाजन यांच्या घरापासून ते सुजित पाटील (कल्पक फेब्रीकेशन) पर्यट कॉक्रीट रस्ता करणे | 1500000 |
| 77 | | | प्र.क्र.12 सौदर्य साधना ब्युटी पार्लर पासुन ते जयंत राणे यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रस्ता करणे | 1500000 |
| 78 | श्री.नितीन बरडे<br>श्री.अनंत जोशी<br>श्री.सुनिल महाजन | 12<br>12<br>15 | प्रभाग क्र. 12 मधील मेहरुण सर्व्हे क्र. 467 हनुमान को-ऑप. सोसा. मकरंद कॉलनी परिजात को-ऑप्. सोसा. मधील रस्ते डांबरीकरण करणे | 5410308 |
| 79 | | | प्रभाग क्र. 12 मधील मेहरुण सर्व्हे क्र. 468/2 महाबळ कॉलनी परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 3918436 |
| 80 | सौ.अंजनाताई सोनवणे | 13 | ग.नं. 462 भागातील रस्ते डांबरीकरण करणे | 2500000 |
| 81 | | | ग.नं. 450 भागातील रस्ते डांबरीकरण करणे | 3400000 |
| 82 | | | ग.नं. 452 भागातील रस्ते डांबरीकरण करणे | 1500000 |
| 83 | सौ.सुरेखा तायडे | 13 | प्र.क्र.13 समता नगर मध्ये रहिवाशी वस्त्यांमध्ये कॉक्रीट गटार करणे | 2500000 |
| 84 | | | प्र.क्र.13 विवेक कॉलनी मधील गट नं. 466/4+5मध्ये रस्त्यांचे डांबरीकरण करणे | 4000000 |
| 85 | | | प्र.क्र.13 देवेंद्र नगर मध्ये कॉक्रीट गटार करणे | 1000000 |
| 86 | श्री.जितेंद्र मराठे | 13 | प्र.क्र.13 गट नं. 451 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 2400000 |
| 87 | | | प्र.क्र.13 गट नं. 466 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 5000000 |
| 88 | श्री.राजेंद्र घुगे | 14 | प्र.क्र.14 मध्ये आरसीसी गटार बांधणे | 3000000 |
| 89 | | | प्र.क्र. 14 मध्ये आदर्श नगर, गणपती नगर, गायत्री नगर व तांबापुरा येथे आरसीसी गटार बांधणे | |
| 90 | | | प्र.क्र.14 अंतर्गत स.नं.272 प्लॉट नं. 5 श्री.शुभम गरुड यांचे घरापासून ते श्री.दिनेशन चौधरी यांचे घरापर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 999000 |
| 91 | | | प्र.क्र.14 अंतर्गत स.नं.272 श्री.कौतिक शालीग्राम वाणी यांचे घरापासुन ते गजानन किराणा पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 999000 |
| 92 | | | प्र.क्र.14 अंतर्गत स.नं.272 श्री.रामदास मारोती बारी यांचे घरापासुन ते श्री.नारायण मिस्तरी याचे घरापर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 999000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 93 | श्री. प्रशांत नाईक<br>श्रीमती शबाना बी खाटीक | 15 | प्र.क्र. 15 अंतर्गत सदोबा वेअर हाऊस ते चंद्रकांत स्वॉमिल पर्यत आरसीसी गटार बांधणे | 5829744 |
| 94 | सौ.जयश्री महाजन | 15 | प्र.क्र. 18 इकरा कॉलेज ते झोया अर्पा., इकरा कॉलेज ते बसेरा अर्पाटमेंट, ॲङइम्रान ते डॉली मिल्क, गणेश मंदीर ते टिक्की हॉल, केजीएन गल्ली मेनरोड, बसेरा अर्पा. ते हनीफ खान साहब रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 95 | सौ. रजनी अत्तरदे | 16 | प्र.क्र.16 कासमवाडी, जैस्वाल मंगल कार्यालय, डॉ.चिंचोले पाटील सर उदयराम महाजन, ईच्छाराम पाटील व परिसरात सिमेंट रस्ते बांधणे | 2000000 |
| 96 | | | प्र.क्र.16 कासमवाडी, जैस्वाल मंगल कार्यालय, डॉ.चिंचोले पाटील सर उदयराम महाजन, ईच्छाराम पाटील व परिसरात गटारी बांधणे | 1000000 |
| 97 | श्री.विरण खडके | 17 | प्र.क्र.17 शांतिनिकेतन हर्सींग सोसायटी, ट्रान्सपोर्ट नगरच्या मागच्या भिंतीपासून ते श्री.संतोष कृष्णा रडे गट नं. 31/1 यांच्य घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण / डांबरीकरण करणे | 3000000 |
| 98 | | | प्र.क्र.17 शांतिनिकेतन गट नं. 31/1 श्री.चाडसे सर यांच्या घरासमोरील रस्ता मुख्य शिवरोड ट्रान्सपोर्ट नगर पर्यत जोडणारा रस्ता कॉक्रीटीकरण / डांबरीकरण करणे | |
| 99 | श्री.सुनिल खडके | 17 | स्वामी लक्ष्मी नारायण नगर गट नं.81 ते 84, 76 ते 80 गटार बांधणे तसेच स्वामी लक्ष्मी नारायण नगर गट नं.58/7 मध्ये जयंत पाटील यांच्या घरापर्यत कॉक्रीट रस्ता तयार करणे | 3000000 |
| 100 | सौ.मिनाक्षी पाटील | 17 | हितेश पाटील यांचे घरापासून तेउज्ज्वल क्लासेस कॉक्रीट रोड बनविणे | 3000000 |
| 101 | | | पुरुषोत्तम चव्हाण यांच्य घरापासून ते बालाजी मंदिर गेट पर्यत कॉक्रीट रोड बनविणे | |
| 102 | | | अयोध्या नगर परिसरात ठिकठिाकणी गटारी बनविणे | |
| 103 | | | पित्रोडा यांच्या घरापासुन ते पवार यांच्या घरापर्यत कॉक्रीट रोड करणे | |
| 104 | श्री.रियाज बागवान<br>सईदा बी शेख | 18<br>18 | प्र.क्र. 18 इकरा कॉलेज ते जोया अपार्ट., थिम कॉलेज ते बसेरा अर्पाटमेंट, ॲड. अमिन यांचे घरापासुन ते डॉली मिल्क, अहेतेशाम देशमुख ते ममता हॉस्पीटल मेन रोड, गणेश मंदीर ते टिक्की हॉल, हाजी मंजिल ते खान साहब यांचे घरापर्यंत, आशीफ मेमन यांचे घरासमोरील रोड, केजीएन गल्ली ते शाह चक्की, चिस्तीया अर्पा. ते कमा किराणा ते नाला पर्यत तसेच परिसरातील ठिकठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | 6000000 |
| 105 | सुन्ना बी देशमुख | 18 | प्र.क्र. दत्त नगर व 18/1 रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 106 | श्री.महेश चौधरी | | प्र.क्र.7 माजी नगरसेवक डी.डी.वाणी यांच्या घराजवळ व इतर परिसरातील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 107 | श्री.विशाल त्रिपाठी | | प्र.क्र.14 अंतर्गत सर्वे नं. 271 प्लॉट नं. 58 ते सुनंदा किराणा पर्यत रोड साईडला आरसीसी गटार बांधणे | 999000 |
| 108 | | | प्र.क्र.14 अंतर्गत सुनंदा किराणा ते आबा सायकल मार्ट पर्यत (उजवी बाजू) रोड साईडला आरसीसी गटार बांधणे | 999000 |
| 109 | | | प्र.क्र.14 अंतर्गत सुनंदा किराणा ते आबा सायकल मार्ट पर्यत (डावी बाजू) रोड साईडला आरसीसी गटार बांधणे | 996000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 110 | श्री.राजेंद्र मराठे | | प्रभाग क्र. 02 अंतर्गत शिवाजी नगर मध्ये महाराष्ट्र दालमिल ते श्री.भगवानदास ओझा यांचे घरापर्यत गटार तयार करणे | 3000000 |
| 111 | | | प्रभाग क्र. 02 अंतर्गत शिवाजी नगर मध्ये सचिन वाणी यांच्या घरापासून ते श्री.प्रमोद पाटील यांचे घरापर्यत गटार तयार करणे | |
| 112 | | | प्रभाग क्र. 02 अंतर्गत शिवाजी नगर, बारशे कॉलनी ते 1 नं व 2 नं गल्ली मध्ये गटार व कल्व्हेट तयार करणे | |
| 113 | | | प्रभाग क्र. 02 अंतर्गत शिवाजी नगर मध्ये पटेलवाडी समोर, शशी बारी यांच्या घरासमोर, शंकर सनस यांच्या घरासमोर, खुपचंद सागरमल शाळेसमोर, बापू गॅसवाले यांचे घरासमोर, काळे नगर दत्त मंदिर जवळ, विष्णुकांत पुरोहित महादेव मंदीर समोरील गटार व कल्व्हेट तयार करणे | |
| | | | | 22,59,24,438.00 |

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांनूसार व मा.पिठासिन अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानूसार उपरोक्त नमूद यादीतील अ.क्र.०१ ते ११३ या विकास कामांसोबतच सन्मा.सदस्यांनी दिलेल्या खालील नमूद अ.क्र.०१ ते १७ या विकास कामांना सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | **जिल्हा वार्षिक योजना सन 2023-24 (रुपये 30 कोटी निधी)** | |
| **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना/नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना/नागरी दलित वस्ती सुधारणा योजना** | | | | |
| 1 | सौ.रंजना सपकाळे श्री.दत्तात्रय कोळी | 3 | प्र.क्र.3 अंतर्गत खेडी बु मधील सर्व रस्ते डांबरीकरण करणे. | 15000000 |
| 2 | श्री.चंद्रशेखर पाटील | 8 | प्र.क्र.8 अंतर्गत विलास सोनवणे वाघुळदे नगर यांच्या घरापासुन हर्षगिरी अपार्टमेंट पर्यंतची मोठी गटार तयार करणे. | 3000000 |
| 3 | | | प्र.क्र.8 अंतर्गत विठ्ठ पार्क, गट नं.74 शुभम प्रोव्हीजन अरुण पाटील जुना निमखेडी रोड येथिल गटार करणे. | |
| 4 | | | प्र.क्र.8 अंतर्गत गट नं.76 महादेव मंदीर जवळील रस्ते कॉक्रीट करणे. | 15000000 |
| 5 | सौ.रजनी अत्तरदे | 16 | प्र.क्र.16 मध्ये नवभारत दुग्धालय ते नाथवाडा (टी पाईंट) पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 3000000 |
| 6 | | | प्र.क्र.16 मुकूंद नगर मधील मानेश्वर शिव मंदीर रोड कॉक्रीटचा करणे. | |
| 7 | | | प्र.क्र.16 नाथवाडा ते संतसेना सलुन पर्यंत रस्ता कॉक्रीटचा करणे. | |
| 8 | | | प्र.क्र.16 सुमन बिल्डींग ते पांडुरंग अण्णा जोशी यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटचा करणे. | |
| 9 | श्री.ईब्राहीम पटेल | 18 | प्र.क्र.18 रजा कॉलनी मध्ये आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे तसेच रस्ते डांबरीकरण करणे. | 3000000 |
| 10 | सौ.निता सोनवणे | 19 | यु.क्र.19 मध्ये अंतर्गत सुप्रिम कॉलनी सर्व्हे 163 व 188 मध्ये आरसीसी गटार बांधणे. | 3000000 |
| 11 | सौ.जिजाबाई भापसे | 19 | यु.क्र.19 मध्ये अंतर्गत सुप्रिम कॉलनी सर्व्हे 166 व 184/2 मध्ये आरसीसी गटार बांधणे. | 3000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | सौ.रंजना विजय सोनार | 17 | प्र.क्र.17 मधील सिध्दी विनायक शाळेपासुन ते भारुळे साहेबांच्या घरापर्यंत डांबरी रस्ता | 2000000 |
| 13 | | | प्र.क्र.17 मधील अमोल चौधरी यांच्या घरापासुन ते बारा खोल्याकडील डांबरी रस्ता | 1000000 |
| 14 | सौ.ज्योती बाळासाहेब चव्हाण | 13 | प्र.क्र.13 मधील आदर्श नगर, रविंद्र नगर, नुतनवर्षा कॉलनी मध्ये गटारी बनविणे. | 2000000 |
| 15 | | | प्र.क्र.13 अंतर्गत ठिकठिकाणच्या बोळ कॉक्रीटीकरण करणे. | 3000000 |
| 16 | | | प्र.क्र.13 अंतर्गत हटकर मंगलकार्यालयाच्या परिसरात तसेच दगडीचाळ रस्ते तयार करणे. | 2400000 |
| 17 | श्री.राजेंद झिपरु पाटील | 04 | प्र.क्र.04 अ मध्ये रस्ते काँक्रीटीकरण करणे. | 7400000 |

**नगरसचिव -विषय क्र.२१ :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील सन्मा.सदस्य यांचेकडून मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडेस विविध विकास कामे करून मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झालेले असून सोबतचे यादीतील एकूण ०१ ते १०७ कामे विविध शासकीय योजनांच्या निधीमधुन तसेच मनपा निधीतून करणेबाबत मा.महापौर ,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** यामध्ये एक सुचना आहे विषय क्र.२१ मध्ये अ.क्र.४९ सौ.भारतीताई सोनवणे यांचा प्रस्ताव आहे. प्रभाग क्र.४ मध्ये रथ मार्गाचे काँक्रीटीकरण करणे, त्यांचे इस्टीमेट १ कोटी ५० लाखाचे आहे. तर ते १ कोटी ६५ लाखाचे करण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे, मंजुर. फक्त विषय क्र.२१ मध्ये महापौरताईनी जे पत्र दिलेले आहे ना.

**मा.महापौर :-** बोला भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.२१ मध्ये उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की,जळगांव शहर महानगरपालिका सर्व सन्मा.नगरसेवकांनी विकास कामांचे प्रस्ताव सादर केलेले असुन विविध शासकीय योजनेतुन घेणेबाबत विनंती केलेली आहे. सदर विकास कामे जिल्हा नियोजन मंडळ तसेच राज्य शासनाच्या निधीतुन घेणेबाबत मा.महापौर कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहे. जिल्हा नियोजन मंडळातील नागरी दलितोत्तर, नगरोत्थान, दलित वस्ती सुधारणा योजना, आदिवासी योजना, नॉशनल प्रोग्रॅम असे विविध हेड मध्ये दाखविलेले कामे प्रस्तावीत केलेले आहे. तर आपण जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातुन मागील ठराव क्र.२० अन्वये मान्यता देण्यात आलेली असल्याकारणाने जिल्हा नियोजन मंडळाचे हेड जे आहे. त्याच्यातुन वगळण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.नितीनभाऊ यांनी दिलेल्या सुचनेची प्रशासनाने नोंद घ्यावी. विषय क्र.२१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका सर्व सन्मा.नगरसेवकांनी विकास कामांचे प्रस्ताव सादर केलेले असुन ते विविध शासकीय योजनांतुन घेणे बाबत विनंती केलेली आहे. सदर विकास कामे जिल्हा नियोजन मंडळ तसेच राज्य शासनाच्या निधीतुन घेणेबाबत मा.महापौर कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. जिल्हा नियोजन मंडळातील, नागरी दलितेत्तर, नगरोत्थान, दलितवस्ती सुधारणा योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी योजना, नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम निधी, नविन्यपुर्ण इत्यादी तसेच राज्य शासनाच्या नगरविकास विभागातुन ही मुलभुत सुखसुविधा, नगरोत्थान, विशेष निधी, नाविन्यपुर्ण तसेच वैशिष्ट्यपुर्ण योजना, शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजना निधी, जळगांव मनपा नगरसेवक निधी, शासनाच्या विविध योजनेतुन प्राप्त होणारे निधी तसेच जळगांव मनपा निधीतुन कामे सुचविलेली असुन त्यास मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेले आहे. तरी यासोबत सादर केलेल्या यादीतील अ.क्र.०१ ते १०७ या विकास कामांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सन्मा.सदस्य व मा.पिठासिन अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानूसार उपरोक्त नमूद ०१ ते १०७ विकास कामांमधील यादीतील अ.नं.४९ यामध्ये नमूद प्रभाग क्र.४ मध्ये रथमार्गाचे

कॉंक्रीटकरण करणे याकामी नमूद रक्कम रुपये १,५०,००,०००/- ऐवजी रक्कम रुपये १,६५,००,०००/- अशी दुरुस्ती करुन उपरोक्त नमूद ०१ ते १०७ कामांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेले जिल्हा नियोजन मंडळाकडिल निधीबाबतचे हेड वगळणेस सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४० प्रतिकूल - ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव.

महासभा ठराव -१२४१ विषय क्र.२१ दि.२३/०८/२०२३

| अ.क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र.क्र. | **कामाचे नांव** | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | **ईतर निधीतील सामान्य कामे** | |
| 1 | खान रुकसाना बी | 1 | प्र.क्र.1 गेंदालाल मील मधील मुख्य 5 रस्ते डांबरीकरण करणे | 20000000 |
| 2 | श्री.नवनाथ दारकुंडे | 2 | प्र.क्र. 2 मधील शिवाजी नगर मधील अंबिका सॉ मिल पासुन ते खुबचंद शाळा विद्यालय पर्यंत दोन्ही बाजुस अर.सी.सी. गटार व ठिकठिकाणी स्लॅब कल्व्हेट टाकणे | 10000000 |
| 3 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील उर्मिया सॉ मिल पासुन ते हनुमान सॉ मिल पर्यंत दोन्ही बाजुस आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हेट टाकणे. | 10000000 |
| 4 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील पुर्वेकडील प्रकाश पोळ यांचे घरापासुन ते पश्चिमेकडुन कानळदा रोडापर्यत दोन्ही बाजुस आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हेट टाकणे | 10000000 |
| 5 | | | प्र.क्र. 2 मधील बारसे कॉलनी मधील ठिकठिकाणचे रस्ते कॉंक्रीटी करण करणे. | 4000000 |
| 6 | | | प्र.क्र. 2 मधील भुरे मामलेदार येथील नागला किराणा पासुन ते तिवारी यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 7000000 |
| 7 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील गोंविद ओझा यांचे दालफळ पासुन ते हुडको मागील शिव मंदीरा पर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 4000000 |
| 8 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील शाळा क्रं. 1 पासुन ते क्रांती चौका पर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 4000000 |
| 9 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील तिवारी यांचे घरापासुन ते स.नं. 338 पासुन कान्हाकाई मेन रोडा पर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 10000000 |
| 10 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील एफ.सी.आय गोडावुन पासुन ते मलनिस्सारण प्लॅन्ड पर्यंत स.नं. 390 पर्यंतचा मेन रस्ता डांबरी करण करणे. | 35000000 |
| 11 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील श्री मोटर्स ते गोविंदा ओझा यांचे गोडावुन पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | 4000000 |
| 12 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील राजवाडया पासुन ते कान्हाकाई मेन रस्त्यापर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 4000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील मंजुर खान यांचे घरापासुन ते सावरकर चौका जवळील रस्ते तसेच बापु ठाकरे यांचे घरापर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | 6000000 |
| 14 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील मन्नत पार्क दक्षिण बाजुस भागाचा रस्ता कॉक्रीटी करण करणे | 4000000 |
| 15 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील मन्नत पार्क उत्तर बाजुस भागाचा रस्ता कॉक्रीटी करण करणे | 4000000 |
| 16 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील साळुंखे चौक ते माजी नगरसेवक राजु भालेराव यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे | 7000000 |
| 17 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील स.नं. 348 मधील रस्ते डांबरी करण करणे | 3000000 |
| 18 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील स.नं. 342/6 ब/1अ/2अ मधील ओपनस्पेस विकसीत करणे. | 10000000 |
| 19 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील अहिल्याबाई होळकर बगीचा विकसीत करणे | 5000000 |
| 20 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील स.नं. 337/3 शिवाजी नगर हुडको येथील 3 ठिकाणच्या ओपनस्पेस विकसीत करणे | 7000000 |
| 21 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील स.नं. 343/1/2/3/4/5 मधील ओपनस्पेस विकसीत करणे | 30000000 |
| 22 | | | प्र.क्र. 2 ला लागुन असलेला प्र.क्र. 1 मधील स.नं. 342/अ,ब,क,ड, मधील संपुर्ण ऐरीया दत्त कॉलनी, धनाजी काळे नगर, पुष्पांजली कॉलनी व इतर ठिकठिकाणी आर.सी.सी. गटार क्रॉसींग कल्व्हट व कॉक्रीट रस्ते करणे | 20000000 |
| 23 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मध्ये ठिकठिकाणी रस्ते कॉक्रीटी करण करणे | 10000000 |
| 24 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मध्ये ठिकठिकाणी रस्ते डांबरी करण करणे | 20000000 |
| 25 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मध्ये ठिकठिकाणी आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हट करणे | 20000000 |
| 26 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मध्ये शिवशक्ती नगर मधील 6 मीटर व 9 मीटर रस्ते खडीकरण करणे | 2000000 |
| 27 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मध्ये हुडको मधील 6 मीटर व 9 मीटर रस्ते खडीकरण करणे | 2000000 |
| 28 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मध्ये स.नं. 348 मधील 6 मीटर व 9 मीटर रस्ते खडीकरण करणे | 2000000 |
| 29 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मध्ये अमन पार्क मधील 6 मीटर व 9 मीटर रस्ते खडीकरण करणे | 2000000 |
| 30 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मध्ये ठिकठिकाणी 6 मीटर व 9 मीटर रस्ते खडीकरण करणे | 2000000 |
| 31 | | | प्र.क्र. 1 मधील स.नं. 342 अ,ब,क,ड पुढील ऐरीया नुसार दत्त कॉलनी, धनाजी काळे नगर, पुष्पांजली कॉलनी व इतर | 20000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ठिकाणी आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हट व रस्ते कॉक्रीटी करण करणे | |
| 32 | | | प्र.क्र. 2 मधील भुरे मामलेदार येथील नागला किराणा पासुन ते तिवारी यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 7000000 |
| 33 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील तिवारी यांचे घरापासुन ते स.नं. 348 पासुन कान्हाकाई मेन रोडा पर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 10000000 |
| 34 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील एफ.सी.आय गोडावुन पासुन ते मलनिस्सारण प्लॅन्ड पर्यंत स.नं. 390 पर्यंतचा मेन रस्ता डांबरी करण करणे | 35000000 |
| 35 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील श्री मोटर्स ते गोविंदा ओझा यांचे गोडावुन पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | 4000000 |
| 36 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील राजवाडया पासुन ते कान्हाकाई मेन रस्त्यापर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 4000000 |
| 37 | | | प्र.क्र. 1 मधील शिवाजी नगर मधील अंबिका सॉ मिल पासुन ते खुबचंद शाळा विद्यालय पर्यंत दोन्ही बाजुस अर.सी.सी. गटार व ठिकठिकाणी स्लॅब कल्व्हट टाकणे | 10000000 |
| 38 | | | प्र.क्र. 1 शिवाजी नगर मधील उर्मिया सॉ मिल पासुन ते हनुमान सॉ मिल पर्यंत दोन्ही बाजुस आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हट टाकणे. | 10000000 |
| 39 | | | प्र.क्र. 1 शिवाजी नगर मधील पुर्वेकडील प्रकाश पोळ यांचे घरापासुन ते पश्चिमेकडुन कानळदा रोडापर्यत दोन्ही बाजुस आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हट टाकणे | 10000000 |
| 40 | श्री.किशोर बाविस्कर | 2 | प्रभाग क्रं. 02 मधील चंदु इंगळे ते सार्व. शौचालय पर्यंत दोन्ही बाजुस आर.सी.सी. गटार तयार करणे | 7000000 |
| 41 | | | प्रभाग क्रं. 02 मधील दोन्ही घरकुल परिसरात 1 व 2 मध्ये पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण व आर.सी.सी. गटार तयार करणे | |
| 42 | | | प्रभाग क्रं. 02 मधील अशोक सोनवणे ते रायसींगे व रमेश इंगळे ते हनुमान मंदीर ते शिवशंकर नगर मधील मनपा ओपनस्पेस जागी व रामभाऊ यांची गल्ली पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण व आर.सी.सी. गटार तयार करणे | |
| 43 | | | प्रभाग क्रं. 02 मधील क्रिडांगण आरक्षण क्रं. 61 मध्ये नविन 2 मजली इमारत बांधणे तसेच जीमसाठी लागणारे सर्व साहित्य पुरविणे. | 20000000 |
| 44 | | | प्रभाग क्रं. 02 मधील घरकुल ते नाल्यापर्यंत या भागामध्ये आर.सी.सी. भव्य कमान उभारणे. | 999000 |
| 45 | सौ.रंजना सपकाळे | 3 | प्र.क्र. 3 दिनकर नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 15000000 |
| 46 | | | प्र.क्र.3 अंतर्गत खेडी बु मधील सर्व रस्ते डांबरीकरण करणे | 15000000 |
| 47 | | | प्र.क्र.3 अंतर्गत विठोबा नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | 6000000 |
| 48 | | | प्र.क्र. 3 श्रीराम कॉलनी ते दशरथ नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 6000000 |
| 49 | सौ.भारती सोनवणे | 4 | प्र.क्र.4 मध्ये रथमार्गाचे कॉक्रीटीकरण करणे | 16500000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 50 | श्री.नितिन लढ्ढा | 4 | प्र.क्र.5 मधील नवीपेठ भागातील सारा हॉटेल मागील बोळ कॉक्रीट करणे | 15000000 |
| 51 | | | प्र.क्र.5 मधील रस्ते डांबरीकरण/कॉक्रीटीकरण करणे | 10000000 |
| 52 | डॉ.अश्विन सोनवणे | 7 | प्रभाग क्र. 7 मध्ये वनविहार कॉलनी, गजानन कॉलनी व इतर परिसरात कॉक्रीट गटारी मनपा निधीतुन करणे | 12500000 |
| 53 | श्री.धिरज सोनवणे | 6 | श्री. प्रदीप तळवेलकर यांच्या निवासस्थानापासुन ते श्री.राणे यांच्या निवासस्थाना पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1500000 |
| 54 | सौ. प्रतिभा पाटील | 8 | साई नगर पोलीस स्टेशन मागील गट 112 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 5000000 |
| 55 | | | धनश्री नगर गट नं. 103 निमखेडी शिवार मधील रस्ते डांबरीकरण करणे | 5000000 |
| 56 | डॉ.चंद्रशेखर पाटील | 8 | प्रभाग क्र. 8 दादावाडी जैन मंदिर वरद बंगला श्रीराम मंदिर ते खोटे नगर पाण्याची टाकी पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 7000000 |
| 57 | | | प्रभाग क्र. 8 गट नं. 118/3, 118/2 व परिसर मध्ये गटारी कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 58 | | | प्रभाग क्र. 8 गट नं. 118/3, 118/2 व परिसर मध्ये रस्ता डांबरीकरण करणे | 4000000 |
| 59 | | | प्रभाग क्र. 8 गट नं. 106 मधील जिव्हाळा सेंटर ते अनिल प्रभागकर सुरवाडे यांच्या घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 60 | | | प्रभाग क्र. 8 मध्ये हर्षवर्धन कॉलनी व परिसरात रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 61 | | | प्रभाग क्र. 8 श्रीराम नगर, कल्याणी नगर व परिसरात रस्ता डांबरीकरण करणे | 2500000 |
| 62 | | | प्रभाग क्र. 8 शिनू बंगलो व परिसरात रस्ता डांबरीकरण करणे | 2500000 |
| 63 | | | प्रभाग क्र. 8 म्हाडा कॉलनी व परिसरात रस्ता डांबरीकरण करणे | 2000000 |
| 64 | | | प्रभाग क्र. 8 श्रीकृष्ण कॉलनी, पोलीस लाईनमध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 3000000 |
| 65 | | | प्रभाग क्र. 8 हायवे दर्शन कॉलनी रस्ते डांबरीकरण करणे | 3000000 |
| 66 | श्री. मयुर कापसे<br>सौ.प्रतिभा कापसे | 9 | प्र.क्र. 9 पाटीलवाडा भिका पाटील ते छोटू पाटील ते मढी चौक व परिसरात आरसीसी गटार बांधणे | 2000000 |
| 67 | | | प्र.क्र. 9 लालू उदयसिंग पाटील ते गाविंदा भिमसिंग पाटील व परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 2000000 |
| 68 | | | प्र.क्र. 9 मोहन मेडिकल गल्ली संजय सोमानी गल्ली अशोक पाटील व परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 2000000 |
| 69 | | | प्र.क्र. 9 मातोश्री प्रोव्हीजन समोरील गल्लीत व गट नं.10 व परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 2000000 |
| 70 | | | प्र.क्र. 9 मुंदडा हायस्कुल व मगन पाटील परिसरात ते बालमोहन शाळेच्या मागील बाजु परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 2000000 |
| 71 | | | प्र.क्र. 9 नाना सोनार ते ओम शांती केंद्र परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 1500000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 72 | | | प्र.क्र. 9 चव्हाण सर व संजय पाटील पाण्याची टाकी गल्ली व परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 1500000 |
| 73 | | | प्र.क्र. 9 नारायण शेठ आरएल कॉलनी परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 1500000 |
| 74 | | | प्र.क्र. 9 राणे दादा गट नं. 8 शिवण्णा नगर परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 2000000 |
| 75 | | | प्र.क्र. 9 शिवण्णा नगर वाणी भिमसिंग पाटील ते शंकर पांचाळ घरापर्यंत परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 1000000 |
| 76 | | | प्र.क्र. 9 शिक्षक कॉलनी परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 1000000 |
| 77 | | | प्र.क्र. 9 साळुंखेदादा आसाराम बापु आश्रम सेमोरील परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 2000000 |
| 78 | | | प्र.क्र. 9 गट नं. 22,23,24 व 25 परिसरात आरसीसी गटारी बांधणे | 2400000 |
| 79 | | | अतुल डेअरी -नाना सोनार-भोकरकर वकील यांच्या घरापर्यंत व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 6000000 |
| 80 | | | ज्ञानेश्वर काका गुजर ते सणस दादा यांच्या घरापर्यंत व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 3000000 |
| 81 | | | रमेश भगवान पाटील ते प्रदिपसिंग पाटील (आरटीओ) मातोश्री प्रोव्हीजन समोरील गल्ली व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 3500000 |
| 82 | | | संजय ठाकरे साहेब ते पोपट देवराम माळी (मातोश्री प्रोव्हिजन समोरील रस्ता) व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 3000000 |
| 83 | | | श्रावण यादव पाटील (मातोश्री किराणा) ते दिलीप पाटील यांच्या घरापर्यंत व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 2500000 |
| 84 | | | योगेद्र नारायण पाटील ते जयकिरण भिवसन पाटील यांच्याघरापर्यंत (बालमोहन शाळेच्या मागील बाजू) व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 4000000 |
| 85 | | | बालमोहन शाळा शाळा ते दत्तात्रय पांडुरंग वाणी (भगवान बारी चौक) यांच्या घरापर्यंत व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 3000000 |
| 86 | | | रामकृष्ण कौतिक घरते वृदावन हॉस्पिटल ते यशवंत पाटील (द्रोपदी नगर) यांच्या घरापर्यंत व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 3000000 |
| 87 | | | मंदाताई सोनवणे - राजेश दादा पाटील (पोलिस) ते जाधव साहेब (आरएल हॉस्पिटल मागील गल्ली) यांच्या घरापर्यंत व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 8000000 |
| 88 | | | सुधीर रमेश पाटील ते राजेश साठे पियुष पार्क (इंद्रनिल सोसायटी शिवरोड) यांच्या घरापर्यंत व इतर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे व दक्षिण बाजु रस्ता | 7000000 |
| 89 | | | निशीकांत निंबाजी सोमवंशी (श्री स्वामी समर्थ केंद्र) ते दिलीप गोविंद सोनार (रेखा कुलकर्णीताई) यांच्या घरापर्यंत व परिसरात रस्ते डांबरीकरण करणे | 7000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 90 | डॉ.चंद्रशेखर पाटील | 8 | प्रभाग क्र. 8 अंतर्गत विलास सोनवणे वाघुळदे नगर यांच्या घरापासून हर्षगिरी अर्पाटमेंअ पर्यतची मोठी गटार तयार करणे | 3000000 |
| 91 | | | प्रभाग क्र. 8 अंतर्गत विठ्ठल पार्क, गट नं. 74 शुभम पोव्हीअजन अरुण पाटील जुना निमखेडी रोड येथिल गटार करणे | |
| 92 | | | प्रभाग क्र. 8 गट नं. 76 मदादेव मंदीर जवळील रस्ते कॉक्रीट करणे | |
| 93 | हसीना बी शरीफ शेख | 10 | प्र.क्र.10 पिंप्राळा हुडको गट नं. 212 इदगाह येथे चेन्लिंक फेन्सींग व पेव्हर ब्लॉक बसविणे | 3756702 |
| 94 | सौ.सुरेखा तायडे | 13 | प्र.क्र.13 मध्ये रायसोनी नगर येथे सर्व्हे नं. 455 मध्ये रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे | 15000000 |
| 95 | श्री.प्रशांत नाईक | 15 | प्र.क्र.15 अंतर्गत मिल्लत मस्जिद ते नॅशलन हायवे 6 पर्यत नाल्याच्या दोन्ही बाजुस संरक्षण भिंत बांधणे | 50000000 |
| 96 | | | प्र.क्र.15 अंतर्गत मिल्लत हायस्कुल ते मलिक नगरच्या नाल्यापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 13000000 |
| 97 | | | प्र.क्र.15 अंतर्गत साईबाबा मंदिर मेहरुण गावठण मधिल खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे | 2000000 |
| 98 | | | प्र.क्र.15 अंतर्गत नेताजी चौकातील शौचालयाजवळील रस्त्यालगत कॉक्रीटीकरण करणे | 5000000 |
| 99 | | | प्र.क्र.15 अंतर्गत मनपाच्या खुल्या जागेत 5/1 हॉलला दुरुस्ती करणे | 4000000 |
| 100 | | | प्र.क्र.15 पिरजादे कब्रस्थान मध्ये भराव करुन पाथवे तयार करणे | 8000000 |
| 101 | सौ. रजनी अत्तरदे | 16 | प्र.क्र.16 मध्ये नवभारत दुग्धालय ते नाथवाडा (टी पॉईंट) पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | |
| 102 | | | प्र.क्र.16 मुकूंद नगर मधील मानेश्वर शिव मंदीर रोड कॉक्रीटचा करणे | |
| 103 | | | प्र.क्र.16 नाथवाडा ते संतसेना सलुन पर्यत रस्ता कॉक्रीटचा करणे | |
| 104 | | | प्र.क्र.16 सुमन बिल्डींग ते पांडुरंग अण्णा जोशी यांचे घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | |
| 105 | श्री.सुनिल खडके | 17 | चिमुकले बालाजी मंदीर रोड ते सिध्देश्वर श्री पंचायत महादेव मंदीर पर्यत कॉक्रीट रस्ते करणे लक्ष्मी पार्क परिसरात कॉक्रीट रस्ते करणे अयोध्या प्रोव्हीजन ते नाला पर्यत कॉक्रीट रस्ते करणे | 5609000 |
| 106 | | | गंगाराम दुसाने ते स्वामी समर्थ ते नारखेडे पर्यत कॉक्रीट रस्ते करणे गोपीनाथ ढाके ते वाणी यांचे घरापर्यत कॉक्रीट रस्ते करणे वासुदेव भंगाळे ते रुबी क्वार्टर पर्यत कॉक्रीट रस्ते करणे दिनकर पाटील ते सिध्दीविनायक रोड पर्यत कॉक्रीट रस्ते करणे | 8200000 |
| 107 | | | हनुमान मंदीर ते जांगीड हॉल पर्यत कॉक्रीट रस्ते करणे | 1063000 |
| | | | | 74,65,27,702 |

**नगरसचिव -विषय क्र.२२ :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील ५०० चौ. फुट पर्यतच्या घरांना बृहन मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर मालमत्ता कर माफ करणेबाबत मा.महापौर,सौ.जयश्री सुनिल महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**अॅड.श्री.दिलीप पोकळे :-** या प्रस्तावासंदर्भामध्ये मला प्रशासनाला थोडी माहिती विचारायची आहे. आपली ड वर्ग महापालिका आहे. असे असतांना या संदर्भात माफ करण्याचा हा प्रस्ताव आलेला आहे. मला ही माहिती हवी आहे

की, ५०० चौ.फुटाच्या मालमत्ता किती आहे. आणि त्यांना जर आपण सवलत देतो आहे माफी देतो आहे तर त्याचा आपल्या मनपाच्या बजेटवर व आर्थिक स्थितीवर काय फरक पडणार.

**श्री.सुनिल महाजन :-** हा आपला सन २०१८ चा जाहिरनामा पोकळे साहेब, आपण ज्या भारतीय जनता पार्टीचे गटनेते म्हणता स्वत:ला त्या पक्षाने २०१८ साली जाहिरनामा काढलेला होता. आणि त्या जाहिरनाम्याची पुर्ती करण्याचे काम महापौर करत आहे. भाजपाने त्यावेळेस ज्या चांगल्या सुचना केलेल्या आहे त्यांचे आम्ही स्वागत करु. आजच्या महासभेमध्ये हा प्रस्ताव मान्य.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** काल जे पत्र आले त्यात म्हटलेले आहे. मालमत्ता करात शासनाची मान्यता घेऊन प्रस्ताव करण्यात यावा. असा आपला प्रस्ताव आहे हा. शासनाची मान्यता घ्यायची आहे. महापालिका आपली आहे, प्रशासन आपला आहे.धोरण आपला आहे. आपले प्रशासनाचे नेमके काय म्हणणे आहे. ५०० चौ.फुटाचे मालमत्ता किती आहे आणि त्याचे आपल्या आर्थिक स्थितीवर काय परिणाम होईल.

**श्री.सुरेश सोनवणे :-** यांच्या तोंडावर मोदी साहेबांचे नांव आहे, त्यांनी मोदी साहेबांच नांव काढल भाजपाचे नांव काढले म्हणजे भारतीय जनता पार्टी या पक्षाचे विरोधी गुण गाता, मी त्यांचे अभिनंदन करतो.

**मा.आयुक्त :-** सन्मा.सदस्य पोकळे भाऊंनी जी माहिती विचारलेली आहे. ५०० चौ.फुटाची मालमत्ता ऐकुण १,३५,००० आहे. त्याची एकत्रीत मागणी आहे १२४ कोटी, चालु मागणी आहे ८४ कोटी अशी ओवरऑल पुर्ण जळगांवची २०८ कोटी मागणी आहे. ती ५०० स्के.फुटापर्यंतची घरपट्टीची आहे मालमत्ता ५१००० पाणीपट्टीची आहे २५००० एकुण थकीत मागणी आहे ३४ कोटी, चालु मागणी आहे १५ कोटी म्हणजे ५०० स्के.फुटामध्ये ह्या ज्या प्रॉप्रटीची आहे त्यांची एकुण डिमांड जी आपली आहे ती आहे ४९.४४ कोटी आहे. या अनुषंगाने प्रशासनाने आपला एक अहवाल तयार केलेला आहे. जर आपण आपला सन २०२३-२४ चे अंदाजपत्रक बघितलं तर ३४२ कोटीच अंदाजपत्रक आयुक्तांनी महासभेला सादर केलेले. त्यापैकी ३९७ कोटी मा.जनरल बॉडीने मान्य केलेला आहे. पण सन २०२२-२३ चे जर आपण रियालिस्टीक फिगर घेतले की, किती आपल्याकडे जमा झाले, तर त्यामध्ये २५९ कोटी आपले जमा झालेले आहे. आपला अनिवार्य म्हणजे कमप्लसरी मासिक खर्च जर बघितला, तर १७ कोटी ३५ लाख आहे. याला जर गुणीले १२ केले तर २१० कोटी होवुन आता उरलेला जो खर्च आहे तो आपला कुठे खर्च होतो.मनपाकडे जुलै २०२३ अखेर २१९ कोटीची आपल्याकडे देयक देणे बाकी आहे. म्हणुन या अनुषंगाने जेथे जो गॅप आहे मॅनडेटरी एक्सपेन्स सोडुन विकास कामांचा जेवढा आपल्याला खर्च करता येईल. तो आपण करण्याचा प्रयत्न करु. अशी जर आपण माफी दिली तर प्रशासनाला प्रशासन चालविणे कठीण होईल. जरी ठराव पास केला तरी सुध्दा आपल्याला याची मान्यता आपल्याला शासनाकडुन घ्यावी लागेल. तर प्रशासनाचे मत आहे की, ठराव मंजुर करण्यात येऊ नये आणि मी जो खुलासा दिलेला आहे त्याची नोंद आपल्या इतिवृत्तात घेण्यात यावी ही विनंती.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** प्रशासनाच्या मताशी मी सहमत आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** आपण शासनाला पाठवत आहोत. आपण शासनाला मंजुरी मागत आहोत. शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहुन करा ठराव.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मुंबई महापालिकेने पण हे लागु केले ना.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मुंबई महापालिका कुठे आपली ड वर्ग महापालिका आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहुन

**श्री.राजेंद्र पाटील :-** मला काय म्हणायचे आहे भाऊ की, ५०० फुटाच्या ऐवजी जर आपण २००-३०० फुटापर्यंत जर केली. ३०० फुटाचे मला वाटते द्यायला हरकत नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मग ३०० चे करायला हरकत नाही.

**श्री.सुनिल महाजन :-** मग आमचा पण हिस्सा पाहिजे ना त्याच्यात, १०० आमचे १०० एमआयएमचे असे ५०० करा ना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सुनिलभाऊ, तुमच्या जाहिरनाम्यात नव्हते ते. त्याच्यामुळे ३०० फुटापर्यंतचा निर्णय घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताईंनी हा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवलेला आहे. या प्रस्तावातली परिस्थिती अशी आहे की, धरल तर चावते आणि सोडले की पळले म्हणजे काय करायचे आणि काय नाही करायचे, एकीकडे सामान्य माणसाला दिलासा देण्याची भुमिका प्रामाणिक आहे. दुसरीकडे आता परिस्थितीचा विचार केला ती सुध्दा अवघड आहे. परंतु या सभागृहात दोन पक्ष जे आहे ते राज्यात सत्ताधारी आहे. यापुर्वी आपण, आता दोनच आहे एक शिंदे गट आहे आणि एक भाजपा, राष्ट्रवादीचे अस्तीत्व आपल्या येथे नाही. महापौरांना मला थोडीशी उपमा द्यावी अशी वाटते की, महापौरताई जेव्हा पहिल्यांदा निवडुन आल्या होत्या. त्यावेळेला त्या गृहीणी होत्या, दुसऱ्या टर्म मध्ये ते समाजकारणी झाल्या आणि तिसऱ्या टर्ममध्ये ते पुर्ण राजकारणी झाल्या. अश्या पध्दतीने संपुर्ण सभागृहाला संभ्रमात

टाकण्याचा आणि प्रशासनाला संभ्रमात टाकण्याचा हा विषय आहे. विषय चांगला आहे त्या बद्दल वाद नाही. परंतु सभागृहाची जर खऱ्या अर्थाने प्रामाणिक ईच्छा असेल. आणि राज्य शासनाची सुध्दा ईच्छा प्रामाणिक असेल तर मला वाटते की, हा प्रस्ताव आपण मान्य करुन राज्य शासनाकडे पाठविल्यानंतर खरी कसोटी २०१८ ला भारतीय जनता पक्षाने त्याच्या घोषणा पत्रात ३०० फुटाची तरतुद त्यांच्या जाहिरनाम्यामध्ये दर्शवलेली होती की, ३०० चौ.फुटापर्यंतच्या घरपट्टीला माफी देण्याचा आम्ही प्रयत्न करु थोडी त्या आश्वासनाची पुर्तता होते. त्याच्यामध्ये महापौरताईंनी २०० स्के.फुटाचे ॲडीशन केलेले आहे. त्याचा सुध्दा मान राज्यातल्या सरकार आणि पक्षाने विचार करावा. आणि याच्या संदर्भात जी काही त्रुटी येईल. ती राज्य शासनाकडुन त्या त्रुटीची भरपाई करण्याच्या संदर्भातली भुमीका सत्ताधारी पक्षाने स्विकारावी अशी आमची एक अपेक्षा आहे. म्हणुन हा प्रस्ताव पारीत करुन राज्य शासनाला पाठविण्यात यावा. यामध्ये मनपाच्या बजेट मध्ये जी आर्थिक तुट येईल. त्याच्या संदर्भात तेवढे अनुदान मिळुन आणण्यासाठी सन्मा.लोकप्रतिनिधींनी राज्य करत्यांनी या संदर्भात राज्य शासनाकडुन तेवढे अनुदान महानगरपालिकेला मिळुन द्यावे अश्या पध्दतीची सुध्दा याद्वारे विनंती करण्यात येत आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** जी सुचना मांडली त्याचे सुस्वागतच आहे आणि निधी म्हटल तर ना.श्री.गिरीषभाऊ महाजन असतील,मा.ना.श्री.गुलाबरावजी पाटील, आमदार राजुमामा भोळे यांच्या माध्यमातुन निधी आणतोच आहे आपण आणि पुढे सत्ता राहिली तर आपण सर्व ते करणारच आहोत. आणि निधी येणारच आहे. मला असे वाटते की, आपण ५०० च्या ऐवजी ३०० स्के.फुट करुन खरंच गरीब लोकांना त्याच्यामध्ये सवलत मिळावी किंवा नागरीकांना त्या गोष्टीचा लाभ मिळावा,३०० चौ.फु.पर्यंत करावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ३०० वाला ही गरीब आहे आणि ५०० वालाही गरीब आहे. आता तर परिस्थिती अशी आहे की, १००० वाला ही गरीब होऊन गेलेला आहे. भयंकर परिस्थिती आहे. लोकांकडे बेरोजगारी वाढलेली आहे.लोकांना आता काम नाही. परंतु तरी सुध्दा बघा हा पॉलिटीकल विषय असला तरी याच्या संदर्भातला निर्णय हा राज्य शासनाच्या अधिन राहुनच होणार आहे. म्हणुन आपण काहीही ठराव पारित केला आणि काहीही प्रस्ताव पाठविला, तरी राज्य शासनाने मान्यता दिल्यानंतरच प्रशासन याच्या संदर्भात अंमलबजावणी करु शकेल. ही वस्तुस्थिती आहे. त्याच्यापुढे आम्ही तुम्ही चालु शकणार नाही. आपण ३०० करा, ५०० करा, १००० करा, १५०० करा, संपुर्ण करुन टाका काही ही करा. या सभागृहाला अनंत अधिकार दिलेले आहे ठराव करण्याचे. परंतु याच्या संदर्भात कायदेशीर रित्या राज्य शासन जो पर्यंत निर्णय घेत नाही दुसरा कुठेही मार्ग निघणार नाही. म्हणुन जो प्रस्ताव आलेला आहे तो महापौरताईंचा सन्मान म्हणुन त्यांनी दिलेला प्रस्ताव आपण मान्य करावा पाठवावा, योग्य तो निर्णय शासन घेईल त्याच्या संदर्भातला, राज्य शासन निर्णय घेणार नाही तोपर्यंत त्याची अंमलबजावणी प्रशासनही करु शकणार नाही. आणि सामान्य माणसाला आपल्याला या गोष्टीला अवगत करुन द्याव लागेल की, जरी ठराव झालेला असला, तर उद्या पासुन तुम्ही त्या ठरावाच्या अपेक्षेने घरपट्टीचा भरणा थांबवु नका ही सुध्दा विनंती करावी लागेल. राज्य शासनाने घेतलेला निर्णय तर निश्चितपणे त्याचा लाभ सामान्य नागरीकांना मिळेल अन्यथा जसा चालु आहे तसा चालु द्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आता आमच्या जाहिरनाम्याची तुम्ही आठवण करुन दिलेली आहे.तर ३०० च होतील आता,

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु एक जबाबदारी स्विकारा, ३०० च्या करारनाम्याची पुर्तता करण्याची जबाबदारी स्वत: तुमचीच राहील.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तुम्ही दोघीकडुन बोलत आहे. एकीकडे म्हणत आहे शासन ठराव विखंडन करणार आहे. तुम्ही दोन्ही बाजु कसे बोलत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग तो जाहिरनामा फसवा होता का आपला.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ तुम्हाला सांगतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कोविडच्या काळात सुध्दा

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तसे जर बघितले ना नितीनभाऊ, अडीच वर्ष आम्ही सत्तेत होतो. आता जर पाहिले महापौर तुमचे, उपमहापौर तुमचेच आहे.आम्ही तुमच्या सोबत उभे आहे.

**श्री.अनंत जोशी :-** अडीच वर्ष काय केले.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आम्ही अडीच वर्षात जे करायचे होते त्याची जर यादी वाचली तर मोठी आहे. त्याची यादी मोठी आहे. अडीच वर्षात काय केले त्याची यादी खुप मोठी आहे.

**श्री.अनंत जोशी :-** विशालभाऊ तुम्ही काय केले ते जाहिर वाचुन दाखवा. मी अनेक वेळा सांगितले आहे पाच वर्षात १०० कोटीतले ९ कोटी आणले ९ कोटी.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई आमचे विरोधीपक्ष नेत्यांनी जसे सांगितले की, भारतीय जनता पार्टीचा जाहिरनामा होता की, ३०० स्के.फुट पर्यंत सुट देणार. बरोबर ना भाऊ. तुम्हाला तेवढच आठवत आहे का फक्त की, भारतीय जनता पार्टीने त्यात तेवढेच म्हटले होते.त्याच्या व्यतिरिक्त हुडको कर्ज निल केले. वेगवेगळया निधी. तुम्ही त्या हुडकोच्या संदर्भात पण बघितले होते त्या जाहिरनाम्यामध्ये, जे.डी.सी.सी. बँकेचे कर्ज होते तुम्ही त्याचे पण स्वागत या ठिकाणी करायला पाहिजे ना. चला हुडकोच्या संदर्भात तर मान्य आहे ना तुम्हाला. राज्य शासनाने त्यावेळेला निधी दिला हे मान्य आहे की नाही.

**श्री.अनंत जोशी :-** सगळया भुमिका आम्ही येणाऱ्या निवडणुकीत मांडणार आहोत. चौका चौकात मांडणार आहोत. ६ महिने थांबा चौका चौकात मांडणार आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जितुभाऊ त्याच्यामध्ये १२५ कोटी याच महानगरपालिकेने भरलेले आहे. श्रेय १००% तुम्ही घ्या. परंतु हे नाकारुन चालणार नाही की, १२५ कोटी महापालिकेने भरले. कायद्याने भांडले असते तर १२५ कोटी भरण्याची सुध्दा गरज भासली नसती.

**श्री.जितेंद्र मराठे :-** २५ कोटी निधी मिळाला तर तेव्हा काय भाजपाची सत्ता होती का येथे. १०० कोटीचा निधी मंजुर झाला.तेव्हा कोणाची सत्ता होती. त्याच्यानंतर १०-१० कोटीचे अनेक वेळी निधी आले. गुलाबभाऊंनी ६१ कोटी दिले त्यावेळेला, आता १०० कोटी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तेव्हा गुलाबभाऊ आमचे होते.

**श्री.अनंत जोशी :-** जितुभाऊ तुम्ही जे म्हणत आहात ना. तुमची १०० कोटीची घोषणा ५ वर्षापुर्वी झालेली होती आहे आणि त्यातले फक्त ९ कोटी प्राप्त झालेले आहे ५ कोटी मनपाने टाकले असे १४ कोटीचे कामे झालेले आहे. थांबा आणि तुम्ही जे सांगतात ना. तुम्ही जे यादी यादी करतात ना तुमची. तुम्ही शहराला ५ वर्षात ९ कोटी रुपये दिले. गुलाबभाऊ पालकमंत्री असतांना मी माझ्या वार्डाला ११ कोटी रुपये आणले. तुमच्या सारख्यांनी ५ वर्षात ९ कोटी रुपये दिले.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आता वारंवार हे बंटीभाऊ, नितीनभाऊ वारंवार सांगतात, सभागृहाची दिशाभुल करतात की, ४२ कोटीतले फक्त ९ कोटी आलेले आहे. आलेले आहे मान्य आहे ऐकुन घ्या. मंजुरी कितीला आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** १०० कोटी.

**श्री.अनंत जोशी :-** ३८ कोटीला, ३८ कोटीला, मी आयुक्तांना बोलत आहे ना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** माझे झाल्यावर बोला. तुम्ही ३८ कोटीचे जेव्हा टेन्डर झाले, निविदा जर झाली. तर पैसे आज न उद्या त्याला मिळणार आहे. तुम्ही त्याची चिंता कशाला करतात. ज्याची वर्कऑर्डर आहे त्याची चिंता करायची.तुम्ही कशाला चिंता करत आहात. महापालिकेची वर्कऑर्डर झाली संपला विषय, संपला विषय. ते येतील पैसे, शासनाने मंजुरी दिलेली आहे, शासन देणार आहे पैसे. शासन त्याच्या शिवाय मंजुरी देत नाही.

**श्री.अनंत जोशी :-** तुमचे १०० कोटी ५ वर्षात आले, तुमचे पुढील १०० कोटी पण ५ वर्षातच येतील.

**मा.महापौर :-** विषय क्र.२२ च्या संदर्भात मा.आयुक्त यांनी मांडलेली भुमिका, प्रशासनाच्या वतीने मांडलेली भुमिकेची इतिवृत्तात नोंद घेण्यात यावी.

**नगरसचिव :-** या ठिकाणी जी सुचना मा.महापौरांकडुन मला आलेली आहे. त्याची इतिवृत्तात नोंद घेण्याचे सांगितले आहे. (मा.आयुक्त महोदया यांनी जा.क्र./जमपा/आ.का./११६४/२०२३-२४ दि.२२/०८/२०२३ अन्वये सादर केलेली लेखी सुचना मा.महापौर महोदया यांच्याकडेस सादर केलेली असुन सदर लेखी सुचना मा.महापौर महोदया यांनी इतिवृत्तात नोंद घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार मा.आयुक्त महोदया यांची लेखी सुचना पुढील प्रमाणे घेण्यात येत आहे.)

## जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

जा.क्र./जमपा/आ.का./११६४/२०२३-२४
दिनांक : २२/०८/२०२३

**प्रति,**

**मा.महापौर सो.,**

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील ५०० चौ.फुट पर्यंतच्या घरांना बृहमुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर मालमत्ताकर माफ करणेबाबतचा प्रस्ताव...

**संदर्भ :-** सभा क्र.५२ विषयपत्रिका क्र.५२ दि.१४/०८/२०२३ महासभेची सुचनापत्रिकेतील अशासकीय प्रस्ताव क्र.२२

**महोदया,**

जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकान्वये महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या महसुली अपेक्षित जमा रक्कमेची विभागणी खालील प्रमाणे आहे.

**(रक्कम कोटीत)**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | आयक्तांचे अंदाज | महासभेचे अंदाज | २०२२-२२ प्रत्यक्ष जमा |
|---|---|---|---|---|
| १ | मनपा भाडे व कर | ६८.३५ | १०३.६२ | ६५.७७ |
| २ | विशेष कायद्यान्वये उत्पन्न | २६.०३ | २६.५२ | २०.८७ |
| ३ | कराव्यतिरिक्त किरकोळ उत्पन्न | ८८.५६ | १०८.५६ | ९.८५ |
| ४ | अनुदाने | १५९.०५ | १५९.०५ | १६३.१९ |
| | **एकुण** | **३४२.०२** | **३९७.७७** | **२५९.६८** |

उपरोक्त प्रमाणे महानगरपालिकेस अपेक्षित उत्पन्नाचे अवलोकन केले असता महानगरपालिकेस सन २०२३-२४ मध्ये रु.३९७.७७ कोटी उत्पन्न जमा होणे अपेक्षित आहे. महानगरपालिकेस मनपास भाडे व करापोटी प्राप्त होणाऱ्या रक्कमेपैकी खुला भुखंडकरापासुन रक्कम रु.१२.७६ कोटी, मालमत्ता करापासुन रु.९०.८६ कोटी, विशेष कायद्यान्वये उत्पन्नातुन रु.२६.५२ कोटी, कराव्यतिरिक्त उत्पन्नातुन १०८.५६ कोटी (ज्यामध्ये गाळेनुकसान भरपाई पोटी रु.१०१ कोटी समाविष्ठ आहेत (सदर मुद्दा शासनाकडे निर्णयास्तव प्रलंबित आहे)) व अनुदानापोटी रु.१५९.५६ कोटी उत्पन्न सन २०२३-२४ अखेर अपेक्षित आहे.

संबंधीत विभागानुसार महानगरपालिकेची मालमत्ता कराची (पाणीपट्टी व इतर शासकीय करांसह) सन २०२३-२४ ची प्रत्यक्ष मागणी (थकीत+चालु मागणी) रु.१८४.१४ कोटी व खुला भुखंडकराची (इतर शासकीय करांसह) प्रत्यक्ष मागणी (थकीत+चालु मागणी) रु.३८.३१ कोटी आहे. परंतु महानगरपालिकेच्या मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष उत्पन्नाचा अभ्यास केला असता सदर प्रत्यक्ष मागणी पैकी मालमत्ता कराचे (पाणीपट्टी व इतर शासकीय करांसह) अपेक्षित उत्पन्न रु.१४५.५१ कोटी धरण्यात आलेले आहे ज्यामध्ये महसुली उत्पन्नापोटी मालमत्ता कराची रु.९०.८६ कोटी रक्कम जमा होणे अपेक्षित दर्शविलेली आहे.

मागील तिन वर्षात महानगरपालिकेस प्राप्त उत्पन्न (१) खुला भुखंडकरापोटी सरासरी वार्षिक उत्पन्न रु.३ कोटी, (२) मालमत्ता कराचे सरासरी वार्षिक उत्पन्न रु.२५ कोटी (सन २०२२-२३ मध्ये मालमत्ता सर्वेक्षण व पुर्नमुल्यांकन केले असल्याने उत्पन्न ६० कोटी आहे.) (३) करा व्यतीरीक्त सरासरी उत्पन्न रु.८ कोटी व (४) अनुदानापोटी सरासरी उत्पन्न १५० कोटी असल्याचे दिसुन येते. म्हणजेच महानगरपालिकेने अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदींपेक्षा प्रत्यक्ष उत्पन्न अत्यंत कमी प्रमाणात प्राप्त झालेल आहे.

महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या महसुली उत्पन्नातुन महानगरपालिकेमार्फत करण्यात येणारा अनिवार्य खर्च पुढील प्रमाणे-

**अनिवार्य मासिक खर्च**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १. | जशमनपा कर्मचारी वेतन खर्च | ६,५०,००,००० |
| २. | जशमनपा निवृत्ती कर्मचारी यांचे निवृत्ती वेतन खर्च | ३,५०,००,००० |
| ३. | दैनंदीन साफ सफाई खर्च | २,००,००,००० |
| ४. | मराविवि कंपनी (वाघुर उच्चदाब व इतर) खर्च | २,००,००,००० |
| ५. | मनपा शिक्षण मंडळ शिक्षकेत्तर व से नि शिक्षक वेतन खर्च | १,७५,००,००० |
| ६. | जशमनपा निवृत्ती कर्मचारी यांचे थकीत निवृत्ती वेतन खर्च | ५०,००,००० |
| ७. | वाघुर पाणी देयक खर्च | ३०,००,००० |
| ८. | EESL कंपनी देखभाल खर्च | १५,००,००० |
| ९. | डिझेल खर्च | १३,००,००० |
| १०. | पा.पु.विभाग तुरटी आणि ॲलम, क्लोरीन गॅस इ. | १३,००,००० |

| | | |
|---|---|---|
| ११. | सुरक्षा रक्षक पुरविणे खर्च | १०,००,००० |
| १२. | स्टेशनरी व कार्यालयीन साहित्य खर्च | १०,००,००० |
| १३. | नगरसेवक मानधन + मिटींग भत्ता खर्च | ८,००,००० |
| १४. | अतिक्रमण पथक मजुर खर्च | ७,००,००० |
| १५. | अंगणवाडी मदतनीस मानधन + पोषण आहार खर्च | ३,००,००० |
| १६. | बेघर निवारा देखभाल व व्यवस्था दुरूस्ती खर्च | १,५०,००० |
| | **एकुण येणार अनिवार्य मासिक खर्च** | **१७,३५,५०,०००** |

उपरोक्त अत्यावश्यक अनिवार्य मासिक खर्चा व्यतीरीक्त मनपामार्फत नागरीकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा/सुविधांबाबत मनपाच्या बांधकाम, पाणीपुरवठा, विद्युत, आरोग्य, वाहन व इतर विभागांकडुन जी कामासंबंधित देयके व मुलभुत सोईसुविधा, अमृत पाणीपुरवठा योजना, अमृत मलनिस्सारण योजना, महा.सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान तसेच इतर शासकीय योजनांच्या मनपा हिस्सा संबंधीत वार्षिक अंदाजीत रु.५५ कोटी मात्रची देयके प्राप्त होत असतात त्यांची अदायगीसुध्दा महसुली उत्पन्नातुन करण्यात येते. तसेच आज रोजी मनपाकडेस अदायगीस्तव प्रलंबीत असलेली वाघुर पाणी देयक, कर्मचारी परिभाषीत अंशदान योजनेचा मनपा हिस्सा व व्याज / ७ वे वेतन फरक / भविष्य निर्वाह निधी व्याज, सेवा निवृत्ती कर्मचारी यांचे उपदान /अर्जितरजा/ ७ वे वेतन फरक मक्तेदार / पुरवठादार यांची प्रलंबित बिले, शासकीय देणी इत्यादींची रक्कम अंदाजे रु.२२० कोटी देणे प्रलंबित आहे ते पुढील प्रमाणे -

| **बंधनकारक अंदाजीत प्रलंबित थकीत देणी (माहे जुलै २०२३ अखेर)** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **शिर्ष** | **बाकी देणे** |
| १. | शासन हमी शुल्क | ४७,००,००,००० |
| २. | कर्मचारी परिभाषित अंशदान योजना, मनपा हिस्सा व व्याज | ३५,००,००,००० |
| ३. | से.निवृत्त कर्मचारी २०१६ पासुन ते आजपावेतो ७ वे वेतन आयोग फरक (४हप्ते) | ३०,००,००,००० |
| ४. | कार्यरत कर्मचारी २०१६ पासुन ते आजपावेतो ७ वे वेतन आयोग फरक (४हप्ते) | २८,००,००,००० |
| ५. | मक्तेदार पुरवठादार | १९,५०,००,००० |
| ६. | कार्यरत कर्मचारी २०१६ पासुन ते आजपावेतो ७ वे वेतन आयोग फरकाची (४हप्ते) DCPS कर्मचारी यांचे खात्यावर जमा करण्यात येणारी रक्कम | १४,००,००,००० |
| ७. | भविष्य निर्वाह निधी थकीत वर्गणी वरिल व्याज | ११,००,००,००० |
| ८. | वाघुर पाणी देयक | ९,५६,००,००० |
| ९. | सेवा निवृत्ती कर्मचारी ग्रॅज्युटी (सेवा उपदान) | ७,५०,००,००० |
| १०. | सेवा निवृत्त कर्मचारी अर्जित रजा वेतन | ५,४२,०४,६०९ |
| ११. | सेवा निवृत्त कर्मचारी थकीत वेतन | २,५०,००,००० |
| १२. | मनपा शिक्षण मंडळ (इतर थकबाकी ७ वे वेतन फरक) | २,३०,००,००० |
| १३. | EESL कंपनी | २,२५,००,००० |
| १४. | महा.जिवन प्राधिकरण (MJP) | २,२४,५०,००० |
| १५. | जशमनपा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान निधी खाते मनपा हिस्सा ३०% + ABOVE | २,००,००,००० |
| १६. | से.नि.कर्मचारी ६ व्या वेतन फरक | १,००,००,००० |
| १७. | नगरसेवक मानधन २०१३-२०१८ | ३१,३२,७७२ |
| १८. | नगरसेवक मानधन २००८-२०१३ | १५,१५,००० |
| १९. | महाराष्ट्र औद्यो.विकास महामंडळ | ५०,००० |
| | **एकुण थकीत देणी-** | **२१९,७४,५२,३८१** |

वरील प्रमाणे महानगरपालिकेस मागील तिन वर्षात प्रत्यक्षात प्राप्त उत्पन्नाचे अवलोकन केले शासन अनुदान वगळता मालमत्ताकर हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत असल्याचे दिसुन येते. तसेच सद्या

मालमत्ता कराची आकारणी ज्या दराने केली जाते ते दर नगरपालिका अस्तित्वात असतांना २००१-०२ या वर्षात निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानंतर महानगरपालिकेची २१ मार्च २००३ साली स्थापना झाली, तरी सुध्दा सदरचे दर सुधारीत करण्यात आलेले नाही. म्हणजेच २००१ ते २०२३ या २२ वर्षात मनपाच्या कर आकारणीच्या दरात आजपर्यंत कुठलाच बदल करण्यात आलेला नाही. तसेच कुठलीच दरवाढ २२ वर्षात करण्यात आलेली नाही.

२०२१-२२ यावर्षात मालमत्तांचे सर्वेक्षण व संगणकीकरण करण्यात आले, परंतु कर आकारणीचे दरात कुठलाही बदल केला नाही. असे असतांना सुध्दा सर्वेक्षण, नविन मालमत्तावाढ, क्षेत्रफळातवाढ, वापरात बदल इत्यादी कारणांमुळे मागणी मध्ये वाढ झालेली आहे.

२०२३-२४ ची एकुण मागणी खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रमाणे आहे.

| एकुण मालमत्ता संख्या | थकीत मागणी | चालु मागणी | एकुण मागणी |
|---|---|---|---|
| १,३५,३५० | १२४,६३,९५,९९३ | ८४,०७,०३,५६४ | २०८,७०,९९५५७ |

यापैकी एकुण रु.२७,४४,५५,४७६/- मात्र इतकी रक्कम महाराष्ट्र शिक्षणकर व रोजगार हमी उपकराची असुन ती रक्कम शासनास जमा केली जाते.

यापैकी ५०० चौ.फुटपर्यंतच्या क्षेत्रफळाच्या मालमत्तेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| मालमत्ता | मालमत्ता संख्या | थकीत मागणी | चालु मागणी | एकुण मागणी |
|---|---|---|---|---|
| घरपट्टी | ५१,७२४ | २८,७९,४४,३९४ | १०,५९,५७,५०४ | ३९,३९,०१,८९८ |
| पाणीपट्टी | २५२२५ | ५,३१,८२,०६४ | ४,७३,६५,१२८ | १०,०५,४७,१९२ |
| | **एकुण** | **३४,११,२६,४५८** | **१५,३३,२२,६३२** | **४९,४४,४९,०९०** |

महानगरपालिकेने अशाप्रकारे ५०० चौ.फुटपर्यंत क्षेत्रफळ असलेल्या मालमत्तांना सुट दिल्यास एकुण रुपये ४९,४४,४९,०९० /- मात्र मनपाचे आर्थिक नुकसान होईल. तसेच एकुण वसुलीचा विचार करता मागील वर्षी ५०० चौ.फुटपर्यंत क्षेत्रफळ असलेल्या मिळकतींचे करापैकी एकुण घरपट्टी वसुली रु.१३,८२,८५,६७९/- व पाणीपट्टी वसुली एकुण रु.४,७३,३८,३४४/- झालेली आहे व दोन्ही मिळुन एकुण रु.१८,५६,२४,०२३/- इतकी वसुली झालेली आहे.

अश्या परिस्थितीत महानगरपालिकेमार्फत ५०० स्केअर फुट पर्यंतच्या इमारतींना मालमत्ता करातुन सुट दिल्या गेल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात मोठी तुट निर्माण होवुन महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट होईल ज्याचा परिणाम महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवांवरील खर्चावर होवुन महानगरपालिका नागरीकांच्या मुलभुत सुखसोई सुध्दा देण्यास असमर्थ होईल. उत्पन्नात तुट निर्माण झाल्यास मक्तेदार / पुरवठादार यांची देयके वेळीच अदा न केल्याने मक्तेदार / पुरवठादारांमार्फत करण्यात येणाऱ्या कामांना विलंब होवुन परिणामी महानगरपालिकेस नागरीकांच्या रोषास सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती व वरील सर्व बाबींचा विचार करता उपरोक्त प्रस्ताव मंजुर केल्यास भविष्यात महानगरपालिकेमार्फत शहरात होणाऱ्या विकास कामांमध्ये व प्रशासकीय कामकाजात अडचणी येतील. म्हणुन महापालिकेच्या विकासात्मक दृष्टीकोनातुन महासभेतील अशासकीय प्रस्ताव क्र.२२ मंजुर करण्यात येवु नये असे प्रशासनाचे मत आहे.

सदर पत्राची नोंद महासभेच्या इतिवृत्तात घेण्यात यावी ही विनंती.

सही/-
आयुक्त
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**श्री.जितेंद्र मराठे :-** जे नितीनभाऊंनी सांगितले, खरंच ते मानावे लागेल. गृहीणी, समाजसेवक, राजकारणी.

**मा.उपमहापौर :-** ८०% समाजसेवक आणि २०% राजकारणी.

**श्री.जितेंद्र मराठे :-** कुलभुषणभाऊ तुम्ही बोला ना, तुम्हाला भरपुर वेळ आहे बोलायला. खरंच मानावे लागेल, अडीच वर्षात नाही सुचले पण शेवटच्या १ महिन्यात सुचते की, आपण हे करायला पाहिजे हा ठराव. आता या ठिकाणी जसे आपण ड वर्गामध्ये आहे महापालिका आपण अ मध्ये गेले पाहिजे. आम्ही हे ३०० स्के.फुटापर्यंत बोललो होतो. पण त्याच्यामध्ये आमचा या संदर्भामध्ये आपल्यावर रिकव्हरी असेल, आपल्यावर हुडको कर्ज असेल. या सगळया गोष्टींमुळे हे अडचणीमध्ये होते.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत होते त्यामुळे कोण काय बोलले ते समजत नाही)

**श्री.नितीन लढ्ढा :-** माझी फक्त ऐवढीच विनंती आहे. सन २०१८ ते २०२३ च्या बॉडीमध्ये ३०० स्के.फुटाला घरपट्टी माफ झाली पाहिजे. आता २०१८ ते २०२३ ची बॉडी संपायला फक्त १ महिना बाकी आहे. आणि आजही ठराव झाला तर माझी ही एक प्रामाणिक ईच्छा राहिल की, त्या तुमच्या आश्वासनाची पुर्तता या बॉडीची मुदत संपण्या अगोदर राज्य शासनाकडुन मान्य करुन आणावी. आणि ३०० चौ.फुटाचा जो आपल्या जाहिरनाम्यामध्ये आश्वासन होते, त्याची पुर्तता केली तरी आम्हाला समाधान होईल की, आम्ही आपल्या जाहिरनाम्या मधील घोषणेची अंमलबजावणी केलेली आहे.

**मा.उपमहापौर :-** सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊंनी सुचवलेली जी सुचना होती सभागृहात झालेली चर्चेनुसार ३०० स्के.फुटाचे घरांना घरपट्टी माफीचा ठराव व ज्या सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या सुचना यांची नोंद घेऊन हा ठराव मंजुर करण्यात येत आहे. सदर प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे. मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात यावे.

**मा. महापौर :-** सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊ यांनी मांडलेल्या सुचनेनुसार प्रस्तावानुसार ५०० चौ.फुट ऐवजी ३०० चौ.फुटापर्यंतच्या मालमत्तांना मालमत्ता करात माफी करण्याच्या संदर्भात प्रस्ताव हे सविस्तर प्रशासनाने राज्य शासनाकडे पाठवावा. आणि विषय क्र.२२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२४२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रातील ५०० चौ. फुट पर्यंतच्या घरांना सरसकटपणे मालमत्ता कराची माफी दिलेली आहे.

खर पाहता ५०० चौ. फुट जागेत अत्यंत गरीब व झोपडीधारकांचा रहिवास असतो. मोलमजूरी करुन सदर नागरीक जेमतेम त्यांच्या संसाराचा गाडा हाकीत असतात त्यामुळे त्यांना महानगरपालिकेची घरपट्टी / मालमत्ता कर भरणे फारच जिकरीचे असते त्यामुळे ते कर भरीत नाहीत व परिणामी मालमत्ता कराची थकबाकी दिवसेंदिवस वाढत जाते आणि मालमत्ता कर वसुलीची टक्केवारी वर त्याचा परिणाम होत असतो आणि अश्या ५०० चौ. फुट पर्यंतच्या मिळकतींचे प्रमाण ही तसे जास्त नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या तिजोरीवर सुध्दा जास्त प्रमाणात फरक पडणार नाही.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषगांने सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांनूसार जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील ५०० चौ. फुट पर्यंतच्या घरांऐवजी जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील ३०० चौ. फुट पर्यंतच्या घरांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर मालमत्ता करात माफी देणेसाठी प्रस्ताव शासनाची मान्यता घेणेस पाठविणेस तसेच सदरच्या प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील ३०० चौ. फुट पर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफ करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२३ :-** जळगांव शहरात पिंप्राळा प्रभागात घरकुल परिसरात १० एकर क्षेत्रफळात भव्य प्रति दिक्षाभुमी विकसित करणेसाठी वास्तुविशारद यांची नियुक्ती करणे संबंधात मा.महापौर,सौ.जयश्री सुनिल महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**मा.उपमहापौर :-** विषय क्र.२३ मध्ये जळगांव शहरात पिंप्राळा प्रभागात घरकुल परिसरात १० एकर क्षेत्रफळामध्ये भव्य प्रति दिक्षाभुमी विकसित करणेसाठी वास्तुविशारद नियुक्ती करणे संदर्भातला जो प्रस्ताव आहे. तर याच्यामध्ये वास्तुविशारद नेमत असतांना नागपुरला आहे अशी दिक्षाभुमी तिचीच प्रतिकृती या ठिकाणी साकारली गेली पाहिजे. जो कोणी वास्तुविशारद आपण याठिकाणी नेमणार आहोत. त्यांचे याठिकाणी ऑनलाईन पध्दतीने गुणवत्तापुर्वक त्यात अटीशर्ती टाकुन सेम टु सेम प्रतिकृती याठिकाणी तयार होईल, त्याच पध्दतीने ज्या वास्तुविशारदांनी यापुर्वी काम केलेले असेल. असे वास्तुविशारदांना अटीशर्ती टाकुन निविदा मागवुन आणि योग्य तो वास्तुविशारद नेमुन त्याचे

लवकरात लवकर आराखडा या ठिकाणी तयार करुन लवकरात लवकर त्या ठिकाणी पिंप्राळा परिसरामध्ये, पिंप्राळा भागात घरकुल परिसरामध्ये प्रतिकृती दिक्षाभुमी उभारणे संदर्भाच्या ठरावाला मी माझे अनुमोदन देत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**श्री.सुरेश सोनवणे :-** मला बोलायचे आहे. जागेसाठी मागच्या वेळेस भारतीय जनता पार्टीच्या वतीने महापौरताई आहे, उपमहापौर आहे सर्व सन्मा.नगरसेवक आहे. सर्वांच्या वतीने ठराव पास झालेला होता. अडीच वर्ष झाले. त्या ठरावाला पाठपुरावा मी अडीच वर्षापासुन करत आहे. पण अजुन पर्यंत त्या ठरावाचा कागद हा पुढे सरकला नाही. हा जो ठराव आला आहे चांगला ठराव आहे पण याच्यात गट नंबर वगैरे काय आहे. कोणती जागा तुम्ही देणार.

**मा.उपमहापौर :-** सुरेश भाऊ आपले घरकुल नविन रुल्सनुसार कायदेशीर प्रक्रिया राबवुन ज्या ठिकाणी आपल्याला योग्य ती जागा प्रशासन देईल. आपण मागणी केले नुसार.

**श्री.सुरेश सोनवणे :-** मागच्या ठरावाचे काय करायचे.

**मा.उपमहापौर :-** त्या ठिकाणी आपण मागच्या ठरावाच्या संदर्भातला आपला जो विषय होता. या आर्थिक वर्षाच्या बजेटमध्ये महानगरपालिका प्रशासनाने दिक्षाभुमीच्या साठीची जी तरतुद होती ५ कोटीची ती शुन्य केलेली होती. तर आपण या आर्थिक बजेट तरतुद मध्ये ती ५ कोटीची सुधारीत तरतुद करुन त्या ठिकाणी ५ कोटी रुपयाची दिक्षाभुमीसाठी तरतुद केलेली आहे. मागचा जो ठराव केलेला होता तो सन २०१८-१९ मध्ये केलेला होता. त्या ठरावाची अंमलबजावणी पण झाली नाही आणि त्या तरतुदीचे इमप्लीमेंट पण झाले नाही. त्याच्यामुळे आता आपण निधीची तरतुद पण केलेली आहे आणि दिक्षाभुमीसाठी वास्तुविशारद नेमण्याचा प्रस्ताव पण महासभेसमोर आणलेला आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** या ठरावामध्ये गट नंबर घ्या ना मग.

**मा.उपमहापौर :-** आता आपल्या घरकुल मध्ये साधारणता जो गट नंबर आहे की, ज्या ठिकाणी घरकुल आहे. आता काही ठिकाणी आपण योजना प्रस्तावीत केलेल्या आहे. पण त्या ठिकाणी योग्य ती जागा असेल आपल्यानुसार जी योग्य जागा प्रशासन आपल्याला देईल त्या जागेवर निश्चितच आपण येणाऱ्या काळात भविष्यात दिक्षाभुमी हा आपला सर्वांचाच मानस आहे. तर त्याच्यासाठी आपण निश्चितच सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे सहकार्य केले पाहिजे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** घरकुल मध्ये रिजर्व जागा दाखवतच नाही तेथे घर दाखवत आहे तेथे.

**मा.उपमहापौर :-** आपण त्या ठिकाणी सर्वांच्या मान्यतेने आपण एक प्रस्ताव तयार करु ठरावाच्या अनुषंगाने आपण एक प्रस्ताव तयार करु आणि शासनाकडे आपण मागणी करु शासन आपल्याला जागा देईल ना.

**श्री.सुरेश सोनवणे :-** दोन अडीच वर्ष झाले पाठपुरावा करत आहे शासन देतच नाही जागा.

**मा.उपमहापौर :-** मागच्या ठरावात जेव्हा केली होती तेव्हा तरतुदच शुन्य होती सुरेश भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** एखादी शासकीय जागा असेल तर मिळेल ना आपल्याला.

**मा.उपमहापौर :-** भाऊ त्या ठिकाणी आपण खरेदी केलेल्या जागा आहे आपल्या. शासकीय जागा ज्या आहे त्याकरीता आपण पाठपुरावा करु. दिक्षाभुमी करीता कुठलीही कायदेशीर अडचण येणार नाही. आणि कायदेशीर प्रक्रियेची पुर्तता करुन लवकरात लवकर त्या ठिकाणी दिक्षाभुमी उभारण्याच्या बाबतीतला प्रयत्न महानगरपालिका प्रशासनाने करायचा आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य उपमहापौर यांनी केलेल्या सर्व सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी. विषय क्र.२३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिनिमित्त नागपुर शहरात दिक्षाभूमी विकसित करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर जळगांव शहरात प्रति दिक्षाभुमी विकसित करणे शहर सौंदर्याच्या दृष्टीने गरजेचे वाटत आहे.

जळगांव शहरात पिंप्राळा घरकुल परिसरात मागासवर्गीय समाजाची लोकसंख्या जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे पिंप्राळा घरकुल परिसरात १० एकर क्षेत्रफळात नागपूर प्रमाणेच प्रति दिक्षाभूमी विकसित करणेस व सदर नियोजीत प्रति दिक्षाभुमीचे आराखडे तसेच अंदाजे खर्चाचे इस्टिमेट इ. बाबी योग्य प्रकारे तयार करुन घेणेस तसेच त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांनूसार मा.पिठासिन अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदर कामी वास्तुविशारद नेमत असतांना नागपुरला आहे अशी दिक्षाभुमी तिचीच प्रतिकृती या ठिकाणी साकारली गेली पाहिजे. यासाठी जो कोणी वास्तुविशारद नियुक्त करणार

आहोत त्याकामी ऑनलाईन पध्दतीने गुणवत्तापुर्वक अटीशर्ती टाकुन सेम टु सेम प्रतिकृती याठिकाणी तयार करणे, त्याच पध्दतीने ज्या वास्तुविशारदांनी यापुर्वी काम केलेले असेल असे वास्तुविशारदांना अटीशर्ती टाकुन निविदा मागविणे आणि वास्तुविशारद नेमुन त्याचा लवकरात लवकर आराखडा तयार करुन लवकरात लवकर पिंप्राळा परिसरामध्ये पिंप्राळा भागात घरकुल परिसरामध्ये प्रति दिक्षाभुमी उभारणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**
**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**
**अनुमोदक :- सोनवणे सुरेश माणिक**

**नगरसचिव -विषय क्र.२४ :-** जळगांव शहरातील अल्प उत्पन्न असलेल्या गोरगरीब लोकांसाठी कमी किमतीत घरे उपलब्ध करुन देणेसाठी “खास बाब” म्हणून सिडको स्थापनेकरीता राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करणे संबंधात मा.महापौर,सौ.जयश्री सुनिल महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शहरातील गोरगरीब जनतेसाठी अल्प दरात घरे उपलब्ध करुन देणेकरीता नाशिक व छत्रपती संभाजी नगर या शहरात सिडको या संस्थेची स्थापना करुन त्यांच्या मार्फत उपरनिदीष्ट शहरात अनेक निवासी सदनिका तयार करुन त्या अल्प उत्पन्न गटातील नागरीकांना किफायतशीर किंमतीत उपलब्ध करुन देण्यात आलेले असून त्यामुळे सदर शहरामध्ये झोपडपट्टीचे निर्मुलन झालेले आहे.

त्याच धर्तीवर जळगांव शहरासाठी सिडको संस्थेची स्थापना करणेसाठी महाराष्ट्र राज्य सरकारकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच सदर संस्थेच्या स्थापनेस शासनाची मान्यता मिळणेपुर्वी प्रस्तावित सिडको कार्यालयासाठी व घरकुलासाठी योग्य जागेची निश्चिती करणेसाठी महानगरपालिका पदाधिकारी व अधिकारी वर्ग यांची समिती नेमणेस देखिल मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२५ :-** शासन निर्णयानुसार मनपाच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमध्ये महिला मातांच्या सेवेसाठी हिरकनी कक्षाची स्थापना करणेबाबत मा.महापौर,सौ.जयश्री सुनिल महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासकीय नियमानुसार शासनाच्या प्रत्येक कार्यालय, बस व रेल्वे स्थानक व वर्दळीच्या ठिकाणी स्तनदा मातांच्या सोयीसाठी हिरकणी कक्षाची उभारणी करण्यात आलेली आहे. मनपाच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमध्ये महिला व बाल कल्याण विभाग, एनयुएलएम तसेच महिलांच्या विकासासाठी बहुतांश विभाग कार्यरत असून याठिकाणी शासन निर्णयानुसार याइमारतीमध्ये सुध्दा महिला मातांच्या सेवेसाठी हिरकणी कक्षाची उभारणी करणे अपेक्षित व गरजेचे असून सदर विषयी कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

महिलांना येणाऱ्या सदर समस्येबाबत आपण ज्ञात असून महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमध्ये दररोज असंख्य महिलांची वर्दळ लक्षात घेता याठिकाणी जागा उपलब्ध करुन महिला मातांच्या सेवेसाठी हिरकणी कक्षाची उभारणी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२६ :-** जळगांव शहरात दिवंगत कवी पद्‌मश्री ना.धों.महानोर यांचे स्मारक उभारणेबाबत मा.महापौर,सौ.जयश्री सुनिल महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.याच्या संदर्भात जागा पुरविणेबाबत एक सुचना मांडतो की, जळगांव हा अत्यंत निर्सगरम्य परिसर आहे आणि आदरणीय ना.धों.महानोर यांचे व्यक्तीमत्व बघितले तर निर्सगाच्या सावरण्यातच त्यांचे आयुष्य गेलेले असल्याने एक निर्सगरम्य ठिकाण हे शिवाजी उद्यान असल्याकारणाने त्याबाबतीत योग्य तो निर्णय घ्यावा. प्रशासनाने याच्या संदर्भातली कार्यवाही करावी.

**श्री.सुनिल खडके :-** एक मिनीट, कवित्री बहिणाबाई चौधरी यांच्या पण पुतळयाचा विचार आपण करावा, आता नुकतेच आसोदा येथे आमच्या बहिणाबाईच्या पुतळयाला १२ कोटी रुपये आदरणीय श्री.गिरीषभाऊ महाजन यांनी जाहिर केलेले आहे.सर्व प्रथम आम्ही त्यांच सभागृहातर्फे स्वागत करतो आणि आता शहरासाठी समजा आता ते माहेरच्या होत्या तिकडे १२ कोटी रुपये मिळाले, आता ते सासरवासी येथे चौधरी वाडयात त्यांचे घर होते. तेथे कुठेतरी किंवा एक चांगली जागा पाहुन त्यांच्याही पुतळयाचे आपण विचार करावा आणि तो विषय पुढच्या मिटींगला घ्यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** नितीनभाऊंनी दिलेल्या सुचनेची प्रशासनाने नोंद घ्यावी. विषय क्र.२६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव जिल्हयाचे सुपूत्र निसर्गकवी कै.पद्‌मश्री ना.धों.महानोर यांच्या कवितांमुळे त्यांची ख्याती फक्त प्रदेशातच नव्हेतर देशस्तरावर पसरलेली असून त्यांना भारत सरकाने पद्‌मश्री पुरस्काराने सन्मानित केलेले आहे. पाठयपुस्तकात तसेच चित्रपटात सुध्दा त्यांची कविता व गिते समाविष्ट करण्यात आलेली आहेत. नुकतेच त्यांचे निधन झालेले आहे. त्यांची आठवण सदैव स्मरणात रहावी यास्तव सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे जळगांव शहरातील मेहरुण शिवारातील शिवाजी उदयान या निसर्ग रम्य ठिकाणी कवी पद्‌मश्री ना.धों.महानोर यांचे स्मारक उभारणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२७ :-** सानेगुरुजी ग्रंथालयाच्या इमारतीत शहरातील विदयार्थ्यांसाठी राज्यस्तरीय स्पर्धा परिक्षा केंद्र उभारणेबाबत मा.महापौर,सौ.जयश्री सुनिल महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा. सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय जे आहे ना. तेथेच आमदार निधीतुन १ कोटी रुपये प्राप्त झालेले आहे. तर त्या दृष्टीकोणातुन सानेगुरुजी ग्रंथालय मध्ये अजुन वरती ३ मजला फेब्रीकेशन मध्ये करुन त्याठिकाणी ही अभ्यासिका उभारण्याच्या संदर्भातला निर्णय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** नितीनभाऊंनी दिलेल्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य नितीनभाऊंनी दिलेल्या सुचनेची प्रशासनाने नोंद घ्यावी. विषय क्र.२७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२४७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सदयाचे युग हे स्पर्धात्मक परिक्षेचे युग आहे. स्पर्धात्मक परिक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या व प्राविण्यप्राप्त करणाऱ्या विदयार्थ्यांनाच भविष्यात उज्ज्वल भविष्य आहे. जळगांव जिल्हयात अशा स्पर्धात्मक परिक्षेसाठी अल्प प्रमाणातच काही संस्था कार्यरत आहेत. या अभावी शहरातील विदयार्थ्यांना पुणे मुंबई व इतरत्र ठिकाणी हया स्पर्धा परिक्षेची तयारीसाठी जावे लागते. त्यामुळे सर्वसामान्य कुटूंबातील विदयार्थ्यांना ते आर्थिकदृष्टया परवडत नाही.

शहरात अनेक हुशार व चाणाक्ष विदयार्थी असून ही निव्वळ आर्थिक कारणास्तव त्यांना हया स्पर्धात्मक परिक्षांना मुकावे लागते. जळगांव महानगरपालिकेने सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालय ही इमारत बरीच मोठी असून व त्याठिकाणी स्पर्धात्मक परिक्षेचे केंद्र सुरु करणेस व सभागृहात झालेल्या चर्चेनूसार तसेच सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनेनूसार सानेगुरुजी ग्रंथालय व वाचनालयाच्या इमारतीत तिसऱ्या मजल्यावर स्पर्धात्मक परिक्षा केंद्र उभारणी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२८ :-** खान्देश एज्युकेशन सोसायटी जळगावचे अध्यक्ष तथा शिक्षण क्षेत्रात अमुल्य कामगीरी करणारे व्यक्तिमत्व श्री.नंदकुमार गोपाळराव बेंडाळे यांना "जळगांव रत्न" पुरस्काराने सन्मानित करणेबाबत मा.महापौर,सौ.जयश्री सुनिल महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील अमृत महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणारी ख्यातनाम शैक्षणिक संस्था खान्देश एज्युकेशन सोसायटीचे विदयमान अध्यक्ष,श्री.नंदकुमार गोपाळराव बेंडाळे हे बहुआयामी व्यक्तिमत्व आहेत. १९४४ मध्ये केवळ १६६ विदयार्थी असलेल्या या संस्थेत आज मितीस जवळपास अठरा हजार विदयार्थी विविध ज्ञान शाखामधुन शिक्षण घेत आहेत. वैश्विक विचार व स्थानिककृती (Think globally, Act Locally) या प्रमाणे शैक्षणिक धोरण राबविणारी संसथा विधी शाखा बी.एड., डी.एड, मेनेजमेंट व्यवस्थापन, इंजिनिअरींग कॉलेज, जलश्री इंटरनेशनल रिसर्च इंस्टिटयुट, कान्ह ललीत कला केंद्र (संगीत, नाटय, नृत्य, फॉईट आर्ट) योग व नेपरोपॅथी केंद्र स्पर्धा परिक्षा केंद्र तसेच विदयार्थी व विदयार्थीनीसाठी वसतीगृह सुव्यवस्थितपणे चालवित असुन विदयार्थी केंद्रबिंदु मानुन त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाचे धोरण श्री.नंदकुमारजी बेंडाळे यांच्या कुशल अध्यक्षतेखाली राबवित आहे.

याशिवाय श्री.नंदकुमार बेंडाळे सो, लेवा एज्युकेशन युनीयन जळगांव, इंडो अमेरीकन कार्डीओ व्हॅस्कुलर सेंटी,जळगांव हार्ट इंस्टिटयुट जळगांव, कै.अप्पासाहेब डॉ.जी.डी.बेंडाळे प्रतिष्ठान जळगांव चे विदयमान अध्यक्ष असुन भोरगाव लेवा पंचायत जळगांव विभागाचे माजी अध्यक्ष आहेत. त्याचप्रमाणे क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विदयापिठ जळगांव चे सिनेट सदस्य तसेच मॅनेजमेंट कौन्सिल, क.ब.चौक म.वि.जळगांव चे सदस्य सुध्दा आहेत. दि.अकोला जनता को.ऑप.बँक लि.मी.जळगांव चे स्विकृत सदस्य म्हणुन गतकाळात कार्यरत असलेले श्री.नंदकिशोरजी बेंडाळे हेरंब पॉली पॅक जळगांव चे प्रोप्रायटर आहेत.

जीवन कला मंडळ पिंपरी चिंचवड व पुर्णवाद परिवार यांच्या तर्फे दिला जाणारा प्रज्ञावंत पुरस्काराने सन्मानित असलेले श्री.नंदकुमार बेंडाळे यांनी कृषी क्षेत्रात ही भरीव कार्य केलेले असुन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन स्वत:ची शेती विकसीत करणारे व विविध उपक्रम यशस्वीपणे राबविणारे सर्जनशील कृषी उदयोजक म्हणुन त्यांना ओळखले जाते.

समाजातील सर्व थरांतील व्यक्तिंशी सातत्याने व थेट संपर्कात असुन त्याव्दारे सामाजिक संस्थाना सहकार्य व मार्गदर्शन करणेत सतत प्रयत्नशील असणारे व्यक्तिमत्व आहे. अशा या कुशल संघटक व दुरदर्शी नेतृत्व लाभलेल्या बहुआयामी व्यक्तीमत्वाचा योग्य तो सन्मान व्हावा यासाठी त्यांना "जळगांव रत्न" पुरस्काराने सन्मानित करणे सर्वार्थाने गरजेचे व संयुक्तीक ठरते. त्यामुळे त्यांना "जळगांव रत्न" पुरस्कार प्रदान करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच जळगांव महानगरपालिकेने महासभा ठराव क्रं.८२२ दि.३०/०५/२०२२ अन्वये जळगांव शहराचे स्व.डॉ.अविनाश आचार्य, विशेष सरकारी वकील ॲड श्री.उज्वल निकम तसेच स्व.श्री.गफ्फार मलिक यांना ही जळगांव रत्न पुरस्काराने सन्मानित करणेस सर्वानुमते मान्यता प्रदान केलेली आहे. त्यामुळे जळगांव रत्न पुरस्काराने सन्मानित सर्वांच्या दि.१० सप्टेंबर २०२३ रोजी जळगांव बालगंधर्व नाटयगृहात "जळगांव रत्न" पुरस्कार प्रदान करणेचा विशेष कार्यक्रम आयोजित करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२९ :-** जळगांव शहर महानगरपालिकेकडिल शहर बस सेवा कार्यान्वीत करणेबाबत मा.महापौर,सौ.जयश्री सुनिल महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा परंतु महानगरपालिकेने स्वत:च्या धरतीवर हा प्रकल्प चालु करण्याच्या भानगडीत पडु नये. कारण काय आहे. यापुर्वी आपण दोन खाजगी मक्तेदारीच्या माध्यमातुन हा प्रकल्प जळगांव शहरात चालविण्याच्या संदर्भात प्रयत्न केलेले होते. आणि पहिले ज्या वेळेला दिलेले होते. प्रसन्न टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स अशी एजन्सी म्हणुन जी या क्षेत्रात काम करणारी चांगली कंपनी होती. परंतु ती सुध्दा यशस्वी झाली नाही. दुसऱ्या वेळेला पुनश्च तो प्रकल्प सुरु करण्याच्या दृष्टीकोणातुन साई सिटी सर्व्हीसेस जळगांवच्या स्थानिक उद्योजकानी बस सेवा चालु करण्याचे दृष्टीकोणातुन धोरणात्मक निर्णय घेतला होता. त्यांनी सुध्दा चालवली होती. ते सुध्दा अयशस्वी झालेले आहे.मा.जिल्हाधिकारी महोदयांचा आग्रह आहे की, ही शहर वाहतुक सेवा सुरु व्हायला पाहिजे.अत्यंत स्तृत्य असे उपक्रम आहे. शहराची गरजही आहे. परंतु जर कधी महानगरपालिका खाजगी उद्योगातुन चालवत असेल तर महानगरपालिकेला आपले परिवहनचे धोरण आहे. त्याच पध्दतीने कोणी खाजगी बस सुरु करण्याचे संदर्भातला पुढाकार घेत असेल. तरच याच्या बाबतीतला विचार करण्यात यावा आणि हा विचार करत असतांना सगळे याच्यामध्ये त्यावेळेला ज्या काही अडचणी आल्या, सगळया अडचणीच्यामध्ये प्रामुख्याने जी अडचण होती ती बसेस थांबाच्या संदर्भातली, कारण आपल्याकडे स्वत:ची बस थांब्याची जागा नसल्या कारणाने त्यावेळेला ही ज्या ज्या ठिकाणी आपण बसेस पार्कींग करत होतो. तेथे नागरीकांच्या मोठया प्रमाणात तक्रारी यायच्या आणि वाहतुकीला, रहदारीला अडथळा होईल. अश्या ठिकाणी रस्त्यावरती बसेस उभ्या करावे लागत होत्या. तर या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी यांना विनंती करुन जळगांव बस स्थानक म्हणजे जुन्या बस स्थानकाची जी जागा आहे. ती महानगरपालिकेच्या ताब्यात या उपक्रमासाठी मिळणे गरजेचे आहे आणि ती जागा ताब्यात मिळाल्यानंतर या संदर्भातला जो काही उपक्रम असेल. तो खाजगी मक्तेदाराच्या माध्यमातुन चालविण्याच्या दृष्टीकोणातुन ही सभा निर्णय घेत आहे.

**मा.उपमहापौर :-** नितीनभाऊ लढ्ढा यांनी सुचवलेली सुचना ही लक्षात घेता व याची नोंद करता सदरील प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी. विषय क्र.२९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेचे रहिवासी व औदयोगिक क्षेत्रफळ दिवसेंदिवस वाढतच असून शहराच्या केंद्रापासून बऱ्याच जास्त लांब अंतरापर्यंत अनेक रहिवासी वस्त्या, कॉलन्यांचा विस्तार झालेला दिसून येत आहे. सदर वाढीव क्षेत्रातील असंख्य नागरीक, विदयार्थी, गृहीणी यांना शासकिय कामकाजासाठी, शैक्षणिक संस्थेत येणेसाठी, बाजारहाटासाठी अश्या विविध कामांसाठी शहरात दैनंदिन कामांसाठी तसेच व्यावसायीक, मजूरी यासम कामकाजासाठी शहरात ये-जा करावी लागत

आहे. सदर कामी यापुर्वी जळगांव मनपातर्फे परिवहन शहर बससेवा सुरु करण्यात आलेली होती, सदर कामी शहरातील नागरीक, शहराचे उपनगर व शहरा नजीकच्या खेडयातील नागरीकांच्या सेवेसाठी शहराच्या मध्यवर्ती भागात मध्यवर्ती बस स्थानक असणे आवश्यक होते. सदर कामी महाराष्ट्र परिवहन महामंडळाकडे शहरातील मध्यवर्ती स्थानी असलेले जुने बस स्थानकाची जागा जळगांव शहर महानगरपालिकेस नियमानुसार मागणी केलेली होती, मात्र त्यांनी सदर जागा उपलब्ध करुन न दिल्यामुळे महानगरपालिकेसह परिवहन सेवेचे मक्तेदार यांना बसथांब्यांसह इतर अडचणी निर्माण झाल्यामुळे सदर सेवा बंदावस्थेत आहे.

सदयस्थितीत शहरातील, उपनगरातील मेहरुण, पिंप्राळायासम तसेच जवळपास खेडे असोदा भादली यासम गांवातील नागरीक ॲटोरिक्षा इतर वाहनांव्दारे शहरात दैनंदिन ये-जा करीत असून त्यांना सदर प्रवासाकामी जास्तीचे पैसे मोजावे लागत आहे. परिणामी बऱ्याच कालावधी पासून शहरातील नागरीकांसह वर नमूद नाकरीकांकडून शहर बस सेवा सुरु करणेची वारंवार मागणी होत असून नुकतिच याबाबत वृत्तपत्रांनी देखिल दखल घेतलेली आहे. महानगरपालिकेने आपल्या हद्दीतील नागरीकांना मुलभूत सेवासुविधा पुरविण्यासह परिवहन सेवा पुरविणे हे देखिल महानगरपालिकेचेच कर्तव्य आहे.

यास्तव, सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनेनूसार जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रासह उपनगरातील मेहरुण, पिंप्राळायासम तसेच जवळपास खेडे असोदा, भादली यासम गांवासाठी खाजगी मक्तेदारमार्फत जळगांव मनपा परिवहन विभागा अंतर्गत शहर बस परिवहन सेवा कार्यान्वीत करणे कामी निविदा प्रक्रिया राबविणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच जळगांव शहर बस स्थानकासाठी जुने बस स्थानकाची जागा मागणी करण्याचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडेस पाठविणेस सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३० :-** लोकसहभागातुन स्वागत कमान उभारणे बाबत मा.उपमहापौर,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नांव काय ठेवणार आहे त्या कमानावर.

**मा.उपमहापौर :-** कमानला लोकसहभागातुन आपण तयार करणार आहोत. पिंप्राळा गांवामध्ये नागरीकांचे हार्दिक स्वागत. ऐवढेच ठेवणार आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२५० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.उपमहापौर,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार जळगांव शहर महानगरपालिका मधील पिंप्राळा गावाकडे येणाऱ्या रस्त्यावर सिल्कमिल जवळ रस्ते वाहतुकीला अडचण होणार नाही अशा ठिकाणी लोकसहभागातुन स्वागत कमान उभारणेस महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३१:-** जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकिय इमारतीच्या आवारात “अखंड भारताचे शिल्पकार लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुर्णाकृती पुतळयाची” देखभाल व मांगल्य

पावित्र्य राखण्याची जबाबदारी कवियत्री बहिणाबाई चौधरी कृषी व बहुउद्देशीय विकास संस्था,जळगांव ता.जि.जळगांव यांना देणे कामी मा.विरोधी पक्षनेता,श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** या ठिकाणी आपले जळगांव शहराचे आमदार यांनी तो पुतळा प्रशासनाच्या ताब्यात दिलेला आहे. त्यांचे आपण या ठिकाणी अभिनंदनाचा ठराव करु. महापौरताई आणि उपमहापौर यांनी जी एन.ओ.सी. आणली, त्यांचेही आपण या सभागृहाच्या वतीने अभिनंदन करु.

**मा.उपमहापौर :-** तो जो पुतळा आहे तो प्लास्टीक फायबरचा आहे. तर मला असे वाटते की, त्याची लाईफ जो पर्यंत आहे त्या धातुची तोपर्यंत राहील तितपर्यंत राहु द्यावे परंतु भविष्यामध्ये तो त्या ठिकाणी आपण आता प्रशासकीय इमारतीत जो पुतळा उभारणार आहे. हा पुतळा देखील तेवढयाच उंचीचा त्याच स्वरुपाचा ब्रॉन्स या धातुचा भविष्यामध्ये उभारण्यासंदर्भात देखील महानगरपालिकेस मी सुचना मांडत आहे. त्याची देखील महानगरपालिका प्रशासनाने अंमलबजावणी करावी ही सर्व सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक असा विषय होता, याची जबाबदारी आपण दुसऱ्या संस्थेला देऊ शकतो का ? देखभाल दुरुस्तीचे. कारण ते महापालिकेच्या मालमत्तातला विषय आहे ना. महापालिकेच्या प्रिमायसेस मध्ये आहे. कारण बाकीच्या पुतळयांची पण जबाबदारी मनपाचीच असते.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्यांनी दिलेल्या सर्व सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी. विषय क्र.३१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकिय इमारतीच्या आवारात “अखंड भारताचे शिल्पकार लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे करीता चबुतरा तयार करणेस जळगांव मनपा महासभा ठराव क्र.१०६० दिनांक २१/०४/२०२३ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदरील पुतळा उभारणे कामी सामन्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.पुतळा-३११६/प्र.क्र.३०८/२९ मंत्रालय, मुंबई दिनांक ०२ मे २०१७ अन्वये संपुर्ण कागदोपत्री कार्यवाही झालेली असून सदयस्थितीत त्याचे काम सुरु असून लवकरच पुर्ण होणार आहे. मात्र संदर्भ शासन निर्णयानुसार सदर पुतळयाची देखभाल व मांगल्य पावित्र राखण्याची जबाबदारी स्विकारणे बाबत करारपत्र सादर करणेची अट नमूद आहे. त्यास अनुसरुन कवियत्री बहिणाबाई चौधरी कृषी व बहुउद्देशीय विकास संस्था,जळगांव ता.जि.जळगांव यांनी सदर कामी महानगरपालिकेकडे लेखी समर्थता दाखविलेली आहे.

यास्तव, जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकिय इमारतीच्या आवारात “अखंड भारताचे शिल्पकार लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुर्णाकृती पुतळयाची” देखभाल व मांगल्य पावित्र्य राखण्याची जबाबदारी कवियत्री बहिणाबाई चौधरी कृषी व बहुउद्देशीय विकास संस्था,जळगांव ता.जि.जळगांव यांना महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३२ :-** शासन मान्यता मिळालेनुसार जळगांव महानगरपालिकेच्या जागेमध्ये साने गुरुजी अभ्यासिका जुनी इमारत नुतनीकरण, डिजिटलायझेशन व फर्निचर करणे कामी मा.विरोधी पक्षनेता,श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मान्य करण्यात यावा परंतु एक विनंती अशी आहे की, शासनाने दि.१०/०७/२०२३ ला या संदर्भात एक शुध्दीपत्रक काढलेले आहे. बरोबर, शासनाने जर काही शुध्दीपत्रक काढलेले आहे तर हा प्रस्ताव महापौरांच्या लेटरहेडवर यायला पाहिजे विरोधीपक्ष नेत्यांचे नाही. म्हणजे याचा अर्थ असा की, शासनाकडुन आलेला पत्र व्यवहार महापौरांना माहित नाही. विरोधीपक्ष नेत्यांना माहिती आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासनाकडिल शुध्दीपत्र क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.४२२-अ-२७(३)/नवि-१६ दिनांक १०/०७/२०२३ नुसार जळगांव महानगरपालिकेच्या जागेमध्ये साने गुरुजी अभ्यासिका जुनी इमारत नुतनीकरण, डिजिटलायझेशन व फर्निचर करणे कामी शासनाकडुन मान्यता प्रदान करण्यात आलेली असून सदर शुध्दीपत्रकानुसार याकामी जळगांव महानगरपालिका महासभेकडील धोरणात्मक निर्णय होवून मंजूरी घेणे आवश्यक असल्याने जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील गरजू विदयार्थ्यांना शैक्षणिक सेवा पुरविणे कामी सदर काम करुन घेणे गरजेचे असून याबाबत नगारीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणेबाबत सतत मागणी होत असल्यामुळे जळगांव महानगरपालिकेच्या जागेमध्ये साने गुरुजी अभ्यासिका जुनी इमारत नुतनीकरण, डिजिटलायझेशन व फर्निचर करणेचे काम महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोईसुविधांचा विकासासाठी विशेष तरतूद योजनेच्या निधी अंतर्गत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३३ :-** महर्षि वाल्मिक नगर जवळील जॉगिंग ट्रॅक येथे स्वच्छतागृह बांधणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.भारती कैलास सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महर्षि वाल्मिक नगर जवळील मोकळया जागेत जॉगिंग ट्रॅक बनविण्यात आला असुन तेथे मंदिर सुध्दा आहे. परीसरातील नागरीक मोठया प्रमाणात सकाळ/संध्याकाळ मंदिरात दर्शन घेण्यास व फिरायला येत असतात मात्र या जागेवर स्वच्छतागृह नसल्याने नागरीकांची गैरसोय होत असल्याने सदरील जॉगिंग ट्रॅकच्या मोकळया जागेत ठिकठिकाणी महिला व पुरुषांसाठी वेगवेगळी स्वच्छतागृह बांधणेस व याकामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.१५/- लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३४ :-** शहरातील मुख्य प्रवेश रस्त्यावर श्री.कालंका माता मंदिराजवळ स्वागत कमान बांधणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.विष्णू रामदास भंगाळे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.सिमा भोळे :-** जी कमान बांधण्यात येणार आहे त्या कमानाला खान्देश कन्या बहिणाबाई चौधरी यांचे नांव देण्यात यावे.

**मा.महापौर :-** जी कमान बांधण्यात येणार आहे तिला खान्देश कन्या कवियीत्री बहिणाबाई चौधरी यांचे नांव देण्यात यावे ही प्रशासनाने नोंद घ्यावी आणि विषय क्र.३४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शहरातील विठ्ठल मंदिर जुने जळगांव भागातील वारकरी व समस्त नागरीकांनी महानगरपालिकेकडे शहरातील पूर्वेकडील प्रवेश रस्त्यावर स्वागत कमान बांधून सुशोभिकरण करण्यासाठी महानगरपालिकेने जागा उपलब्ध करुन देणेस व त्याठिकाणी स्वागत कमान बांधण्यास परवानगी मिळावी अशी विनंती पत्र श्री समस्त लेवा पाटीदार पंच श्री विठ्ठल मंदिर संस्थान शहर जळगांव यांनी केलेली असून त्याअनुषंगाने शहरातील मुख्य प्रवेश रस्त्यावर श्री.कालंका माता मंदिराजवळ स्वागत कमान बांधणेसकामी मनपा अटी-शर्तीस बंधनकारक राहून श्री समस्त लेवा पाटीदार पंच श्री विठ्ठल मंदिर संस्थान शहर जळगांव यांना परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर ठिकाणी यापूर्वी प्रवेशव्दार उभारणी करणेस कोणत्याही व्यक्तीस किंवा संस्थेस परवानगी दिली नसल्यास त्याबाबत खात्री करुनच पूढील कार्यवाही करावी.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनेनूसार उपरोक्त नमूद स्वागत कमान बांधकाम झालेनंतर सदरचे स्वागत कमानीस “खान्देश कन्या कवियत्री बहिणाबाई चौधरी” असे नांव देण्यात यावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३५ :-** मोहाडी फाटा नामफलक बोर्ड लावणेस परवानगी मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.अंजनाबाई प्रभाकर सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** शिवाजी नगर पुलाला नांव देण्याचा ठराव झालेला आहे ३ वर्षापुर्वी आता पर्यंत त्याला नांव नाही दिलेले गेलेले आहे. ते केव्हा होणार. छत्रपती शिवाजींचे नांव द्यावे असा ठराव झाला आहे. ३ वर्ष झाले, पुल चालु झालेला आहे.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** भाऊ आपण जसे म्हणत आहात तसा ठराव पारित झालेला आहे. परंतु त्या पुलाची जी प्रॉपर्टी आहे.ही समजा बी ॲण्ड सी मार्फत किंवा रेल्वे मार्फत एन.ओ.सी. घ्यावी लागेल. जसे हायवे वरुन जे काही ब्रिज बांधलेले आहे ज्याच्या नांवाचे प्रस्ताव आपण केलेले आहे. ते प्रस्तावीत करुन आपण बी ॲण्ड सी ला पाठवतो हायवेला पाठवतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मग इतके वर्षांपासुन का लावले नाही.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** आपण तर खर्च करु पण त्यांची एन.ओ.सी.यायला पाहिजे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** लवकरात लवकर करा.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** ठिक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव पाठवा तसा.

**श्री.सोनगीरे, शहर अभियंता :-** हो ठिक आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीक व प्रवाश्यांच्या सोईसाठी मोहाडी फाटा येथे नामफलक बोर्ड व कि.मी. दर्शविण्यात येणारा बोर्ड दुभाजकावर बसविण्याकामी परवानगी मिळणेबाबतची मागणी नागाई जोगाई मंदिर ट्रस्टच्या वतीने व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आलेली आहे.

मौजे मोहाडी,जळगांव येथे मोहाडी फाटा असून सदर फाटयावर किलो मिटर दर्शविण्यात येणारे बोर्ड लावणे आवश्यक आहे. सदर किलोमीटरचे बोर्ड लावल्यास नागरीकांना तसेच वाहनधारकांना अंतर समजण्यास मदत होणार आहे. सदर बोर्ड हे दुभाजकावर लावण्यात येणार असून नागाई जोगाई तिर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्र, कांताई बंधारा, जैन उदयोग समुह ईत्यादी ठिकाणांचे नावे दर्शवून त्यांचे असलेले किलो मीटर अंतर दर्शविण्यात येणार असून सदर बोर्ड हे नागाई जोगाई मंदिर ट्रस्ट तर्फे लावण्यात येणार असून या लोकाभिमुखकामी महानगरपालिकाकडुन बोर्ड लावण्याची परवानगी मिळणेबाबत त्यांनी केलेल्या मागणी नुसार मोहाडी फाटा येथे किलोमीटर दर्शविणारे नामफलक बोर्ड स्व:खर्चाने लावणेस नागाई जोगाई मंदिर ट्रस्ट यांना महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३६ :-** जुना खेडी रोड बैठक हॉल जवळ गिताई बिल्डींगच्या पुढे श्री.तुळशिराम बंडु पाटील यांच्या घराजवळ तिर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांचे नावाने लोकसहभाग निधीतून प्रवेशव्दार सिमेंट कॉंक्रीटव्दारे आरसीसी कमान तयार करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रविण रामदास कोल्हे यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.०३ जुना खेडी रोड बैठक हॉल जवळ गिताई बिल्डींगच्या पुढे श्री.तुळशिराम बंडु पाटील यांच्या घराजवळ जुना खेडी रोडमध्ये लोकसहभाग निधीतून तिर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांचे नावाने प्रवेशव्दार कमान सिमेंट कॉंक्रीटव्दारे आरसीसी तयार करणेबाबत या परिसरातील समस्त नागरीकांची वारंवार मागणी होत असल्याने जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.०३ जुना खेडी रोड बैठक हॉल जवळ गिताई बिल्डींगच्या पुढे श्री.तुळशिराम बंडु पाटील यांच्या घराजवळ जुना खेडी रोड मध्ये लोकसहभाग निधीतून तीर्थरुप डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांचे नावाने प्रवेशव्दार कमान सिमेंट कॉंक्रीटव्दारे आरसीसी तयार करणेस महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने यापूर्वी उपरोक्त नमूद ठिकाणी प्रवेशव्दार कमान उभारणेस तसेच त्यास उक्त नमूद केलेप्रमाणे नांव दिले गेले नसल्याबाबत बाबत खात्री करुनच नियमानुसार पूढील कारदेशीर कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३७ :-** प्रभाग क्र.१३ अंतर्गत मेहरुण शिवार सर्वे नं.४१५ पैकी दगडीचाळ येथील खाजगी घरांवरुन जाणारी ३३ के.व्ही.ची विदयुत वाहिनी रस्त्यांच्या कडेस ओव्हरहेड ने किंवा भुमिगत पध्दतीने इतरत्र स्थालांतरीत करण्याबाबत येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.२० लक्ष मात्रच्या कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.हा प्रस्ताव प्रशासकीय पण आहे आणि वित्तीय पण आहे. पुन्हा सभागृहापुढे ठेवण्याची गरज नाही.

**मा.महापौर :-** विषय क्र.३७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका मेहरुण शिवार सर्वे नंबर ४१५ पैकी दगडीचाळ येथे सुमारे १० ते १५ वर्षापासून रहिवाश्यांचे वास्तव्य आहे परंतू नागरीकांच्या निवासस्थानकाच्या गच्ची वरील ३३ के.व्ही.ची विदयुत वाहिनी गेलेली आहे. त्यामुळे प्रत्येक पावसाळयात ३३ के.व्ही.च्या लाईनमुळे नागरीकांच्या जिवितास धोका असून जिवित व वित्तीयहानी होण्याची दाट शक्यता आहे. याप्रमाणे दरसालाप्रमाणे या पावसाळयात देखिल असुरक्षितपणा वाटतो तसेच प्रसंगी गच्चीवर गेले असता विदयुत प्रवाहामुळे शरीरावर केस उभे राहणे व सतत विदयुत प्रवाहाचा ध्वनी देखिल येत असतो त्यामुळे सततच्या आवाजाने घरात शांतता नसल्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. परिणामी त्यांचे मानसीक आरोग्य देखिल बिघडत आहे. याबाबत नागरीकांनी महानगरपालिकेकडे वारंवार मागणी केलेली आहे.

उपरोक्त नमूद केल्यानूसार नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मेहरुण शिवार सर्वे नंबर ४१५ पैकी दगडीचाळ येथील खाजगी घरांवरुन जाणारी ३३ के.व्ही.ची विदयुत वाहिनी रस्त्यांच्या कडेस ओव्हरहेड ने किंवा भुमिगत पध्दतीने इतरत्र स्थालांतरीत करण्याबाबत येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.२०/- लक्ष मात्रच्या कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३८ :-** खेडी बु गट क्रमांक ४५/पै रहिवासी क्षेत्र असून त्यास श्री.संत तुकाराम नगर असे नामकरण करणेचा ठराव पारित होणेबाबत खेडी बु गट क्रमांक ४५ मधील रहिवासी नागरीक यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, खेडी बु गट क्रमांक ४५ या क्षेत्रास संपुर्ण गटास कोणतेही नामकरण करण्यात आलेले नाही त्यामुळे तेथिल रहिवाश्यांना पत्ता देतांना किंवा नोंदणी करतांना अडचण निर्माण होत असल्याने खेडी बु गट क्रमांक ४५ मधील रहिवासी नागरीक यांनी केलेल्या मागणीनुसार खेडी बु संपुर्ण गट क्रमांक ४५ रहिवासी क्षेत्रास "श्री.संत तुकाराम नगर" असे नामकरण करणेस महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने उक्त नमूद परिसरास यापूर्वी कोणतेही नांव दिले गेले नसल्याबाबत खात्री करुनच नियमानुसार पूढील कायदेशीर कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३९ :-** मौजे मोहाडी, ता.जि.जळगांव शिवारातील जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीची गट नं.६० क्षेत्र हे. ५.०४ आर जमीन मालकी हक्काने अथवा दिर्घ मुदतीसाठी भाडेतत्वावर संस्थेस क्रीडा मैदान तथा क्रीडा संकुलासाठी मिळणेबाबत सेक्रेटरी,जळगांव जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई क्रीडा संकुल उभारण्याच्या संदर्भातला हा प्रस्ताव आलेला आहे. हा प्रस्ताव पाठविलेला आहे जळगांव जिल्हा क्रिकेट असोसिएशनने पण सेक्शन ७९ बघता, अश्या पध्दतीने डायरेक्टली आपण निर्णय घेणे हे योग्य ठरणार नाही. तर या दृष्टीकोणातुन क्रीडा संकुल उभारणे कामी फक्त या विषयाला लागुन अश्या पध्दतीने याच्या संदर्भातल्या नियमानुसार निविदा मागविणे हे संयुक्तीक ठरेल. विषय हा तत्वता मान्य करण्यात येत आहे. आणि मान्य करुन या संदर्भात प्रशासनाने लवकरात लवकर या संदर्भातली जाहिर निविदा प्रक्रिया राबवावी. आणि जाहिर निविदा प्रक्रिया राबविल्यानंतर जे योग्य प्रस्ताव असतील त्या प्रस्तावांच्या दृष्टीकोणातुन निर्णय प्रशासनाने आपल्या स्तरावर घेण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊंनी मांडलेल्या सुचनेची प्रशासनाने नोंद घ्यावी आणि त्यानुसार कार्यवाही करावी. विषय क्र.३९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आज जळगांवातील क्रिडा क्षेत्रात जळगांव जिल्हा क्रिकेट असोसिएशन ही संस्था भरघोस कार्य करीत असून सदर संस्था महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) व भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) शी संलग्न असलेली एकमेव अधिकृत संघटना असून तिची स्थापना सन १९८२ मध्ये करण्यात आलेली आहे. सदर संस्था मागील ४० वर्षांपासून जळगांव जिल्हा क्रिकेट असोसिएशनमार्फत जिल्ह्यातील क्रिकेट खेळाडूंना विविध क्रिकेट स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यासाठी संधी उपलब्ध करून देते तसेच पुढे त्यांची राज्य संघात निवड करून देण्यात या संस्थेचा मोठा वाटा आहे व यापुढेही क्रिकेट खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठविण्याचा संस्थेचा मानस आहे.

एकंदरीत शहरात क्रिकेट मैदानाच्या अभावामुळे खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्यास संस्थेस अपयश येत आहे. हे सर्व साध्य करण्यासाठी व क्रिकेट खेळाडूंच्या हितासाठी संस्थेने जळगांव शहरात किंवा जळगांव शहर हद्दीलगत आंतरराष्ट्रीय स्तराचे क्रिकेटचे मैदान तथा क्रीडा संकुल उभारण्याचा संकल्प केलेला आहे. परंतु जागेच्या अभावामुळे संस्थेस सदर उद्दीष्ट पूर्ण करणेस अडचणी निर्माण होत आहे म्हणूनच तपासाअंती जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीची मौजे मोहाडी शिवारातील शिरसोली रस्त्यावरील गट नं.६० क्षेत्र हे. ५.०४ आर (१२.४५ एकर) ची जमीन बऱ्याच वर्षांपासून पडीत असल्याचे समजते. म्हणून सदर जमीन संस्थेस मैदान, क्रीडा संकुल व संलग्न बाबींसाठी उपलब्ध झाल्यास संस्थेचे उद्दिष्ट साध्य होण्यास नक्कीच मदत होईल.

जळगांव शहरातील व परिसरातील सर्वसामान्य मुलांना उच्च प्रतिचे प्रशिक्षण मिळावे ह्या उद्देशाने जे क्रिडा मैदान उभारले जाणार आहे ते मुलांच्या शारीरिक विकासासाठी नक्कीच फायदेशीर ठरेल. या अनुषंगाने मोहाडी शिवारातील गट क्र.६० क्षेत्र हे. ५.०४ आरची जमीन सोबतच्या नकाशात दर्शविलेप्रमाणे मालकीहक्काने अथवा दिर्घ मुदतीकरीता भाडेतत्वावर मिळाल्यास खेळाडूंना खेळण्यासाठी मैदानाचा प्रश्न आपोआपच सुटण्यास मदत होणार आहे. आज जळगांव शहर व परिसरात क्रिकेट प्रेमींसाठी जिल्हास्तरीय क्रीडा संकुल उपलब्ध नाही. त्यामुळे जळगांव जिल्ह्यातील क्रिकेट खेळाडूंना प्रशिक्षण व सराव या अभावी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळामध्ये सहभाग नोंदविता येत नाही हे खेदाने नमूद करावेसे वाटते. सदर

असोसिएशनच्या मार्फत जर जळगांव जिल्ह्यातील क्रिकेट खेळाडूंसाठी क्रीडा संकुलाची निर्मिती झाल्यास खेळाडूंसाठी मोठया प्रमाणात संधी उपलब्ध होतील यात शंका नाही व यामुळे जळगांव शहराचे पण नावलौकिक होईल हे अभिमानाने सांगावेसे वाटते.

या सर्व बाबींचा साकल्याने विचार करता, मौजे मोहाडी, ता.जि.जळगांव शिवारातील जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीची गट नं.६० क्षेत्र हे. ५.०४ आर (१२.४५ एकर) जमीन मालकी हक्काने अथवा दिर्घ मुदतीसाठी भाडेतत्वावर क्रीडा मैदान तथा क्रीडा संकुलासाठी मिळावी यासाठी जळगांव जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांनी मागणी केलेली आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषगांने सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनेनूसार मौजे मोहाडी, ता.जि.जळगांव शिवारातील जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीची गट नं.६० क्षेत्र हे. ५.०४ आर जमीन मालकी हक्काने अथवा दिर्घ मुदतीसाठी भाडेतत्वावर देणेकामी लवकरात लवकर जाहिर देकार मागविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने प्रस्तावाची अंमलबजावणी करुन निविदा प्रक्रिया त्वरेने सुरु करण्याची दक्षता घ्यावी.

प्रशासनाने याकामी जो योग्य प्रस्ताव येईल त्यास मान्यता दयावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४० :-** मनपाच्या मालकीच्या मराठी शाळा क्र.५ (पोलिस मुख्यालय) व शाळा क्र.३८ (लाठी शाळा) या अभिनव योजनेअंतर्गत शैक्षणिक प्रयोजनार्थ संस्थेच्या शहरातील अनुभूती इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विस्तारीकरणासाठी ३० वर्ष मुदतीकरीता भाडेपट्टयावर मिळणेबाबत भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई, दोन शाळांच्या मागण्यांच्या अनुषंगाने एक शाळा जी आहे आपण यापुर्वी शाळा क्र.०५ जी आहे. कृषी मल्टीप्रपज फाऊंडेशन संचलित उड्डाण प्रशिक्षण केंद्र यांना ऑलरेडी दिलेली आहे यापुर्वी. या कारणाने शाळा क्र.०५ चा प्रस्ताव जो आहे तो रद्द करण्यात यावा. फक्त शाळा क्र.३८ जी आहे. त्याला मान्यता देण्यात येत आहे. आणि त्यानुसार प्रशासनाने त्यांची कार्यवाही करावी.

**मा.उपमहापौर :-** नितीनभाऊंनी दिलेल्या सुचनेस माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊंनी मांडलेली शाळा क्र.०५ ही रद्द करुन शाळा क्र.३८ ला सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन,जळगांव ही सामाजिक बांधीलकी जोपासत शहरात शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक तसेच इतर अनेक क्षेत्रात उल्लेखनीय समाजोपयोगी आणि लोकहिताचे कार्य करणारी अग्रेसर संस्था आहे. संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात मागील १५ वर्षापासून दारिद्रय रेषेखालील विदयार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण सुविधा विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे हेतूने संस्थेच्या संलग्न असलेली अनुभूती इंग्लिश मिडीयम स्कूलची स्थापना करुन त्याव्दारे झोपडपट्टीत राहणारे व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत खडतर जीवन जगत असलेल्या गुणवान मुलांच्या भविष्याच्या बांधणीच्या दृष्टीने त्यांना उच्च दर्जाच्या शैक्षणिक सुविधा विनामुल्य उपलब्ध करुन देत आहे. अल्पावधीतच सदर शाळेस शहरातच नव्हे तर जिल्ह्यातसुध्दा नावलौकिक प्राप्त झालेला आहे. आज संस्थेने भाडेतत्वावर घेतलेल्या मनपाच्या मालकीच्या शाळा क्र.३ मध्ये अनुभूती इंग्लिश मिडीयम स्कूल (प्रायमरी) येथे पहिली ते सहावीपर्यंत तर मनपा शाळा क्र.४ मध्ये अनुभूती इंग्लिश मिडीयम स्कूल (सेकंडरी) येथे सातवी ते दहावीपर्यंत वर्ग चालविले जात असून दोन्ही शाळा मिळून जवळपास ६०० गरीब विदयार्थी तेथे शिक्षणाचा

लाभ घेत आहेत. सदर दोन्ही शाळांचे जागेबाबत मनपा व संस्थेत याअगोदर रितसर ३० वर्ष मुदतीकरीता करारनामे करण्यात आलेले असून त्याचे वार्षिक भाडे संस्था नियमितपणे अदा करीत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार नर्सरी, ज्युनिअर व सिनिअर केजी हे नवीन वर्ग सुरु करण्यासोबतच पहिली ते दहावीपर्यंतच्या प्रत्येक वर्गाच्या तुकडया वाढवून जास्तीत जास्त मुलांना शिक्षणाचा कसा लाभ होईल याचा विचार करता तसेच चालू शैक्षणिक वर्षापासून स्थानिक लोकप्रतिनिधी व पालकांच्या शाळेत तुकडी / वर्ग वाढविण्याच्या आग्रहास्तव शाळेला वर्ग खोल्यांची अत्यंत आवश्यकता भासत आहे. त्यातच दोन्ही शाळेत मिळणारे शिक्षण हे गुणवत्तापूर्ण असल्याने दिवसेंदिवस स्थानिक नागरिकांकडून व पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. परंतू जागेच्या अभावी ते शक्य होवू शकत नसल्याने इतर विदयार्थ्यांना विनामूल्य शैक्षणिक सुविधांच्या लाभापासून वंचित व्हावे लागत आहे, हे खेदाने नमूद करावेसे वाटते. या सर्व कारणांस्तव नवीन शाळेचा प्रस्ताव संस्थेच्या विचाराधीन आहे.

सदर बाबींचा विचार करता, अनुभूती इंग्लिश मिडीयम स्कूल ही शाळा अगोदरच १ ली ते १० वी पर्यंतचे वर्ग चालवित असून त्यानंतर नर्सरी, ज्युनिअर व सिनिअर केजी तसेच ११ वी व १२ वी पर्यंतचे वर्गसुध्दा त्याच धर्तीवर कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारता अथवा शासनाचे कोणतेही अनुदान न घेता विनामुल्य चालविणार आहे. त्यासाठी आमच्या संसथेने जळगांव शहरातील मनपाच्या मालकीच्या बंद पडलेल्या वा कमी विदयाथी संख्या असलेल्या मराठी शाळांबाबत माहिती घेतली असता मनपाच्या मालकीच्या मराठी शाळा क्र.५ (पोलिस मुख्यालय) व शाळा क्र.३८ (लाठी शाळा) या जर त्यांतील सध्या असलेले विदयार्थी व शिक्षक हे लगतच्या मनपाच्या दुसऱ्या शाळेत समायोजित करुन भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन या संस्थेस शैक्षणिक प्रयोजनार्थ दिर्घ मुदतीकरीता नाममात्र दराने करारावर दिल्यास संस्थेचा प्रामाणिक शैक्षणिक हेतू पूर्ण होणेस मदत होईल व शहरातील जास्तीत जास्त मुलांना दर्जेदार शिक्षणाचा विनामुल्य लाभ घेता येईल, ज्याव्दारे संस्थेस पहिली ते दहावीपर्यंतचे वर्ग वाढविता येतील व नर्सरी, ज्युनिअर व सिनिअर केजी तसेच ११ व १२ वी हे नवीन वर्ग वाढवून त्याव्दारे जास्तीत जास्त विदयार्थ्यांना विनामुल्य शिक्षण देता येणे शक्य होईल.

उपरोक्त विषयाचे अनुषगांने सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनेनूसार जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीची मराठी शाळा क्र.५ (पोलिस मुख्यालय) ही यापूर्वी महासभा ठराव क्र.३३४ दिनांक १६/१२/२०२० अन्वये सुशिल मल्टीपर्पज फाऊंडेशन,जळगांव संचलित उडाण दिव्यांग प्रशिक्षण केंद्र या संस्थ्ेास दिलेली असल्याने मनपा मराठी शाळा क्र.५ ची केलेली मागणी रद्द करणेत येत असून शाळा क्र.३८ (लाठी शाळा), भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन या संस्थेस महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने ठरावाची अंमलबजावणी त्वरेने करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४१ :-** जळगांव शहरातील मेलेले जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे कामी १.श्री.नंदु शहादु नाडे २.श्री.अशोक रामा सोनवणे यांची तात्पुरत्या स्वरुपात मानसेवी कामगार म्हणून मानधनावर ६ महिन्याकरिता नेमणूक करणेस व याकामी येणारा एकूण रक्कम रु.२,०३,०४०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ३०९ (१) नुसार शहरातील मेलेले जनावरांची उचलून त्यांची विल्हेवाट लावणे महापालिकेचे कर्तव्य आहे. अर्जदार / मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांनी दि.०१/१२/२०२२ रोजी अर्ज देवून शहरातील मेलेले जनावरे उचलणे कामाकरिता ६ महिने करिता मुदत वाढीचा अर्ज केलेला आहे.

तसेच श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार हे गेल्या १५ ते २० वर्षापासून ६ महिन्याचे मुदतीवर प्रत्येकी रु.१६,९२०/- प्रमाणे मानधनावर दोन्ही कामगार शहरातील दैनंदिन मेलेले जनावरे उचलणेचे काम व्यवस्थित करीत असून स्थायी समिती ठराव क्रं.१००२ दि.१५/०२/२०२३ चे मंजूरी अन्वये दरमहा रु.१६,९२०/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरर्ती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे. सदरची मुदत ६ महिने दि.०२/०८/२०२३ रोजी संपत असल्याने पुढील ६ महिन्याच्या कालावधीसाठी पुन्हा दोन दिवसांचा खंड देवून मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना पुर्वीच्या नियुक्ती मध्ये २ दिवसांचा खंड देवून दि.०५/०८/२०२३ ते दि.०५/०१/२०२४ पर्यंत (६ महिने) तात्पुरती नियुक्ती देवुन रु.१६,९२०/- प्रत्येक कामगार प्रमाणे दरमहा सहा महिनेकरीता दोन्ही मानसेवी कामगारांचा एकूण रु.२,०३,०४०/- खर्च नुसार मेलेले जनावरांची विल्हेवाटीचे काम दैनंदिन सुरु आहे.

तसेच श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना सहा महिन्याचा मुदतवाढीच्या येणाऱ्या रु.२,०३,०४०/- खर्चास व तात्पुरती नियुक्ती देणेस स्थायी समिती ठराव क्र.१००२ दि.१५/०२/२०२३ मंजूरी अन्वये दोन्ही मानसेवी कामगारांचे मानधन देणे करिता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकीय (रोजंदारी/मानधन) या लेखाशिर्षा अंतर्गत रु.१२ लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरती नियुक्ती दि.०५/०८/२०२३ ते दि.०५/०१/२०२४ पर्यंत कामाची मुदत आहे. सदर मुदत संपल्यानंतर दोन्ही मानसेवी कामगार १.नंदु शहादु नाडे २.अशोक रामा सोनवणे यांना दोन दिवसांचा खंड देवून पुन्हा ६ महिने (दि.०५/०८/२०२३ ते दि.०५/०१/२०२४) अशा मुदतीस व प्रती मानसेवी कामगार प्रत्येकास रु.१६,९२०/- X २ कामगार रु.३३,८४०/- प्रतीमहा प्रमाणे ६ महिने कालावधीसाठी येणारा एकूण रक्कम रु.२,०३,०४०/- च्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच यापूढे सदर प्रकरणात नेमणूकीस मुदतवाढ देण्यासाठी आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४२ :-** प्रभाग क्र.०२ महाराष्ट्र दालमिल पासुन हुडको रस्त्यापर्यंत मोठी गटार बांधणे व रोड क्रॉसिंग स्लॅब बांधणे व याकामी रक्कम रु.३९,५१,१२३/- मात्रचा खर्च मनपा निधी अंतर्गत नविन गटार या लेखाशिर्षातुन करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०२ महाराष्ट्र दालमिल पासुन हुडको रस्त्यापर्यंत मोठी गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे आवश्यक असून या कामाचे रक्कम रु.३९,५१,१२३/- चे अंदाजपत्रक B&C चे SSR २०२२-२३ अन्वये तयार करण्यात आलेले असून सदरचे काम मनपा निधी अंतर्गत नविन गटार या लेखाशिर्षातुन करणेस व याकामी येणारा अंदाजीत रक्कम रु.३९,५१,१२३/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४३ :-** नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.११ पिंप्राळा शिवार गट नं.६१,६२ व ६३ कोल्हे नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे (१ निधीतुन) कामी मक्तेदार डी.एच.पाटील & समर्थ डेव्हलपर यांचे निविदा रक्कमेइतचेचेच दरास व याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.१,०४,०३,६९६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.११ पिंप्राळा शिवार गट नं.६१,६२ व ६३ कोल्हे नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे (१ निधीतुन) कामास जिल्हाधिकारी,जळगांव यांच्या कडील पत्र क्रं.नप/नियोजन/आर.आर./२७५/२०२३ दि.३०/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त,मनपा यांचे दि.२८/०४/२०२३ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२६२ (Tender ID - २०२३_JCMCJ_८९६६५०_१) सन २०२३-२४ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा./१९९ दि.०२/०५/२०२३ चे पत्रान्वये दै.लोकमत राज्यस्तरीय या वर्तमान पत्रात दि.०४/०५/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता ई-निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्या आहे. सदरचे कामाचे आलेल्या ई-निविदांचे कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असून मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.८६८७०५९/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | यशपाल दयाराम शर्मा | निविदा रक्कमेवर १०% जास्तीचे दराने | ९५,५५,७६४/- |
| २ | डी.एच.पाटील & समर्थ डेव्हलपर | निविदा रक्कमेइतकेचेच दराने | ८६,८७,०५९/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार डी.एच.पाटील & समर्थ डेव्हलपर यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.८६,८७,०५९/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ८६,८७,०५९/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | १५,६३,६७१/- |
| ०३ | कामगार विमा १% | ८६,८७१/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | १०,१००/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ५५,९९५/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | १,०४,०३,६९६/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.१,०४,०३,६९६/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.१,०४,०३,६९६/- मात्र नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन करणेस व त्यानुसार मक्तेदार डी.एच.पाटील & समर्थ डेव्हलपर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४४ :-** सुप्रिम कॉलनी येथे मनपा बालवाडी करीता एक उर्दु शिक्षिका यांची मानधनावर ०६ महिने करीता नियुक्ती करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२६४पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मुख्याध्यापक, जळगांव शहर महानगरपालिका उर्दु शाळा क्रं.११ सुप्रिम कॉलनी, एमआयडीसी, जळगांव यांचे कडील दि.२०/०६/२०२३ चे पत्रानुसार बालवाडी वर्गासाठी शिक्षिका मिळणेबाबत मागणी केलेली असुन त्याठिकाणी सय्यद तरन्नुम रियाज हसन यांची आयुक्त यांचेकडील आदेश क्रं.४२६ दि.०१/०६/२०२३ अन्वये मानधनावर नियुक्ती करण्यात आलेली होती. सदरच्या शिक्षिका या आजपावेतो हजर झालेले नसल्याने त्यांच्या जागेवर एक नविन उर्दु शिक्षिका यांची मानधनावर ०६ महिने करीता नियुक्ती करणे आवश्यक आहे. मा.महासभा ठराव क्र.११२६ दि.२०/०५/२०२३ नुसार ०३ नविन बालवाडी शिक्षिका यांची मानधन तत्वावर नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली असुन सुप्रिम कॉलनी येथे मनपा बालवाडी करीता एक उर्दु शिक्षिका यांची मानधन तत्वावर ०६ महिने करीता नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४५ :-** मनपा बालवाडी करीता चार मदतनिस यांची ६ महिन्याकरीता मानधनावर नियुक्ती करणेस व याकामी येणारा एकूण रक्कम रु.१,३२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा बालवाडी विभागाकडील ३ मदतनिस यांची सेवा समाप्त झाल्याने व एक मदतनिस यांची बालवाडी शिक्षिका म्हणून नेमणूक करण्यात आलेली असून ४ मदतनिस यांची पदे रिक्त असल्याने त्यांची मानधन तत्वावर नियुक्ती करणे आवश्यक असल्याने मनपा बालवाडी करीता चार मदतनिस यांची ६ महिन्याकरीता प्रत्येकी मासिक मानधन रक्कम रुपये ५५००/- मात्र नुसार मानधनावर नियुक्ती करणेस व याकामी येणारा एकूण रक्कम रु.१,३२,०००/- मात्र खर्च महिला बालकल्याण निधी सन २०२३-२४ चे तरतूदीतून करणेस मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधील तरतूदीनुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४६ :-** मनपा प्रशासकीय वाहन क्रं.एम एच १९ एम ०४३३ (टाटा इंडिगो) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.४५,३६८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२६६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका सहा.आयुक्त (आरोग्य) विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ एम ०४३३ (टाटा इंडिगो) हे वाहन आरोग्य विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर वाहनाचे दुरुस्तीचे कामे नविन स्पेअर पार्टसह व मजुरीसह करणे कामी वाहन चालक यांचा टिप्पणी रिपोर्ट व मागणी क्रं.४१६२ दि.१२/०७/२०२३ प्रमाणे सदर वाहनाचे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टसह व मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे असल्याने मनपा प्रशासकीय वाहन क्रं.एम एच १९ एम ०४३३ (टाटा इंडिगो) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.११/०७/२०२३, दि.१२/०७/२०२३ अन्वये खर्च रक्कम रु.४५,३६८/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.४५,३६८/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४७ :-** महानगरपालिका सार्व.बांधकाम विभागाअंतर्गत (पर्यावरण विभागा करिता) राष्ट्रीय शुध्दहवा कार्यक्रम (NCAP) निधी अंतर्गत Road Sweeper Machine Mounted on Truck Chassis- 01 नग खरेदी कामी GeM Portal प्रक्रीयेव्दारे प्राप्त L1 निविदाधारक मे.Kam-Avida Enviro Engineers Private LTD Pune यांचे प्राप्त झालेले न्युनतम दर रक्कम रु.१,१६,१०,०००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे त्यास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आयुक्त यांच्या दि.१७/०५/२०२३ रोजीच्या सक्षम मान्यतेने GeM Portal प्रक्रीयेव्दारे राष्ट्रीय शुध्दहवा कार्यक्रम (NCAP) महानगरपालिकेस प्राप्त निधी अंतर्गत निविदेमध्ये नमुद केलेनुसार Road Sweeper Machine Mounted on Truck Chassis- 01 नग खरेदी कामी GeM Portal व्दारे प्रक्रीया राबविण्यात आली आहे.

GeM Portal वर प्रस्तावित Road Sweeper Machine Mounted on Truck Chassis- 01 नग खरेदी करणेस आयुक्त यांनी दि.१७/०५/२०२३ रोजी प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त कामाची Online

Bidding GEM/2023/B/3505601 दि.३०/०५/२०२३ रोजी केंद्र सरकारच्या संकेतस्थळ www.gem.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली होती.

GeM Portal वर दि.३०/०५/२०२३ पासून ते दि.०९/०६/२०२३ सायंकाळी १८:०० वाजेपावेतो विहीत केलेल्या मुदतीत ०४ Online bid (GeM Portal) वरील संकेतस्थळावर प्राप्त झाल्या आहेत.

सदर निविदा सहा.आयुक्त (वाहन) यांच्या सक्षम मान्यतेने लिफाफा क्रं.१ (दस्ताऐवज) डाऊनलोड करण्यात आलेली असून GeM Portal वर ०४ निविदा प्राप्त झालेले निविदाकारांची नांवे खालील प्रमाणे आहेत.

1) Maniar & Company Ahmedabad
2) Kam-Avida Enviro Engineers Pvt. Ltd. Pune
3) TPS Infrastructure LTD New Delhi
4) Ensol Multiclean Equipment PVT. LTD Jaipur

त्यानुसार सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेअंती चारही निविदाधारकांचे कागदपत्रांची पडताळणीअंती अनुक्रमांक २ व ३ निविदाकार पात्र असून अनुक्रमांक १ व ४ निविदाकार अपात्र आहेत. निविदा समितीच्या सक्षम मान्यतेने अनुक्रमांक २ व ३ यांचे लिफाफा क्रं.२ (दराचा लिफाफा) उघडण्यास सक्षम मान्यता प्रदान केल्याच्या अनुषंगाने आयुक्त यांनी देखील सक्षम मान्यता दिलेली आहे. त्यानुसार GeM Portal वर दि.१८/०७/२०२३ रोजी लिफाफा क्रं.२ उघडणेकामी शहर समन्वयक यांनी कार्यवाही केलेली आहे. GeM पोर्टलव्दारे Financial Evaluation can be open only 48 hours after comlition of technical evaluation (Financial Opening time २०/०७/२०२३ रोजी दुपारी १५:२७ मि. असा संकेतस्थळावरती GeM Portal व्दारे मेसेज देण्यात आला.)

आज रोजी पात्र निविदाधारकांचा (अनुक्रमांचा २ व ३ यांचा) लिफाफा क्रं.२ उघडले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

List Of Technically Qualified Sellers

| S.No | Seller Name | Offered Item | Total Price | Diffrence Betweeen Present Rate & Past Estimate Rate (-20% to + 10%) | Rank |
|---|---|---|---|---|---|
| 1 | KAM-AVIDA ENVIRO ENGINEERS PRIVATE LTD | Item Categories: Road Sweeper | Rs.11610000.00 | -0.29% | L1 |
| 2 | TPS INFRASTRUCTURE LIMITED | Item Categories: Road Sweeper | Rs.11945000.00 | +2.58% | L2 |

वर तक्त्यात नमूद केलेनुसार L1 निविदाधारक KAM-AVIDA ENVIRO ENGINEERS PRIVATE LTD यांचे निविदेमधील प्राप्त दर रक्कम रु.१,१६,१०,०००/- मात्रचे आलेले असून दि.०१/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील ४.४.३.१ मधील "ब" नुसार दोन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत (रक्कम रु.१,१६,१०,०००/-) व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत (रु.१,१६,४४,३७५/-) यामध्ये (-20% to +10%) तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील असे नमुद आहे.

त्याअनुषंगाने L1 निविदाधारक KAM-AVIDA ENVIRO ENGINEERS PRIVATE LTD यांनी दिलेले निविदेतील दर हे अगोदर ठरलेल्या अंदाजित किंमतीच्या -0.29% ने कमीचे दर आलेले आहे. शासन निकषानुसार (-20% to +10%) किंमत श्रेणीमध्ये (Price Band) च्या निकषाची देखील पुर्तता होत आहे.

तरी L1 निविदाधारक KAM-AVIDA ENVIRO ENGINEERS PRIVATE LTD यांनी निविदेत दिलेले न्युनतम दर रक्कम रु.१,१६,१०,०००/- स्थायी समितीच्या मान्यतेने स्विकृत करणेस तसेच निविदाकार यांना कार्यादेश निर्गमित करणेस हरकत नाही असे विभागाचे मत आहे.

जशमनपा आवक क्रं.६५२ दि.१८/०७/२०२३ व सार्व.बांधकाम विभाग आवक क्रं.१७३० दि.१८/०७/२०२३ अन्वये पर्यावरण विभागास सन-२०२१-२२ मध्ये देण्यात आलेल्या निधीमधून सन-२०२२-२३ मध्ये किमान ७५% रक्कम वापरात घेतल्याचे (उपयोग प्रमाणपत्र) PRANA Portal वर सादर करण्याबाबतचे पत्र महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे. यापुर्वीच महासभा ठराव क्रं.९८८ दि.१५/०२/२०२३ अन्वये प्रदुषण कमी करणे कामी प्राप्त निधीतुन मार्गदर्शक सुचनेनुसार करावयांच्या कामांबाबत चर्चा होवून आवश्यक कामे सुनिश्चित करण्यात आली होती. त्याअनुषंगाने पर्यावरण विभागामार्फत या निधीतुन करण्यात येणाऱ्या खर्चास तसेच त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करणेस व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार वाढीव खर्च झाल्यास त्यास सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे याबाबत ठराव पारीत करण्यात आल्यानुसार व विहीत कालमर्यादेमध्ये निधी खर्च करावयाचा असल्याने कार्यादेश निर्गमित करणे आवश्यक व गरजेचे असून L1 निविदाधारक KAM-AVIDA ENVIRO ENGINEERS PRIVATE LTD यांचे निविदेतील प्राप्त दरास स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता घेणे उचित राहील असे विभागाचे मत आहे.

तरी L1 निविदाधारक KAM-AVIDA ENVIRO ENGINEERS PRIVATE LTD यांनी निविदेत दिलेले न्युनतम दर रक्कम रु.१,१६,१०,०००/- स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेने स्विकृत करणेस तसेच निविदाकार यांना कार्यादेश निर्गमित करणेस हरकत नाही असे विभागाचे मत आहे.

महासभा ठराव क्रं.९८८ दि.१५/०२/२०२३ अन्वये NCAP अंतर्गत प्राप्त निधीच्या मार्गदर्शक सुचनेनुसार विनियोग करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच शासन योजनेकरिता याकामी अधिक खर्च झाला तरी त्यास मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र प्राप्त दराचे अवलोकन केले असता अंदाजित दरापेक्षा कमीचे (0.29% Below) दर प्राप्त झालेले आहेत.

शासन निधीचे विनियोग प्रमाणपत्र मुदतीत सादर करणे आवश्यक असलेने प्राप्त दर हे स्विकारणे योग्य असल्याने महानगरपालिका सार्व.बांधकाम विभागाअंतर्गत (पर्यावरण विभागा करिता) राष्ट्रीय शुध्दहवा कार्यक्रम (NCAP) निधी अंतर्गत Road Sweeper Machine Mounted on Truck Chassis-01 नग खरेदी कामी GeM Portal प्रक्रीयेव्दारे प्राप्त L1 निविदाधारक मे.Kam-Avida Enviro Engineers Private LTD Pune यांचे प्राप्त झालेले न्युनतम दर रक्कम रु.१,१६,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४८ :-** महानगरपालिका आरोग्य विभागाकरिता मनपा निधी अंतर्गत Mahindra Bolero Pick up Chassis 05 Ton GVW Vehicle Mounted /cleaning Machine (Open Nallah) चेचीस सह बांधणी कामी -०२ नग नाला एक्सेव्हेटर खरेदी कामी Gem Portal प्रक्रीयेव्दारे प्राप्त L1 निविदाधारक मे.Kam-Avida Enviro Engineers Private LTD Pune यांचे प्राप्त झालेले न्युनतम दर रक्कम रु.६२,२४,०००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे त्यास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२६८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आयुक्त यांच्या दि.१८/०४/२०२३ रोजीच्या सक्षम मान्यतेने Gem Portal प्रक्रीयेव्दारे महानगरपालिका निधी अंतर्गत निविदेमध्ये नमूद केलेनुसार Mahindra Bolero Pick up Chassis 05 Ton GVW Vehicle Mounted /cleaning Machine (Open Nallah) वर चेचीससह बांधणी कामी ०२ नग नाला एक्सेव्हेटर खरेदी कामी प्रक्रीया राबविण्यात आली आहे.

Gem Portal वर प्रस्तावित Mahindra Bolero Pick up Chassis 05 Ton GVW Vehicle Mounted /cleaning Machine (Open Nallah) -०२ नग खरेदी करणेस आयुक्त यांनी दि.१८/०४/२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता नुसार उक्त कामाची Online Bidding GEM/2023/B/3371274 दि.२०/०४/२०२३ रोजी केंद्र सरकारच्या संकेतस्थळ www.gem.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली आहे.

Gem Portal वर दि.२०/०४/२०२३ पासून ते दि.०१/०५/२०२३ सायंकाळी १८.०० वाजेपावेतो विहीत केलेल्या मुदतीत ०४ Online Bid (ई-निविदा) सदरील संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहेत.

सदर निविदा सहा.आयुक्त (वाहन) यांच्या दि.०८/०५/२०२३ रोजीच्या सक्षम मान्यतेने लिफाफा क्रं.१ (दस्ताऐवज) डाऊनलोड करण्यात आलेली असून Gem Portal वर प्राप्त झालेले निविदाकारांची नांवे खालील प्रमाणे आहेत.

1) Maniar & Company Ahmedabad
2) Kam-Avida Enviro Engineers Private Ltd, Pune
3) TPS Infrastructure LTD New Delhi
4) Clean & Green Equipments PVT LTD Ghaziabad Uttar Pradesh

त्यानुसार सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेअंती चारही निविदाधारकांचे कागदपत्रांची पडताळणीअंती अनुक्रमांक २ व ३ निविदाकार पात्र असुन अनुक्रमांक १ व ४ निविदाकार अपात्र आहेत. निविदा समितीच्या सक्षम मान्यतेने अनुक्रमांक २ व ३ यांचे लिफाफा क्रं.२ (दराचा लिफाफा) उघडण्यास सक्षम मान्यता प्रदान केल्याच्या अनुषंगाने आयुक्त यांनी देखील सक्षम मान्यता दिलेली आहे. त्यानुसार Gem Portal वर दि.२८/०७/२०२३ रोजी लिफाफा क्रं.२ उघडणे कामी शहर समन्वयक यांनी कार्यवाही केली असता Gem Portal व्दारे Financial Evaluation can be open only 48 hours after comlition of technical Evaluation तद्नंतर Financial Opening time ३१/०७/२०२३ रोजी सकाळी १०:५६ मि. अशी संकेतस्थळावरती Gem Portal व्दारे प्रक्रीया पुर्ण केली.

आज रोजी पात्र निविदाधारकांचा (अनुक्रमांक २ व ३ यांचा) लिफाफा क्रं.२ उघडले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

List Of Technically Qualified Sellers

| S.No | Seller Name | Offered Item | Total Price | Diffrence Betweeen Present Rate & Past Estimate Rate (-20% to + 10%) | Rank |
|---|---|---|---|---|---|
| 1 | KAM-AVIDA ENVIRO ENGINEERS PRIVATE LTD | Item Categories: Vehicle Mounted Cleaning Machine | Rs.62,24,000.00 | -2.29% | L1 |
| 2 | TPS INFRASTRUCTURE LIMITED | Item Categories: Vehicle Mounted Cleaning Machine | Rs.66,90,000.00 | +5.02% | L2 |

वर तक्त्यात नमूद केलेनुसार L1 निविदाधारक KAM-AVIDA ENVIRO ENGINEERS PRIVATE LTD PUNE यांचे निविदेमधील प्राप्त दर रक्कम रु.६२,२४,०००/- मात्रचे आलेले असून दि.०१/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील ४.४.३.१ मधील “ब” नुसार दोन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत (रक्कम रु.६२,२४,०००/-) व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत (रु.६३,७०,०५४/-) यामध्ये (-20% to +10%) तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील असे नमुद आहे.

त्याअनुषंगाने L1 निविदाधारक KAM-AVIDA ENVIRO ENGINEERS PRIVATE LTD PUNE यांनी दिलेले निविदेतील दर हे अगोदर ठरलेल्या अंदाजित किंमतीच्या -2.34% ने कमीचे दर आलेले आहे. शासन निकषानुसार (-20% to +10%) किंमत श्रेणीमध्ये (Price Band) च्या निकषाची देखील पुर्तता होत आहे.

तरी L1 निविदाधारक KAM-AVIDA ENVIRO ENGINEERS PRIVATE LTD PUNE यांनी निविदेत दिलेले न्युनतम दर रक्कम रु.६२,२४,०००/- मात्रला स्थायी समितीच्या मान्यतेने स्विकृत करणेस तसेच निविदाकार यांना कार्यादेश निर्गमित करणेस हरकत नाही असे विभागाचे मत आहे.

आरोग्य विभागाचे अत्यावश्यक सेवा विचारात घेता वाहन विभाग प्रमुख यांनी प्रस्तावित केलेनुसार महानगरपालिका आरोग्य विभागाकरिता मनपा निधी अंतर्गत Mahindra Bolero Pick up Chassis 05 Ton GVW Vehicle Mounted /cleaning Machine (Open Nallah) चेचीस सह बांधणी कामी -०२ नग नाला एक्सेव्हेटर खरेदी कामी Gem Portal प्रक्रयेव्दारे प्राप्त L1 निविदाधारक मे.Kam-Avida Enviro Engineers Private LTD Pune यांचे प्राप्त झालेले न्युनतम दर रक्कम रु.६२,२४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४९ :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.११,२९,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२६९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणे बाबत पंप ऑपरेटर यांनी मागणी दिलेली असून दि.०८/०८/२०२३ नुसार अखेर डिझेल साठा शिल्लक ५१७० लिटर असुन सदर साठा ०४ ते ०५ दिवसांसाठी पुरवठा होईल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी मा.महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.०८/०८/२०२३ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर | सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर |
|---|---|---|
| १ | प्रती लिटर दर रु.९४.२४७६१२/- | प्रती लिटर दर रु.९४.११/- |
| २ | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,३०,९७१.३५/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,२९,३२०/- |
| ३ | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.१,६५१.३५/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना रक्कम रु.१,६५१/- मात्र अधिक खर्च १२००० लिटर डिझेल खरेदी करतांना होणार आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.१,६५१/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता

येत नाही. ज्यावेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जोपर्यंत तफावत राहील तोपर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

| प्राप्त झालेल्या इंधन (डिझेल) दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | Quantity | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, (आय.ओ.सी.डिलर) जळगांव |
| १ | महानगरपालिका कार्यरत विविध वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) खरेदी करणे बाबत. | १२००० लि. | प्रति लिटर दर रु.९४.११/- |
| | | | ११,२९,३२०/- |
| | एकूण रक्कम रुपये - | | ११,२९,३२०/- |

महासभा ठराव क्रं.८८६ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, महासभा ठराव क्र.८८७ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मा.महासभा ठराव क्रं.९२७ दि.०७/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, मा.महासभा ठराव क्रं.९४१ दि.२१/१०/२०२२, मा.महासभा ठराव क्रं.९७७ दि.२३/१२/२०२२ मा.महासभा ठराव क्र.१००१ दि.१५/०२/२०२३, मा.महासभा ठराव क्र.१०४४ दि.२१/०३/२०२३, मा.महासभा ठराव क्र.१०९३ दि.२१/०४/२०२३, मा.महासभा ठराव क्र.१०९४ दि.२१/०४/२०२३, मा.महासभा ठराव क्रं.११३४ दि.३०/०५/२०२३, मा.महासभा ठराव क्रं.१२०३ दि.०७/०७/२०२३, मा.महासभा ठराव क्रं.१२०४ दि.०७/०७/२०२३ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभागप्रमुखांच्या मागणीनुसार दि.२४/०७/२०२३ ते आजपावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोयीचे होईल.

सबब इंधन (डिझेल) खरेदी करणे कामी दुसऱ्या वेळेस ई-निविदा सुचना क्रं.३३४ सन-२०२३-२४ दि.१८/०७/२०२३ अन्वये तिसऱ्या वेळेस ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती. परंतु सदर ई-निविदेत एकही ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेली नसल्याने सदर कामाच्या ई-निविदे प्रक्रीयेस प्रतिसाद मिळत नसल्याने तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२३-२४/०५ दि.०८/०८/२०२३ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,२९,३२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास तसेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने वाहनांसाठीची इंधनाची मागणी व सदर वाहनाचे इंधनासाठीची गरज याबाबत खात्री करुन डिझेल पुरवठा करणेची वाहन विभागाने दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.५० :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.११,२९,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२७० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणे बाबत पंप ऑपरेटर यांनी मागणी दिलेली असून दि.१७/०७/२०२३ नुसार अखेर डिझेल साठा शिल्लक २४७० लिटर असुन सदर साठा ०२ ते ०३ दिवसांसाठी पुरवठा होईल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी मा.महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.१७/०७/२०२३ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर | सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर |
|---|---|---|
| १ | प्रती लिटर दर रु.९४.२४६९७१/- | प्रती लिटर दर रु.९४.११/- |
| २ | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,३०,९६३.६६/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,२९,३२०/- |
| ३ | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.१,६४३.६६/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना रक्कम रु.१,६४३.६६/- मात्र अधिक खर्च १२००० लिटर डिझेल खरेदी करतांना होणार आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.१,६४३.६६/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यावेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जोपर्यंत तफावत राहील तोपर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

| प्राप्त झालेल्या इंधन (डिझेल) दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | Quantity | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, (आय.ओ.सी.डिलर) जळगांव |
| १ | महानगरपालिका कार्यरत विविध वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) खरेदी करणे बाबत. | १२००० लि. | प्रति लिटर दर रु.९४.११/- |
| | | | ११,२९,३२०/- |
| | एकूण रक्कम रुपये - | | ११,२९,३२०/- |

महासभा ठराव क्रं.८८६ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, महासभा ठराव क्र.८८७ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मा.महासभा ठराव क्रं.९२७ दि.०७/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, मा.महासभा ठराव क्रं.९४१ दि.२१/१०/२०२२, मा.महासभा ठराव क्रं.९७७ दि.२३/१२/२०२२ मा.महासभा ठराव क्र.१००१ दि.१५/०२/२०२३, मा.महासभा ठराव क्र.१०४४ दि.२१/०३/२०२३, मा.महासभा ठराव क्र.१०९३ दि.२१/०४/२०२३, मा.महासभा ठराव क्र.१०९४ दि.२१/०४/२०२३, मा.महासभा ठराव क्रं.११३४ दि.३०/०५/२०२३, मा.महासभा ठराव क्रं.१२०३ दि.०७/०७/२०२३, मा.महासभा ठराव क्रं.१२०४ दि.०७/०७/२०२३ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभागप्रमुखांच्या मागणीनुसार दि.२७/०६/२०२२ ते आजपावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोयीचे होईल.

सबब इंधन (डिझेल) खरेदी करणे कामी दुसऱ्या वेळेस ई-निविदा सुचना क्रं.३२८ सन-२०२३-२४ दि.०३/०७/२०२३ अन्वये दुसऱ्या वेळेस ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. परंतु सदर ई-निविदेत एकही ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेली नसल्याने सदर कामाच्या ई-निविदे प्रक्रीयेस प्रतिसाद मिळत नसल्याने तिसऱ्या वेळेस फेर ई-निविदा प्रसिध्द करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर निविदा प्रक्रीया अंतिम होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२३-२४/०४ दि.१७/०७/२०२३ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,२९,३२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास तसेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने डिझेल खरेदीची नियमित निविदा प्रक्रिया तात्काळ पुर्ण करावी. तसेच वाहनांसाठीची इंधनाची मागणी व सदर वाहनाचे इंधनासाठीची गरज याबाबत खात्री करुन डिझेल पुरवठा करणेची वाहन विभागाने दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.५१ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. बोला बोला.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२७१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१०४ दि.३०/०६/२०२३ अन्वये नाविण्यपुर्ण योजना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०८ येथे २४ नग, प्रभाग क्रं.०९ येथे २४ नग, प्रभाग क्रं.१० येथे १६ नग, प्रभाग क्रं.१२ येथे १६, प्रभाग क्रं.१३ येथे २४ नग असे एकुण १०४ नग बाक बसविणे कामी मक्तेदार श्री.राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन रक्कम रु.९,९८,४००/- मात्र खर्चाची संविदा.
२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१०५ दि.३०/०६/२०२३ अन्वये नाविण्यपुर्ण योजना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०२ येथे ०८ नग, प्रभाग क्रं.०३ येथे १९ नग, प्रभाग क्रं.०४ येथे २४ नग, प्रभाग क्रं.०६ येथे ३२, प्रभाग क्रं.०७ येथे २४ नग असे एकुण १०४ नग बाक बसविणे कामी मक्तेदार श्री.राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन रक्कम रु.९,९८,४००/- मात्र खर्चाची संविदा.
३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१०६ दि.३०/०६/२०२३ अन्वये नाविण्यपुर्ण योजना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१२ ते १७ मध्ये प्रत्येकी १५ नग बाक व प्रभाग क्रं.१८ व १९ मध्ये प्रत्येकी ०७ असे एकुण १०४ नग बाक बसविणे कामी मक्तेदार श्री.राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन रक्कम रु.९,९८,४००/- मात्र खर्चाची संविदा.
४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१०७ दि.३०/०६/२०२३ अन्वये नाविण्यपुर्ण योजना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१४ येथे १६ नग, प्रभाग क्रं.१६ येथे १६ नग, प्रभाग क्रं.०१ येथे १६ नग, प्रभाग क्रं.१२ येथे १६, व इतर परिसरात ५६ नग असे एकुण १०४ नग बाक बसविणे कामी मक्तेदार श्री.राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन रक्कम रु.९,९८,४००/- मात्र खर्चाची संविदा.
५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१०८ दि.३०/०६/२०२३ अन्वये नाविण्यपुर्ण योजना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०१ ते ०८ मध्ये प्रत्येकी १० नग बाक व प्रभाग क्रं.०९ व १० मध्ये प्रत्येकी १२ असे एकुण १०४ नग बाक बसविणे कामी मक्तेदार श्री.राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन रक्कम रु.९,९८,४००/- मात्र खर्चाची संविदा.
६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./११० दि.०३/०७/२०२३ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.०७ अंतर्गत जळगांव शिवार मधील सिटी सर्वे नं.८०७५ विजय कॉलनी येथील मनपा ओपनस्पेस मध्ये पाथवे तयार करणे कामी मक्तेदार श्री.अजिंक्य सुनिल पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन रक्कम रु.९,९९,७०१/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)
७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१११ दि.०३/०७/२०२३ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.०७ अंतर्गत जळगांव शिवार मधील सिटी सर्वे नं.८३९९ गजानन कॉलनी येथील मनपा ओपनस्पेस मध्ये पाथवे तयार करणे कामी मक्तेदार श्री.अजिंक्य सुनिल पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी चे स्विकृत करुन रक्कम रु.७,७९,३२२/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

८. प्रशासकीय आदेश क्रं./५३ दि.२०/०७/२०२३ अन्वये पाणी पुरवठा विभाग सन-२०२३-२४ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा विभागा अंतर्गत वाघुर योजनेच्या १५०० मीमी ते ४५७ मीमी पी.एस.सी. व एम.एस. पाईपलाईन तसेच एअर व्हॉल दुरुस्ती करणे कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे,जळगांव यांचे निविदा रक्कमेपेक्षा १.५००% जास्तीचे दर सर्वात कमी चे स्विकृत करुन रक्कम रु.२४,९०,०५७/- मात्र खर्चाची संविदा.

९. प्रशासकीय आदेश क्रं./वाहन/०७ दि.०४/०५/२०२३ अन्वये मनपा मालकीच्या अत्यावश्यक सेवेत कार्यरत असलेल्या विविध वाहनांकरिता सर्वो कंपनीचे 15W40 इंजिन ऑईल-१ बॅरल पुरवठा करणे कामी मक्तेदार Morya Trading Company, Jalgaon यांचे सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.६१,७०२/- मात्र खर्चाची संविदा.

१०. प्रशासकीय आदेश क्रं./जा.क्र./जमनपा/आस्था/८९३ दि.२०/०७/२०२३ अन्वये आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२५-२६ या आर्थिक वर्षातील कर्मचारी, मक्तेदार/सप्लायर्स यांचे फॉर्म नं. 24 Q व 26 Q form no.16 A तसेच शासनाकडून वेळोवेळी पारीत झालेले विहीत फॉर्म तयार करुन त्याच्या सॉफ्ट तसेच हार्ड कॉपी दोन प्रतीमध्ये पुरविणे कामी सनदी लेखापाल शाम सदरिया ॲन्ड असोसिएटस,जळगांव यांचे सर्वात कमी चे दर स्विकृत करुन रक्कम रु.१,८०,०००/- मात्र खर्चाची संविदा.

११. प्रशासकीय आदेश क्रं./विदयुत/०९ दि.१३/०६/२०२३ अन्वये मनपाने U-HWC (आरोग्यवर्धिनी) साठीच्या निश्चित स्थळा ठिकाणी नवीन इले.फिटींग व विदयुत संबधीची कामे करणे कामी मक्तेदार वरद इलेक्ट्रीकल्स,वर्क्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेत सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.५,१८,४६६/- मात्र खर्चाची संविदा.

१२. प्रशासकीय आदेश क्रं./विदयुत/१५ दि.२७/०७/२०२३ अन्वये जळगांव शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रं.५३ (जुना राष्ट्रीय महामार्ग क्रं.६) वरील राधीका हॉटेल ते एकवीरा गार्डन पर्यंत महामार्गावरील प्रकाश व्यवस्था करणे कामी ११ मीटर उंचीचे पोलसह असलेल्या जुन्या यंत्रणेची दुरुस्ती करणे कामी मक्तेदार न्यु.आर.के.इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेत सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.६,७३,५०३/- मात्र खर्चाची संविदा.

१३. प्रशासकीय आदेश क्रं./७३ दि.०३/०८/२०२३ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा विभागा अंतर्गत वाघुर रॉवाटर पंपींग स्टेशन येथे बाबवार दराप्रमाणे वार्षिक स्वरुपात सबस्टेशन व पंपींग स्टेशन अंतर्गत आवश्यकतेनुसार विविध उपकरणे व साहित्य पुरविणे व दुरुस्ती करणे कामी मक्तेदार मे.चोपडे इलेक्ट्रीकल्स एन्टप्राईजेस,श्रध्दानगर पारस, बालापुर जि.अकोला यांचे बाबवार दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.२४,९१,४४०/- मात्र खर्चाची संविदा.

१४. प्रशासकीय आदेश क्रं./विदयुत/१८ दि.१०/०८/२०२३ अन्वये जळगांव शहरात विविध प्रभागात संपुर्ण शहरासाठी १२.५ मीटर उंचीचे हायमास्ट व ९ मीटर उंचीचे मिनी हायमास्ट लॅम्प लावणे (LED लाईट वगळुन) कामी मक्तेदार सत्यम इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इंजिनियर्स,भुसावळ यांचे निविदेतील सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.१६,८८,९९९/- मात्र खर्चाची संविदा

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ४०**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**श्री.प्रशांत नाईक :-** हा जो शौचालयाचा विषय आहे. हे आपले जे खासदार साहेब यांनी आपल्या जळगांव शहरामध्ये ५१,५१/१,५१/२,/५१/३,५१/४,५१/५ या ठिकाणी जे बाकडे दिलेले आहे. हे बाकडे आपण स्थानिक आमदार निधीतुन करतो,

हे जे खासदार साहेब आहे यांनी बाकडे दिलेले आहे येथे. या बाकडेची किंमत आहे रु.३३००/- जी.एस.टी.सोबत आपण त्यांना देतो आहे रु.८२००/- याच्यात सरळ सरळ जो आकडा निघतो आहे या ५ संविदांचा रु.४२,१२,६५५/- आणि त्याची किंमत ओरिजीनल जर धरली तर रु.१७,१६,०००/- आहे फक्त. आणि आपण या बाकड्यांवर रु.२४,९४,६९५/- जास्त देतो आहे. हे माझ्याकडे बिल आहे ज्यानी बाकडे पुरविले. हे माझ्याकडे पक्के बिल आहे जी.एस.टी.सहीत. शहरात प्रभाग क्र.५ आणि १५ सोडुन संपुर्ण प्रभागात आहे ते. हे खासदारांचे बाकडे आहे. हे खासदारांनी जिथुन बाकडे घेतले तिथलेच बिल आणले आहे आपण. रु.३३००/- जागेवर फिटींग सहीत. तिथुन पक्के बिल आणलेले आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** तेथे रेट काय लावलेले आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** रु.३३००/- येथे रु.८१००/- लावले आहे ज्याची ओरिजीनल किंमत रु.३३००/- आहे. बिल आहे आपल्याकडे जी.एस.टीचे पक्के बिल आहे. जागेवर फिटींग करुन देणार आहे तो आपल्याला. बाकडे पाहिले तर किती आहे ५२० बाकडे आहे. येथे लोकांना रस्त्यांचे ठिकाण नाही.

**मा.उपमहापौर :-** जसे नितीनभाऊंनी सांगितले, घरात नाही लाकडे पण शहरात पाहिजे बाकडे असे आहे ते.

**श्री.प्रशांत नाईक :-** राजुमामा आमदार आहे आपण त्यांना म्हणतो की, लाईट आणि बाकडे बसु नका आणि खासदार काय आहे मग. एक जण बोलत नाही. ऐवढे ५२० बाकडे पुरविले जात आहे शहरामध्ये. खासदारांच्या या विषयाचा मी निषेध करतो महापौर महोदया.

**श्री.अनंत जोशी :-** मॅडम, फुलमोगरे साहेब आलेत.

**अॅड.शुचिता हाडा :-** सन्मा.सदस्या भारतीताईंच्या वतीने एक विषय मी मांडत आहे येथे. जळगांव शहरात अनेक ठिकठिकाणी नव्याने महादेव मंदिरांची निर्मीती झालेली आहे. मंदिरांचे प्रमाण ही खुप मोठया प्रमाणात वाढलेले आहे. तेथे लोकं हार फुले अर्पण करत असतात. नंतर सगळया निर्माल्या हे सुध्दा शेवटी घंटागाडीतच टाकल्या जात आहे. अनेक मोठया शहरांमध्ये निर्माल्य संकलनासाठी वेगळी गाडी असते. आमची सदस्यांची ही ईच्छा आहे आणि नागरीकांची सुध्दा मागणी आहे. जर निर्माल्य संकलनासाठी जर कधी वेगळी व्यवस्था करु शकेल. एक स्वतंत्र गाडी जर त्याच्यासाठी ठेवावी. प्रत्येक प्रभागासाठी वार जरी ठरवुन दिला. आठवडयातुन एकदा जरी ती प्रभागात आली. तरी सुध्दा त्याचे पावित्र सुध्दा राखले जाईल. नागरीकांच्या भावनांचा सुध्दा आदर केला जाईल. तर अशी व्यवस्था करण्याची मागणी करण्यात येत आहे.

**श्री.अनंत जोशी :-** ताई.

**मा.महापौर :-** पुर्वी अश्या गाडीचे आयोजन केलेले होते. त्या अनुषंगाने त्यांचे अभिनंदनच. त्या अनुषंगाने संपुर्ण शहरात तशी योजना राबवावी म्हणुन मी उदय पाटील साहेब आणि आयुक्त मॅडमांना तसे पत्र पाठविलेले आहे. त्या अनुषंगाने आपण शहरात कसे आयोजन करु न घंटागाड्या किंवा इतर गाडयांच नियोजन करायचे सांगितले आहे. तसे नियोजन सुरु आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्याचे संकलन करुन कुठे टाकणार परत कचऱ्यात, त्याची पण काही तरी व्यवस्था करा ना.

**मा.महापौर :-** नाही त्याची वेगळी व्यवस्था करावी लागेल.

**श्री.अनंत जोशी :-** मगाशी मी कर्मचाऱ्यांबद्दल बोललो होतो प्रभाग समिती क्र.४ मधील ज्यांनी अॅडव्हान्स सही केलेली होती. त्याच्या बद्दल मी मागच्या महासभेत पण बोललो होतो की, मला पुढच्या महासभेला कन्टीनीव्ह करायच आहे म्हणुन त्या बद्दल मी सकाळी आपल्याशी व्ययक्तीक बोललो होतो. आता यांना मी कमीत कमी १० -१५ दिवसापुर्वी पत्र दिलेले होते की, येणाऱ्या महासभेत मला या विषयावर चर्चा करणे कामी परवानगी मिळावी. पत्र देखील दिलेले होते. आता याच्याशी संबंधीत जी लोकं आहे जसे प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.०४ ज्यांच्याकडे चार्ज दिलेला आहे. दिपक फुलमोगरे साहेब, आय.जी.पाटील साहेब, आपण एक टिम निवडली होती. पथक नेमलं होत. ते दोन लोक, रविभाऊ आपले आणि शिंदे दादा आपले त्यांना सगळयांना बोलवा आणि बाविस्कर साहेब आपले आहेतच. फुलमोगरे साहेब. काय झाले मॅडम ?

**मा.आयुक्त :-** त्या अनुषंगाने मी विचारले, बाकी कोण उपस्थित आहे सांगा.

**श्री.गणेश सोनार :-** त्यांची तब्येत खराब आहे आणि फुलमोगरे रजेवर आहे.

**श्री.अनंत जोशी :-** गणेशभाऊ जाऊ द्या. मी सांगतो, मॅडम विषय असा आहे की, चुक माझी झाली, हे जे दिपक फुलमोगरे आहे यांना ३-४ दिवसापुर्वी मी सांगुन आलो, यांनाही सांगुन आलो होतो. आय.जी.पाटीलांना ही सांगुन आलो होतो की, तुम्हाला महासभेत आयुक्त मॅडमांसमोर बोलण करणार आहे. यांना ही सांगितले होते दिपक फुलमोगरेंना ही सांगितले होते की, तुम्ही तयार रहा, पुढच्या महासभेत तुम्हाला आयुक्त मॅडमांसमोर उभे राहायचे आहे म्हणुन माझी चुक झाली, म्हणुन आज दिपक फुलमोगरेंनी सुट्टी टाकलेली आहे. आता माझी विनंती अशी आहे.

आता विषय असा आहे मॅडम की, आता १७ तारखेला आमची टर्म संपत आहे, पाच वर्ष आमचे संपत आहे. कदाचित महापौर मॅडम एखादी मिटींग लावतील, आज जी चुक मी केली, तीन तास सर्वांचे ऐकले, सभागृहाला ही विनंती आहे महापौरांना ही विनंती आहे जेव्हा ही महासभा लागेल, सगळयात आधी वंदेमातरम आदी माझा विषय घ्यावा. आजच करतो आहे सगळयांना विनंती करतो आहे. शेवटची सभा आहे मला बोलु द्यायचे. दुसरा विषय ज्यांनी आज सुट्टी टाकली, दिपक फुलमोगरे, यांनी का सुट्टी टाकली याचे कारण मी तुम्हाला सांगितले, तुमचे कर्मचारी अधिकारी आहे पण मला माहित आहे सुट्टी का टाकली, त्यांना आजच सांगा पुढची जेव्हा महासभा असेल काही जरी कारण असले, तरी चंद्रयानात जायच असेल त्यांना तरी सुट्टी देता येणार नाही तुम्ही आजच सांगा त्यांना. त्यांना कल्पना द्या फुलमोगरेंना आणि आय.जी.पाटीलांना आणि ते आस्थापनेतील दोन लोकं, मॅडम कसं आहे प्रशासनाची किती भिती आहे मला माहित नाही. पण मी जे काही केले आहे मी जे काही पाठपुरावा करतो आहे. मेरा तो डर है. म्हणजे जी व्यक्ती जी कर्मचारी २५-३० वर्ष काम न करता पगार घेत आहे.आणि सह्या करुन निघुन जाते, मी तुमच्याकडे सी.सी.टीव्ही साठी मागणी दिली, प्रत्येक ठिकाणी प्रत्येक रुममध्ये लागले, जो व्यक्ती फक्त सह्यांची पगार घेत होता. किमान तो रजा टाकायला लागला आहे. आता मेडीकल रजा टाकली आहे. आता फक्त सही करुन निघुन जात नाही. पण रजा तरी टाकत आहे. ये मेरा डर है. याच्यानंतर तुमचे दिपक फुलमोगरे जे आहे, आज येथे सिध्द करायचे होते त्यांनी काय काय लिहलेले आहे, बाविस्कर साहेबांनी काय काय लिहलेले आहे. आय.जी.पाटील असतील,तुमचे दिपक फुलमोगरे असतील, बाविस्कर साहेब असतील, हे सगळे कागदपत्र माझ्या कडे आहे. गेल्या महासभेत माझ्याकडे कागदपत्र नव्हते, अर्धवट होते अपुर्ण होते. आज माझ्याकडे सगळं आहे.पुढच्या महासभेमध्ये शेवटची जरी असली, तर मला याच्यावर बोलण्याची संधी महापौरताई द्यावी आणि मी याच्यावर बोलणार आहे. आणि त्याच्यानंतर तुम्हाला कार्यवाही करावी लागेल. यांच सगळ मी तुमच्या समोर मांडणार आहे. हे बाविस्कर साहेब असतील, हे फुलमोगरे असतील, हे आय.जी.पाटील असतील, आणि आता हा विषय फक्त त्या कर्मचाऱ्यांपुरता नाही राहिला, ज्या कर्मचाऱ्याचा विषय मी वारंवार मांडतो आहे, आता हा फक्त त्याचा विषय नाही राहिला, आपले आय.जी.पाटील हे पण त्रासात येतील, तुमचे दिपक फुलमोगरे आहे ना हे पण त्रासात येतील कारण यांनी चुकीच्या पध्दतीने मदत केलेली आहे. यांनी पण मोठे अधिकारी आहे. यांनी काय केलेले आहे ते पण सांगेल तुम्हाला मी.

**श्री.प्रशांत नाईक** :- नाही पण कार्यवाही होईल का ? पुढची मिटींग लागेल का ?

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताईंना सांगितले, आयुक्त मॅडमांना बोललो मी कार्यवाही करावी लागेल. कसे आहे मॅडम हा न्याय मला कळला नाही. एका नगरसेविकेचे पती आहे त्यांना लगेच सस्पेन्ड केले तुम्ही. असा नसतो न्याय वेगवेगळा न्याय कसा काय ? आताही सांगतो पुढच्या मिटींगला ही सांगेल. तुम्हाला कार्यवाही करावी लागेल. आणि प्रशांतभाऊचा जो प्रश्न होता मिटींग लागेल का ? महापौरांनी सांगितले आहे की, मिटींग लागेल म्हणुन आपली टर्म संपायच्या आधी. समजा नाही लागली. मी असे नाही म्हणत मी पुन्हा येईल. मी म्हणणार नाही. मी पुढच्या पंचवार्षिकला नक्की येईल आणि मी पिछा सोडणार नाही. त्यावेळेस आयुक्त आपणच असणार आहे. मी बोलुन नाही दाखवतो पण मी नक्की येईल. आणि पुढच्या पंचवार्षिकला माझा हा विषय चालु राहील. प्रत्येक महासभेत सुरु राहील.जोपर्यंत त्या व्यक्तीवर कार्यवाही होत नाही तोपर्यंत.

**मा.महापौर :-** महापालिकेची मुदत लवकर संपणार असल्यामुळे आज दि.२३/०८/२०२३ बुधवार रोजी महासभा क्र.५२ च्या महासभेमध्ये जे सभा कामकाज, ठराव व चर्चा झालेली आहे ती आजच्या महासभेत येथेच कायम करण्यात येत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सरदार वल्लभभाई पटेलांचा पुतळयाचा जो विषय आहे भारत रत्न लोहपुरुष तर त्यावेळेस महापौर सिमाताई भोळे पण होत्या. त्यांच्या वेळेत ठराव झालेला होता. त्यांच्या अभिनंदनाचा विषय त्यावेळेस माझ्याकडुन राहुन गेला. सुनिलभाऊ खडकेंनी ही केले होते त्यांचे ही अभिनंदन. आणि इस्रोचा चंद्रयाण २० मिनीटात उतरत आहे. त्यांचे ही सगळयांचे अभिनंदन. आणि प्रार्थना करु की, आपले चंद्रयाण यशस्वी रित्या आज चंद्रावर लॅन्ड होईल.

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीतला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**